# अर्थसंवाद

खंड 24, अंक 1
एप्रिल - जून , 2000
भारतीय सौर चैत्र-ज्येष्ठ, 1922



वि.म. दांडेकर

- आंतरराष्ट्रीय भांडवलाचे स्वरूप
- मार्क्सच्या दृष्टिकोनातून भारतीय समाजातील वर्गकलह
- संघटित कामगारांची भूमिका
- जागतिक व्यापार संघटना आणि अविकसित राष्ट्रे
- महाराष्ट्रातील औद्योगिक विकास : आधारभूत संरचना
- केन्स : व्यक्ती व विचारांची ओळख

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

Vinayak Deshpande

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।


मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 24, अंक 1

एप्रिल-जून, 2000



■ प्रमुख संपादक ■
रवीन्द्र दोशी

■ सहायक संपादक ■
विनायक देशपांडे

■ सल्लागार मंडळ ■
(2000 - 03)

माधव दातार
सुहास सहस्त्रबुद्धे
मुक्ता जहागिरदार
सर्जेराव ठोंबरे



■ संपादकीय पत्रव्यवहार ■
रवीन्द्र दोशी,
526/1, सूर्यवंशी लेआऊट,
प्लॉट क्र. 3, 'एलोरा गार्डन'
अपार्टमेंटस् समोर,
सम्राट नगर,
कोल्हापूर - 416 008
दूरध्वनी :
(0231) 690963


## अनुक्रमणिका


1 आंतरराष्ट्रीय भांडवलाचे आजचे स्वरूप व भारताचे वित्तीय शिथिलीकरणाचे धोरण
*चंद्रकांत केळकर*

15 मार्क्सच्या दृष्टिकोनातून भारतीय समाजातील वर्गकलह
*लतिका अरगडे*

32 संघटित कामगारांची भूमिका
*माधव दातार*

40 जागतिक व्यापार संघटना आणि अविकसित राष्ट्रे
*नलिनी पंडित*

50 टिपणे
*अंजली कुलकर्णी / विनायक देशपांडे / शीतल महाडिक / पुष्पा तायडे*

73 महाराष्ट्रातील औद्योगिक विकास
*चंद्रहास स. देशपांडे*

79 अर्थ शब्दांची वाट पाहे
*शि. ना. झाने*

82 केन्स : व्यक्ती व विचारांची ओळख
*दि. व्यं. जहागिरदार*

89 सांख्यिकी पुरवणी - 33
*रवीन्द्र दोशी*


**(मुखपृष्ठ : वि. म. दांडेकर)**

# मराठी अर्थशास्त्र परिषद


**कार्यकारी-मंडळ**
(2000 - 01)

**अध्यक्ष**
भालचंद्र मुणगेकर

**कार्याध्यक्ष**
व्यं.सु. पाटणकर

**कार्यवाह-खजिनदार**
आ.गो. पुजारी

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**
रवीन्द्र दोशी

**सदस्य**
गुरुशांतप्पा हरकूड
कालिदास जोशी
श्रीहरी मिसाळ
सुधाकर अंभोरे
पांडुरंग गावडे
संपत गंभीरे
शरणाप्पा मानकरी
गोविंद हडप
कैलास पाटील
अरुणा सावंत
शमा दलवाई
राजू झाडबुके


**● कार्यालयीन पत्रव्यवहार**

(वर्गणी पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, 'अर्थसंवाद' वितरणाविषयी पत्रव्यवहार, इत्यादी)


डॉ. आ. गो. पुजारी,
कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
किल्ला भाग, मंगळवेढा (जि. सोलापूर) 413 305
(दूरध्वनी : 02188-20556)


**● परिषदेचे प्रमुख कार्यालय**


मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज,एस. एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट क्र. 6, 'एफ' ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व),
मुंबई 400 051.


**● वर्गणी :**

*(अ) परिषदेचे सदस्य*

(1) आजीव सदस्य : रु. 800 (एकरकमी)
(2) साधारण सदस्य : रु. 150 (वार्षिक)
(3) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 150 (वार्षिक)
व्यावसायिक संस्था : रु. 200 (वार्षिक)
(※ परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.)

*(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार*

ग्रंथालये : रु. 150 (वार्षिक)

*(इ) वर्षगणना :* 1 एप्रिल ते 31 मार्च

※ वर्गणी मनी ऑर्डरने वा डिमांड ड्राफ्टने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी; संपादकाकडे पाठवू नये.


● 'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :
(1) पश्चिम विभागीय केन्द्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई.
(2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. (टीप : म.रा.सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

# आंतरराष्ट्रीय भांडवलाचे आजचे स्वरुप व भारताचे वित्तीय शिथिलीकरणाचे धोरण ⁂

चंद्रकांत केळकर ⁂⁂

'पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान' देण्याकरिता संबंधित विश्वस्त व मराठी अर्थशास्त्र परिषद यानी मला निमंत्रित केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. पां. वा. गाडगीळ यांच्या 'दास कॅपिटल' या मार्क्सच्या जगद्विख्यात ग्रंथाच्या सुबोध भाषांतराने त्यानी माझी मार्क्सच्या विचाराशी प्राथमिक ओळख करून दिली. स्वतः पां. वा. गाडगीळ हेही काही प्रमाणात त्याच तत्त्वज्ञानाने भारलेले होते. कोणत्याही कठीण विषयावर सुबोध मराठीमध्ये लिहिण्याच्या त्यांच्या हातोटीबद्दल प्र.के. अत्रे यानी त्यांची एकदा स्तुती केल्याचे मला आठवते. पां. वा. गाडगीळांच्या लेखनातील सुबोधपणा माझ्या व्याख्यानामध्ये आहे की नाही याची मला खात्री नाही. परंतु आज पां. वा. गाडगीळ जर आपल्यामध्ये उपस्थित असते तर त्याना ज्या दृष्टिकोनातून आणि ज्या विषयावर पोटतिडिकीने लिहिणे, बोलणे आवश्यक वाटले असते, अशा विषयावर आपल्याशी बोलावे असे मी ठरविले आहे.

"And despite the existence of the inherent risks of free capital flows, the Wall Street (US) Treasury complex is currently proceeding on the self-serving assumption that the ideal world is indeed one of free capital flows, with I.M.F. and its bailouts at the apex in the role that guarantees its survival and enhances its status. But the weight of evidence and the force of logic point in the opposite direction, towards restrain on capital flows. It is time to shift the burden of proofs from those who oppose to those who favour liberated capital". (Jagdish Bhagwati, 'The Capital Myth', *Foreign Affairs,* May-June,1998.)

*⁂ मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मुळजी जेठा महाविद्यालय, जळगांव येथे 10 एप्रिल, 2000 रोजी झालेले पत्रकार पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान.*

*⁂⁂ भूतपूर्व प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालय, मुंबई.*

आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये वस्तू व सेवा यांची आयात निर्यात होत असते. गेल्या 15 ते 20 वर्षांत आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवहारांमध्ये जो कायापालट झाला आहे त्याचे बदललेले स्वरूप, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, त्याचे परिणाम, भारतासारख्या विकसनशील देशांना या बदललेल्या वित्तीय बाजारांपासून कोणते धोके आहेत, वगैरे प्रश्नांची चर्चा या व्याख्यानात करावयाची आहे. 1990 नंतर भारताच्या अर्थव्यवस्थेने ज्या दिशेने वाटचाल केली त्याचे वर्णन भारताची 'बाजाराधिष्ठित आर्थिक घडण' असे केले जाते. खरे तर, या धोरणाला पूरक असे भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक शिथिलीकरणाचे धोरण भारताने ज्यावेळी 'आंतरराष्ट्रीय नाणे निधी'चे 1969 साली पहिले कर्ज घेतले त्यावेळीच सुरू झाले. त्यानंतर 1990 पर्यंत उद्योग व आंतरराष्ट्रीय व्यापार या क्षेत्रांमध्ये क्रमशः आर्थिक नियोजनाच्या धोरणाला मुरड घालून मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले गेले. या नवीन धोरणाचाच एक अटळ असा भाग म्हणजे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत निर्नियंत्रण स्वीकारण्याचा.

## बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थांचा आग्रह का ?

पाश्चात्य राष्ट्रांच्या वसाहती नष्ट होऊन वसाहतींना राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बहुतेक राष्ट्रांनी त्यांच्या आर्थिक विकासाकरिता नियोजनाचा अवलंब केला. आयात पर्यायाचे धोरण स्वीकारून या राष्ट्रांनी आपल्या उद्योगांना संरक्षण देण्याचे धोरण स्वीकारले. त्याकरिता आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर आवश्यक ती नियंत्रणे घातली. त्या प्रयत्नांच्या साहाय्याने भारतासारख्या काही राष्ट्रांनी आर्थिक विकासाचा काही एक टप्पा गाठला. दरम्यान दक्षिण-पूर्व आशियातील दक्षिण कोरिया, हाँगकाँग, तैवान व सिंगापूर या देशांनी निर्यातीच्या वाढीतून विकास साधण्याचे धोरण अंगिकारले ; त्यांचे थायलंड, फिलिपिन्स, इंडोनेशिया, मलेशिया यासारख्या राष्ट्रांनी अनुकरण केले.

1970 ते 1995 या 25 वर्षांत दक्षिणपूर्व आशियातील राष्ट्रांनी जो लक्षणीय असा आर्थिक विकासाचा वेग साधला त्याचे आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक यानी 'बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थांच्या विकासाचे आशियाई अभूतपूर्व आश्चर्य (miracle) असे वर्णन केले आणि तीच बाजाराधिष्ठित अर्थनीती इतर विकसनशील अर्थव्यवस्थांनी स्वीकारावी असा आग्रह धरला. ज्यावेळी मध्यपूर्वेतील राष्ट्रांनी क्रूड तेलाचे भाव 1973 व 1979 अशा दोन वेळा वाढविले त्यावेळी विकसनशील देशांचे मुळातच ऋण असलेले आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद अधिक ऋण झाले आणि त्याना ही ताळेबंदातील तूट भरण्याकरिता 'निधी'कडून कर्ज घेणे भाग पडले. अशावेळी या दोन संस्थांनी विकसनशील देशांना कर्ज देताना आर्थिक नियोजनाचे धोरण सोडून देऊन त्याना त्यांच्या अर्थव्यवस्थांचे शिथिलीकरण करण्यास भाग पडले.

वस्तुतः दक्षिण-पूर्व आशियातील देशांचे विकासाच्या प्रयत्नांचे यश आवश्यक तेथे आणि आवश्यक तेवढ्या शासकीय हस्तक्षेपामध्ये सामावलेले होते. एवढेच नव्हे तर, जर्मनी व अमेरिका या देशांचा आर्थिक विकासाचा इतिहास हेच सांगतो की, त्यांचा विकास शासनाच्या हस्तक्षेपामुळेच झाला; किंबहुना, आजही अमेरिका, युरोप आवश्यक वाटेल त्यावेळी हस्तक्षेपाचेच धोरण आचरतात. अगदी अलीकडे माहिती तंत्रविज्ञानाच्या विकासामध्ये जपानला मागे टाकण्याकरिता अमेरिकेच्या शासनाने संशोधनावर भर देण्याचे धोरण अंगिकारावे, असा आग्रह अमेरिकेमध्ये धरला जात होता. थोडक्यात, भांडवलशाही देशांचा आर्थिक विकास व अभिवृद्धी संरक्षणाच्या भिंतीआडच झाला असल्याचे आर्थिक इतिहास सांगतो.

प्रगत भांडवलशाही देशांनी दुसऱ्या महायुद्धाच्या विध्वंसाच्या खुणा पुसून टाकून सुवर्णकाळ अनुभवला, त्यानंतर अमेरिका, पश्चिम युरोप व जपान या देशांकडे गुंतवणूक करण्यासाठी प्रचंड प्रमाणात भांडवल निर्माण झाले. या भांडवलाची विकसनशील देशांमध्ये गुंतवणूक

करावयाची तर त्यानी त्यांच्या आर्थिक विकासाकरिता उभारलेल्या संरक्षक भिंती पाडणे आवश्यक होते. त्याकरिता 1980 नंतर 'बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेच्या धोरणा'च्या पुरस्काराचा आग्रह 'निधी' व जागतिक बँक यानी धरण्यास सुरुवात केली. विदेशी म्हणजेच प्रगत देशांच्या वस्तू, सेवा व भांडवल यांच्या आयात-निर्यातीला विकसनशील देशांनी आपल्या अर्थव्यवस्था खुल्या कराव्यात, असे दडपण विकसनशील देशांवर येऊ लागले. 'बाजाराधिष्ठित आर्थिक धोरणा'च्या नव्या आग्रहाचे थोडक्यात असे धोरणाभिमुख अर्थशास्त्र आहे. जागतिक भांडवलाचे जे आजचे स्वरूप आहे ते या खुल्या आर्थिक धोरणाची परिणती आहे असे म्हणता येईल.

### जागतिक भांडवलाचे वाढलेले महत्त्व

आज आंतरराष्ट्रीय व्यवहार होतात त्यामध्ये वित्तीय व्यवहार तसेच सेवा व वस्तू यांच्या आयातनिर्यातीचे व्यवहार अंतर्भूत होतात. जगातील देशांदेशांमध्ये होणारी वस्तूंची आयातनिर्यात कमीत कमी उत्पादन परिव्ययात व्हावी, यासाठी अर्थव्यवस्था मुक्त ठेवण्याचा आग्रह केला जातो. परंतु वास्तवात जगातील राष्ट्रांच्या परस्पर व्यापाराचे वार्षिक मूल्य 2,700 अब्ज डॉलर इतकेच आहे, तर वित्तीय बाजारामध्ये दररोजच्या होणाऱ्या वित्तीय व्यवहाराचे मूल्य 1,300 अब्ज डॉलर इतके असते.

विनिमयाचे माध्यम व मूल्याचा संचय ही पैशाची दोन महत्त्वाची कार्ये आहेत. त्यामुळे पैशाच्या वापराने आर्थिक व्यवहार सुकर होतात. ज्यावेळी विनिमयाच्या व्यवहारासाठी चलन वंगण म्हणून काम करते त्यावेळी व्यवहारांची गती वाढते हे खरे. पण अशावेळी व्यवहारांची ही गती आर्थिक व्यवहार कर्ता ठरवितो हे महत्त्वाचे आहे. वर उल्लेखिलेल्या वास्तव व्यवहारांच्या मूल्याशी केवळ वित्तीय व्यवहारांच्या मूल्याची तुलना केल्यास हे लक्षात येईल की, 'वंगण' केवळ व्यवहार सोपे करून थांबत नाही तर तेच आता त्या व्यवहारांची गती ठरवीत आहे. त्या गतीचे विनियमन करण्याचे स्वातंत्र्य आता व्यवहारकर्त्यांच्या हातात राहिलेले नाही. अर्थव्यवस्थेमधील वित्तीय क्षेत्राने वास्तव अर्थव्यवस्थेवर केलेली ही कुरघोडीच आहे.

### जागतिक भांडवलाची विध्वंसकता

दिनांक 19 ऑक्टोबर, 1987 च्या 'काळ्या सोमवारी' न्यू यॉर्क स्टॉक एक्सचेंज (NYSE) मध्ये पहिल्या एका तासात एकूण समभागांच्या किमतीच्या 22.7 टक्के समभाग नष्ट झाले. जागतिक भांडवलाच्या या विध्वंसक शक्तीची तुलना एका अर्थशास्त्रज्ञाने अणुबॉबशीच केली आहे. 1930 च्या 'महामंदी' ची सुरुवात 28 ऑक्टोबर, 1929 ला NYSE च्या कोसळण्यानेच झाली होती. त्याच्याशी तुलना करता 1987 मधील NYSE वरचे संकट अधिक तीव्र होते. तथापी, 1929 च्या अरिष्टाचे वर्णन 'महामंदी' असे केले जाते, तर अलीकडच्या समभाग बाजारातील अरिष्टांना अर्थव्यवस्थेचे विचलन (aberration) समजले जाते आणि त्या दृष्टिकोनातून त्याच्यावर उपाययोजना सुचविली जाते. वित्तीय बाजारातील आपत्ती किती अचानकपणे कोसळतात आणि त्याविषयीचा अंदाज अर्थशास्त्रज्ञांनाही कसा येत नाही हे पाहण्यासारखे आहे. 1929 साली NYSE कोसळण्यापूर्वी आयर्विन फिशर या अर्थशास्त्रज्ञाने 1928 मध्ये 'सारे काही ठीक आहे,' असा निर्वाळा दिला होता. ''समभागाच्या किंमती घटतील असे वाटण्यासारखे काही घडणार नाही,'' असे भविष्य फिशर यानी महामंदी च्या केवळ दोन महिने आधी वर्तविले होते ; तीव्र मंदीचा आभासही त्याना झाला नव्हता.

आजच्या काळात जेव्हा प्रचंड क्षमता असलेली संपर्क साधने अस्तित्वात आहेत त्यावेळच्या मेक्सिको व द. पू. आशियाई राष्ट्रांतील आर्थिक आपत्तीविषयीचा अनुभवही वेगळा नाही. थायलंडचे बाथ हे चलन जुलै, 1997 मध्ये कोसळून त्याची साथ जवळच्या देशांमध्ये पसरण्यापूर्वी 'निधी' चे या अरिष्टाविषयीचे भाष्यही हीच उणीव दर्शविते. देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार

ताळेबंदावर देखरेख ठेऊन त्या त्या देशांवरील संभाव्य अडचणींमध्ये मार्गदर्शन करणे हे आता 'निधी' चे महत्त्वाचे कार्य आहे. आवश्यक त्या तपशीलात प्रत्येक देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदाच्या चालू खात्याचे चित्र BIS प्रसिद्ध करीत असूनही 'निधी' ला दक्षिण कोरिया व इतर द. पू. देशांवरील आपत्तीचा अंदाज आला नाही. एवढेच नव्हे तर, द. कोरिया संकटात सापडण्यापूर्वी केवळ एक महिना अगोदरच्या 'निधी' च्या सप्टेंबर, 1997 च्या *World Economic Outlook* मध्ये द. कोरियाच्या आर्थिक प्रगतीबद्दल 'निधी' ने तोंडभर स्तुती केली होती.

आजच्या भांडवल बाजारातील अल्प मुदतीच्या भांडवलाच्या हालचालीविषयी निश्चित अंदाज बांधणे जर शक्य असते तर त्यामध्ये अस्थैर्य असण्याचे कारण नव्हते. सध्याच्या संपर्क व्यवस्थेतही हे शक्य झालेले नाही. एवढेच नव्हे तर, उलटे, अरिष्टाची साथ चटकन जगभर पसरण्याला ही प्रगत संपर्क व्यवस्था कारणीभूत झाली आहे. अधिक जलद संपर्क, म्हणून अधिक त्वरित व अचूक माहिती (information) आणि म्हणून भांडवल बाजाराचा समतोल, अशी अपेक्षित प्रक्रिया तो बाजार मुक्त होत असूनही अनुभवाला येत नाही.

15 ऑगस्ट, 1997 ला डोव्ह जोन्स निर्देशांक घसरल्याबरोबर त्याचे पडसाद फ्रँकफर्ट, पॅरिस, हाँगकाँग, टोकियो या बाजारांमध्ये लगेच उमटले. यावेळी समभाग बाजार व विदेशी चलन बाजार यामध्ये सट्टेबाजीसाठी वापरल्या जाणाऱ्या अनुजातांचा (derivatives) वापर झाला. जागतिक भांडवल बाजारातील अस्थैर्य हे त्या बाजारात जी नवीन साधिते आली आहेत त्यामुळेही काही अंशी निर्माण झाले आहे. यावेळी जगभरच्या मध्यवर्ती बँकांपाशी असलेले विदेशी चलनाचे कोट्यवधी डॉलर मूल्याचे साठे सट्टेबाजांकडे जमा झाले. जून ते सप्टेंबर, 1997 या दरम्यान केवळ थायलंड बँकेचा विदेशी चलनाचा साठा 10 अब्ज कोटी डॉलरनी घटला. रशियाच्या बाबतीत ही रक्कम पाच 'मार्शल प्लॅन' इतकी आहे.

## जागतिक भांडवलाचे स्रोत

भांडवलाच्या आजच्या जगड्व्याळ स्वरुपाचा प्रारंभ युद्धोत्तर कालातील पश्चिम युरोपला अमेरिकेने दिलेल्या 'मार्शल योजने'खालील मदतीतून झाला असे म्हणता येईल. 1948 ते 1951 पर्यंत इतर देशांशी असलेल्या अमेरिकेच्या व्यापाराची किंमत चुकविण्यासाठी पश्चिम युरोपला या मदतीचा उपयोग झाला आणि युद्धामुळे बेचिराख झालेली ती पश्चिम युरोपमधील राष्ट्रे राखेतून उभी राहिली. या डॉलरमधील मदतीच्या साहाय्याने या सर्व राष्ट्रांमधून वास्तविक (real) संपत्ती निर्माण होण्यास मदत झाली. याचा अर्थ असा की, त्यावेळी आंतरराष्ट्रीय भांडवलामध्ये आजचे विध्वंसक रूप मिळाले नव्हते.

त्यानंतर 1971 मध्ये आणि 1979 मध्ये आखाती देशांनी वाढविलेल्या तेलाच्या किमतीमुळे तेलाच्या निर्यातीतून मिळणाऱ्या डॉलरचा प्रचंड ओघ आखाती देशांकडे वाहू लागला. हे पेट्रोडॉलर इंग्लंड, अमेरिका, युरोप यांच्या भांडवल बाजारात कर्जाच्या रूपाने खेळू लागले. विशेषतः दक्षिण अमेरिकेमधील देशांना या पेट्रोडॉलरचे कर्ज देण्यासाठी वित्तीय संस्थांची अहमहमिका लागली आणि सहजगत्या मिळालेल्या या कर्जामुळे दक्षिण अमेरिकेतील देश 80 व्या दशकात कर्जाच्या सापळ्यात सापडले. दुसऱ्या बाजूला, कर्ज देणाऱ्या बँकांना वाचविण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने ब्रॅडी योजनेसारख्या योजना अमलात आल्या. दक्षिण अमेरिकेतील देश हे त्यावेळी एकदा कर्जाच्या सापळ्यात सापडले आहेत ते अजूनही त्यातून सुटलेले नाहीत.

1950 ते 1973 पर्यंतचा काल हा भांडवशाहीचा सुवर्णकाल होता. पाश्चिमात्य राष्ट्रांतील मध्यम वर्गाचे उत्पन्न या कालात वाढले. तसेच त्या देशांतील सामाजिक सुरक्षेच्या कार्यक्रमांमुळे गुंतवणुकीसाठी निधी उपलब्ध होऊ लागला. त्या कालात बहुराष्ट्रीय कंपन्या गुंतवणुकीकरिता स्वतःचाच निधी वापरत असल्याने त्यांना या वित्तीय संस्थांच्या पैशाची विशेष गरज नसे.

त्यामुळे समाजाकडून मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणाऱ्या निधीचे व्यवस्थापन करणाऱ्या वित्तीय संस्थांनी सट्टेबाजीतून अधिक नफा मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. संगणित्राच्या वापराचा प्रसार झाल्यावर विविध देशांच्या चलन बाजारातील विनिमय दर, समभागांच्या किमती यावर सट्टेबाजी करून त्या संस्था नफा मिळवू लागल्या. या संस्थांकडे अतिरिक्त पैसा उपलब्ध असल्यामुळे आणि वित्तीय व्यवहारांवर नियंत्रणे नसल्याने अमेरिकेमध्ये विविध प्रकारचे वित्तीय घोटाळे (scams) निर्माण झाले. Savings and Loan Association Scam हा बँकिंगमधला घोटाळा, 'junk bonds', 'insider trading' अशा प्रकारचे अवैध व्यवहार या कालात उघडकीला आले.

वित्तीय भांडवलाच्या बाजारामध्ये सर्वात अनिष्ट असा जो स्रोत आहे तो बेकायदेशीर कृत्यांतून मिळणाऱ्या पैशाचा. अमली पदार्थांचा व्यापार, शस्त्रास्त्रांची खरेदी-विक्री, व्यापारातील गैरव्यवहार, करचुकवेपणा, विकसनशील देशांतील हुकूमशहांनी व राजकीय पुढाऱ्यांनी अवैधपणे जमविलेली मालमत्ता, या प्रकारच्या सर्व व्यवहारांतून जागतिक भांडवल बाजारामध्ये गुंतवणुकीसाठी पैसा उपलब्ध होत असतो. सागरकक्षा बाह्य बँकांमुळे (off-shore banking) तर असे व्यवहार उघडकीला न येण्याची वित्तीय बाजारात व्यवस्था झाली आहे.

वित्तीय बाजारातील सट्टेबाजीच्या व्यवहारातून होणाऱ्या नफ्याचे प्रमाण फारच मोठे असते. तो नफा अत्यल्प मुदतीत मिळत असल्याने या नफ्याचे आकर्षणही भांडवलशाहीमधील बँका व इतर वित्तीय संस्था याना अधिक असते. सट्टेबाजीमुळे होणारा नफा मूल्यवर्धन करणारा नसतो. हा नफा दुसऱ्याच्या नुकसानीतून होत असतो ; तो zero-sum-game असतो.

## जागतिक भांडवलाचे आजचे स्वरूप

आजच्या जागतिक भांडवलाची काही वैशिष्ट्ये आहेत. एक, अलीकडच्या अनुभवातून हे लक्षात येते की, डोव्ह जोन्स निर्देशांक काही मिनिटांमध्ये 50 बिंदूंनी घसरतो किंवा वधारतो. NYSE सुपर-डॉट व्यवस्थेमुळे हे आता शक्य झाले आहे. या व्यवस्थेमुळे एका सेकंदाला सरासरीने मागणीच्या 375 नोंदी करता येतात. 1987 शी तुलना केली तर समभाग बाजाराची गती व व्यवहार हाताळण्याचे प्रमाण 10 पट वाढले आहे आणि त्याबरोबरच अस्थैर्याची जोखीमही वाढली आहे.

या सुधारणांमुळे भांडवलाला आलेली गतिक्षमता हे दुसरे वैशिष्ट्य आहे. संगणित्र शास्त्राने केलेल्या प्रगतीमुळे आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या जगभरच्या केन्द्रांमधील संपर्क अधिकाधिक शीघ्रतेने साधणे शक्य झाले आहे आणि त्याचबरोबर जगाच्या कोणत्याही केन्द्रामधील 'निधी'सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या दबावामुळे त्या देशांना भांडवलाच्या आयात-निर्यातीवरील बंधने कमीजास्त प्रमाणात काढून घ्यावी लागली. त्यामुळे भांडवलाची गतिक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

या भांडवलाचे तिसरे वैशिष्ट्य त्याचे आकारमान हे आहे. Bank of International Settlement (BIS) ने प्रसृत केलेल्या माहितीप्रमाणे 1994 साली आंतरराष्ट्रीय भांडवलाची गुंतवणूक 400 अब्ज डॉलर इतकी होती, तर भांडवल बाजारात दररोज 1,300 अब्ज डॉलर इतकी सर्व प्रकारची उलाढाल होते. आंतरराष्ट्रीय पातळीवर बँकांनी दिलेल्या कर्जाचा निधी (stock)1980 साली 320 अब्ज डॉलरचा होता. 1991 साली तो निधी 7,500 अब्ज डॉलर इतका वाढला. OECD देशांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादिताशी जर या निधीचे प्रमाण पाहिले तर असे दिसते की, 1980मध्ये कर्जाऊ निधीचे स्थूल राष्ट्रीय उत्पादिताशी जे प्रमाण 4 टक्के होते ते 44 टक्क्यांवर गेले.

सर्व राष्ट्रांनी विकलेल्या कर्जरोख्यांचे 1982 सालचे मूल्य 259 अब्ज डॉलर होते ते 1994 साली अंदाजे 2,000 अब्ज डॉलर इतके झाले. सरकारी कर्जातील

या वाढीबरोबर दुसरी महत्त्वाची बाब अशी की, या कर्जाची मालकी अधिकाधिक प्रमाणात विदेशी गुंतवणूकदारांकडे जात आहे. उदाहरणार्थ, 1980 मध्ये फ्रान्सच्या सरकारी कर्जापैकी 1 टक्का कर्जरोखे विदेशी गुंतवणूकदारांच्या मालकीचे होते. हे प्रमाण 1992 मध्ये 43 टक्के झाले. इंग्लंडमध्ये हे प्रमाण 9 टक्क्यांचे 17 टक्के झाले. अमेरिकेमध्ये हे प्रमाण 1970 साली 7 टक्के होते, ते 1988 साली 17 टक्के झाले.

महत्त्वाच्या साधितांचे मूल्य 1986 साली 1,100 अब्ज डॉलर इतके होते, ते 1991 साली 6,900 अब्ज डॉलर इतके वाढले, तर 1994 साली ते 20,000 अब्ज डॉलर इतके फुगले. जागतिक भांडवलाच्या व्यवहाराच्या या आकारमानामुळे कोणत्याही देशाची विदेशी चलनाची गंगाजळी सोडाच पण 'निधी' जवळ असलेली वित्तीय साधनेही विदेशी चलनाच्या आणीबाणीच्या वेळी अपुरी पडतील, हे उघड आहे.

चौथे वैशिष्ट्य आहे ते जागतिक भांडवलाला आलेल्या विरूपित (distorted) स्वरुपाचे. विदेशी भांडवलाला जी गतिक्षमता प्राप्त झाली आहे आणि भांडवल बाजारात जे गुंतवणुकीचे नवे पर्याय उपलब्ध आहेत त्यामुळे एका देशाचे भांडवल दुसऱ्या देशाची काहीं अत्यल्प मुदतीत 'सहल' करून परत येते आणि तरीही गुंतवणूकदाराला भांडवलाच्या त्या सहलीतून लाभ होत असतो. विदेशी गुंतवणुकीचे धारण (hedge) केले तर त्यामुळे दुसऱ्या देशात गेलेल्या भांडवलाचा मार्ग पुसला जातो.

## गुंतवणुकीची बदललेली वित्तीय साधने

भांडवलशाहीच्या सुरुवातीच्या विकासाच्या कालात या साधनांमुळे व्यापाराची सुलभता वाढविली. व्यापारातून उद्‌भवणाऱ्या देण्याघेण्याच्या व्यवहाराकरिता जी कागदपत्रे निर्माण होत होती त्यांचे प्रकार आणि त्यांची हस्तांतरता (negotiability) वाढत गेली. हुंडीसारखे विनिमयपत्र याचे सर्वपरिचित उदाहरण आहे. वित्ताच्या व्यवहारातून त्यासारखेच वित्तपत्र निर्माण होत असते. अशा प्रकारच्या प्रपत्रांना 'प्राथमिक मालमत्ता' (primitive asset) म्हणतात. ज्या दोन पक्षांत खरेदी-विक्रीचा व्यवहार होतो त्यापैकी एका पक्षाने या ना त्या कारणाने प्रपत्राचे पैसे चुकते केले नाहीत तर दुसऱ्या पक्षाला त्यामुळे नुकसान सोसावे लागते. ही एक प्रकारची जोखीम (risk) अशा व्यवहारात अनुस्यूत असते ती कमी करण्याचे काही संस्थात्मक उपाय कालाच्या ओघात निर्माण झाले आहेत. दोन देशांच्या चलनांमधील विनिमय दरातील बदलांमुळेही अशी जोखीम निर्माण होऊ शकते. आंतरराष्ट्रीय व्यवहार विदेशी चलनाच्या साहाय्याने होत असल्याने त्या चलनाचे विनिमय दर बदलले तर त्यामुळे दोन पक्षांपैकी एकाचे नुकसान होण्याची शक्यता राहते. तथापी, पूर्वी म्हटल्याप्रमाणे, हा zero-sum-game असतो. अशी जोखीम टाळण्याकरिता त्याविरुद्ध संरक्षक भिंत उभारण्याकरिता प्राथमिक मालमत्तेच्या आधारे काही अनुजात (derivatives) निर्माण केले जातात. उदाहरणार्थ, हुंडीची योग्य किंमत मिळावी म्हणून हुंडी धारक त्याचे 'धारण' (hedging) करतो. हे अनुजात आहे. अशा अनुजाताचे मूल्य ज्या प्राथमिक मालमत्तेतून निर्माण होते त्या मालमत्तेच्या मूल्यावर अवलंबून राहते. उदाहणार्थ, प्राथमिक मालमत्तेचे मूल्य डॉलरमध्ये व्यक्त झाले असेल आणि डॉलर किंवा त्या व्यवहारातील दुसरे चलन यापैकी एकाच्या विनिमय दरात बदल झाला, तर प्राथमिक मालमत्तेचे मूल्य घटेल किंवा वधारेल. घटणाऱ्या मूल्याची जोखीम, त्या प्राथमिक मालमत्तेतून 'वायद्याचा करार' (forward contract), पर्याय (options), अदलाबदल (swaps), वायदा व्यवहार (futures) यासारखे अनुजात निर्माण करून कमी करण्याचा किंवा ती जोखीम टाळण्याचा प्रयत्न मालमत्ताधारक करतो. थोडक्यात, मालमत्तेच्या मूल्यामध्ये होणाऱ्या संभाव्य घटीमुळे नुकसान संभवते. म्हणून त्यापासून संरक्षण देणारी अनेक प्रकारची अनुजाते निर्माण होत असतात.

अनुजाते धारण करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था

यांचे, मूल्याची हमी देण्याच्या संदर्भात परस्परांशी जोडलेले एक जाळे (network) तयार झाले आहे. केवळ अनुजातांच्या निर्मितीमुळे समस्या निर्माण होत नाहीत; परंतु परस्परावलंबी अनुजातांच्या जाळ्यामुळे मात्र भांडवल बाजारात अचानक समस्या निर्माण होऊ शकते. उदाहरणार्थ, ज्या चलनामध्ये जास्त गुंतवणूक आहे अशा एखाद्या चलनाच्या मूल्यामध्ये फरक झाल्यास त्याचा परिणाम या जाळ्यातील प्रत्येक सांध्यावर होतो आणि ते जाळे पूर्णपणे विस्कळीत होण्याचा, तुटण्याचा धोका निर्माण होतो. अशा वेळेला एखाद्या वित्तीय केन्द्रातील मालमत्तेचे भाव कोसळलेले दिसतात. ते महत्त्वाचे केन्द्र असेल तर वितीय जगतात त्याचे वर्णन 'वॉल स्ट्रीटचा काळा सोमवार' (1 सप्टेंबर, 1997) अशा प्रकारे केले जाते.

## जागतिक भांडवल बाजाराच्या नव्या स्वरूपाचे परिणाम

परिणामी, कोणताही देश वा त्याचा नागरिक दुसऱ्या देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात गुंतवणूक करतो. अशा गुंतवणुकीची मुदत कमी होऊ लागली आहे. हे बदल केवळ घटना नसून त्या बदलांचे परिणाम दूरगामी आहेत. प्रथमत: त्यांचा उघड दिसणारा परिणाम म्हणजे देशांनी मौद्रिक किंवा विनिमय दर ठरविण्याचे गमावलेले स्वातंत्र्य. बदललेल्या परिस्थितीमुळे एखाद्या देशामध्ये अचानकपणे उद्भवणारी जागतिक भांडवलाची ये-जा त्या देशांच्या मौद्रिक व विनिमय दरावर परिणाम करते. जर त्या देशाला स्वत:चे धोरण राबविण्याचे स्वातंत्र्य हवे असेल तर राज्याच्या हस्तक्षेपाखेरीज ते शक्य नाही.

जागतिक भांडवलाच्या बदललेल्या स्वरुपाचा अन्य एक परिणाम महत्त्वाचा आहे. या बदलामुळे जागतिक अभिवृद्धीचा दर घटत आहे. कारण, अभिवृद्धीकरिता कोणताही एक देश सौम्य भावफुगवट्याचे (reflation) धोरण अवलंबू शकत नाही. तसे केल्यास, त्या देशाच्या चलनाचे मूल्य घटेल आणि विदेशी भांडवल देश सोडून जाईल ही भीती असते. अर्थात, ज्या चलनाचे मूल्य त्या देशाजवळील पुरेशा मोठ्या गंगाजळीमुळे स्थिर राहण्यासारखे असेल त्या देशाचे हे स्वातंत्र्य अबाधित राहते. परंतु असा देश अमेरिकेखेरीज अन्य नाही.

## भांडवल बाजारातील अस्थैर्य

बाजारातील जोखीमांमध्ये जी भर पडते (ती भरच वित्तीय बाजारात अधिक अनिश्चितता निर्माण करते), ती सट्टेबाजी करणाऱ्या व्यक्ती, संस्था व निधी (funds) यांची.

**(अ) विदेशी चलन बाजार व अस्थैर्य :** एखाद्या महत्त्वाच्या चलनाच्या विनिमय दरामध्ये जो चढउतार होतो त्याची अगोदर अटकळ बांधून त्या चलनाची अगोदरच खरेदी-विक्री करणारा असा एक सट्टेबाजांचा वर्ग असतो. अशा किमतीतील संभाव्य चढउतारावरील सट्टेबाजीतून नफा करणे हाच या व्यवहाराचा हेतू असतो. विदेशी चलनाच्या बाजारांमध्ये अशा प्रकारच्या सट्टेबाजीचे प्रमाण एवढे प्रचंडपणे वाढले आहे की, त्या सट्टेबाजीमुळे विनिमय दरावर दडपण येते. त्यामुळे वित्तीय बाजार अत्यल्प कालात कोसळू शकतात. चलनाच्या बाजारभावातील बदलांमुळे होणाऱ्या सट्टेबाजीपासून आणि त्यातून निर्माण होणाऱ्या जोखिमीपासून संरक्षण मिळणे अशक्य असते. एखादी वास्तविक (real) अर्थव्यवस्था सुदृढ असूनही केवळ वित्तीय बाजार कोसळल्यामुळे एका रात्रीत विकलांग कशी होते त्याचे प्रत्यंतर दक्षिणपूर्व आशियामधील देशांच्या किंवा ब्राझील, मेक्सिको यासारख्या देशांच्या अर्थव्यवस्थांच्या अलीकडील ऱ्हासाची जी उदाहरणे आहेत त्यातून मिळते.

**(आ) समभाग बाजार व अस्थैर्य** : आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारात अस्थैर्य आणणारा जो दुसरा बाजार आहे तो समभाग बाजार. विदेशी भांडवलाला गतिक्षमता प्राप्त झाल्यानंतर जगातील वित्तीय बाजार एकमेकाला जोडले गेले आहेत. त्यामुळे भांडवल गुंतविणारा जसा विदेशी चलनातील वित्तीय पत्रात आपले भांडवल

गुंतवितो, तसेच त्या देशातील समभाग बाजारातही आपले भांडवल गुंतवितो. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे आज प्रत्यक्ष उत्पादन करण्याकरिता वापरलेल्या विदेशी भांडवलाचे प्रमाण वित्तीय भांडवलाशी तुलना करता उत्तरोत्तर कमी होत आहे. केवळ अल्प मुदतीची वित्तीय पत्रे, समभाग भांडवल व स्थावर मालमत्ता यामधील विदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीचे प्रमाण वाढत आहे. त्यातही भांडवल गुंतवणुकीवरील प्रत्यायासाठी (return) ही गुंतवणूक होण्याऐवजी समभाग किंमत किंवा विनिमय दरावर सट्टेबाजी करून नफा मिळविण्याला आजच्या भांडवल बाजारामध्ये महत्त्व आले आहे. थोडक्यात, विदेशी भांडवलातील 'पळपुट्या' भांडवलाचे प्रमाण वाढल्यामुळे आंतरराष्ट्रीय भांडवल बाजाराला प्रचंड अस्थैर्य आले आहे. आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारात प्रख्यात असलेले सट्टेबाज जॉर्ज सोरोस यांच्या म्हणण्याप्रमाणे ''आजचा भांडवल बाजार अंगभूतपणे (inherently) अस्थिर (unstable) व चंचल (volatile) झाला आहे. त्यावर काही नियंत्रणे न आणल्यास वास्तविक अर्थव्यवस्था मोडकळीस येतात आणि त्यापासून समाजाचे रक्षण करणे आवश्यक झाले आहे.''

## स्पर्धाशील बाजार व जागतिक भांडवल

भांडवल बाजारात स्पर्धा यावी आणि त्यासाठी शासनकर्त्यांनी भांडवलाच्या ये-जावर बंधने घालू नयेत; आंतरराष्ट्रीय भांडवलासाठीही ते बाजार खुले व्हावेत, असा आ : शिथिलीकरणाच्या पुरस्कर्त्यांचा असतो. कारण, त्यामुळेच भांडवलाचा सर्वात कार्यदक्ष पद्धतीने वापर होईल असे त्यांचे प्रतिपादन असते. वास्तवात भांडवलाच्या गुंतवणुकीचे मोठे प्रमाण सट्टेबाजीसाठी किंवा अत्यल्प मुदतीच्या गुंतवणुकीसाठी असते. अशा प्रकारच्या भांडवलाचा त्याच्या कार्यदक्ष विल्हेवारीशी (allocation) काहीही संबंध नाही. केवळ वित्तीय भांडवलामधील गुंतवणुकीतून किंवा त्या भांडवलाच्या किमतीतील बदलांवर सट्टेबाजी करून नफा मिळविणे, हाच त्यामागील हेतू असतो. हे लक्षात घेतले तर आंतरराष्ट्रीय भांडवलाला किती विरूपित स्वरूप आले आहे हे लक्षात येईल. उत्पादनक्षम असणारे भांडवल वेगळ्या अर्थाने 'स्वभक्षक' (cannibal) बनते आहे, हे त्याचे विरूपण आहे. जागतिक भांडवल हे बहुतांशी विध्वंसक बनले असल्याने त्याच्या आयातनिर्यातीवरील निर्बंधांचे शिथिलीकरण करणे आत्मघातकीपणाचेच ठरेल. एक तर जागतिक भांडवलाच्या मालकीचे केन्द्रीकरण होत चालले आहे आणि त्यामुळे ते स्पर्धाशील राहिलेले नाही. दुसरे, त्यामुळे त्याचा आता साधनसंपत्तीच्या कार्यदक्ष वापराशीही काही संबंध राहिलेला नाही.

If demands are dominated, not by expected satisfaction but by guesses about what prices may be in the future, so that a large element of speculation is present in the formation of prices; and if supplies are offered, not in response to perceived costs but in anticipation of future movements of prices, or of other people's expected anticipations of such movements; then the ensuing prices which are set may bear no systematic or reliable relationship to the real economic factors of the regular economic activity which, it is argued, prices ought to reflect. And all this is independent of whether the power is diffused equally on both sides of the market, or whether the power is diffused equally on both sides of the market, or whether it is concentrated in the hands of either buyers or sellers or both.

त्यामुळे बुंडेस बँकने 1993 मध्येच प्रसिद्ध केलेल्या अहवालात BIS ने सुचविलेले केवळ 'देखरेखी'चे उपाय अपुरे आहेत; अनुजातांच्या व्यापारामुळे सर्वच वित्तव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता असते. त्याकरिता 'काही विशिष्ट अनुजातांचा व्यवहारच बंद करण्याची' शिफारस त्या संस्थेने केली.

## भांडवल बाजारांतील अस्थैर्य व 'निधी' ने केलेला उपाय

वर वर्णन केलेल्या सट्टेबाजीसाठी गुंतवणूक करणाऱ्या संस्था या प्रगत देशांतील बहुराष्ट्रीय बँका, भविष्य निर्वाह निधी, विमा कंपन्या, धारण निधी (hedge funds), अशाप्रकारच्या संस्था आहेत. आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारातील उलाढालींमुळे या संस्था अडचणीत आल्यास त्यांना तात्पुरते संरक्षण मिळावे, त्यांच्यावर दिवाळखोरी जाहीर करण्याची पाळी येऊ नये, यासाठी ऑक्टोबर, 1998 मध्ये जी - 7 राष्ट्रांनी 90 अब्ज डॉलरचा निधी आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे सोपविला आहे. जी - 7 देशांनी ज्या उद्देशाने हा निधी स्थापन केला आहे, त्या उद्देशाच्या पूर्णपणे विरोधी असा परिणाम हा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे होईल, हे खरे तर स्पष्ट आहे. या निधीच्या स्थापनेमुळे सटोडियांना त्यांचे नुकसान भरून देण्याची हमीच या निधीने दिल्यासारखी आहे. त्यामुळे निश्चिंत मनाने सट्टेबाजी करण्यास ते मोकळे राहतील. त्याचबरोबर, ज्या राष्ट्राला विदेशी चलनाच्या टंचाईतून बाहेर काढण्यासाठी या निधीतून कर्ज दिले जाईल त्या राष्ट्रावर वाटाघाटीचे गुन्हाळ न लावता कडक निर्बंध लादणे धनको बँका/संस्थांना शक्य होईल. 90 अब्ज डॉलरच्या निधीपैकी 30 ते 40 अब्ज डॉलरची रक्कम धनको वित्तसंस्थांना ब्राझीलच्या कर्जापोटी देण्याचे निश्चित झाले आहे. त्या कर्जाच्या मोबदल्यात ब्राझीलच्या अध्यक्षांना त्या देशाला दारिद्र्याच्या खाईत लोटणारे काटकसरीचे उपाय अगोदरच योजावे लागले आहेत. त्यामुळे ब्राझीलचे कर्जफेडीचे ओझे अधिकच वाढणार आहे.

जी - 7 राष्ट्रांच्या निधीमुळे जगातील सरकारी कर्जाचे आकारमान जे अलीकडे वाढले आहे ते अधिक वाढेल. या आकारमानाच्या वाढीचा अनिष्ट परिणाम जगाच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. सट्टेबाजीमुळे एका बाजूला विकसनशील देशांकडील साधनसंपत्ती धनको देशांकडे संक्रमित होत आहे. दुसऱ्या बाजूला, जी - 7 राष्ट्रांत निधी उभा करण्यासाठी सरकारी कर्ज वाढत राहते. या प्रक्रियेतील लक्षात घेण्याजोगा भाग असा आहे की, या कर्जामागील हमी (underwriting) सट्टेबाजी करणाऱ्या वित्तसंस्थाच देत असतात. थोडक्यात, जी - 7 राष्ट्रांच्या आकस्मिकता निधीच्या उपायामुळे सरकारी कर्जाच्या आकारमानात फार मोठी वाढ होईल. त्याचवेळी जगभर रोजगार व उत्पादन घटत असल्यामुळे जागतिक मंदीच्या दृष्टीने ही परिस्थिती स्फोटक आहे.

## आर्थिक केन्द्रीकरणाचे स्वरूप

सार्वजनिक निर्वाह निधी, पेन्शन फंड, मोठ्या बँका, श्रीमंत गुंतवणूकदार, उद्योग मंडळे यांना त्यांच्या भांडवल गुंतवणुकीमध्ये मदत करणारी जी संघटने आहेत त्यांना 'धारण निधी' (hedge funds) असे संबोधितात. अशी जगभर पसरलेली जवळजवळ 4,000 संघटने आहेत आणि त्यांच्याकडे जाहीर केलेले 300 अब्ज डॉलरचे भांडवल आहे. परंतु या भांडवलातून ही संघटने कित्येक पटीने अधिक भांडवल कर्जाऊ देतात. 'धारण निधी'चे व्यवहार गुप्तपणे चालतात. 'म्युच्युअल फंड' च्या तुलनेने त्यांच्यावर नियंत्रणे नाहीत. मोठी जोखीम पत्करून सट्टा खेळण्याकडे त्यांचा कल असतो. भांडवलाच्या मानाने अनेक पटीने अधिक पैसा ते अशा सट्टेबाजीमध्ये गुंतवितात. द.पू. आशियामध्ये धारण निधींच्या पैशानेच पेचप्रसंग निर्माण केला. अमेरिकेतील LTCM चे दिवाळे निघाले त्यावेळी 4 अब्ज डॉलर भांडवलावर 100 अब्ज डॉलर गुंतवणूक केली होती. त्याशिवाय 1,000 अब्ज डॉलरचा व्यवहार LTCM ने केला होता. मोठ्या बँका व व्यापारी यांच्याकडून या धारण निधीने कर्जे घेतली होती. इंग्लंडच्या 1762 साली स्थापन केलेल्या बेअरिंग्ज बँकेला 1.4 अब्ज डॉलरच्या नुकसानीमुळे दिवाळ्यात निघण्याची कथाही अशाच प्रकारच्या सट्टेबाजीचा नमुना होता. जर्मनीतील व फ्रान्समधील काही बँका सट्टेबाजी केल्यामुळे दिवाळ्यात निघाल्या. शिवाय सागरकक्षा बाह्य बँकांशी (off-shore banking) व्यवहार करणाऱ्या धारण निधींनी आपले भांडवल जाहीर केलेलेच नसेल. या संघटनांची आर्थिक ताकद प्रचंड असते. त्यांच्या एका दिवसाच्या अब्जावधी

डॉलरच्या उलाढालीतून त्या जी-7 राष्ट्रांच्या निर्णयावर प्रभाव पाडू शकतात.

इंग्लंड व जर्मनी यामधील बँकांनी वॉल स्ट्रीटवरील संस्थांशी हातमिळवणी करून महाकाय संस्था उभ्या केल्या आहेत. Bankers' Trust, Deutsche Bank, B.P.-Amco, Dailner-Chrisler यासारख्या युती झालेल्या संघटनांच्या हातात बँका, तेल, वायू, वगैरे मूलभूत उद्योगांचे केन्द्रीकरण होत आहे. त्याचप्रमाणे संगणित्र, दूरसंचार उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स, यासारख्या उच्च तंत्रविज्ञानाच्या उद्योगांमध्येही या संघटनांचे केन्द्रीकरण होत आहे. एका बाजूला, युरो-अमेरिकन बँकांची मंडळे (conglomerates) सर्वात मोठ्या उद्योगांच्या समभागांमध्ये गुंतवणूक करीत आहेत. दक्षिण आशिया व दक्षिण अमेरिका या खंडांतील देशांच्या वस्तूरूप संपत्तीवर मालकी प्रस्थापित करून त्यामार्गे संपत्तीचे केन्द्रीकरण होत आहे.

## लॅटिन अमेरिका व दक्षिणपूर्व आशियातील देशांचा अनुभव

दक्षिण अमेरिकेतील ब्राझील, अल्जेरिया, पेरू, तसेच द.पू. आशियामधील इंडोनेशिया, थायलंड, दक्षिण कोरिया, जपान, फिलिपिन्स या देशांच्या गेल्या 5-10 वर्षांचा अनुभव पाहिला तर असे लक्षात येईल की, या देशांच्या अर्थव्यवस्था विदेशी भांडवलाच्या सट्टेबाजीमुळे विकलांग झाल्या आहेत. समभाग बाजार, विदेशी चलन बाजार यामधील सट्टेबाजीमुळे ते बाजार जे कोसळले ते आजपर्यंत सुधारले नाहीत. त्या त्या देशांच्या अर्थव्यवस्था पाश्चात्य देशांतील मोठे उद्योग, बँका यांच्या अंकित झाल्या आहेत. त्यांची ध्येयधोरणे आणि त्यांची अमलबजावणी आता त्यांच्या हाती न राहता महाकाय बँका - उद्योग किंवा त्यांच्याच वतीने काम करणाऱ्या 'आंतरराष्ट्रीय नाणे निधी' सारख्या संस्थांच्या हाती गेली आहे.

ज्या आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या साहाय्याने हे बदल घडले आहेत त्या बदलांच्या प्रक्रियेची जी तार्किक अखेर दिसते ती अशी की, त्याच वित्तीय भांडवलाच्या अतिरेकाने पाश्चात्य देशांतील वित्तीय बाजार 'बुडबुड्या'सारखे फुटतील आणि सर्व जगाचीच अर्थव्यवस्था उध्वस्त होईल. आजचे विदेशी भांडवल हे 'स्वभक्षक' होईल, हे साऊंचे म्हणणे एका वेगळ्या अर्थाने खरे होईल.

हे टाळावयाचे असेल तर जी-7 च्या जून 1999 च्या डेन्व्हर शिखर परिषदेमध्ये सुचविलेले 'जोखिमीचे अधिक कार्यदक्ष व्यवस्थापन', 'सुधारित पारदर्शकता' व 'अधिक परिणामकारक दूरदर्शी मानदंड' (strong prudential standards) यासारखे मलमपट्टीचे सौम्य उपाय अपुरे आहेत. उत्पादक गुंतवणूक व सट्टेबाजीची गुंतवणूक यापासून होणाऱ्या नफ्यामध्ये भेद करून दुसऱ्या प्रकारच्या नफ्यावर तीव्र वेगाने वाढणारा कर आकारल्यास सट्टेबाजीला आळा बसू शकेल असे हारकोर्ट यांनी सुचविले आहे. भांडवल बाजारात झालेले तंत्रवैज्ञानिक बदल आणि आजची मान्यता पावलेली विचारसरणी लक्षात घेता, आंतरराष्ट्रीय भांडवल प्रकल्पावर नियंत्रणे आणणे व्यवहार्य नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि, जागतिक भांडवलाचे स्वरूप, त्याची गुंतागुंत लक्षात घेता हारकोर्ट यांची उपाययोजनाही परिणामकारक ठरणे अशक्य आहे. टोबिन्स कराविषयीही असेच म्हणता येईल.

याउलट, जागतिक वित्तीय भांडवलाच्या ये-जावर तातडीने पुन्हा नियंत्रणे घालणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सागरकक्षा - बाह्य बँका (off-shore banking), धारण निधी यांचे कठोरपणे नियंत्रण करणे आवश्यक आहे. थोडक्यात, पैशाला केवळ विनिमयाचे माध्यम व मर्यादित प्रमाणात मूल्य संचयाचे साधन म्हणून कार्य करावयास लावणे महत्वाचे झाले आहे. अधिक दूरच्या धोरणाचा विचार करता कोणत्याही देशावर बाजाराधिष्ठित अर्थपद्धती न लादता त्या त्या देशाच्या आर्थिक परिस्थितीला अनुरूप असे धोरण त्या देशाला अवलंबिण्याचे स्वातंत्र्य देऊन आर्थिक दृष्टीने

त्याना सबल करणे, हे पाश्चात्य देशांच्याही हिताचे आहे.

## भारतीय अर्थव्यवस्था व जागतिक भांडवल

भारताने शिथिलीकरणाचे धोरण अंगिकारल्यानंतर त्या धोरणाचा भाग म्हणून विदेशी भांडवलाला दार खुले केले. त्यानंतर आंतरराष्ट्रीय ताळेबंदाच्या चालू खात्यावरील सर्व व्यवहाराकरिता व संस्थांच्या भांडवली व्यवहाराकरिता विदेशी चलनाच्या रूपांतरावर बंधन राहिलेले नाही. तथापी, नागरिकांच्या भांडवली खात्यातील व्यवहारांमध्ये ही विदेशी चलनाची रूपांतरितता अद्याप बंधनमुक्त नाही. हे भांडवल अल्प व दीर्घ मुदतीचे अशा दोन प्रकारचे असते. आताच्या संदर्भामध्ये मुख्यत: अल्प मुदतीच्या भांडवलाच्या वर्तनाची चर्चा महत्त्वाची आहे. समभाग व रोखे याप्रकारे गुंतविलेले भांडवल भारताबाहेर नेण्यास परवानगी असल्याने रोखे, समभाग या बाजारांमध्ये केलेली गुंतवणूक त्या त्या बाजारात परत विकून ते भांडवल विनाप्रतिबंध भारताबाहेर जाऊ शकते. त्यामुळे भारतीय भांडवल बाजाराला अस्थैर्य येण्याची भीती व्यक्त करण्यात येते. रशिया, ब्राझील, मेक्सिको व दक्षिण-पूर्व आशियामधील देशांचे वित्तीय बाजार व त्यांची चलने ज्या तऱ्हेने कोसळली ती तशी कोसळण्याची कारणे पाहिली तर त्या प्रकारचा धोका भारताला आहे किंवा काय, हे यापुढे पाहावयाचे आहे.

## भारतीय भांडवल बाजारातील संस्थात्मक बदल

### *भारतातील अनुजाते*

**(1) डॉलर - रुपी फॉरवर्ड मार्केट :** हा भारतातील सर्वात महत्त्वाचा अनुजाताचा बाजार आहे. यामध्ये केवळ ओटीसी अनुजातांचाच व्यवहार चालतो. रिझर्व्ह बँक या बाजारात प्रवेश बंदीचा वापर करते.

राष्ट्रीय समभाग बाजारामध्ये (NSE) पहिल्या वित्तीय अनुजाताची तयारी होत आली आहे. Stock Index Futures Market स्थापन करून त्यामध्ये संगणित्रांद्वारा व्यवहार होतील आणि Clearing Corporation मार्फत 'नोव्हेशन' प्रक्रियेने अनुजातांचा व्यवहार होईल. याला 'सेबी' ची परवानगी अपेक्षित आहे.

**(2) व्याज दराचे अनुजात :** भारतातील मागणीदेय पैसा बाजार (call money market) मधील अनुजाताचे विनियमन रिझर्व्ह बँक करते.

**(3) वस्तू अनुजात :** भारतात वस्तूंच्या व्यापारातील जोखीमांपासून संरक्षण करण्याकरिता गेली अनेक वर्षे अनुजातांचा वापर होत आहे.

या तिन्ही अनुजातांचे विनियमन करण्याचा अधिकार 'सेबी', रिझर्व्ह बँक व 'फॉरवर्ड मार्केट कमिशन' या संस्थांमध्ये विभागला असल्याने विनियमन परिणामकारक होत नाही.

### *भारतीय बँका व विनियमन*

भारतीय बँकांमध्ये पुढील चार दोष आहेत:(अ) भागभांडवल व पतव्यवहार यांचे अनिष्ट प्रमाण (high leverage); (आ) कमी तरलता असलेली मत्ता व अपारदर्शक व्यवहार ; (इ) घेतलेले कर्ज व दिलेले कर्ज यांचा मेळ नसणे; (ई) जोखीम पेलण्याचे पारंपरिक चित्र. गुप्ता समितीच्या शिफारशींनुसार हे दोष दूर करण्याचा प्रयत्न होत आहे. गुप्ता समितीच्या अहवालावर जी - 7 राष्ट्रांमधील 'बॅसल समझोत्या'मधील तरतुदींचा मोठा प्रभाव आहे.

डॉलर-रुपया विनिमय दराचे विनियमन रिझर्व्ह बँक करते. विदेशी चलन बाजारातील विनिमय दरातील चढउतारांमुळे दरामध्ये चंचलता येते. रिझर्व्ह बँकेने या बाजारात आजपर्यंत जो हस्तक्षेप केला त्याचे दोन कालखंड आहेत : 1990 ते 1994 आणि 1 जानेवारी, 1995 ते सप्टेंबर, 1998. पहिल्या कालखंडात चंचलतेचे प्रमाण कमी होते. परंतु त्या कालात विनिमय

दरात अचानक दोन बदल झाले; जुलै 1991 मध्ये रुपयाचे 23 टक्के अवमूल्यन झाले आणि मार्च, 1992 मध्ये 10 टक्के अवमूल्यन झाले. 1 जानेवारी, 1996 पासून रिझर्व्ह बँकेने कमी प्रमाणात हस्तक्षेप केला. या कालात रुपयाच्या मूल्यामध्ये संथ वेगाने घट झाली. त्यामुळे किमतीतील बदलामुळे निर्माण होणारी जोखीम कमी झाली.

### *मागणीदेय पैसा बाजार (call money market)*

या बाजारात बँकांखेरीज इतर वित्तसंस्था व्यवहार करीत नाहीत. बँकांनी सांभाळावयाचे निधीचे प्रमाण नीट करण्यासाठी बँका इतर बँकांकडून अल्पल्प मुदतीचे कर्ज घेत असतात. दर पंधरा दिवसांनी शुक्रवारी हा व्यवहार होतो. त्या दिवशी त्या पैसा बाजारामध्ये चंचलता येते. इतर वेळी हा व्याज दर चंचल नसतो. तथापी, रिझर्व्ह बँकेला या बाजारात काही वेळा हस्तक्षेप करावा लागला होता. उदाहरणार्थ, जानेवारी 1998 मध्ये हा व्याज दर 5 ते 10 पट वाढला होता. त्यानंतर केलेल्या संस्थात्मक बदलामुळे त्यामधील चंचलता कमी झाली आहे. ते प्रमाण 0.75 ते 2.75 टक्के इतके असते, शुक्रवारी ते प्रमाण 4 पटीपर्यंत वाढते.

रुपयाच्या परिवर्तनीयतेमुळे तिन्ही बाजार एकमेकाला जोडले आहेत. तथापी या बाजारांच्या चंचलतेच्या दृष्टीने भारतामध्ये वित्तीय बाजाराचे बँका, समभाग बाजार या घटकांचे आणि विदेशी चलन बाजार या घटकांचे व्यवहार महत्त्वाचे आहेत. या संस्थांच्या व्यवहारांमध्ये 'नैतिक धोका' (moral hazard) व 'प्रतिकूल निवड' (adverse selection) यांचे प्रमाण जर अधिक असेल तर वित्तीय बाजाराचा नाजुकपणा (fragility) वाढतो आणि त्याला अस्थैर्य येते. या बाबतीतील थोडी चर्चा अप्रस्तुत ठरणार नाही.

बँका ज्या मत्तांमध्ये गुंतवणूक करतात त्यामागील हेतू नफ्याचे प्रमाण वाढविणे हा असतो हे उघड आहे. ज्या प्रमाणात अर्थव्यवस्थेचे शिथिलीकरण झालेले असेल त्या प्रमाणात बँकांपुढे हेच उद्दिष्ट अधिक महत्त्वाचे असते. कारण, त्या अर्थनीतीनुसार त्याच निकषावर अर्थव्यवस्थेमधील साधनसंपत्तीचा वापर कार्यदक्ष आहे की नाही ठरते. ज्यावेळी वित्तीय बाजारात तेजी येते त्यावेळी त्या तेजीचा लाभ उठवून नफा वाढविण्याची प्रवृत्ती वित्तीय संस्थांमध्ये स्वाभाविकपणे असते. वित्तीय संस्था नाजूक प्रतीच्या मालमत्तांमध्ये गुंतवणूक करतात आणि मग अस्थिर होतात. अशा बाजारात बदलणाऱ्या किमतीवर सट्टेबाजी होणे शक्य असते. वित्तीय बाजारात किंमत वाढणाऱ्या मत्तेची अधिकाधिक खरेदी होऊ लागली की 'बुडबुडा' तयार होत जातो. 'आता यापुढे मत्तेची किंमत कोसळेल' असे ज्यावेळी त्या मत्तेच्या खरेदीदारांमध्ये मत तयार होते, त्यावेळी वाढणारी किंमत अचानक कोसळते (crash). त्या मत्तेच्या कोसळणाऱ्या किमतींचा परिणाम इतर मत्तांच्या किमतीवरही होतो आणि त्या किमतीही कोसळू लागतात. अशा तऱ्हेने जे गुंतवणूकदार तेजीच्या वातावरणात असतात ते अचानक मंदीच्या मानसिकतेत जातात. एकाच देशाच्या वित्तीय बाजारामध्ये तेजीची किंवा मंदीची पसरणारी लाट ही गुंतवणूकदारांच्या 'झुंड' प्रवृत्तीमुळे (herding) निर्माण होते. बाजाराविषयीची 'माहिती' सर्वच गुंतवणूकदारांना पूर्णपणे असत नाही. त्यामुळे दुसऱ्या गुंतवणूकदारांच्या तथाकथित कृतीवर अवलंबून राहून इतर गुंतवणूकदार आपले निर्णय घेत असल्याने त्या बाजारात ही 'झुंड प्रवृत्ती' कार्यान्वित होते. ज्यावेळी भिन्न देशांचे वित्तीय बाजार याप्रमाणे वर्तन करतात त्यावेळी त्या प्रक्रियेचे वर्णन 'साथ' (contagion) असे केले जाते. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे आता जगातील सर्व प्रमुख बाजार संगणित्रांनी एकमेकांना जोडले गेल्यामुळे एखाद्या महत्त्वाच्या वित्तीय बाजारात जर भाव कोसळले तर ती 'साथ' इतर बाजारांत त्वरित पसरते. ब्राझीलचा सावरलेला 'रिअल' रशियाचा कर्जाचा हप्ता चुकल्यामुळे पुन्हा कोसळणे किंवा थायलंडचा बाथ कोसळल्यामुळे इंडोनेशिया, कोरिया, मलेशिया अशा दक्षिणपूर्व आशियातील राष्ट्रांच्या चलनाचे भाव कोसळणे, ही या 'साथी'ची उदाहरणे आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेला अशा प्रकारचा धोका

कितीसा असू शकेल ? भारताच्या प्रत्येक वित्तीय बाजाराची कामगिरी थोडक्यात तपासून याविषयी काही निष्कर्ष काढता येतो का ते पाहू. दक्षिणपूर्व आशियातील देशांचे चलन बाजार ज्यावेळी कोसळत होते त्या काळात रिझर्व्ह बँकेने रुपयाच्या मूल्यामध्ये होणारी घट सावकाशीने होईल, त्यातून घबराट निर्माण होणार नाही हे यशस्वीपणे पाहिले आहे. 1993 नंतर बॅसल तत्त्वांच्या आधारे भारतीय बँक व्यवसायाची पुनर्रचना करण्यात आली आहे. नियोजनाच्या कालात बँकांकडून ज्या अपेक्षा होत्या त्यापेक्षा वेगळ्या आणि विशेषत: नफ्याच्या आधाराने बँकांची कार्यदक्षता ठरविली जाणार असल्याने वर उल्लेखिलेले 'नैतिक धोका' व 'प्रतिकूल निवड' या दोषांचा प्रादुर्भाव बँक व्यवसायात निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बॅसलची मार्गदर्शक तत्त्वे हा धोका टाळण्याला अपुरी पडत असल्याचे प्रगत देशांमध्ये गेल्या 15 वर्षांमध्ये अनेक वेळा दिसून आले आहे. 1996 पूर्वीच्या वीस वर्षांमध्ये प्रगत देशांत 59 वेळा बँकांची दिवाळी वाजली आहेत. त्यावेळी त्यांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादिताच्या 9 टक्के उत्पन्न बँका वाचविण्यासाठी खर्ची पडले आहे. भारतातील समभाग भांडवल बाजाराला शिस्त लावण्याला सुरुवातच मुळात 'सेबी' ला समर्थ केल्यानंतर गेल्या दोनतीन वर्षात झाली. 1992 पर्यंत या बाजाराचे स्वरूप एकाधिकाराचे आणि बॉम्बे स्टॉक एक्सचेंजपुरतेच मर्यादित होते. जागतिक भागभांडवल बाजारांशी त्याची तुलनाच होऊ शकत नव्हती. भारताने खुले धोरण अवलंबिल्यावर ज्यावेळी भागभांडवल बाजारातून उद्योगांनी भागभांडवल 1991 मध्ये प्रथम उभे केले, त्यावेळची उद्योजकांची मानसिकता दर्शविणारी दोन बोलकी उदाहरणे देता येतील. 1990-94 या कालात जे समभाग भांडवल उद्योगांनी उभे केले त्यापैकी 30 ते 40 टक्के भांडवल उभे करणारे उद्योग अस्तित्वातच नाहीत. त्याच दरम्यान घडलेले हर्षद मेहता यांचे रोखे घोटाळा प्रकरण हे दुसरे उदाहरण आहे. जोशी व लिटल यांच्या वर्णनाप्रमाणे भारतीय समभाग बाजार हा 'सापाचे वारूळ' आहे, "lacking in fairness and integrity, prone to speculative excess and showing scant regard for the interests of small investors."

थोडक्यात, समभाग भांडवल बाजारातून भांडवल उभे करू पाहणाऱ्या उद्योगांचे वर्तन, त्या बाजारांचे संघटन या गोष्टी त्या बाजारांच्या विश्वसार्हतेच्या द्योतक नाहीत. असे असले तरी, भारतीय वित्तीय बाजारांमध्ये दक्षिणपूर्व आशियातील देशांमध्ये जशी वित्तीय बाजारांची दीन अवस्था (melldown) झाली, तशी भारतात होण्याची शक्यता कमी आहे. नजिकच्या कालात वित्तीय संस्थांना व्यापक स्वरूप येईपर्यंत तरी तसा धोका नाही. एक तर, भारताचा निर्यातीचा व्यापार भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादिताशी तुलना करता फार कमी आहे. त्यामुळे निर्यातीमध्ये झालेल्या घटीचा प्रवेगामुळे होणारा समष्टीय परिणाम महत्त्वाचा असणार नाही. दुसरे, भारतीय अर्थव्यवस्थेवर अजूनही शेती क्षेत्रातील उत्पन्नाचा प्रभाव अधिक महत्त्वाचा आहे आणि ते क्षेत्र वित्तसंस्थांमधील चंचलतेच्या प्रभावापासून नजिकच्या कालात तरी दूर राहील. अशा कारणांमुळे 1997-98 मध्ये दक्षिणपूर्व आशियातील पेचप्रसंगाचा रुपयाच्या मूल्यावर होऊ शकणारा परिणाम रिझर्व्ह बँक मर्यादित करू शकली. तथापी, हे खरेच आहे की, शासनाने आजपर्यंत रुपयाची जी परिवर्तनीयता स्वीकारली आहे, त्यामुळे विदेशी गुंतवणूकदारांची गुंतवणूक देश सोडून जाऊ शकेल. 2000-01 च्या अर्थसंकल्पामध्ये व पुढील वर्षी 1,400 वस्तूंपेक्षा जास्त उपभोग्य वस्तूंच्या आयातीवरील बंधने काढून टाकण्यात आली आहेत. त्यामुळे उपभोग्य वस्तूंची आयात वाढेल. गेले दोन महिने सोडले तर निर्यात गोठलेली किंवा घटणारीच आहे. भांडवली वस्तूंची आयात यावर्षी स्थिर असली तरी अर्थव्यवस्थेतील नरमाई कमी झाल्यास ती स्थिती बदलेल. त्यामुळे तेलाच्या किमती वाढणे किंवा जगातील महत्त्वाच्या वित्तीय केन्द्रांमध्ये पेचप्रसंग निर्माण होणे यासारखी तात्कालिक महत्त्वाची घटना घडली आणि भारतातील वित्तीय बाजारातील गुंतवणूक नाजुक (fragile) स्वरुपाची असली तर भारतीय वित्तीय बाजारांमध्येही पेचप्रसंग निर्माण होणे, ही दूरची शक्यता राहणार नाही.

अखेरीला, वित्तीय बाजाराच्या, विशेषत: समभाग बाजाराच्या, संदर्भात काही महत्त्वाचे निष्कर्ष मांडणे मला गरजेचे वाटते. प्रथमत: वित्तीय बाजारातील किमतीचे वर्तन आणि वास्तव अर्थव्यवस्थेची स्थिती यांचा परस्पर संबंध असल्याचे दिसत नाही. विशेषत: हे बाजार चंचल असल्याने त्यामधील किमती अर्थव्यवस्थेमधील साधनसंपत्तीच्या कार्यदक्ष विल्हेवारीकरिता (allocation) निरुपयोगी ठरतात. त्यामुळे अर्थातच बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार निरर्थक ठरतो. दुसरा, विकसनशील देशांमध्ये झालेल्या विदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीमुळे त्या देशात अधिक बचत उपलब्ध झाल्याचेही दिसत नाही. असे असूनही विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था विदेशी भांडवलाला अधिकाधिक खुल्या करण्याच्या प्रगत देशांच्या आग्रहामुळे त्या अर्थव्यवस्था विदेशी उद्योगांच्या व संस्थांच्या आक्रमणाला बळी पडत आहेत. तसेच, या अर्थव्यवस्था जागतिक मंदीच्या धोक्याला अधिकाधिक उघड्या पडत आहेत. अशा प्रकारची व्यापक स्वरुपाची मंदी आलीच तर, " In this melt-down scenario, where the international system breaks down, global capitalism would be thrown back into a financial stone age."


## मराठी अर्थशास्त्र परिषद

### अंक परत आल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांचा पत्ता बदललेला असेल त्या सदस्यांनी आपला बदललेला पत्ता कार्यवाहांना लेखी कळवावा. म्हणजे कार्यालयातील दप्तरात आवश्यक तो बदल करून घेऊन त्या पत्त्यावर पत्रव्यवहार / 'अर्थसंवाद' चे अंक पाठविले जातील. पत्ता बदलल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणाने 'अर्थसंवाद' चा अंक परत आल्यास त्यापुढील अंक पाठविण्याचे बंद केले जाते. सर्व आजीव सदस्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

आ. गो. पुजारी

कार्यवाह – खजिनदार



## मराठी अर्थशास्त्र परिषद

### आंतरराष्ट्रीय व्यापार – सिद्धान्त व धोरण (लेखक : भ.ग. बापट)

एम. ए. अर्थशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र विषयासाठी उपयुक्त आणि दर्जेदार म्हणून प्रशंसा लाभलेला वरील ग्रंथ वाचकांना उपलब्ध झाला आहे.

किंमत रु. 160/- आणि सूट 10 टक्के. सूट वजा जाता रक्कम म. ऑ. ने / डिमांड ड्राफ्टने ('मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने आणि मंगळवेढा येथील बँक शाखेवर देय) कार्यवाहांकडे पाठवावी. ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक पोस्टाने पाठविला जाईल.

**पत्ता: डॉ. आ. गो. पुजारी, किल्ला भाग, मंगळवेढा (जि. सोलापूर) 413 305**

# मार्क्सच्या दृष्टिकोनातून भारतीय समाजातील वर्गकलह *

## : स्वरूप, सटीक विश्लेषण, प्रत्युत्तर, सद्यःस्थिती

लतिका अरगडे **

* अर्थविज्ञान, जून 1978, खंड 20, पृष्ठे 101-24.

** गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

### 1.0 प्रस्तावना

वि.म. दांडेकरानी भारतीय समाजातील वर्गकलह या विषयाचा ऊहापोह त्यांच्या 1978 साली लिहिलेल्या 'Nature of Class Conflict in the Indian Society' या शोधनिबंधाद्वारे केला आहे. त्यावरील उलटसुलट चर्चा त्याचा अभ्यास करणाऱ्या इतर संशोधकांनी केली आहे. त्यात आनंद नाडकर्णी, दासगुप्ता, व्यंकटरमय्या यासारख्या विचारवंतांनी त्यांचे विचार मांडले आहेत. त्यानंतर त्या सर्वांना स्वतंत्रपणे उत्तर देण्यापेक्षा दांडेकरानी 'A Restatement' या नावाखाली एकत्रितपणे उत्तर दिले आहे. हा सर्वच अभ्यास गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या 'अर्थविज्ञान' या मासिकामध्ये (1978) छापून आला आहे. या लेखात वर निर्देश केलेला दांडेकरांचा मूळ लेख, त्यावरील इतर तज्ज्ञांची मते आणि त्याना दांडेकरांचे उत्तर या गोष्टींचा थोडक्यात आढावा घेण्याचे योजिले आहे. दांडेकरांच्या या लेखाला आता 20 वर्षे पूर्ण झाली आहेत. तेव्हा भारतीय समाजातील वर्गकलहाच्या प्रश्नाने या 20 वर्षात कोणत्या दिशेने प्रवास केला आहे आणि दांडेकराना अभिप्रेत असलेल्या दिशेने हा समाज गेला किंवा नाही अथवा त्यात काही बदल झाले असतील तर त्या ठळक बदलांबद्दल थोडेसे लिहिण्याचा प्रयत्न लेखाच्या शेवटी केला आहे. वर निर्देश केल्याप्रमाणेच संपूर्ण लेख चार भागात विभागला आहे.

### 2.0 भारतीय समाजातील वर्गकलहाचे स्वरूप

#### 2.1 मार्क्सवादाचा सिद्धान्त

दांडेकरानी 'भारतीय समाजातील वर्गकलहाचे

स्वरूप' या विषयावर डिसेंबर 1977 मध्ये 'भटनागर व्याख्यान' दिले होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अशा प्रकारच्या विषयावरील व्याख्यानाचे निमंत्रण स्वीकारण्याचे कारण त्या विषयावर त्यांचे प्रभुत्व आहे म्हणून नव्हे, तर त्यांच्या मते भारतातील कित्येक समस्या समजावून घेताना त्याच्यामागील वर्गकलहाचे स्वरूप माहीत असणे जरूर आहे म्हणून हा विषय तसा अगदी मूलभूत गरजेचा आहे. त्यांच्या मते मार्क्सवाद हा एक विचार नसून ती एक विचारप्रणाली किंवा विचारांची चौकट आहे आणि त्या चौकटीमध्ये आताच्या भारतीय समाजाचे वर्गीकरण आणि त्यातील कलहाचा विचार मांडण्याचा हा प्रयत्न आहे. मूलत: लेखाचे दोन भाग पडतात. त्यापैकी पहिल्या भागात दांडेकर मार्क्सची 'वर्ग,' 'वर्गकलह' याविषयीची संकल्पना विस्तृत उद्धृतांसकट मांडतात आणि नंतरच्या विभागात या चौकटीशी साधर्म्य असलेली परंतु आधुनिक भारतात अस्तित्वात असलेली संरचना व त्यातील 'वर्गकलह' यांचे विवेचन करतात.

दांडेकर मार्क्सच्या वर्ग या संकल्पनेबद्दल लिहिताना त्याच्या व्याख्येपासूनच सुरुवात करतात. त्याचा पाठपुरावा करीत असताना मार्क्सनी त्यांच्या इतक्या विस्तृत लिखाणामध्येसुद्धा वर्ग (Class) ही संकल्पना स्वच्छपणे लिहिलेली नसल्याचे त्यांना जाणवते. त्यासाठी वर्गाची नक्की व्याख्या करणे आणि त्या व्याख्येनुसार समाजाचे किती वर्ग करावयाचे आणि त्यानुसार आताच्या काळाचा अभ्यास करण्याची त्यांना गरज वाटते. वर्गाची व्याख्या नीटपणे समजण्यासाठी 1848 साली लिहिलेल्या 'Manifesto of Communist Party' या संदर्भाचा उपयोग लेखात केला आहे.[1] जरी मार्क्सच्या मूळ Manifesto मध्ये वर्ग या संकल्पनेची नीट व स्पष्ट व्याख्या दिलेली नसली तरी एंजल्सच्या Manifesto च्या इंग्रजी भाषांतरात त्या व्याख्या मिळू शकतात. मार्क्सच्या संकल्पनेप्रमाणे समाज हा दोनच वर्गांत विभागलेला असतो, बुर्झ्वा किंवा मालकवर्ग व श्रमजीवी किंवा कामगार वर्ग. दांडेकर आपल्या लेखात या दोन्ही वर्गाबद्दल मार्क्सची काय संकल्पना आहे ती मार्क्सच्याच योग्य अशा उद्धृतांमधून विशद करून सांगतात. खालील भागात आपण या सर्वांचा क्रमवार गोषवारा थोडक्यात लिहून भारतातील वर्गकलहाच्या चर्चेकडे वळणार आहोत.

प्रथम आपण बुर्झ्वा वर्गाबद्दल चर्चा करू या. या वर्गाचे वैशिष्ट्य काय ? मुख्यत: हा वर्ग सर्व उत्पादनसाधनांचा मालक असतो आणि त्या उत्पादनसाधनांचा वापर करून उत्पादन करण्यासाठी तो पगारी नोकरांची नेमणूक करतो. या वर्गाची उत्पत्ती म्हणजे एक प्रदीर्घ प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये नैसर्गिक व मानवनिर्मित साधनांचा हा मूठभर वर्ग मालक होतो. ही उत्पादनाची साधने आणि देवाणघेवाणीची साधने पूर्वी सरंजामांच्या हातात होती आणि काळाच्या ओघात आणि काही मूल्यबदलांमुळे ही सरंजामशाही जाऊन नवीन अर्थव्यवस्था आली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे हा बुर्झ्वा वर्ग होय. मात्र हा वर्ग सरंजामशाहीपेक्षा एका महत्त्वाच्या बाबतीत वेगळा आहे. ते वेगळेपण त्यातील खुल्या किंवा मुक्त स्पर्धेमध्ये दडलेले आहे. त्या मुक्त स्पर्धेमध्येच मुक्त व्यापाराची ही मूल्ये साठवलेली आहेत आणि या दोन्हींचा मिलाफ होऊन येथे एका वेगळ्या प्रकारचे शोषण होते. सरंजामशाहीमध्ये पूर्वी धर्म किंवा राजकारण या नावावर शोषण चाले. याउलट सध्या अतिशय प्रत्यक्षपणे आणि अमानुष असे वेगळ्या प्रकारचे शोषण केले जात आहे. परंतु याचबरोबर आपण हेही विसरता कामा नये की, याच प्रगतीमुळे मानवजात निसर्गात असलेल्या गोष्टींचा योग्य वापर करून कशी प्रगती साधू शकते हेही सिद्ध झाले आहे. यामध्ये शेती, वाहतूक, धरणे, वेगवेगळ्या प्रकारची यंत्रे अशा अनेक गोष्टींचा समावेश होऊ शकतो आणि मागील कित्येक शतकांपेक्षा या शतकात माणूस कितीतरी पुढे गेला आहे हेही पाहतो. मग असे सर्व असताना आणि हे होण्यात बुर्झ्वा वर्ग फार महत्त्वाची भूमिका बजावत असताना अन्य वर्गांबरोबर त्यांचा कलह का आणि तो योग्य कसा असा स्वाभाविकच प्रश्न येतो. ज्या मार्गाचा वापर करून बुर्झ्वा वर्गाने सरंजामशाहीचे पतन केले ते मार्गच बहुधा

त्यांच्यावर उलटण्यात या कलहाचे बीज दडलेले असावे. मार्क्सना निश्चितपणे या स्पर्धेअंतर्गत दडलेल्या केन्द्रित व एकवटलेल्या अशा पद्धतींची चाहूल लागलेली होती. परंतु मार्क्सनी त्यांची स्पर्धात्मक स्थितीची चौकट कधी सोडली नव्हती आणि त्याचमुळे दांडेकराना वाटते की, सद्यःपरिस्थितीत जेथे एकाधिकारशाही चालू आहे तेथे मार्क्सची तत्त्वे लागू पडू शकत नाहीत आणि त्याचमुळे सध्या अस्तित्वात असलेल्या रचनेमध्ये मार्क्सच्या तत्त्वाने उत्तरे सापडत नाहीत. तेव्हा हा बदल लक्षात घेऊन मार्क्सची तत्त्वे पुढे नेली पाहिजेत आणि या वर्गकलहाचे स्वरूप तपासले पाहिजे असा दांडेकर आग्रह धरतात. तत्पूर्वी मार्क्सच्या तत्त्वाप्रमाणे त्यांचा दुसरा वर्ग 'श्रमजीवी वर्ग' (proletariat class) याबद्दल मार्क्सची संकल्पना थोडक्यात समजावून घेतली पाहिजे.

'श्रमजीवी कामगार' हा बुर्झ्वा वर्गामुळे तयार झालेला आवश्यक व विशिष्ट असा वर्ग आहे. वर वर्णन केल्याप्रमाणे बुर्झ्वा वर्ग हा जर उत्पादनाच्या साधनांचा मालक असेल तर कामगार वर्ग हा अशी कोणतीच मालकी नसलेला वर्ग आहे आणि त्याला स्वतःच्या चरितार्थासाठी स्वतःजवळ असलेली काम करण्याची शक्ती विकावी लागते. अशा प्रकारे हा वर्ग तयार होतो. त्याच्या या वैशिष्ट्यामुळेच हा वर्ग बुर्झ्वा वर्गाचा शत्रू होतो. त्यांच्या कलहात कामगारांचाच अंतिम विजय होणार असल्याचे विधान मार्क्सनी त्यांच्या लिखाणात अतिशय जोरदारपणे मांडले आहे. मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे हा काहीही नसलेला वर्ग एकत्र येऊन शेवटी त्याचा एक राजकीय पक्ष होईल आणि राज्यकर्त्यांना कामगारांच्या हिताचे कायदे करण्यास भाग पाडेल. असे घडत असताना बुर्झ्वा वर्गाचे संघटन दुबळे होत जाईल, त्यांच्यातच फूट पडेल आणि बुर्झ्वा वर्गापैकी काही लोक कामगारांची बाजू घेतील. या प्रक्रियेने कामगार संघटना विजयी होत जातील. म्हणूनच मार्क्सच्याच शब्दांत दांडेकर लिहितात की, ''आधुनिक उद्योगांची वाढ हीच त्या उद्योगांच्या मुळावर घाव घालते आणि बुर्झ्वा वर्ग हा स्वतःच स्वतःसाठी हा घाव घालावयाला जबाबदार असतो. सरतेशेवटी बुर्झ्वा वर्गाचा शेवट आणि कामगार वर्गाचा विजय या दोन्ही गोष्टी अटळ आहेत.''

याप्रकारे मार्क्सना अभिप्रेत असलेला लढा आताच्या काळातही चालू आहे का हे पाहणे आणि खरोखरीच त्यानी कल्पना केली तसेच दोन वर्गांत संपूर्ण जगाचे विभाजन होते आहे का हे पाहणे दांडेकराना भारतीय समाजाचा वर्गकलहाचा अभ्यास करण्यापूर्वी जरूर वाटल्याने दांडेकर यानी आधुनिक मध्यम वर्गाची उत्पत्ती कशी झाली हे तपासून पाहिले, त्या वर्गाची वैशिष्ट्ये थोडक्यात बघून आपण भारतातील परिस्थितीचे विश्लेषण बघू या.

मार्क्सनी कामगारवर्गाचे वर्णन करताना मूलतः दोन गोष्टी अभिप्रेत धरलेल्या आहेत. एक म्हणजे सर्व कामगार समान असतात आणि त्यांच्यामध्येही पूर्णतः स्पर्धात्मक असेच वागणे असते. त्याचा परिणाम म्हणजे त्यांच्या बाजारात ते एका वस्तूसारखेच बनतात आणि त्यांचा बाजार स्पर्धात्मक परिस्थितीत उपलब्ध होणारी किंमतच त्याना देईल. ही किंमत ही माणसाची किंमत नसून वस्तूसारखीच असेल आणि ती त्या कामगाराला फक्त जगण्यापुरतेच उत्पन्न देणारी इतकीच असेल. त्याप्रमाणे दुसरी गोष्ट जी मार्क्सनी मनात धरली होती ती म्हणजे, यांत्रिकीकरणाच्या अतीव वापराने कामाचे इतके विभाजन होईल की, कामगाराला त्यात आपले काहीच कौशल्य वापरावे लागणार नाही. याउलट, त्याला अतिशय कंटाळवाणे व सोपे असे काम करावे लागेल. यामुळे सर्व कामगारांच्या कौशल्यात एकजिनसीपणा येईल आणि त्यांची किंमत पण त्यामुळे सारखीच होईल. अशातऱ्हेने सर्वच स्तरातील कामगार हे एकाच स्तरावर (खालच्या) जाऊन पोहोचतील.

मार्क्सची ही दोन्ही परस्परपूरक अशी भाकिते कालाने खोटी ठरविली आहेत. आता यंत्रे अतिशय गुंतागुंतीची झाली असल्याने त्यांच्या वापरासाठी विविध स्तरातील कौशल्यांची गरज भासते. या नवीन प्रकारच्या उत्पादन प्रक्रियेमध्ये सर्व कामगार एकाच

स्तरावर न राहता त्यात मुख्य श्रमजीवी कामगार व पांढरपेशा कामगार असे दोन स्तर तयार झाले आहेत. त्याचप्रमाणे आता तांत्रिक माहिती असून, उत्पादन क्षेत्रात बाकीच्या गोष्टींचे व्यवस्थापन करण्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे तज्ज्ञ लागतात. हा वर्ग उत्पन्नाच्या साधनांचा मालक नसला तरी त्या वर्गाकडे असलेली माहिती व ज्ञान हे फार महत्त्वाचे असल्याने त्याना लठ्ठ पगार असतो. त्याना आपण नवश्रीमंत असे म्हणू शकतो. त्यांचा प्रयत्न नेहमीच बुर्झ्वा वर्गाबरोबर राहण्याचा आणि त्यांचीच नक्कल करण्याचा असतो. या परिस्थितीत मार्क्सच्या अपेक्षेप्रमाणे दोनच वर्ग तयार न होता हा नवीन 'मध्यम वर्ग' तयार होतो. त्यातही दोन भाग आहेत. उच्च मध्यमवर्ग, जो बुर्झ्वा वर्गाच्या जवळ आहे आणि कनिष्ठ मध्यम वर्ग, जो कामगार वर्गाच्या जवळ आहे. या मध्यम वर्गात जरी सर्व पगारी नोकरच असले तरी त्यांच्या आकांक्षा वेगवेगळ्या असल्याने त्यांच्यात एकसंधपणा असण्याऐवजी एकमेकांशी स्पर्धाच अधिक असते. त्यामुळे मार्क्सच्या संकल्पनेप्रमाणे ते 'कामगार वर्ग' या एकाच छत्राखाली येणे जवळजवळ अशक्य आहे.

त्याचप्रमाणे कामगार वर्गासारखेच उत्पन्न असणारे परंतु कामगार नसणारे आणि स्वतःचे उत्पन्न स्वतःच्याच तुटपुंज्या भांडवलावर उत्पन्न करणारे शेतकरी व लघुउद्योजक या लोकांचा मार्क्सनी विचारच केलेला नाही. परंतु त्यांच्या कामाच्या स्वरूपाचा व चरितार्थाचा मार्ग इतका वेगळा आहे की, त्याना या वर्गकलहात कोणत्याच वर्गात जागा नाही असे दांडेकराना वाटते. त्यामुळे भारतातील समाजाचे याबाबतीत असलेले विभाजन कसे आहे, किती लोक या वर्ग कलहात मोडतात आणि त्याचे स्वरूप कसे आहे हे लेखाच्या पुढील भागात पाहू या.

## 2.2 भारतीय स्थितीचे विश्लेषण

मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे दोन वर्ग निर्माण होण्यातच अडचण आहे असे दांडेकरांना वाटते आणि त्या विचारांचा पाठपुरावा करताना प्रा. दांडेकर भारतातील समाजाकडे वळतात. ते प्रथम भारतीय समाजात कोणते आणि कसे वर्ग झाले आहेत ते विशद करून नंतर त्यांच्यातील कलहाच्या स्वरूपाचे विश्लेषण करतात.

भारतातील वर्गांच्या संरचनेची संकल्पना दांडेकरांनी खालीलप्रमाणे मांडली आहे. ही संरचना 1971 च्या जनगणनेतील माहितीवर आधारित आहे. जरी ही माहिती सात वर्षापूर्वीची असली तरी 1971 साली असलेल्या वर्गसंरचनेमध्ये इतक्या थोडक्या कालात फारसा बदल होणार नाही असे गृहीत धरले तरी वावगे ठरू नये अशी भारतातील समाजसंरचना आहे. जनगणनेमध्ये सर्व व्यक्ती कामगार व बिगर-कामगार अशा दोन गटांमध्ये विभागल्या आहेत. त्यापैकी कामगारांची (worker) पुढे वर्गवारी करण्यात आली आहे. एकूण 54.79 कोटी लोकसंख्येपैकी 18.04 कोटी व्यक्तीच कामगार या गटात मोडतात. त्यापैकी 13.20 कोटी कामगार भांडवलशाहीपूर्व काळातील कामामध्ये गुंतलेले आहेत (शेतकरी, शेतमजूर, घरगुती क्षेत्रातील कामगार), उरलेले 4.75 कोटी कामगार (30 टक्के) फक्त मार्क्सनी वर्णन केल्याप्रमाणे भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील कामगार होऊ शकतात. दांडेकरांच्या म्हणण्यानुसार इतके कमी कामगारसुद्धा मार्क्सनी वर्णन केल्याप्रमाणे फक्त दोन वर्गात विभागता येत नाहीत. यापैकी 1.6 कोटी कामगार तर स्वतंत्रपणे काम करीत असल्याने ते बुर्झ्वा किंवा श्रमजीवी कामगार यातील कोणत्याच वर्गात मोडत नाहीत. याउलट फक्त 3.17 कोटी कामगारच कामगार -मालक (employer-employee) या नात्यात काम करीत असतात. त्यांची विभागणी तक्ता 1 मध्ये दाखविली आहे.

या तक्त्यातील 73.5 टक्के कामगार भांडवलशाहीपूर्व काळातील उत्पादन तंत्र वापरत असल्यामुळे त्यांचा या वर्गकलहाशी काही संबंध जोडता येत नाही. फक्त 26.5 टक्के कामगारांच्या वर्गसंरचनेबद्दल बोलणे शक्य आहे. या कामगारांच्या

तक्ता 1
भारतीय कामगारांची वर्गवारी (1971)

| | कामगार वर्ग | दशलक्ष कामगार | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | **भांडवलशाहीपूर्व वर्ग** | **132.0** | **73.5** |
| | (अ) शेतकरी | 78.2 | |
| | (आ) शेतमजूर | 47.5 | |
| | (इ) घरगुती उद्योग | 6.3 | |
| 2 | भांडवलशाही समाजातील स्वतंत्र कामगार | 16.2 | 8.9 |
| 3 | मालक | 2.2 | 1.2 |
| 4 | पांढरपेशे नोकर | 12.2 | 6.8 |
| 5 | कारखान्यांतील कामगार | 17.3 | 9.6 |

वर्गकलहाबद्दल बोलावयाचे झाले तर, हा कलह आजकालच्या संपांमधून स्पष्ट होतो. या वर्गात श्रमजीवी व पांढरपेशी असे दोन्ही प्रकारचे कामगार मोडतात. म्हणून जे पगारी नोकर आहेत त्या सर्वांनाच 'कामगार' संबोधणे योग्य आहे, त्या वर्गालाच मार्क्सचा 'प्रोलिटारिएट' वर्ग असे म्हणता येईल. मार्क्सच्या युक्तिवादाप्रमाणे हा वर्ग त्यांच्या वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी लढा देत राहील. परंतु दांडेकराना असा प्रश्न पडला आहे की, लढ्याचा हा मार्क्सचा मूळ हेतूच आजच्या भारताच्या या वर्गातील लढ्यात शिल्लक राहिला आहे का ? त्याचे उत्तर शोधताना दांडेकर म्हणतात की, याचे उत्तर हा लढा कोणाविरुद्ध चालला आहे त्याच्या उत्तरात सापडण्याजोगे आहे. त्यासाठी भारतातील या लढ्यासंबंधीची सद्य:परिस्थिती पडताळून पाहणे दांडेकराना गरजेचे वाटते.

कामगारवर्गाच्या दडपणामुळे खूप भांडवलशाही राष्ट्रांनी मार्क्सने घालून दिलेल्या मार्गावर बरीच प्रगती केलेली दिसते. त्या मार्गातील मुद्दे खालीलप्रमाणे होत :

1 राष्ट्रीय अशी एकच बँक की जिच्यामुळे कर्ज देण्याच्या कामाचे पूर्णत: केन्द्रीकरण होते आणि त्या बँकेच्या हातात सर्व सत्ता एकवटली जाते.

2 कर्जाप्रमाणेच वाहतूक व दळणवळण याही गोष्टींचे केन्द्रीकरण (सरकारच्या ताब्यात).

3 सरकारी उत्पादन क्षेत्राची वाढ.

भारतानेही हीच सूत्रे अवलंबिलेली आहेत.

याशिवाय मार्क्सनी विचार न केलेल्या अशा कल्याणकारी योजनासुद्धा सध्याची सरकारे करीत आहेत. भारतात तर अशा योजनांमुळे सरकार हाच सर्वात मोठा 'मालक' (employer) झालेला आहे. 1971 मध्ये जे 2.95 कोटी पगारी कामगार होते त्यांची संख्या 1974 मध्ये अंदाजे 3 कोटी होईल. त्याची विभागणी थोडक्यात अशी करता येईल. 40 टक्के लोक सरकारी नोकरांमध्ये, 35 टक्के कामगार लघुउद्योग धंद्यामध्ये आणि 25 टक्के पेक्षासुद्धा कमीच कामगार बुर्झ्वा वर्गातील मोडणाऱ्या वर्गातील मालकांकडे काम करतात. तिन्ही वर्गातील कामगारांच्या त्यांच्या मालकाविरुद्धच्या लढ्यांचे स्वरूप आता आपण थोडक्यात पाहू.

प्रथम सरकारी नोकरांकडे वळू या. 125 लाख कामगार या क्षेत्रात काम करतात असे गृहीत धरले असता, त्यातील 62 लाख कामगार सरकारच्या प्रशासन विभागात काम करतात. 33 लाख लोक सार्वजनिक सेवानिर्मिती संस्थेत तर उरलेले 33 लाख लोक उत्पादन क्षेत्रात काम करताना आढळतात. या सर्वच क्षेत्रांत पूर्ण किंवा अंशत: एकाधिकार आहे. या एकाधिकारात नफ्याची संकल्पना व प्रक्रिया दोन्हीही संभवत नाही. अशा परिस्थितीत या सेवेतील कामगार सरकारविरुद्ध 'मालक' किंवा बुर्झ्वा म्हणून कशासाठी लढा करतात ? दांडेकरांच्या मते याला दोन कारणे असू शकतात. एक तर 'सरकार' हे संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करीत असते असे मानले आणि जर त्या वर्गाचे राहणीमान किंवा दरडोई उत्पन्न हे सर्वसाधारण समाजांच्या राहणीमानापेक्षा किंवा ते राहणीमान प्राप्त

करण्यासाठी लागणाऱ्या दरडोई उत्पन्नापेक्षा कमी असेल तर त्यांचा हा लढा योग्य होय. परंतु भारतात सर्वसाधारणपणे अशा प्रकारची शक्यता दिसत नाही. याउलट, जर सरकार हेसुद्धा एक सर्वसामान्य बुर्झ्वा वर्गाचा प्रतिनिधी असेल, तर मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे आधुनिक सरकारी यंत्रणा ही बुर्झ्वा वर्गाने चालविलेली एक संस्था बनेल. मार्क्स एका ठिकाणी असेही म्हणतात की, बुर्झ्वा वर्ग हा स्वत: स्वत:साठी खड्डा खणत असतो. वरील दोन्ही गोष्टी जर आधुनिक सरकारला लागू केल्या आणि सरकारी क्षेत्र व खाजगी भांडवलदार यांच्यात जर कामगारवर्गाने फरक केला नाही तर भारताची, किंबहुना कोणत्याही सरकारची, गत वर वर्णन केल्यासारखी झाल्याशिवाय राहणार नाही.

दुसरा गट लहान उद्योगधंद्यांच्या मालकांकडे काम करणाऱ्यांचा होईल. येथे एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे की, येथील सर्वच व्यवहार बड्या धंद्यांतील व्यवहारापेक्षा कमी प्रमाणावर चालतात. याच नियमाने येथील कामगारांचे वेतनही मोठ्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांपेक्षा कमी असते. येथे जर कामगारांनी वेतनवाढीसाठी संप केला तर लहान मालक ते देऊ शकणार नाही आणि सरतेशेवटी टाळेबंदी होऊन या क्षेत्रातील मालकवर्ग आर्थिक कलहात बुडून जाईल. मार्क्सच्या विचाराने, या प्रक्रियेतूनच मोठा कामगार वर्ग तयार होतो. दांडेकरांच्या मते भारतात हा मालक वर्ग बुडल्याने मार्क्सला अपेक्षित प्रक्रिया होणार किंवा नाही माहीत नाही परंतु येथील कामगाराला त्याचा मालक आर्थिकदृष्ट्या बुडावा आणि त्याची उत्पादनसाधने मोठ्या मालकाने विकत घ्यावी असे मात्र जरूर वाटते. लघुउद्योजक जेव्हा आर्थिकदृष्ट्या बुडावयाला येतो तेव्हा त्याचे उत्पादन संयंत्र एखादा मोठा कारखानदार विकत घेतो, त्यातील कामगार हे त्या मोठ्या कारखान्यातील कामगार होतात आणि त्याना त्याचप्रमाणे सर्व सोयीसवलती मिळतात. म्हणून छोट्या कारखान्यांतील कामगारांची तशी इच्छा असते.

सरतेशेवटी आपण कामगार वर्गाच्या मोठ्या आस्थापनांतील बुर्झ्वा वर्गाशी असलेल्या वेतनवाढीच्या लढ्याचा विचार करू. भारतात हा वर्ग संपूर्ण कामगार वर्गाच्या (total workers) 25 टक्के एवढा जेमतेम आहे आणि एकूण कामगारांच्या (labour force) सहावा हिस्सा एवढाच आहे. म्हणून या लढ्याला मार्क्सने 'बहुसंख्यांकांचा लढा' असे जे प्रतिपादले होते तसे नसून हा लढा अल्पसंख्यांकापुरताच मर्यादित राहिला आहे. हीच बाब भारतातील वर्गकलहाला विशिष्ट कलाटणी देणारी आहे. हे पुढील विवेचनावरून लक्षात येईल.

मार्क्स हे कायमच पूर्ण स्पर्धात्मक अशा चौकटीत विश्लेषण करीत असल्याने, एकाधिकारातील चौकटीत असलेल्या भांडवलदार व तशाच चौकटीत असलेल्या कामगार वर्गाचे विश्लेषण करणे मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे उचित होणार नाही. दांडेकरांच्या मताप्रमाणे असा एकाधिकार असलेला एकत्रित कामगार वर्ग अतिशय बलवान असतो. एकाधिकाराच्या चौकटीतील (बुर्झ्वा) मालक वेतनवाढीचे परिमाण, जराही अडचण न येता, सामान्य गिऱ्हाईकावर तो खर्च ढकलून वसूल करू शकतात. अशा परिस्थितीत या कामगारांचा वेतनवाढीचा लढा तुलनात्मकदृष्ट्या अधिक सोपा व फलदायी असतो. या गोष्टींचे परिणाम फार गंभीर होतात. या प्रकारच्या परिस्थितीमुळे मोठ्या आस्थापनांतील कामगारांची सौदाशक्तीसद्धा लहान उद्योगांतील कामगारांच्या सौदाशक्तीपेक्षा कितीतरी अधिक होते आणि विशेष म्हणजे या शक्तीची बीजे त्यांच्या एकीत किंवा राजकीय कुशलतेमध्ये नसून ती त्यांच्या मालकाकडे असलेल्या एकाधिकाराच्या शक्तीत आहेत. या एकाधिकारामुळे वेतनवाढीमुळे येणारा खर्चाचा बोजा मालक सरळपणे सामान्य गिऱ्हाईकांवर लादू शकतो. म्हणून त्याच्या नफ्यावर या वेतनवाढीचा परिणाम होत नाही. कामगारांना त्याची पर्वा नसते. याचाच अर्थ वर्गकलहाच्या नावाखाली या मोठ्या आस्थापनांतील कामगार त्यांच्या मालकाच्या हातात हात घालून एकाधिकारी भांडवलदार व एकाधिकारी कामगार एकाधिकारामधून मिळणारा नफा वाटून घेतात.

यानंतर मार्क्सच्या विरोधविकासामधील (dialectic) वर्गकलहातील डाव्या व उजव्या बाजूंबद्दलचे विवेचन दांडेकरानी त्यांच्या लेखात केले आहे. मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे भांडवलदार व कामगार एकत्रितपणे नांदणे ही या प्रक्रियेची जमेची बाजू आहे, तर कामगार वर्गाचे समूळ उच्चाटन ही त्याची डावी बाजू आहे. यावर विचार करता भारतातील परिस्थिती मार्क्सनी वर्तविलेल्या परिस्थितीपेक्षा खूपच निराळी आहे. भारतातील पाच-षष्ठांश कामगारवर्ग हा मार्क्सनी वर्णन केलेल्या दर्जाचा कामगार झालेलाच नाही. ते सर्व लोक मोठ्या आस्थापनांतल्या कामगारासारखा कामगार होण्याची वाट बघताहेत. ही प्रक्रिया होण्यास खूप वेळ लागणार आहे. तोपर्यंत बुर्झ्वा व मार्क्सच्या कल्पनेतील कामगार एकत्रितपणे उरलेल्या समाजाचे शोषण करण्याचीच अधिक शक्यता आहे असे दांडेकराना वाटते. या कामगार वर्गाला दांडेकर 'संघटित कामगार' असे संबोधितात आणि भारतातील वर्गकलहाचे वर्णन ते पुढील शब्दांत करतात, ते लिहितात, ''संघटित कामगार एका बाजूला आणि सरकार किंवा मोठ्या आस्थापनांतील मालक यांच्यातील संघर्ष आणि या दोघांनी मिळून असंघटित समाजाला लुटण्याची प्रक्रिया असे भारतातील वर्गकलहाचे वर्णन करता येईल (यात एक-नवमांश संघटित कामगार आठ-नवमांश असंघटित समाजाला लुटत आहेत).''

भारतातील हाच वर्गकलह एका वेगळ्याच स्तरावरून दांडेकरानी त्यांच्या लेखात पुढे नेला आहे. ते लिहितात की, मार्क्सना अभिप्रेत असलेल्या वर्गकलहाने भारतात मात्र संघटित वर्ग विरुद्ध असंघटित वर्ग असे स्वरूप धारण केले आहे. संघटित वर्गात सरकारी तसेच खाजगी क्षेत्रांतील संघटित कामगार आणि सरकार आणि मोठ्या आस्थापनांतील मालक मिळून या संघर्षातील क्षेत्रांवर पकड धरून आहेत. इतर सर्व क्षेत्रांतील मालक व त्यांचे कामगार हे असंघटित वर्गात मोडतात. या अशाप्रकारे निर्माण झालेल्या वर्गाला आपण मार्क्सला अभिप्रेत असलेल्या वर्गाचे नामकरण करू शकतो का हा खरा प्रश्न आहे. बदललेल्या आर्थिक संबंधांच्या कालात, उत्पादनाच्या साधनांवर मालकी हक्क असणे हीच बाब फक्त सामाजिक वर्गीकरणाला पुरेशी नाही आहे. याउलट, एकाधिकारातील उत्पन्नाचे वाटेकरी आणि त्यात वाटा नसलेले लोक यावरच सामाजिक वर्गीकरण करणे अधिक उचित आहे असे दांडेकराना वाटते. या गोष्टींवरून निर्माण झालेल्या वर्गांना दांडेकर 'किंमत बनविणारा' (price-maker) आणि 'किंमत स्वीकारणारा' (price-taker) असे नवे नामाभिधान करतात. वर वर्णन केलेल्या परिस्थितीत संघटित वर्ग त्यांच्या सोयीप्रमाणे वस्तूंची बाजारातील किंमत ठरवितात म्हणून त्यांच्या वर्गाला (कामगार, मालक मिळून) दांडेकर 'किंमत बनविणारा वर्ग' मानतात. याउलट, इतर सर्व असंघटित लोक जी किंमत ठरविली गेली आहे ती स्वीकारतात म्हणून त्या असंघटित वर्गाला ते 'किंमत स्वीकारणारा वर्ग' असे संबोधितात. हे दोन्ही वर्ग एकमेकांच्या विरुद्ध आहेत. तसेच स्वतःच्या अस्तित्वासाठी दोन्ही वर्ग एकमेकांचे अस्तित्व मानतात ही मार्क्सच्या विरोधविकासामधील उजवी बाजू आहे. स्वतःचे शोषण थांबविण्यासाठी किंमत स्वीकारणाऱ्यांना शोषित वर्ग म्हणून पूर्णतः नष्ट व्हावयास पाहिजे. हे उद्दिष्ट तो वर्ग त्यांच्या विरुद्ध असलेल्या वर्गाचा नायनाट न करता स्वतःच त्या वर्गात जाण्याची उलटी क्रिया करून गाठू इच्छितो. ही या कलहाची डावी बाजू आहे. यावरून हे दोन्ही गट मार्क्सना अभिप्रेत असे वर्ग निर्माण करतात असे अनुमान दांडेकरानी काढले आहे.

लेखाच्या शेवटी भारतातील प्रत्यक्ष परिस्थिती या प्रक्रियेच्या कोठे आहे याचे विवेचन दांडेकरानी केले आहे. ते म्हणतात की, ''असंघटित (किंमत स्वीकारणारा) वर्ग आपापले उद्योगधंदे सोडून मोठ्या आस्थापनांतील कामगार होण्यासाठी शहराकडे धाव घेऊ लागले आहेत. या सर्वांना एक तारखेचा पगार दिसतो. बाकी जगात काही घडो, तो पगार त्यांना हवाच ! यामुळे दोन्ही वर्गांतील दरी वाढत जाईल आणि प्रत्येकाचीच धडपड 'किंमत बनविणाऱ्यांच्या' वर्गात मोडण्याची राहील, परंतु एका विशिष्ट स्तराच्या पुढे हे

अशक्य होईल आणि त्यातील विरोधाभास सर्वांच्याच लक्षात येईल. तोपर्यंत वेळ गेलेली असेल आणि सबंध सामाजिक संरचना तेव्हा कोलमडून पडेल''.

### 3.0 सटीक विश्लेषण

या विभागात आपण दांडेकरांच्या वरील लेखावर विविध विचारवंतांनी केलेली टिपण्णी पाहू या.

#### *आनंद नाडकर्णी*

आनंद नाडकर्णींनी त्यांचे विचार दोन भागांत मांडले आहेत. एक भाग मार्क्सच्या सिद्धान्तावर, तर दुसरा भारतीय समाजाबद्दल लिहिला आहे. पहिल्या भागात दांडेकरानी न लिहिलेले मार्क्सचे विचार जे वर्गकलहाबद्दल जरूरी आहेत ते लिहिले आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, वर्गकलहाचा मार्क्सचा सिद्धान्त आजही लागू आहे किंवा नाही. आजच्या बदललेल्या परिस्थितीत मार्क्सच्या संपूर्ण युक्तिवादात 'वर्ग' हा केन्द्रबिंदू आहे किंवा नाही आणि हे कशाप्रकारे ठरविता येईल यावरही नाडकर्णी यानी काही भाष्य केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वर्गकलह सुरू होण्यासाठी तीन गोष्टींची जरूरी आहे :

(अ) जे एका वर्गात मोडतात त्यांच्यात सामूहिक क्रियाशीलता, विचारसरणी व जीवनपद्धती यांच्यात साधर्म्य असले पाहिजे.

(आ) याच्यापेक्षा वेगळ्या धारणीच्या समूहाचे व त्यांचे हितसंबंध एकमेकांविरुद्ध असले पाहिजेत.

(इ) वरील लोक एकत्रितपणेच त्यांच्यात्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण आणि त्यांची वाढ करू शकतात असा त्याना विश्वास वाटला पाहिजे.

नाडकर्णी पुढे लिहितात की, या तिन्ही गोष्टींवर जो कलह आणि जो प्रगतीचा मार्ग अवलंबून असतो तो 'मार्क्सियन' मार्ग होय आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे हा मार्ग अतिशय सकारात्मक आहे (मार्क्सिस्ट हे नकारात्मक असतात या समजुतीला हे बहुधा उत्तर असावे).

यानंतर लेखात लेखकाने शोषण (exploitation) या विषयाला स्पर्श केला आहे. दांडेकर याबद्दल मार्क्सच्या संदर्भात लिहीत नाहीत. यामध्ये महत्त्वाचा मुद्दा आय वितरणाबद्दलचा आहे आणि ज्याप्रमाणे दांडेकरानी भारतीय समाजाबद्दल जसे वर्ग केले आहेत, अशाच प्रकारचे आय वितरण व वर्ग हे मार्क्सनी वर्तविले होते. भाग एकच्या शेवटी वरील मुद्यांचेच विवेचन करण्यात आले आहे. त्यातील दोन बाबींवरील स्पष्टीकरणांची नोंद करणे महत्त्वाचे आहे. एक म्हणजे, बुर्झ्वा वर्गामध्ये व्यवस्थापन वर्गही मोडतो आणि व्यवस्थापक आणि अभियंते (engineers) हे, पारंपरिक पद्धतीने व्याख्या केल्यास, जरी कामगार वर्गात मोडत असले तरी आजकाल त्यांच्याजवळ तांत्रिक कौशल्य व ज्ञान भरपूर असते आणि तेच त्यांचे एक प्रकारचे भांडवल (मार्क्सच्या शब्दात 'उत्पादनाचे' साधन) असते. त्यामुळे ते 'बुर्झ्वा' या उपाधीस पात्र होतात. त्यामुळेच बुर्झ्वा वर्ग हा अतिशय प्रगत भांडवलशाही देशांमध्ये सुद्धा वाढला आहे. या दोन वर्गांचा आताच्या कालात भारतीय समाजाबद्दलचा विचार हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. भारतामध्ये मध्यमवर्गामध्ये जी वरच्या वर्गात जाण्याची चढाओढ असते त्यात वर्गकलहाऐवजी स्वतःची प्रगतीच महत्त्वाची ठरते आणि वर्गकलहास जरूर असणारी एकता व एकात्मता राहात नाही. परंतु ज्या एका विशिष्ट पातळीच्या खालील व्यक्तीला वर चढणे शक्य नसते अशाच गटातील माणसे एकत्र येतात आणि श्रमजीवी वर्ग तयार होतो. अशांची ताकद पुरेशी असेलच असे नाही. परंतु नाडकर्णी राइट मिल्सचे उद्धृत देऊन हा मुद्दा पटवून देतात. यातील गोषवारा असा की, जरी हे वर्ग मार्क्सच्या अपेक्षेइतके स्पष्ट नसले आणि त्यांच्यात लढण्याची पुरेशी ताकद नसली तरी आपण त्याची कारणे शोधणे आणि यातील प्रगती करण्यासाठी प्रयत्नशील असणे जरुरीचे आहे.

व्यंकटरमय्या लिहितात," दांडेकरांचा भारतीय वर्गकलहावर लिहिलेला लेख अतिशय उत्तेजित करणारा आहे. संघटित कामगार वर्ग व भांडवलदार एका बाजूला व असंघटित वर्ग दुसऱ्या बाजूला असा वर्गकलह भारतात आहे. पहिला वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करतो असा दांडेकरांच्या लेखाचा मूळ सिद्धान्त आहे. जरी नाइलाजास्तव त्यानी भांडवलदारांचा शोषण करणाऱ्यांच्या वर्गात समावेश केला असता तरी शोषण करणाऱ्यांमध्ये त्यांचा मुख्य रोख हा संघटित कामगार वर्गावरच अधिक आहे. समाजातील दोन मुख्य गटांमध्ये कलह असतो आणि त्याचे उत्तर लहान वर्गाला मोठ्या वर्गाने नेस्तनाबूत करण्यात असते, या विचारावर मार्क्स व दांडेकर यांचे एकमत दिसते. मार्क्सच्या दृष्टिकोनातून क्रान्तीच्या आघाडीवर असणारा संघटित कामगार वर्ग हा दांडेकरांचा मुख्य शत्रू आहे आणि हाच मार्क्स व दांडेकरांमधील फरक आहे. दांडेकराना लोकांची थोडी जरी चाड नसती तर कदाचित त्यानी कामगाराना 'Disunite the workers' अशी घोषणा देण्यासही मागेपुढे पाहिले नसते.

संघटित कामगार वर्ग (organized labour) त्यांच्या मालकांसहित असंघटित कामगार वर्गाचे (un-organized labour) शोषण करतो असे जेव्हा दांडेकर म्हणतात तेव्हा त्यानी त्यांच्या संबंध लेखात शोषण म्हणजे काय आणि ते कसे होते याचे कोणतेच विश्लेषण केलेले नाही, असे व्यंकटरमय्या यांचे म्हणणे आहे आणि म्हणून संघटित कामगारांच्या वर्गात कोण कोण मोडते, शोषण करतात किंवा नाही, त्याचे मोजमाप कोणते आणि त्यांच्या मोजमापाप्रमाणे हे शोषण होते आहे का हे तपासणे असे हेतू समोर ठेऊन व्यंकटरमय्यानी ही टीप मांडली आहे. यात त्यानी ज्याना दांडेकरानी 'संघटित कामगार' म्हणून संबोधले आहे, अशा संघटित वर्गाचा समावेश केलेला आहे. त्यात मुख्यत: कारखाना क्षेत्र (factory sector), सरकारी (केन्द्र व राज्य) क्षेत्र, खाण क्षेत्र, गोदी क्षेत्र व शिक्षण क्षेत्रातील विद्यापीठीय शिक्षणाचे क्षेत्र यांचा समावेश केला आहे. यापैकी कारखाना व केन्द्र सरकारचे क्षेत्र यांचे जरा सखोल आणि इतर क्षेत्रांचे ओझरते असे विश्लेषण करण्यात आले आहे.

शोषणाची संकल्पना मांडताना व्यंकटरमय्या म्हणतात की, एखाद्या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वास्तविक उत्पन्नवाढीचा वेग हा जर वास्तविक दरडोई उत्पन्नवाढीच्या वेगापेक्षा अधिक असेल, तर त्या क्षेत्रातील कर्मचारी समाजाचे शोषण करतात असे जरी ठामपणे म्हणता आले नाही तरी तसे मानता येईल. अशा प्रकारच्या मोजपद्धीमध्ये मोजमापाच्या व इतर अशा काही अभिनती (biases) समाविष्ट आहेत की त्या दूर करता येत नाहीत. या अभिनतींमुळे आढळलेल्या आकड्यांबद्दल मात्र फारशी शंका घेण्याचे कारण नसल्याचे व्यंकटरमय्या यानी प्रतिपादन केले आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक कौशल्याप्रमाणे असणारा वेतन निर्देशांक योग्य किंवा सरासरी वेतन निर्देशांक योग्य हे ठरविणे तसे अवघड आहे. परंतु दांडेकरांच्या लेखातील संदर्भावरून व्यंकटरमय्या अशा निष्कर्षाप्रत येतात की, दांडेकराना अभिप्रेत असलेले शोषणप्रक्रियेचे मोजमाप सरासरी वेतनवाढ निर्देशांक व दरडोई वेतनवाढ निर्देशांक यांच्या तुलनेनेच योग्य प्रमाणात मांडले जाईल.

अशा प्रकारची मोजपद्धती एकदा ठरविल्यानंतर वर निर्देश केलेल्या क्षेत्रांच्या वास्तविक वेतनवाढीची दरडोई उत्पन्नवाढीच्या निर्देशांकांशी तुलना करून शोषणाबद्दलच्या निष्कर्षाप्रत येण्याचा प्रयत्न या टिप्पणीमध्ये केला आहे. कोणत्या वर्षाचे कोणते वेतन निर्देशांक वापरावयाचे याची चर्चा वर निर्देश केलेल्या दोन क्षेत्रांबद्दल सविस्तरपणे केली आहे. त्यातील आलेले क्षेत्रवार निष्कर्ष थोडक्यात तक्ता 2 मध्ये मांडले आहेत.

वरील विश्लेषणावरून असे लक्षात येईल की, पन्नासच्या दशकात, जेव्हा किमती बऱ्याच प्रमाणात स्थिर होत्या तेव्हा संघटित कामगार वर्ग त्याच्या

तक्ता 2
**क्षेत्रवार वेतनवाढीचे निर्देशांक**

| क्षेत्र | सुरुवातीचे वर्ष व त्याचा निर्देशांक | शेवटचे वर्ष व त्याचा निर्देशांक |
|---|---|---|
| कारखान्यातील कामगार : दरमहा दोनशेपेक्षा उत्पन्न कमी | 1939=100 | 1964=105 |
| कारखान्यातील कामगार | 1949=100 | 1958=199 |
| कारखान्यातील कामगार | 1961=100 | 1975=103 |
| खाण | 1951=100 | 1964=150 |
| गोदी | 1960-61=100 | 1967-68(202/205)X100 |
| विद्यापीठ शिक्षक - अ | 1956=100 | 1961=130 |
| आ | 1961=100 | 1973=88 |

टीप : सरकारी क्षेत्रात माहिती वर्गाप्रमाणे दिल्यामुळे एकत्रित करता येत नाही. त्यामुळे येथे ते क्षेत्र समाविष्ट केले नाही.

जरुरीपुरता उत्पन्नातील वाटा मिळविण्यात यशस्वी झाला होता. परंतु 1961 नंतर, जेव्हा वास्तविक दरडोई उत्पन्न प्रतिवर्षी 1 टक्क्याने वाढत होते तेव्हा वरील वर्गाचे उत्पन्न स्थिर राहिले होते किंवा 1 टक्क्यापेक्षा कमी प्रमाणात वाढत होते. असंघटित वर्गाची तर स्थिती यापेक्षाही वाईट होती. तरी दांडेकर अतिशय ठामपणे संघटित कामगार वर्गाने केलेले समाजाचे शोषण प्रतिपादन करीत आहेत ही आश्चर्याचीच बाब म्हटली पाहिजे. संघटित किंवा असंघटित यापैकी कोणताच कामगार वर्ग जर समाजाचे शोषण करीत नसेल तर तो उत्पन्नाचा वाटा कोणाकडे जातो ? दांडेकर याचे उत्तर चुकीच्या जागी शोधत आहेत असे वाटते.

### *आर. एस. महत*

महत यानी जगभरातील 'शेतकरी वर्गाने' कसा लढा दिला ते चीन व रशिया यांची उदाहरणे देऊन त्यांच्या लेखात स्पष्ट केले आहे. मुख्यत्वे चीनमधील माओ-त्सेतुंग यांची क्रान्ती, की ज्यामध्ये शेतकरी वर्ग मार्क्सच्या श्रमजीवी वर्गाप्रमाणे क्रान्तीमध्ये सहभागी झाला आणि मोठी यशस्वी क्रान्ती झाली या दोन्हींचा समावेश झाला आहे. त्याचप्रमाणे जगातील इतर राष्ट्रांतही अशा प्रकारची क्रान्ती होऊ शकते. अशा प्रकारचा विचार आणि अशी धारणा मनात धरून भारतात प्रथमत: अशी क्रान्ती 'नक्षलवाडी' येथे सुरू झाली. नक्षलवाडी एक पूर्णत: सरंजामशाही असलेले गाव आहे. तेथे हजारो गरीब व अस्तित्वासाठी (जगण्यासाठी) लढत असणाऱ्या शेतकऱ्यांना अशा प्रकारची क्रान्ती करण्यासाठी प्रवृत्त करण्यात ही क्रान्ती करणाऱ्यांनी काही विचार केला नसेल असे कसे म्हणता येईल ? या क्रान्तीवर चीनमधील क्रान्तीकर्त्यांनी केलेली टिप्पणी महत्त्वाची आहे. ते लिहितात, ''भारत हा एक अर्धवसाहतवादी व अर्धसरंजामशाही असलेला 50 कोटी लोकसंख्या असलेला मोठा देश आहे. शेतकरी हे येथे सर्वात अधिक प्रमाणात आहेत आणि ते जर का एकदा जागृत झाले तर ते (10 कोटीहूनही अधिक) भारतात यशस्वी क्रान्ती करू शकतील. जर हा शेतकरी वर्ग आणि भारतातील श्रमजीवी वर्ग एकत्र आले तर ते भारतातील खेडेगावात जगाला हादरवून

सोडण्यासारखा बदल घडवून आणू शकतील आणि त्यांच्या क्लेशदायक स्थितीस जबाबदार असणाऱ्या त्यांच्या शत्रूचा पराभव करतील.'' म्हणून महत म्हणतात की, या प्रकारच्या प्रगतीमध्ये भांडवलशाहीपूर्व अशा या क्षेत्राला (शेती), वर्गकलहाच्या दृष्टीने अभ्यास करताना, डावलणे हे अनुचित ठरणार नाही काय ? कम्युनिस्ट चळवळ अशा क्षेत्रात खूप पुढे जाते असा अनुभव आहे. या क्षेत्राची व्याप्ती भारतात 70 टक्क्यांपेक्षासुद्धा अधिक आहे की जेथे 15 टक्के कुटुंबे 60 टक्क्यांपेक्षा अधिक जमिनीचे मालक आहेत आणि 50 टक्के कुटुंबांना फक्त 9 टक्के जमीन शेती करावयाला मिळते आहे. हरित क्रान्तीसारख्या यशस्वी शेतीच्या क्रान्तीनंतरदेखील शेतमजुराचे वास्तविक उत्पन्न वाढण्याऐवजी कमीच झाले आहे आणि दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या खेडेगावातील लोकसंख्येमध्ये सतत वाढ होत आहे. अशा परिस्थितीत, मार्क्सचा साधा क्रान्तीचा मार्ग न अवलंबता एकदम भांडवलशाही राज्यपद्धती स्वीकारून ज्या क्षेत्रात क्रान्ती करण्यासाठी प्रचंड क्षमता आहे त्या क्षेत्रास कोणी कसे दुर्लक्षित करू शकतो ?

### *दासगुप्ता*

दासगुप्ता आपल्या प्रतिक्रियेची सुरुवात ''बुद्धीजीवी माणसे चहाच्या टेबलाभोवती बसून मार्क्सबद्दल चर्चा करतात आणि एकदा त्यांच्या बाजूने तर नंतर त्यांच्या विरुद्ध अशा अनेक चर्चा चालू ठेवतात'', अशा विधानाने करतात. परंतु दांडेकरांच्या या लेखात वरीलपैकी कोणतीच गोष्ट केली नसल्याचे दासगुप्तांना वाटते. थोडक्यात, दासगुप्तांचे म्हणणे असे आहे की, दांडेकरानी 'वर्ग' या संकल्पनेची व्याप्ती वाढविण्याचा, वर्गकलह, भांडवलशाही अर्थव्यवस्थेची पडझड यासंबंधी असलेल्या विशिष्ट संकल्पना आणि सरतेशेवटी ही सर्व संकल्पना भारताच्या संदर्भात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दासगुप्तांचा मुख्य मुद्दा दांडेकरांच्या लेखातील त्रुटी दाखवून त्यावर काही भाष्य करणे हा आहे.

दासगुप्तांचा मुख्य भर हा मार्क्सच्या सिद्धान्तांविषयीचा आहे. दासगुप्तांना प्रथमदर्शनीच असे वाटते की, मार्क्सच्या सिद्धान्ताप्रमाणे जेव्हा एखाद्या परिस्थितीचे विश्लेषण करावयाचे असते तेव्हा त्यांना अभिप्रेत असलेली संपूर्ण परिस्थिती तशी असणे आणि नसल्यास तशी जाणीव असण्याची गरज आहे. परंतु प्रस्तुत लेखात तशी काहीच चौकट अनुसरलेली नाही. दांडेकरांचा मोठा आक्षेप आहे की, मार्क्सनी जो सर्व सिद्धान्त (वर्गकलहाचा) मांडला आहे त्यात फक्त स्पर्धात्मक संरचनेचाच वापर केला आहे आणि त्याने एकाधिकाराबद्दल काहीच उल्लेख केलेला नाही. त्यामुळे आताची परिस्थिती वेगळी आहे आणि त्यातून मार्क्सच्या कल्पनेप्रमाणे समाज फक्त दोनच वर्गात विभागला गेला नाही. परंतु दासगुप्ता त्यांच्या विधानात मार्क्सची याबद्दलची संकल्पना स्पष्ट करतात. त्यात त्यांचे म्हणणे असे आहे की, मार्क्सच्या मते एकाधिकारामध्ये सरकारला हस्तक्षेप करावा लागेल आणि अशाप्रकारच्या उत्पादनप्रक्रियेत सरकारच मालक बनेल. या स्थितीत बाकीची परिस्थिती खाजगी उत्पादनप्रक्रियेशीच जुळणारी असेल आणि फक्त उत्पादनाची साधने खाजगी मालकीची नसतील.

दासगुप्तानी यानंतर दांडेकरानी अजिबात स्पर्श न केलेल्या, परंतु ज्या संकल्पनांचा वर्गकलहाच्या अभ्यासात उपयोग करणे जरूर आहे, अशा गोष्टींचे विवेचन केले आहे. त्यात मुख्यतः स्वयंचलन (level of automation), कामात स्वारस्य न वाटणे (alienation) आणि वेगवेगळ्या स्तरातील कामगारांचे एकमेकांशी असणारे संबंध या तीन विषयांचा ऊहापोह केला आहे.

दासगुप्तांच्या म्हणण्याप्रमाणे मार्क्स जरी अतिशय स्पष्ट शब्दांत वर्गाची व्याख्या करू शकले नसले तरी या विषयावर अभ्यास करणाऱ्यांच्या मते साधारणतः खालील तीन गोष्टी 'वर्ग' या संकल्पनेत जरूर असतात:

(1) सामाजिक संरचनेतील उत्पादनाची साधने

आणि त्यांची मालकी असणाऱ्या व नसणाऱ्यांचे परस्परसंबंध;

(2) राजकीय शक्तीशी आर्थिक लाभांसाठी लढा देण्याची ताकद व इच्छा ;

(3) कामगार वर्गाला त्यामुळे मिळणारे समाजातील स्थान, उत्पादनप्रक्रियेमधील सहभागाचा स्तर या सर्व गोष्टींविषयी थोड्या तरी कामगारांना जाणीव असून त्याबद्दल जागरूक राहून आपल्या हक्कांसाठी भांडण्याची तयारी असणे.

यासंदर्भात भारतीय समाजाचे वर्गीकरण करण्याच्या दृष्टीने दांडेकर जर प्रयत्न करीत असतील तर शहरी-ग्रामीण भागातील स्तर इतके भिन्न असूनही त्यात वरीलपैकी वैशिष्ट्ये आढळत नाहीत असे खेदपूर्वक म्हणावे लागते.

या सर्व गोष्टी लक्षात घेता दासगुप्ता यांचे म्हणणे असे आहे की, भारतातील सध्याची समाजरचना निःसंदिग्धपणे अभ्यास करण्याजोगी आहे. यातील सर्वच स्तरांचा वर वर्णन केल्याप्रमाणे स्वतंत्र असा अभ्यास करणेही जरुरीचे आहे. त्यानंतरच या सर्व गटांचे परस्परांशी पूरक किंवा संघर्षाचे संबंध आहेत का हे तपासले पाहिजे. यातूनच मार्क्सच्या चौकटीमध्ये बसणारा वर्गकलहाचा अभ्यास, त्याचे सामाजिक-राजकीय अर्थ काढण्यासाठी समाजातील परिवर्तन तपासणे महत्त्वाचे आहे. असा अभ्यास करताना प्रथमतः हे लक्षात ठेवले पाहिजे की, तो अभ्यास वस्तुनिष्ठ (objective) असेल. किंबहुना, एकाच वेळी घडणाऱ्या घटनांवरून सबंध त्यांच्या संरचनेबद्दल सांगणे हे जरा अधिकच धाडसाचे ठरेल. याउलट, मार्क्सचा सिद्धान्त हा फक्त साधन आहे, असे समजून केलेला अभ्यास वस्तुस्थितीचे अधिक योग्य वर्णन करू शकेल.

### 4.0 प्रत्युत्तर

प्रत्येकाच्या विश्लेषणाला स्वतंत्र उत्तर न देता दांडेकरानी सर्वांना एकत्रितपणे उत्तर दिले आहे. ते 'Restatement' या शीर्षकाखाली छापले आहे. यात मुख्यतः दांडेकर मार्क्सच्या अपेक्षेप्रमाणे भारतात घडले नाही आणि त्यांच्या अपेक्षेपेक्षा भारतातील सद्यःस्थिती कशी वेगळी आहे तसेच तिचे काटेकोररित्या 'वर्ग' या पद्धतीने जरी विश्लेषण करता येत नसले तरी त्यानी त्यांचा मुद्दा स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रत्युत्तराच्या सुरुवातीलाच दांडेकर कबूल करतात की, इतक्या स्पष्टपणे व सखोलपणे त्यानी त्यांचा मुख्य विचार मांडूनही तो स्पष्टपणे व नीटपणे लोकांपर्यंत पोहाचविण्यात त्याना यश आले नसणे सहज शक्य आहे. म्हणून मार्क्सच्या भांडवलशाहीबद्दल असलेल्या संकल्पना, त्यांच्या अपेक्षेप्रमाणे न घडलेल्या स्थितीत, भारतातील वर्गकलहाची दिशा कशी झाली आहे हे थोडक्यात त्यानी परत एकदा दिले आहे. त्यात मुख्यत्वे मध्यम वर्गाची निर्मिती, बुर्झ्वा वर्ग किंवा कामगार वर्गात अपेक्षित एकसंधपणा निर्माण न होणे आणि शेवटी केवळ तत्त्वापुरती कामगारवर्गाची एकी ठेऊन बाकी प्रत्येक मालक व त्याचा कामगार वर्ग हे करारमदार करूनच कसे राहतात या गोष्टींचा समावेश होतो.

भारतात फक्त दहा टक्केच कामगार हे संघटित कामगार या गटात मोडतात. त्यांच्यापुरतीच मार्क्सची भांडवलशाहीची चौकट लागू होते. आणि म्हणून दांडेकर असा प्रश्न विचारतात की, भारतातील ही स्थिती बघता या गोष्टींचा इतर 90 टक्के कामगारवर्गावर काय परिणाम होतो? कोणतीही चौकट आणि कोणतेही नियम वापरले तरी हा संघटित कामगार वर्ग असंघटित वर्गाचे शोषण करतोच असे ठाम प्रतिपादन दांडेकर करू इच्छितात आणि त्यांच्या प्रत्युत्तरात त्यानी पुढे हेच विवेचन अधिक सखोलपणे मांडले आहे.

दांडेकर स्वतःचा मुद्दा पटवून देण्यासाठी काही आकडेवारीचा आधार घेतात. त्यांच्या मते भारतातील कामगारांचे तीन गटात विभाजन करता येते. एक म्हणजे, संघटित वर्ग आणि असंघटित वर्गाचे पुढे विभाजन करून ग्रामीण व शहरी अशा गटांत रूपांतर

करता येईल. या वर्गाचे वेगळेपण सिद्ध करून त्यांच्यातील परस्परसंबंध दांडेकर विशद करून सांगतात.

**तक्ता 3**
**उत्पादन क्षेत्र (1974-75)**

| | नोंदणीकृत | अनोंदणीकृत | |
|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी |
| कर्मचारी (लाख) | 5.6 | 4.7 | 10.8 |
| पगारी कर्मचारी (लाख) | 4.4 | 1.0 | 0.8 |
| दरडोई स्थिर भांडवल (रु.) | 12,100 | 1,449 | 601 |
| दरडोई वर्धित मूल्य (रु.) | 11,389 | 2,579 | 932 |
| दरडोई वार्षिक वेतन (रु.) | 3,831 | 1,551 | 822 |

स्रोत : *Statistics of the Unorganized Sector.* Central Statistical Organization. Paper submitted to the Fifth Seminar on the Data Base of the Indian Economy, Madras, May 25-26, 1978.

तक्ता 3 वरून तिन्ही वर्ग सर्वच बाबींमध्ये वेगळे आहेत हे सिद्ध होते. विशेषत: त्यांच्या दरडोई भांडवल वापरामध्ये, दरडोई उत्पन्न निर्माण करण्यामध्ये त्याचप्रमाणे त्यांच्या दरडोई वेतनामध्ये लक्षणीय फरक आहे. या प्रत्येक गुणोत्तराचे वेगवेगळे स्पष्टीकरण दिले गेले आहे. उदाहरणार्थ, कामगारांची कार्यदक्षता (दरडोई निर्माण केलेले उत्पन्न) ही अधिक भांडवल वापरणाऱ्या क्षेत्रात अधिक आहे. मार्क्सच्या म्हणण्यानुसार या क्षेत्रात काम करणारा कामगार हा अकुशल कामच करीत राहतो कारण त्यात यंत्रेच अधिक कार्यदक्ष असतात. त्यामुळे कामगाराला फक्त त्याच्या उदरनिर्वाहाइतकेच उत्पन्न मिळू शकते. परंतु दांडेकरांना हे चूक वाटते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जितकी नवनवीन व सुधारित यंत्रे येतील तितकीच अधिक कुशलता ती चालविणाऱ्या कामगारांना जरूर आहे असा अनुभव आहे. त्याच्या बदल्यात त्याचा मालक त्याला अधिक पगार देण्यास तयार असतो (नवीन कामगार बघून त्याला शिक्षण देण्याऐवजी). यातून दोन प्रश्न निर्माण होतात. एक, कामगारांच्या शिक्षणाच्या सार्वजनिक खर्चाचा आणि दुसरा, त्यांना या शिक्षणाचा मिळणारा मोबदला मिळण्याबद्दल. दुसरा प्रश्न अधिक महत्त्वाचा व तात्त्विक आहे. येथे वाढणारा नफा हे कामगाराच्या शिक्षणाचे किंवा नवीन यंत्राचे फलित आहे याबद्दल वाद निर्माण होतो. कामगार व त्यांचे मालक दोघेही त्यावर हक्क सांगत असतात. परंतु अर्थशास्त्राच्या श्रममूल्य सिद्धान्ताप्रमाणे हे सर्व उत्पन्न शेवटी कामगारांनीच निर्माण केलेले असते. म्हणून स्वाभाविकपणे ते त्यांच्याच मालकीचे असते. परंतु वर पाहिल्याप्रमाणे ते फक्त सध्या अस्तित्वात असलेल्या कामगारांचेच नसून पूर्वीपासून काम करीत आलेल्या सर्व कामगारांचेच असते. सारासार विचार करता हीच संकल्पना अधिक योग्य वाटते हे जर मान्य केले तर भांडवलदारांना व कामगारांना हे उत्पन्न कसे वाटावयाचे हे ठरविणे हे समाजाचे काम ठरते. समाजात कामगार काम कोठे करतो यावर त्याचे उत्पन्न ठरणे बरोबर होत नाही. वर दृष्टीस पडणारा दरडोई वेतनामधील फरक मान्य होण्यासारखा नाही.

या स्पष्टीकरणानंतर दांडेकर या फरकाचे कारण शोधताना लिहितात की, निर्माण झालेल्या उत्पन्न वाटपाचा हा प्रश्न सर्व आस्थापनांसाठी एकत्रितपणे सोडविला जात नाही. याउलट, प्रत्येक आस्थापनामधील कामगार आणि त्याचा मालक यांच्यातील चर्चेनुसार या प्रश्नावर तोडगा निघतो. जेव्हा ही पद्धत अवलंबिली जाते तेव्हा त्याचा पहिला आविष्कार म्हणजे अधिक भांडवल वापरणाऱ्या किंवा अधिक प्रगतीशील क्षेत्रातील कामगारांना जास्त वेतन मिळते. याची दोन कारणे देता येतील. एक म्हणजे, या क्षेत्रात भांडवल अधिक असल्याने उत्पादन करण्याची पद्धती आधुनिक असल्याने निर्माण होणारे उत्पन्न अधिक असते. दुसरे तितकेच महत्त्वाचे कारण म्हणजे, त्यांचा मालक अधिक ताकदवान असल्याने त्यांचे कामगार जास्त संघटित होऊन अधिक ताकदवान झालेले असतात. त्यामुळे त्यांची सौदेबाजीची क्षमता

वाढलेली असते आणि याचा परिणाम म्हणजे त्याना मिळणारे वेतन हे इतर कोणत्याही क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारापेक्षा जास्त असते. तिसरे कारण हे त्यांच्या मालकांशी निगडित आहे. अशा क्षेत्रातील (खाजगी अथवा सरकारी) मालकांकडे बाजारातील एकाधिकाराची ताकद असते. त्यामुळे त्यांच्या कामगारांना दिलेल्या वेनतवाढीचा बोजा ते त्यांच्या खर्चाचा भाग न ठेवता तो खर्च ते बऱ्याच प्रमाणात त्यांच्या सामान्य गिऱ्हाईकावर लादू शकतात. हे विश्लेषण हीच दांडेकरांच्या शोधनिबंधाची मध्यवर्ती कल्पना आहे. या परिस्थितीमुळेच असंघटित (किंवा कमी संघटित) क्षेत्राचे संघटित (अधिक संघटित) क्षेत्राकडून शोषण होत राहते. या शोषणप्रक्रियेत भांडवल व कामगार हे दोन्ही उत्पादनाचे घटक समाविष्ट होतात.

पुढे जाऊन दांडेकर (व्यंकटरमय्यांच्या टीकेला उत्तर देताना) लिहितात की, इतके असूनही संघटित कामगारांचे खरे वेतन मोठ्या प्रमाणावर न वाढता जेमतेम त्याच पातळीवर राहिले आहे (काही संघटित क्षेत्रात तर ते कमीसुद्धा झाले आहे), ही वस्तुस्थिती आहे आणि ती नाकारता येत नाही. यावर अधिक अभ्यास करण्याची गरज त्यानी दर्शविली आहे. त्यावर संघटित व असंघटित क्षेत्रांतील कामगारांची वेतनवाढ, त्यांच्यातील फरकाचा चढउतार यांच्या अभ्यासाचा समावेश व्हावा असे त्याना वाटते. परंतु एक तर हा अभ्यास प्रस्तुत लेखाशी संलग्न नसल्याने आणि त्यासाठी अधिक सखोल अभ्यासाची गरज असल्याने त्याचा परामर्श प्रस्तुत लेखात घेतला नाही. तरीही या गोष्टींना ओझरता स्पर्श करताना दांडेकर दोन गोष्टींचा उल्लेख करतात. एक मुद्दा संघटित क्षेत्रातील कामगार वाढीच्या वेगाशी जोडलेला आहे तर दुसरा मुद्दा अनुत्पादित कामगारांच्या वेतनवाढीशी निगडित आहे. त्यांच्या मते, जरी उत्पादन क्षेत्रातील संघटित कामगारांचे वेतन रास्त असले तरी त्याची वाढ निदान त्यांच्या उत्पादनवाढीशी निगडित असण्याची जरुरी आहे. परंतु अनुत्पादित क्षेत्रातील संघटित कामगारांची वेतनवाढ मात्र संपूर्णपणे असंघटित क्षेत्रातील लोकांच्या शोषणाशिवाय शक्य नाही. या शोषणाविरूद्ध लढा देऊन किंवा या शोषण करणाऱ्या वर्गाविरुद्धच लढा देऊन असंघटित वर्गाने आपले शोषण थांबवावे असे दांडेकराना वाटते. ते पुढे लिहितात की, वस्तुस्थिती फारच वेगळी आहे. ते एकत्रित होण्याऐवजी व लढण्याऐवजी स्वत:च संघटित वर्गात जाण्याची धडपड करीत असतात. हीच या वर्गकलहाची खरी शोकांतिका आहे !

प्रत्युत्तराचा शेवटी दांडेकरानीच त्यांच्या मूळ लेखात लिहिलेल्या वाक्यांचाच आधार घेऊन पुढील विधान केले आहे. '' मी मार्क्सप्रमाणेच उत्पादित काम करणारा व अनुत्पादित काम करणारा वर्ग असा फरक करू शकतो आणि मूळ लेखातील उद्‌धृतात फरक करू शकतो. त्याप्रमाणे, ''तो काय उत्पादन करतो किंवा विक्री करतो किंवा नाही' हे उत्पादन करणाऱ्या वर्गातील कामगारांना लागू होईल आणि 'पाऊस पडो अथवा न पडो, फक्त महिन्याच्या 1 तारखेचे खात्रीशीर वेतन देणारी नोकरी'' हे विधान दोघांनाही लागू होते. [2]

## 5.0 सद्य:स्थिती

वि.म. दांडेकरानी त्यांच्या लेखात भारतीय समाजातील काही वस्तुनिष्ठ स्थितीचे वर्णन केले आहे, तसेच काही प्रक्रिया कशा चालत आहेत हेही लिहिले आहे. हे सर्व 1977 च्या आसपासचे आकडे किंवा वस्तुस्थिती यावर अवलंबून आहे. त्या परिस्थितीत गेल्या वीसबावीस वर्षांत बदल झाले आहेत. त्यापैकी एकदोन ठळक बदलांचा येथे विचार केला आहे.

5.1 दांडेकरानी कामगारांची वेगवेगळ्या 5 वर्गात विभागणी केली आहे आणि त्यानुसार वर्गकलहात त्यांचा किती वाटा आहे हे पुढे विस्ताराने लिहिले आहे. हे वर्ग 1971 च्या जनगणनेवरून घेतले आहेत. अर्थात 1971 च्या जनगणनेच्या माहितीप्रमाणे प्रत्यक्षात ती माहिती मिळत नाही. परंतु ती ज्या माहितीवर आधारित आहे अशी माहिती आपण 1981 व 1991 मधील

जनगणनेमधून घेऊन त्यांची 1971 शी तुलना करू शकतो. अशी माहिती "Distribution of 1000 workers in Nonhousehold industry, trade, business, profession or service in each sex and occupational division by workers for total" अशा तक्त्यावरून उपलब्ध होते. असे 1971, 1981 व 1991 चे तीन तक्ते पुढे दिले आहेत (तक्ता 4). त्यात 10 : occupational division ची त्यांच्या एकूणासकट वर निर्दिष्ट केलेली माहिती संकलित केली आहे.

तक्ता 4 वरून प्रथमतः असे लक्षात येते की, एकत्रित पातळीवर 1971, 1981 व 1991 मधील 'मालक' च्या प्रमाणात बराच फरक पडला आहे तर 'नोकर' च्या प्रमाणात नगण्य असा फरक पडला आहे. विभाग 2 (प्रशासकीय, कार्यकारी व व्यवस्थापकीय कामगार) आणि विभाग 4 (विक्री कामगार) मध्ये अधिक फरक पडला आहे. विभाग 2 मधील मुख्यतः 'मालक' या वर्गात स्त्री व पुरूष अशा दोघांमध्येही फरक पडला आहे. ही वाढ पुरूषांमध्ये 1971 मध्ये 186 दरहजारी वरून 1981 मध्ये 363 दरहजारी इतकी आहे तर स्त्रियांमध्ये हीच वाढ 280 दरहजारी वरून 312 दरहजारी इतकी झाली आहे. येथे 'नोकर' तेवढ्याच प्रमाणात कमी झाले आहेत. विभाग 4 मध्ये 'मालक' या वर्गात 1971 व 1981 मध्ये काहीच फरक पडला नसून 1981 ते 1991 मध्ये मात्र बरीच वाढ झाली आहे. यामध्ये 1981 मध्ये दरहजारी पुरुषांची संख्या 154 होती ती 1991 मध्ये 252 वर गेली आणि हीच दरहजारी स्त्रियांची संख्या 66 वरून 159 वर गेली. याच वेळी 'विवाहित कामगार' व 'अविवाहित कामगार' मध्ये मात्र बऱ्याच प्रमाणात घट झालेली आढळते. या बदलांवरून आपल्या असे लक्षात येईल की दांडेकरानी ज्या पद्धतीने वेगवेगळ्या वर्गातील कामगारांच्या संख्येचे अनुमान काढले त्यात या बदलांमुळे निश्चितच फरक पडेल, परंतु दांडेकरानी वापरलेली पद्धती निश्चितपणे माहिती नसल्याने, प्रत्यक्ष सोपी पद्धत उपलब्ध नसल्यामुळे आणि तसे अनुमान काढण्याचा प्रस्तुत लेखाचा उद्देश नसल्याने ते काम येथे केले नाही. परंतु यातून एवढेच लक्षात घेता येते की, दांडेकरानी केलेल्या विभागणीमध्ये वरील बदलाने फरक पडेल आणि पुढे मांडलेल्या विश्लेषणातील बदलानुरूप समाजातील संरचनेमध्येही फरक पडलेला आपल्याला आढळेल.

5.2 वर वर्णन केलेल्या कारणांमुळे भारतातील सामाजिक वर्गकलहात होणारा बदल हा कालानुरूप होणारा बदल आहे असे गृहीत धरले तरी आणखी दुसरी एक घटना की जिच्यामुळे भारतातील अर्थव्यवस्थेत आणि त्याच्या अनुषंगाने समाजसंरचनेत महत्त्वाचा बदल घडून येणे अपरिहार्य आहे, ती गोष्ट म्हणजे, भारताने 1990 नंतर राबविलेले खुले आर्थिक धोरण !

भारताने खुले आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर, संघटित उत्पादन क्षेत्राला जागतिक पातळीवरील स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. त्याचबरोबर, थोड्याफार प्रमाणात जागतिक मंदीची झळही भारतातील औद्योगिक क्षेत्राला लागली आहे. अशा वेळेस दांडेकरांना अभिप्रेत असलेल्या संघटित वर्गाकडून होणाऱ्या शोषणाला खीळ बसली आहे. त्याचबरोबर नव्याने आलेल्या बहराष्ट्रीय कंपन्यांमधील लठ्ठ पगाराच्या नोकरांचा दांडेकरानी संबोधिलेल्या संघटित वर्गापेक्षा एक वेगळाच वर्ग तयार होतो आहे. दांडेकराना 1977 मध्येच संघटित व असंघटित कामगारांच्या वेतनातील दरी फार मोठी वाटत होती. आताचा हा नवीन बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील कामगार वर्ग संघटित कामगार वर्गाच्या काही पटीत वेतन मिळवीत असतानाच त्यांच्या वेतनाची असंघटित कामगारांच्या वेतनाशी तुलना करणे जवळजवळ अशक्य आहे. अशा परिस्थितीत असंघटित कामगार व काही प्रमाणात संघटित कामगारांच्या जीवनाचाच प्रश्न इतका बिकट होत आहे की यावरून भविष्यात कोणत्या प्रकारचा वर्गकलह होऊ शकेल हे सांगणे आता तरी अवघड आहे. शेवटी हे नमूद करावेसे वाटते की अशी

तक्ता 4

**बिगर-घरगुती उद्योग, व्यापार, धंदा, पेशा किंवा नोकरी यातील 1000 कामगारांची लिंग व व्यवसायनिहाय विभागणी**

| व्यावयायिक विभागणी | एकूण कामगार | | मालक | | नोकर | | अविवाहित कामगार | | विवाहित कामगार | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| **1971** | | | | | | | | | | |
| सर्व विभाग | 1000 | 1000 | 50 | 13 | 622 | 655 | 275 | 238 | 53 | 94 |
| विभाग 0-1 | 1000 | 1000 | 16 | 6 | 819 | 935 | 154 | 53 | 11 | 6 |
| विभाग 2 | 1000 | 1000 | 186 | 280 | 745 | 526 | 60 | 149 | 9 | 45 |
| विभाग 3 | 1000 | 1000 | 3 | 1 | 978 | 989 | 17 | 9 | 2 | 1 |
| विभाग 4 | 1000 | 1000 | 153 | 60 | 206 | 91 | 549 | 694 | 92 | 155 |
| विभाग 5 | 1000 | 1000 | 40 | 9 | 639 | 604 | 253 | 225 | 68 | 162 |
| विभाग 6 | 1000 | 1000 | 26 | 8 | 426 | 657 | 344 | 170 | 204 | 165 |
| विभाग 7,8,9 | 1000 | 1000 | 25 | 7 | 664 | 649 | 281 | 282 | 30 | 62 |
| विभाग 10 | 1000 | 1000 | 18 | 13 | 748 | 544 | 206 | 373 | 28 | 70 |
| **1981** | | | | | | | | | | |
| सर्व विभाग | 1000 | 1000 | 62 | 17 | 622 | 665 | 257 | 218 | 60 | 101 |
| विभाग 0-1 | 1000 | 1000 | 20 | 6 | 838 | 948 | 132 | 41 | 10 | 5 |
| विभाग 2 | 1000 | 1000 | 363 | 312 | 490 | 498 | 111 | 128 | 36 | 63 |
| विभाग 3 | 1000 | 1000 | 2 | 1 | 986 | 995 | 10 | 4 | 2 | 1 |
| विभाग 4 | 1000 | 1000 | 154 | 66 | 214 | 99 | 506 | 633 | 125 | 202 |
| विभाग 5 | 1000 | 1000 | 47 | 11 | 655 | 616 | 217 | 193 | 80 | 180 |
| विभाग 6 | 1000 | 1000 | 38 | 12 | 380 | 559 | 387 | 230 | 196 | 199 |
| विभाग 7,8,9 | 1000 | 1000 | 33 | 9 | 660 | 646 | 266 | 263 | 41 | 82 |
| विभाग 10 | 1000 | 1000 | 29 | 23 | 839 | 803 | 117 | 150 | 15 | 24 |
| **1991** | | | | | | | | | | |
| सर्व विभाग | 1000 | 1000 | 101 | 40 | 642 | 715 | 218 | 174 | 39 | 71 |
| विभाग 0-1 | 1000 | 1000 | 42 | 17 | 837 | 936 | 113 | 43 | 8 | 4 |
| विभाग 2 | 1000 | 1000 | 334 | 211 | 492 | 537 | 150 | 211 | 23 | 41 |
| विभाग 3 | 1000 | 1000 | 10 | 6 | 973 | 986 | 15 | 7 | 2 | 2 |
| विभाग 4 | 1000 | 1000 | 252 | 159 | 277 | 207 | 400 | 492 | 70 | 143 |
| विभाग 5 | 1000 | 1000 | 81 | 34 | 704 | 710 | 175 | 174 | 40 | 82 |
| विभाग 6 | 1000 | 1000 | 77 | 26 | 479 | 660 | 301 | 140 | 143 | 174 |
| विभाग 7,8,9 | 1000 | 1000 | 65 | 31 | 671 | 665 | 231 | 228 | 33 | 77 |
| विभाग 10 | 1000 | 1000 | 34 | 38 | 889 | 824 | 66 | 103 | 11 | 35 |

परिस्थिती व असा वर्गकलह याची कल्पना मार्क्स किंवा दांडेकर यापैकी कोणीच केली नव्हती !

### संदर्भ टीपा

1 संपूर्ण लेखात या संदर्भाचा दांडेकरानी सतत वापर केला आहे.

2 दांडेकरानी यासंबंधी पुढील विधानाने मूळ लेखाचा शेवट केला आहे. "And, they have a job to win, a job with an assured income at the first of every month, whether it rains or not, whether they produce or not, whether what they produce sells or not."

## 'अर्थसंवाद' पूर्वीच्या वर्षांचे अंक

'अर्थसंवाद' चे 1992-93 पासून पुढील वर्षांचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षांचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यानी कार्यवाहांकडे प्रत्येक वर्षासाठी रु. 100/- पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने 'प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' यानुसार अंक पुरविले जातील.

**आ. गो. पुजारी**
**कार्यवाह – खजिनदार**

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### 'अर्थसंवाद' च्या अंकांतील लेख

'अर्थसंवाद' च्या पूर्वीच्या अंकांतील विशिष्ट लेख कोणाला हवे असतील तर ते मागणीनुसार झेरॉक्स करून देण्याची व्यवस्था केलेली आहे. संबंधितांना झेरॉक्सचा खर्च द्यावा लागेल. आपली मागणी परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. आ. गो. पुजारी यांच्याकडे त्यांच्या मंगळवेढ्यावरील पत्त्यावर नोंदवावी.

**प्रमुख संपादक**

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### आजीव सदस्य वर्गणीत वाढ

मराठी अर्थशास्त्र परिषदेची आजीव सदस्य वर्गणी रु. 600/- होती. दिनांक 1 एप्रिल, 1999 पासून ती रु. 800 /- अशी वाढविण्यात आली आहे. परिषदेचे आजीव सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांनी आजीव सदस्य होण्यासाठी रु. 800/- पाठवावेत. वर्गणीची रक्कम 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने देय अशा डिमांड ड्राफ्टने पाठवावी.

**आ. गो. पुजारी**
**कार्यवाह – खजिनदार**

# संघटित कामगारांची भूमिका : एक आढावा

माधव दातार *

1

वर्तमानातील समस्यांबाबत आपली मते रोखठोक, किंबहुना काहीशा वादळी, पद्धतीने मांडणाऱ्यांत फारच थोड्या व्यक्तींना वि.म. दांडेकरांचा हात धरता येईल. त्यांच्या लिखाणा - भाषणामुळे विवक्षित विषयाकडे इतर अभ्यासकांचे लक्ष वेधले जाऊन त्या विषयावर सविस्तर चर्चा झाली आणि त्या विषयात महत्त्वाची भर पडली असे अनेक वेळा घडले आहे. नीळकंठ रथ यांच्या सहकार्याने लिहिलेला त्यांचा गरिबीवरील निबंध 1970 मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर गरिबीच्या प्रश्नांच्या विविधांगांनी वेध घेणारे लेखन प्रदीर्घकाळ होत राहिले. गरिबीचे मापन, गरिबी व असमानता यांचा संबंध आणि गरिबी निर्मूलनाचे उपाय याबाबत जे विविध अभ्यास झाले त्यांना दांडेकर व रथ यांच्या लेखनाने एक प्रकारे सुरुवात झाली. असाच काहीसा प्रकार संघटित कामगारवर्गाची भूमिका याबाबतच्या त्यांच्या भाषणांबाबत झाला. गरिबीबाबतच्या लेखनाच्या तुलनेत या भाषणामुळे झालेले वादविवाद व चर्चा, खरे तर वादंग, अधिक खळबळजनक व वादळी ठरले. संघटित कामगार क्षेत्रातील कामगार आणि त्यांच्या संघटना यानी दांडेकरांच्या भूमिकेला विरोध केला हे साहजिकच म्हणता येईल. पण पुढे शेतकरी संघटनेच्या आंदोलनाबाबत दांडेकरानी जी भूमिका घेतली त्यामुळे तर त्यांच्या विरोधकांत मोठीच भर पडली. संघटित कामगारांबाबत दांडेकरांनी जे विवेचन केले त्याचा प्रस्तुत निबंधात विचार केला आहे.

दांडेकरांच्या विविधांगी लेखनांतून या विवक्षित बाबींची निवड करण्याची कारणे दोन आहेत. एकतर प्रस्तुत लेखकाच्या मते, दांडेकरांचे विचार समजावून

* भारतीय औद्योगिक विकास बँक, मुंबई.

घेताना ही विचारधारा महत्त्वाची आहे. दुसरे, आणि तितकेच किंबहुना जास्त, महत्त्वाचे कारण त्या विचारांना अजूनही वर्तमानाचा संदर्भ असल्याने या विचाराचा मागोवा घेणे ही बाब वर्तमान समस्यांच्या आकलनास मदत करणारी ठरेल. सोविएत युनियनचा अस्त झाला असला तरी भांडवलशाहीतील परिवर्तने व स्थित्यंतरांचा आढावा घेण्यासाठी मार्क्सीय विचार पद्धतीचा उपयोग उपयुक्त ठरेल. जागतिकीकरणामुळे भांडवलशाही चौकटीमध्ये अविकसित देशांच्या विकासाचा प्रश्न आता निकालात निघाला आहे, असे ज्यांना वाटत नाही त्या सर्वांना असमान विनिमय ही कल्पना महत्त्वाची वाटण्याची शक्यता आहे. असमान विनिमयाचा राष्ट्रीय संदर्भात विचार करण्याच्या दांडेकरांच्या प्रयत्नाला असा वर्तमान संदर्भ आहे.

भारतातील वर्गकलहाच्या विवेचनात कामगारांच्या भूमिकेचा प्रश्न पहिल्यांदा ग.रा. भटकळ स्मृती व्याख्यानात मांडला गेला (दांडेकर, 1997). संघटित कामगार व किसानांच्या युतीचा प्रश्न पुढे असमान विनिमयाच्या संदर्भात रमेशचंद्र दत्त स्मृती व्याख्यानाद्वारे पुन्हा प्रतिपादला गेला (दांडेकर, 1980), या लेखकाच्या मते ही दोन्ही व्याख्याने आणि शेतकरी संघटनेच्या आंदोलनाबाबतची दांडेकरांची भूमिका यात एक सातत्य आहे. म्हणून त्यांचा एकत्रित विचार करावयाला हवा. या सर्व विचारांना एकत्र आणणारी कल्पना अंतर्गत वसाहतवाद ही आहे. वसाहतवादात परराष्ट्राद्वारे शोषण अनुस्यूत आहे, तर अंतर्गत वसाहतवादात एकाच राष्ट्रातील एक गट दुसऱ्या गटाचे शोषण करतो ही कल्पना मांडली जाते. निबंधाच्या पहिल्या भागात दांडेकरांच्या लिखाणातील अंतर्गत वसाहतवाद ही कल्पना विशद केली आहे. दुसऱ्या भागात या कल्पनेवरील विविध मतांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. या विचारमंथनातून वर्तमान संदर्भात काही धडे शिकता येतात काय ? असल्यास कोणते ? या आणि अशा काही प्रश्नांचा विचार निबंधाच्या शेवटी केला आहे.

## 2

## भारतातील वर्गसंघर्ष

भारतीय समाजातील वर्गसंघर्षाचे स्वरूप विशद करताना आपण मार्क्सवादी पद्धतीचा वापर करीत आहोत, असा दावा करीत मार्क्सवादी पठडीत स्थान मिळाले तर आपणास आनंद होईल, असे दांडेकर भटकळ स्मृती व्याख्यानाच्या सुरुवतीलाच नमूद करतात. वर्गसंघर्षातून सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरे होतात. कार्ल मार्क्स यांच्या विश्लेषणाचे मूलतत्त्व भांडवली व्यवस्थेच्या विकासाबाबतचे विवेचन असे मानले तर भारतीय समाजातील कित्येक वर्तमान समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी या समस्यांच्या मुळाशी असणाऱ्या वर्गसंघर्षाचे स्वरूप समजावून घेतले पाहिजे, असे नमूद करीत असतानाच मार्क्सवाद ही विचारांची पद्धती असून, ती विचार करण्याला पर्याय असू शकत नाही, असे म्हणत भारतीय संदर्भात मार्क्सवादी संकल्पना व विवेचनात आवश्यक ते फेरफार करण्याची आवश्यकता ते प्रतिपादन करतात.

1971 मधील जनगणनेच्या माहिती आधारे दांडेकरांचे मुख्य प्रतिपादन असे आहे की, शेतकरी, शेतमजूर व कुटिरोद्योग यात काम करणारे लोक 13.2 कोटी (म्हणजे एकंदर काम करणाऱ्यांचा 73.5 टक्के वाटा) आहेत. ते भांडवली व्यवस्थेच्या बाहेरचे मानावे लागतात. याशिवाय 1.6 कोटी स्वयंरोजगारी लोक आहेत. ते भांडवली व्यवस्थेत असले तरी मजुरी न करणारे आणि म्हणून स्वतंत्र आहेत (अशांचा वाटा 8.9 टक्के आहे). याशिवाय मालकांची संख्या 0.22 कोटी (1.2 टक्के) आहे. समाजातील कामगारांची संख्या 2.95 कोटी (किंवा 16.4 टक्के वाटा) आहे. यात पांढरपेशा व औद्योगिक कामगारांचा समावेश होतो. मार्क्स ज्यांचा सर्वहारा असा उल्लेख करतात तो कामगारवर्ग एकंदर काम करणाऱ्या लोकसंख्येचा एक-षष्ठांश एवढाच आहे. हा वर्ग लक्षणीय असला तरी अल्पमतातील आहे. साहजिकच या वर्गाने

वेतनवाढीसाठी केलेले संप व इतर लढे बहुसंख्याकांचे तर असतच नाहीत, पण बहुसंख्याकांच्या हिताचे तरी आहेत का हाही विचार करण्याजोगा प्रश्न आहे.

एकंदर 2.95 कोटी कामगारांपैकी 1.02 कोटी कामगार असंघटित क्षेत्रातील आहेत आणि उर्वरित संघटित क्षेत्रातील संघटित कामगारांपैकी 40 टक्के कामगार सरकारी क्षेत्रातील आहेत. कामगारवर्गाचा जेमतेम 25 टक्के एवढा हिस्सा बुर्झ्वा मालकांकडे काम करीत आहे. सरकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या 50 टक्के प्रशासकीय किंवा शिक्षण, आरोग्य, इत्यादी सामाजिक सेवा क्षेत्रांत काम करतात. या क्षेत्रांतील मूल्यवृद्धी वेतनाशी निगडित असते. या क्षेत्रांत अतिरिक्त मूल्य निर्माण होत नाही आणि मार्क्सीय अर्थाने शोषण संभवत नाही. सरकारी क्षेत्रातील कामगारांच्या जेमतेम 25 टक्के कामगार खाणी, निर्माणी, जंगले अशा उत्पादक क्षेत्रांत काम करतात. यापैकी बहुतेक क्षेत्रांत सरकारचा उघड व छुपा एकाधिकार आहे, पण या क्षेत्रांत नफा क्वचितच होतो. सरकारी क्षेत्रातील कामगारांच्या संपाचे न्याय्य कारण काय असू शकते ?

दांडेकरांच्या मते, सरकारी क्षेत्रातील वेतनमान सरासरी वेतनमान व राहणीमानाच्या तुलनेत कमी पातळीवर असेल तर सरकारी क्षेत्रातील कामगारांचा संप न्याय्य ठरेल. पण सरकारी क्षेत्रातील वास्तवातील संप या प्रकारचे नसतात.

खाजगी व सरकारी क्षेत्रांतील कामगारांचा निराळा विचार करावा का करू नये ? मार्क्स यानी असे नमूद केले आहे की, सरकार म्हणजे दुसरे तिसरे काही नसून समस्त बुर्झ्वा वर्गाचे हितसंवर्धन करणारी समिती आहे. पण मार्क्स यानी असेही नमूद केले की, बुर्झ्वा वर्ग स्वतःचे दफनकरी निर्माण करतो. विकासाच्या प्रक्रियेतील सरकारी क्षेत्राच्या महत्त्वाच्या भूमिकेचा कामगारवर्ग वेगळा विचार करणार नसेल आणि खाजगी मालक व शासन यांच्यात फरक करणार नसेल तर संघटित कामगारांच्या रूपात सरकारी क्षेत्र स्वतःचे दफनकरीच निर्माण करेल.

लघुउद्योगात काम करणारे मजूर जवळजवळ 1 कोटी आहेत. या उद्योगांच्या काही खास समस्या असतात. उत्पादनाचे प्रमाण छोटे असते त्यामुळे उत्पादन परिव्यय जास्त असतो. बड्या उद्योगांच्या स्पर्धेत टिकावयाचे तर कमी मजुरी देऊन आणि कमी नफा स्वीकारून व्यवसाय चालू ठेवता येतो. स्पर्धेमुळे या उद्योगांना टिकाव धरणे अवघड बनते. ते मोठ्या उद्योगांत विलीन होण्याची शक्यता असते. मोठ्या उद्योगांत काम करणारे मजूर कामगारवर्गाचा फक्त पाव हिस्सा आहेत. कामगारवर्गच काम करणाऱ्या लोकसंख्येचा एक - षष्ठांश भाग असल्याने कामगारांचा बड्या मालकांविरुद्धचा लढा ही फक्त एका लहान वर्गाची कृती ठरते. स्पर्धात्मक वातावरणात भांडवलदार व मालक संघर्ष विकोपाला जाऊन व्यवस्था संकटात पडते. पण एकाधिकारी भांडवली व्यवस्थेत परिस्थिती वेगळी असते. कामगारांची सौदाशक्ती बड्या एकाधिकारी उद्योगात जास्त यशस्वी ठरते. कारण एकाधिकारी भांडवलदारांना ज्यादा मजुरीचा भार वाढीव किमतीच्या स्वरुपात ग्राहकांवर ढकलता येतो. साहजिकच लहान उद्योग बंद पडून ते मोठ्या उद्योगात विलीन होणे लहान उद्योगांतील कामगारांच्या हिताचेच असते. मोठ्या उद्योगांतील कामगारांची सौदाशक्ती जास्त असते. याचे कारण त्यांची संघटना क्षमता वगैरेशी संबंधित नसून ती त्यांच्या मालकांच्या एकाधिकारावर अवलंबून असते. या स्थितीत मोठ्या उद्योगांतील कामगारांचे हित त्यांच्या मालकांच्या हिताविरुद्ध नसते. मालकाच्या एकाधिकारी लाभांचा वाटा कामगारांना प्राप्त होतो. कामगारवर्ग एकजिनसी स्वरुपाचा राहात नाही. खाजगी व सरकारी एकाधिकार निर्माण झाला म्हणजे श्रमिकांचा पण एकाधिकार बनतो. शासनसंस्था भांडवलदार व श्रमिकांच्या एकाधिकाराचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारते. अशा परिस्थितीत मार्क्सीय वर्गसंघर्ष एका मोठ्या संघर्षात दडला जातो. हा संघर्ष संघटित व असंघटित क्षेत्रांमध्ये चालतो. सरकारी व खाजगी क्षेत्रांतील संघटित

कामगार, शासनसंस्था व बडे भांडवलदार यांचा संघटित क्षेत्रात समावेश होतो. हे सर्व घटक मिळून समाजाचा जेमतेम 18 टक्के भाग बनतात. हे घटक ते विक्री करतात त्या वस्तू व सेवा यांच्या किमती ठरवू शकतात. उर्वरित अर्थव्यवस्था असंघटित क्षेत्रात असते. असंघटित क्षेत्राला किंमत स्पर्धेला तोंड द्यावे लागते. कारण त्याचे किमतीवर नियंत्रण नसते. संघटित क्षेत्राचा आकार लहान असल्याने असंघटित क्षेत्राचे शोषण काही काळ चालू शकते. पण असंघटिताचा संघटित क्षेत्रात प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न चालू राहतो. विविध दडपणांमुळे सरकारी क्षेत्रातील रोजगार वाढविण्याचे प्रयत्न चालू राहिल्यास किमती ठरविणाऱ्यांची संख्या वाढण्याची मर्यादा गाठली गेली की या व्यवस्थेतील विरोधाभास पराकोटीला जाऊन कल्याणकारी शासनाचे अस्तित्व धोक्यात येईल. मार्क्सीय पद्धतींचा उपयोग करून अमार्क्सीय निष्कर्ष काढण्याचा हा प्रयत्न सनसनाटीपूर्ण ठरला.

### 3

## आंतरराष्ट्रीय व्यापार व साम्राज्यवाद

भारतीय समाजातील मुख्य संघर्ष कामगार विरुद्ध भांडवलदार असा नसून तो संघटित कामगार, शासन संस्था आणि भांडवलदार यांचा समावेश असलेले संघटित क्षेत्र आणि शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर व नागरी भागातील असंघटित क्षेत्र यांच्यात संघर्ष चालू असतो. हा निष्कर्ष भिन्न पद्धतीने मांडण्याचा आणखी एक प्रयत्न दांडेकरानी 1979 मध्ये दत्त स्मृती व्याख्यानातून केला. इमॅन्युएल (1972) यानी आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारे विकसित देशांतील भांडवलदार व मजूर संयुक्तपणे विकसनशील देशांतील मजुरांचे शोषण करतात, असा सिद्धान्त मांडला. हा सिद्धान्त जगभराच्या कामगारांचे हितसंबंध एकसारखे असतात, त्यामुळे त्याना एकजुटीने भांडवलशाहीविरुद्ध लढा उभारता येईल, या समजुतीला छेद देऊ पाहात असल्याने हे विवेचनही वादविषय बनले. दत्त स्मृती व्याख्यानात इमॅन्युएल यांच्या सिद्धान्ताचे परीक्षण करून ते विवेचन देशांतर्गत व्यापाराला लागू पडते, असे दांडेकरांचे मुख्य प्रतिपादन होते.

इमॅन्युएल यांच्या विवेचनाची ढोबळ दिशा मान्य करून त्यानी अवलंबिलेल्या मूल्याचे उत्पादन किमतीत परिवर्तन करण्याच्या मार्क्सीय पद्धतीऐवजी स्राफा पद्धतीचा उपयोग करून त्याच्या विवेचनाची व अंकीय उदाहरणाची फेरमांडणी केली. इमॅन्युएल यानी दर्शविलेला असमान विनिमय भिन्न वेतन दरांमुळे उद्भवतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर भांडवलाची नेआण सुलभतेने होते, पण श्रमिकांच्या हालचालीवर बंधने असल्याने वेतन दरात कायमस्वरूपी भिन्नता असू शकते. या स्थितीत विकसनशील व विकसित देशांमधील व्यापाराद्वारे विकसित देशांना त्यांच्या निर्यातीच्या निर्मितीत जे श्रमतास अध्याहृत असतात त्यापेक्षा जास्त श्रमतास खर्ची पडलेल्या वस्तूंची आयात करू शकतात. परिणामतः अविकसित देशांची पिळवणूक होते आणि जे अतिरिक्त मूल्य विकसित देशाला प्राप्त होते त्याचा वाटा विकसित देशांतील मजुरीचे दर विकसनशील देशांतील मजुरीच्या दरापेक्षा जास्त असल्याने, विकसित देशांतील मजुरांना पण प्राप्त होतो. विकसित देशांतील अतिरिक्त मूल्याचा, कितीही लहान असला तरी, वाटा मिळणे शक्य आहे आणि तो काही विरोधाभास नाही.

मात्र मजुरीचे दर व श्रमाची उत्पादकता भिन्न असणे या गोष्टी जशा दोन देशांबाबत खऱ्या असू शकतात, त्याचप्रमाणे एकाच अर्थव्यवस्थेचे निरनिराळे विभाग, उद्योग याबाबत खरी असू शकते. मजुरीचे दर भिन्न असले म्हणजे अंतर्गत व्यापारामध्ये कमी मजुरी असलेल्या क्षेत्रांतील अतिरिक्त मूल्य जास्त मजुरी असलेल्या क्षेत्रांकडे हस्तांतरित होते. या अतिरिक्त मूल्याचा वाटा जास्त मजुरी असलेल्या कामगारांनाही मिळतो. ही परिस्थिती किसान व कामगार यांच्या एकजुटीचा पाया कमकुवत बनविते. विवेचनाचा पाया काहीसा वेगळा असला तरी एकाधिकारामुळे असंघटित

क्षेत्राची पिळवणूक शक्य होते असे भटकळ स्मृती व्याख्यानातील प्रतिपादन आहे. हीच गोष्ट वेतन भिन्नेमुळे शक्य होते असा दत्त स्मृती व्याख्यानाचा निष्कर्ष आहे. भटकळ स्मृतीच्या व्याख्यानाचा निष्कर्ष यातील साम्यही काही योगायोगाची बाब नाही. फरक फक्त एवढाच आहे की, पहिल्या व्याख्यानातच सर्वांच्या किमती ठरविणारे होण्याच्या प्रयत्नातून सर्व व्यवस्था कोसळून पडेल अशा भीषण निष्कर्षाशी येऊन दांडेकर थांबतात. दुसऱ्या आठवड्याच्या अखेरीस या पेचप्रसंगावर त्यांनी तोडगा सुचविला आहे. या धोरणाची मुख्य सूत्रे पुढीलप्रमाणे असावीत.

सर्वसमावेशक उत्पन्न व किंमत धोरण ठरविणे आणि किमान वेतनावर काम करण्याची तयारी असलेल्या सर्वांना रोजगार पुरविण्याची हमी सरकारने द्यावी. भिन्न कसब वा हुन्नर यासाठी भिन्न एका मर्यादेपर्यंत मोबदला दिला जावा. खाजगी भांडवलावरील लाभांशावर कमाल मर्यादा असावी आणि जास्तीत जास्त भांडवल गुंतवणूक साध्य करण्याचे उद्दिष्ट ठरविले जावे. कामगारवर्गाने आपल्या शक्तीचा उपयोग वरील धोरणे प्रत्यक्षात आणण्यासाठी केला तर किसान व कामगार यांच्या एकजुटीचा पाया मजबूत होईल.

## 4

## शेतकरी आंदोलन

शेतीमालाला रास्त भाव मिळावा या मागणीसाठी 1980 च्या दशकात कांदा, ऊस व कापूस उत्पादकांची आंदोलने महाराष्ट्र व इतर राज्यांत झाली. या आंदोलनामागची तात्त्विक भूमिका शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यानी सर्वांत परिणामकारकतेने मांडली. ही मांडणी अंतर्गत वसाहतवाद या कल्पनेनुरूप मांडली गेली. भारत विरुद्ध इंडिया या स्वरूपात शेती (ग्रामीण) व उद्योग (नागरी) या क्षेत्रांतील परस्परविरोधी हितसंबंधाचे चित्र शेतीमालाला रास्त भाव न मिळणे या पार्श्वभूमीवर रंगविण्यात आले. दांडेकरांच्या संघटित विरुद्ध असंघटित क्षेत्र या चित्राशी शरद जोशींची शेती (ग्रामीण) विरुद्ध उद्योग (नागरी) ही मांडणी मिळतीजुळती तर होतीच शिवाय शेतकरी व कामगारवर्गाचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत, हेदेखील दत्त स्मृती व्याख्यानातील प्रतिपादनाला समांतर होते. मात्र हे साम्य वरवरचे ठरले. कारण शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने झडलेला दांडेकर-जोशी वाद या दोन भूमिकांतील खाईच दर्शवून गेला. शेतकरी आंदोलनामागील शरद जोशींची भूमिका आणि त्यांचा दांडेकरांबरोबर झालेला वाद याचा येथे सविस्तर विचार करता येणार नाही. पण दांडेकरांच्या भूमिकेचा निर्देश यासंदर्भात प्रस्तुत ठरेल.

दांडेकरांचे प्रतिपादन असे होते की, शेतीमालाच्या किमती वाढवून शेतकरी वा ग्रामीण भाग यांचा कायमस्वरूपी लाभ होणार नाही, कारण शेतीमालाच्या (अन्न व औद्योगिक कच्चा माल) किमती वाढल्या की कालांतराने मजुरीचे दर वाढतील. तसेच औद्योगिक वस्तूंच्या किमतीही. साहजिकच शेतीमालाच्या वाढीव किमतीचा लाभ कालांतराने नाहीसा होईल. मग पुन्हा शेतीमालाच्या किमती वाढविणे आवश्यक ठरेल. याऐवजी औद्योगिक कामगारांची मजुरी जास्त असते म्हणून औद्योगिक मालाच्या किमती जास्त (वा चढ्या) राहतात. शेतमजुरांची तुलनात्मक मजुरी वाढत नाही तोवर शेती व बिगर-शेती क्षेत्रांतील वस्तू व्यापार शर्ती शेती क्षेत्राला प्रतिकूलच राहतील. शेतमजुरीचे दर वाढविले तर वाढीव किमतीचे सुपरिणाम व्यापक प्रमाणात वाटले जाऊन ग्रामीण विकासाचा पाया विस्तृत होईल. शेती व उद्योग यांच्या असमतोल विकासाचे कारण या दोन क्षेत्रांतील मजुरीचे दर भिन्न असण्यात शोधले गेले. या अर्थाने शेतकरी आंदोलनाबाबतची दांडेकरांची भूमिका दत्त स्मृती व्याख्यानातील विवेचनाशी निगडित आहे.

## 5

## मतमतांतरे

दांडेकरांच्या विवेचनाबाबत जी चर्चा झाली त्याचा आता इतक्या वर्षानंतर तटस्थतेने विचार करणे शक्य आहे. दांडेकरांचा मुख्य मुद्दा संघटित कामगारवर्गाला सुस्थिती प्राप्त झाली आहे आणि केवळ वेतनवाढीच्या मागण्या संघटनेच्या जोरावर मान्य झाल्या तरी त्यातून विकासाचा व्यापक प्रश्न सुटणार नाही, असा मानला तर या प्रकारचे विवेचन करणाऱ्यांत दांडेकर अग्रभागी असतील, पण एकटे नव्हते. बडे भांडवलदार, जमीनदार व नोकरशहा यांची अर्थ/ राजकारणावर पकड असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेत अवरुद्ध अवस्था आली, असे विवेचन अनेकांनी केले होते. देसाई (1981) यानी सरकारी क्षेत्रातील कामगारांनी नोकरांची खोगीरभरती, उत्पादनक्षमतेचा अपुरा उपयोग, इत्यादी कारणांमुळे मंद औद्योगिक प्रगतीला जबाबदार धरले होते. दांडेकरानीही *'अर्थविज्ञान'* मधील चर्चेचा समारोप करताना सरकारी क्षेत्रातील कामगारांचा अधिक स्पष्टपणे उल्लेख केला. पण दांडेकरांचे विवेचन व निष्कर्ष जेवढे वादग्रस्त ठरले तितकाच किंबहुना जास्त वादग्रस्त ठरला मार्क्सीय पद्धतीचा अवलंबत केल्याचा त्यांचा दावा.

बडे जमीनदार व भूमीहीन शेतमजूर याना असंघटित या एका क्षेत्रात बसविल्याने शेती क्षेत्रातील वर्गसंबंध व पिळवणुकीकडे दुर्लक्ष होते. विशेषत: औद्योगिक कामगारांची मजुरीची भांडवली-पूर्व व्यवस्थेतील मजुरीशी तुलना करून कामगार असंघटित क्षेत्राची पिळवणूक करतात. हा निष्कर्ष दांडेकर म्हणतात त्याप्रमाणे केवळ एकाधिकारी भांडवलशाही पुरताच खरा नसून तो अभिजात भांडवलशाहीलाही लागू पडेल. भांडवलशाही व्यवस्थेत नेहमीच विविध विरोधाभास व संघर्ष चालू असतात. त्यापैकी संघटित व असंघटित क्षेत्र हा संघर्ष प्रमुख मानता येईल का? असा प्रश्नही उपस्थित झाला.

याशिवाय संघटित कामगार हा मार्क्सच्या अर्थाने वर्ग मानता येईल का? वर्गविषयक जाणिवांचा विचार टाळून वर्ग संघर्षाचा विचार शक्य आहे का ? तसा विचार मार्क्सीय म्हणता येईल का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. संघटित कामगार असंघटित क्षेत्राच्या शोषणात सहभागी आहेत, या निष्कर्षाचा प्रतिवाद संघटित क्षेत्रातील वास्तविक वेतनातील वाढीचे प्रमाण पाहता ज्या वर्गाला जेमतेम वास्तविक वेतन शाबूत ठेवता आले, त्याला शोषणात सहभागी ठरविता येणार नाही, अशी भूमिका मांडली गेली (वेंकटरमय्या, 1978). शिवाय वास्तविक वेतनात कितीही वाढ झाली असली तरी गुंतवणुकीचे निर्णय घेण्यात कामगारांना सहभागी करून घेण्यात येत नसल्याने त्यांना वरकड मूल्यातील वाटा मिळत असला तरी शोषणासाठी भांडवलदारांच्या बरोबरीने कामगारांना जबाबदार धरता येणार नाही, असे मत मांडले गेले. यासंदर्भात मांडण्यात येणारा अजून एक मुद्दा असा होता की, कामगारांनी जर वेतन वाढीची मागणी पुढे रेटली नाही तर केवळ भांडवलदारांचा नफा वाढेल. पण ही अतिरिक्त साधने असंघटित क्षेत्राच्या विकासासाठीच वापरली जातील, याची खात्री देणारी संस्थागत व्यवस्था नसल्याने केवळ कामगारांच्या वेतनवाढीच्या मागणीला दोष देता येणार नाही. मार्क्सीय दृष्टिकोनातून कामगारवर्गाच्या भूमिकेचा सर्वात परिपूर्ण विचार रणदिवे (1982) यानी मांडला. भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादनाचे निर्णय सुटे व स्वतंत्रपणे केले जात असल्याने उत्पादन निर्णयात जशी अराजकता उत्पन्न होते, तीच गोष्ट वेतन दरातील तफ़ावतीबाबत म्हणता येते असे त्यांचे प्रतिपादन होते.

भटकळ स्मृती व्याख्यानावरील प्रतिक्रियांच्या संदर्भात दत्त स्मृती व्याख्यानात मार्क्सीय पद्धतीचा आग्रह नव्हता. मुख्य विवेचन वेतनदरातील असमानतेवर आधारलेले होते आणि ते असमतोल विनिमयाच्या तांत्रिक अंगाने (आकडेमोडीच्या आधारे) मांडले गेले. संघटित कामगार शोषणात सहभागी आहेत हा मुख्य निष्कर्ष तसाच असला तरी व्यवस्था कोलमडून पडण्याचे भाकीत नव्हते, तर आवश्यक धोरणांची रूपरेषा दिली होती. या धोरणांत राष्ट्रीय उत्पन्न व किंमत धोरण, भिन्न कसबी कामगारांना

मिळणाऱ्या मजुरीतील तफावत कमी करणे, लाभांशावर निर्बंध आणि जास्तीत जास्त गुंतवणूक करण्याचे उद्दिष्ट या बाबी समाविष्ट केल्या होत्या. पण ही धोरणे अमलात येऊ शकतील का, याचा वर्गीय हितसंबंधांच्या पार्श्वभूमीवर विचार केलेलाच नव्हता. संघटित कामगारांची भूमिका याबाबतच्या वादाचा सारांश काय, या प्रश्नाभोवती केन्द्रित राहिली. कदाचित, दांडेकरानी संघटित कामगार असा शब्द वापरला तरी त्यांचा मुख्य मुद्दा सरकारी क्षेत्राची कामगिरी, सरकारी नोकरभरती व अशा आस्थापनांत व्यवस्थापकीय स्वायत्तता (नसणे) या पद्धतीने मांडला जाणे कदाचित अधिक परिणामकारक ठरले असते. यासंदर्भात सरकारी क्षेत्राची व शासनाची भूमिका याचाही विचार आवश्यक होता. संघटित कामगार केवळ वेतनवाढीची मागणी करून त्यांचे दीर्घकालीन हित साध्य करू शकतील का ? या प्रश्नाचा सरकारी क्षेत्राच्या भूमिका या व्यापक संदर्भात विचार झाला असता तर ही चर्चा अधिक सकारात्मक झाली असती. कामगार समस्येमुळे नवीन रोजगार असंघटित क्षेत्रात निर्माण करण्याच्या प्रवृत्तीमुळे खाजगी संघटित क्षेत्रातील रोजगारनिर्मितीचा वेग कमी झाला आहे. मात्र भारतासारख्या देशांत रोजगार क्षेत्रातील क्रान्तीकारक बदलांमुळे रोजगारनिर्मितीच्या शक्यतांवर मोठा परिणाम होत आहे. जागतिकीकरण व तंत्रवैज्ञानिक बदल यामुळे दांडेकर ज्याला कामगारांचा एकाधिकार म्हणतात तो संपुष्टात, निदान धोक्यात, येत आहे. मुंबईतील 1983 सालचा कापड गिरणी कामगार संप हे यासंदर्भातील लक्षणीय उदाहरण ठरावे. सरकारी उद्योगांचा एकाधिकार संपुष्टात येत असताना आवश्यक त्या फेररचनेची यशस्वीता कामगार संघटनांच्या भूमिकेवरही अवलंबून असेल. दांडेकरानी वर्गसंघर्षाचे स्वरूप, कामगारवर्ग शोषक आहे काय, असे प्रश्न उपस्थित केल्याने चर्चा, उच्च अमूर्त पातळीवरच राहिली. याउलट टीकाकारांनी दांडेकरांचे प्रतिपादन तात्त्विक व वास्तविकदृष्ट्या अपुरे किंवा चुकीचे कसे आहे, या गोष्टीवर लक्ष केन्द्रित केले.

## 6

## उपसंहार

संघटित कामगारांची भूमिका याबाबतच्या पंधरावीस वर्षांपूर्वीच्या चर्चेचे फक्त ऐतिहासिक महत्त्व आहे काय? वर्तमान समस्यांच्या संदर्भात हा वादविवाद गैरलागू ठरेल का? अनेक कारणांसाठी असा निष्कर्ष काढणे अयोग्य ठरेल. एकतर भांडवलशाही व्यवस्थेत अविकसित राष्ट्रांच्या विकासाचा प्रश्न शिल्लक असेतो भांडवलशाहीचा विकास व विविध राष्ट्रांमधील विनिमय या गोष्टी महत्त्वाच्या ठरतील. जागतिकीकरणामुळे राष्ट्राराष्ट्रांमधील व्यवहार तर वाढत आहेतच, पण वस्तू व्यापाराबरोबरच गुंतवणुकीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे इमॅन्युएल यानी उपस्थित केलेले प्रश्न विचारणीय ठरतील. वेतन दरातील असमानता-देशादेशांत तसेच एका देशातील भिन्न क्षेत्रांत - सातत्याने वाढत आहे. संगणित्रांच्या वापरामुळे कढ कसबाची मागणी कमी होत आहे, तर विशेषज्ञांचे वेतन वेगाने वाढते आहे. भारतामध्येही आर्थिक सुधारणांतर्गत व्यवस्थापकीय अनागोंदी कारभार असे म्हणून भागणार नाही. विकसित देशांमध्येही अविकसित देशांतील कमी वेतन दर ही बाब अ-रास्त स्पर्धेची मानली जात आहे. त्यामुळेही प्रश्न भविष्यात अधिक महत्त्वाचा बनेल.

दुसरे, मध्य युरोप व भूतपूर्व सोविएत युनियनमधील घडामोडींमुळे मार्क्सवादी विचारांचा राजाश्रय संपला असेल, पण केवळ त्यामुळे ते विचार गैरलागू होत नाहीत. विसाव्या शतकाच्या अखेरीला भांडवली व्यवस्थेचे स्वरूप समजावून घेताना मार्क्स यांचे विवेचन व भाकिते अंतिम सत्य मानण्याचे अर्थातच कारण नाही. पण भांडवलशाही व्यवस्थेच्या स्थित्यंतरांचा अभ्यास करताना मार्क्सवादी पद्धतींचा उपयोग फलदायी ठरण्याची शक्यता आहेच.

तिसरी गोष्ट, मार्क्सीय विचारांत भांडवलशाहीच्या विकासात व ही व्यवस्था पलटून टाकण्यात औद्योगिक कामगार महत्त्वाची भूमिका बजावतील. भारतासारख्या

देशात औद्योगिक कामगारांची संख्या कमी होत आली आहे. विकासाच्या प्रक्रियेत सेवा क्षेत्राचे महत्त्व वाढत असताना औद्योगिक कामगारांचे महत्त्व कमी होईल. इतर कोणते वर्ग औद्योगिक कामगारांना साथ देऊ शकतील, या प्रश्नाचे महत्त्व कमी होणार नाही. या प्रश्नांचा या घटकेला विशेष गांभीर्याने विचार होताना दिसत नाही. पण या सर्व प्रश्नांचा विचार करताना दांडेकरानी सुरू केलेल्या विचारप्रवर्तक विवादाचे शैक्षणिक मूल्य कायमच राहील.

## संदर्भ टीपा


1 Bardhan, Pranab (1984), *The Political Economy of Development in India*, Oxford, Basil Blackell.

2 Dandekar, V. M. (1977), *Nature of Class Conflict in the Indian Society*, G.R. Bhatkal Foundation, Bombay.

3 Dandekar V. M. (1978),' A Restatement' *Arthavijnana*, 20 (2), April-June, pp. 160-67.

4 Dandekar, V. M. (1981), *Peasant-Worker Alliance: Its Basis in The Indian Economy*, CDSS & Orient Longman, Calcutta.

5 Dasgupta (1978),' Marxian Framework and Analysis of Class Conflict in India,' *Arthavijnana*, 20 (2), April-June, pp. 147-56.

6 Desai, Ashok V. (1981),' Factors Underlying the Slow Growth of Industry,' *Economic and Political Weekly*, XVI (10-12), Annual Number, pp. 381-92.

7 Emmanuel, A. (1972), *Unequal Exchange:A study of The Imperialism of Trade*, Monthly Review Press, New York.

8 Frankel, Francine R. (1978), *India's Political Economy 1947 - 1977: The gradual Revolution*, Oxford University Press, Delhi.

9 Jha, Prem Shankar (1980), *India : A Political Economy Of Stagnation*, Oxford University Press, Delhi.

10 Parvez, Alam (1979), *The Nature of Class Conflicts in Indian Society -A Critique of V. M. Dandekar*, Janavadi Vichar Manch, University of Delhi, Delhi.

11 Ranadive, K.R. (1982), *Accumulation, Employment and Labour Aristocracy: Towards Understanding Working Class Reality in India*, Tata Institute off Social Sciences, Bombay.

12 Sarkar, Subrata and Sen, Anindya (1999),' Liberalisation of Remuneration Guidelines in India and its Effect on Managerial Pay : Evidence from Large Corporations,' *Vikalp*, 24(2),April-June, pp. 35-44.

13 Venkatramaiah, P. (1978),' Is Organised Labour Exploiting or Exploited?' *Arthavijnana*, 20 (2), April-June.


■■■■

# जागतिक व्यापार संघटना आणि अविकसित राष्ट्रे

नलिनी पंडित ※

आंतरराष्ट्रीय व्यापार आणि प्रशुल्क (tariff) या प्रश्नांवर वाटाघाटी करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेने 1999 सालच्या डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीस अमेरिकेतील सिॲटल शहरात निरनिराळ्या राष्ट्रांच्या मंत्र्यांची एक परिषद आयोजित केली होती. तिला विरोध करण्यासाठी हजारो लोक त्या परिषदेच्या भवनाबाहेर जमले. त्यानी तिच्याविरुद्ध निदर्शने केली; बराच आरडाओरडा केला आणि दगडफेकही केली. अमेरिकेतील पोलिसांनी हस्तक्षेप करून ही निदर्शने बंद पाडली आणि परिषदेचे कामकाज सुरू होण्यास मदत केली. पण ही परिषद पूर्णपणे अयशस्वी झाली. जागतिक व्यापार संघटना ज्या पद्धतीने काम करीत होती त्याबाबत अविकसित देशांनी केलेल्या तक्रारी बाजूस ठेऊन गुंतवणूक, शासकीय खरेदी, कामगारांचे हक्क आणि पर्यावरण हे प्रगत देशांना महत्त्वाचे वाटणारे प्रश्न ते देश पुढे ढकलत होते. त्याविरुद्ध अविकसित देशांनी केलेले हे बंड होते. या संघटनेचा कार्यक्रम यापुढे केवळ अमेरिका व युरोपीय युनियन ठरविणार नसून अविकसित राष्ट्रांना महत्त्वाचे वाटणारे प्रश्न त्याना विचारात घ्यावे लागतील, हे या राष्ट्रांनी त्याना दाखवून दिले. या पार्श्वभूमीवर जागतिक व्यापार संघटना, तिची कार्यपद्धती, आणि अविकसित राष्ट्रांच्या तिच्या संबंधातील अपेक्षा यांचा या लेखात विचार केला आहे.

## आंतरराष्ट्रीय संघटना

दुसऱ्या महायुद्धाच्या कालात युरोपातील राष्ट्रांमध्ये फार मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झाली आणि इमारती, कारखाने, दळणवळणाची साधने नष्ट होऊन उत्पन्नातही मोठी घट झाली. तेव्हा भविष्यात असे युद्ध पुन्हा घडून येऊ नये या हेतूने अनेक राष्ट्रांनी एकत्र

※ भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, मुंबई.

येऊन संयुक्त राष्ट्र संघटनेची (United Nations Organization) स्थापना केली. कोणत्याही दोन राष्ट्रांमध्ये काही कारणाने वितुष्ट निर्माण झाले तर त्यांनी हा तंटा या संघटनेकडे न्यावा आणि तिच्या मदतीने तो सोडवावा; त्यासाठी युद्धाचा मार्ग अवलंबू नये असे ठरविण्यात आले.

सन 1929 नंतर जगामध्ये जी महामंदी आली होती त्या कालात स्वतःचा निर्यात व्यापार वाढविण्यासाठी चलनाचे दर कमी करण्याची निरनिराळ्या देशांत चढाओढ लागली होती आणि तिच्यामधून आंतरराष्ट्रीय व्यापाराला धक्का बसला होता. तेव्हा पुढील कालात निरनिराळ्या देशांचे चलनाचे दर स्थिर राहावे आणि ज्यांना जरूर असेल त्यांना आर्थिक पुनर्उभारणी व विकास यासाठी कर्ज मिळावे यादृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक या दोन संस्थांचीही उभारणी करण्यात आली. प्रत्येक राष्ट्राने सोन्याची किंमत आपल्या चलनामध्ये स्थिर ठेवावी आणि त्यात बदल करण्याची जरूर भासल्यास नाणे निधीकडून कर्ज घेऊन तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा, आणि तेवढ्याने न भागल्यास मगच चलनाचा दर कमी करावा असे ठरले. चलनाचे दर स्थिर राखण्यासाठी सोन्याची किंमत डॉलरमध्ये स्थिर राखण्याचे अमेरिकेने नाणे निधीला आश्वासन दिले. याचवेळी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियम ठरविण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनाही स्थापन करण्यात यावी अशी अनेक अविकसित देशांची मागणी होती, पण ती प्रमुख भांडवलदारी राष्ट्रांनी मान्य केली नाही.

आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेला पर्याय म्हणून प्रशुल्क व व्यापार याबाबत एक सर्वसंमत करार (GATT) करण्याचा त्यांनी आग्रह धरला. हा ठराव दोन देशांमधील परस्पर देवाणघेवाण, सर्वांना समान वागवणूक आणि चर्चेतील पारदर्शकता या तीन तत्त्वांवर आधारलेला होता. पहिल्या तत्त्वानुसार एका राष्ट्राने दुसऱ्याशी वाटाघाटी करून त्याच्याकडून येणाऱ्या आयातीवरील कर कमी केला तर दुसऱ्यानेही पहिल्या राष्ट्राकडून येणाऱ्या मालावरील प्रशुल्क कमी करून त्याला प्रतिसाद द्यावा अशी अपेक्षा होती. मात्र अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रे यांनी सुरुवातीपासूनच शेती व दुग्धजन्य पदार्थ याबाबत आपण वाटाघाटी करणार नाही असे जाहीर केले. दुसरे, समान वागवणूक याचा अर्थ एका राष्ट्राला एका वस्तूवर देण्यात आलेली सूट तो पदार्थ निर्यात करणाऱ्या सर्व देशांना देण्यात यावी असा होता. तिसरे, वाटाघाटी उघडपणे करावयाच्या होत्या. दोन देशांमधील वाटाघाटीतून प्रशुल्काचे दर ठरविले जाणार असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकार निरनिराळ्या देशांच्या सौदेबाजीच्या शक्तीवर अवलंबून राहणार होता. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रे अधिक सामर्थ्यवान असल्यामुळे या वाटाघाटींचा वापर करून आपल्या मालावरील आयात कर त्यांनी कमी करून घेतला. हा आयात कर 1947 साली वस्तूंच्या किमतीच्या सरासरी 47 टक्के होता, 1977 साली तो सरासरी 10 टक्क्यांवर येऊन पोहोचला. त्यामुळे जागतिक व्यापारातही बरीच वाढ झाली.

1980 सालापर्यंत अमेरिकेची निर्यात आयातीपेक्षा बरीच जास्त असल्याने ते एक धनको (creditor) राष्ट्र होते. परंतु कोरिया व व्हिएतनाममधील युद्धखर्च व पेट्रोलियम उत्पादन करणाऱ्या राष्ट्रांनी या वस्तूच्या दरात केलेली वाढ यामुळे निर्यातीच्या मानाने अमेरिकेच्या आयातीवरील खर्चात बरीच वाढ झाली आणि विदेशी लोकांच्या हातातील डॉलरचा पुरवठा वाढून डॉलरची किंमत घसरू लागली. विदेशी लोकाकडील डॉलर अमेरिकेतील बँकांमध्ये ठेवले गेल्यामुळे त्यांनी आपला पतपुरवठा वाढविला आणि त्याचा परिणाम म्हणून अमेरिकेच्या बाजारात वस्तूंच्या किंमती वाढू लागल्या. या भाववाढीला आळा घालण्यासाठी रिगन सरकारने आयात वाढू दिली आणि व्याजाच्या दरातही वाढ केली. त्यामधून अमेरिकेच्या आयात-निर्यात व्यापारातील तूट वाढू लागली. 1984 साली ही तूट 10,000 कोटी डॉलर इतकी होती. 1987 साली ती 16,000 कोटी डॉलरवर जाऊन

पोहोचली. तेव्हा आपल्या धोरणात बदल करून आयात थोपविण्यासाठी रिगन याना पाउले टाकावी लागली. यासाठी आंतरराष्ट्रीय कराराला धक्का न लावता अमेरिकेने निर्यात करणाऱ्या देशांना त्यानी स्वतःहून अमेरिकेकडे जाणारी आपली निर्यात कमी करावी (voluntary export restraint) असा सल्ला दिला. अमेरिकेच्या भीतीमुळे हा सल्ला मान्य करणे अनेक राष्ट्रांना भाग पडले. या पार्श्वभूमीवर जागतिक व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने नव्या वाटाघाटी सुरू करण्याची अमेरिकेला गरज वाटू लागली.

## जागतिक व्यापार संघटना

1994 साली युरुग्वे येथे ज्या वाटाघाटी झाल्या त्यांची सुरुवात 1986 साली झाली होती. त्यानंतर आणखी दोन वेळा निरनिराळे देश एकत्र येऊन त्यानी आपापसात चर्चा केली. ही चर्चा इतकी वर्षे चालण्याचे कारण यापूर्वी ती फक्त वस्तूंच्या व्यापारापुरती मर्यादित होती; आता बँकिंग, विमा यासारख्या सेवा क्षेत्रांचाही त्याच्यामध्ये अंतर्भाव करण्यात यावा असा अमेरिकेने आग्रह धरला हे होय. त्यादृष्टीने अमेरिकन एक्स्प्रेस, सिटी बँक आणि आय.बी.एम. यांच्या नेतृत्वाखाली दोनशे बड्या कंपन्यांनी बहुराष्ट्रीय व्यापारी वाटाघाटींसाठी एकत्र येऊन एक मसुदा तयार केला. त्याच्या जोडीला फायझर मोन्सॅन्टो, ड्यूपॉन्ट या कंपन्यांनीही परस्परांशी हातमिळवणी केली आणि बौद्धिक संपदा (Intellectual Property Rights) मिळविण्यासाठी एक गट स्थापन केला. अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रिगन आणि इंग्लंडच्या पंतप्रधान मागरिट थॅचर या दोघांचा त्याना पाठिंबा होता. या चर्चा अनेक महिने चालूनही त्यातून काही मार्ग निघेना. अखेरीस 1994 साली आर्थर डंकेल यानी एक प्रस्ताव बैठकीसमोर सादर केला. या प्रस्तावात वस्तूंचा व्यापार, बौद्धिक संपदा आणि विदेशी गुंतवणूक यांच्या दृष्टीने काही नियम ठरविण्यात आले. ज्याना हे नियम मान्य असतील त्यानी या प्रस्तावावर सह्या कराव्या ; जे सह्या करणार नाहीत ते सह्या करणाऱ्यांबरोबर व्यापार करू शकणार नाहीत, ते बाहेर राहतील असे ठरविण्यात आले. व्यापार बुडण्याच्या भीतीमुळे भारत व इतर अविकसित राष्ट्रे याना या करारावर सह्या कराव्या लागल्या. या कराराच्या अमलबजावणीसाठी थोड्याच कालात जागतिक व्यापार संघटनेची (World Trade Organization) निर्मिती झाली.

## डंकेल करार

### (अ) व्यापारविषयक तरतुदी

(1) पूर्वी विदेशी मालाची आपल्या देशातील स्पर्धा कमी व्हावी म्हणून आयातीवर कर लादण्याचा शासनाचा हक्क मान्य करण्यात आला होता. दोन देशांतील उत्पादन परिव्ययात फार फरक असला तर आयातीचे प्रमाणही शासन ठरवीत असे. आता आयातीचे प्रमाण ठरविण्यावर बंदी घालण्यात आली. आयात कर बसविताना 1986-88 सालातील आयात चालू राहील इतकाच तो बसवावा आणि 2003 सालापर्यंत तो 24 टक्क्यांनी कमी करावा असे ठरले. काही राष्ट्रांना आयात-निर्यातीचा समतोल राखण्यासाठी आयातीचे परिमाण ठरवावे लागेल. पण तसे करण्यासाठी दर दोन वर्षांनी त्यानी नाणे निधीची परवानगी घ्यावी. (2) सिंचन, क्रीडा नियंत्रण आणि संशोधन क्षेत्रे सोडून इतर बाबतीत अर्थसाहाय्ये (subsidies) 13.3 टक्क्यांनी कमी करावी. निर्यातीवरील अर्थसाहाय्यातही कपात करण्यात यावी.

### (आ) बौद्धिक संपदेचा हक्क

या कलमानुसार संघटनेचे सभासद असलेल्या राष्ट्रांनी आपले पेटंट, ट्रेड मार्क आणि कॉपी राईट याविषयींचे कायदे बदलून बौद्धिक संपदेच्या हक्कांचे रक्षण करावे. शेतीलाही हा कायदा लागू करून बियाणांच्या नव्या जातींना पेटंट द्यावे. पेटंट केवळ प्रक्रियेपुरते मर्यादित न ठेवता वस्तूवरही ते देण्यात यावे, आणि पेटंटच्या कालाची मर्यादा वाढविण्यात यावी असे ठरले.

## (इ) विदेशी गुंतवणुकीवर बंधने

पूर्वी कोणत्याही राष्ट्राला आपल्या देशातील लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विदेशी गुंतवणुकीवर आवश्यक ती बंधने घालण्याचे अधिकार होते. या करारानुसार ते नष्ट करण्यात आले असून त्यांच्या जागी सर्व राष्ट्रांना सारखेपणाने लागू असणारे नियम करण्यात यावे असे ठरले. ते कोणते असावेत हे ठरविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणुकीबाबतच्या एका बहुराष्ट्रीय करारावर वाटाघाटी चालू करण्यात याव्या असे ठरले.

जागतिक व्यापार संघटनेचा उद्देश जागतिक पातळीवर खुला व्यापार, खुली उत्पादनव्यवस्था आणि मालकी हक्क याना संरक्षण मिळेल अशा दृष्टीने निरनिराळ्या देशांना कायदे करण्यास लावणे असा आहे. तिला देशातील असा एक नवा राजकीय आकार आहे आणि घटनात्मक आधारही आहे. शिवाय वस्तूंचे अभिसरण आणि राष्ट्रीय व राष्ट्रांतर्गत कायद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिनियम करण्याची तिच्यापाशी सत्ताही आहे. साहजिकच जगातील महासत्ता आणि महाकाय कंपन्या याना सोयीचे होईल अशा पद्धतीने बाजाराचे नियंत्रण करणारी यंत्रणा तिने राबविली तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

जागतिकीकरण व उदारीकरण ही उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेऊन काम करणारी जागतिक व्यापार संघटना ही एकच संघटना नाही. विसाव्या शतकात जागतिक भांडवलशाहीचा जो विकास झाला त्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा उदय हा होय. या कंपन्यांची अंतर्गत संघटनाच केवळ बहुराष्ट्रीय आहे. अशी राष्ट्रातीत कंपनी प्रत्येक देशातील कच्च्या मालाची उपलब्धता, निरनिराळ्या कामासाठी लागणाऱ्या मजुरीचे दर, शासनाकडून वाटाघाटीच्या मार्गाने सवलती मिळण्याची शक्यता या गोष्टी ध्यानात घेऊन एकाच वस्तूचे सुटेसुटे भाग निरनिराळ्या देशांत तयार करते आणि ते एकत्र जोडते. अशा कंपन्यांची संख्या आता 45,000 च्या वर आहे आणि त्यांचे त्या त्या देशातील शासनांवर वर्चस्व आहे. त्या शासनामार्फत आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यावर त्या प्रभाव पाडीत आहेत. कोणताही अविकसित देश कर्ज मागण्यासाठी नाणे निधीकडे गेला की नाणे निधी अशाच उदारीकरणाच्या अटी त्याच्यावर लादीत आहे आणि त्यामधून देशी उद्योगांना संरक्षण देण्याची त्या त्या राष्ट्रांतील शासनाची क्षमता नष्ट होत आहे. उदाहरणार्थ, 1991 साली भारताने जे नवीन आर्थिक धोरण स्वीकारले ते नाणे निधीने आपल्यावर लादलेले होते. त्यामधून विदेशी भांडवलाला येथे मुक्तपणे प्रवेश देण्यात यावा, सरकारी नियंत्रणे कमी करण्यात यावी, शासकीय उद्योगधंद्यांचे खाजगीकरण करण्यात यावे, उत्पन्नावरील व संपत्तीवरील कर कमी असावेत आणि अर्थसाहाय्ये बंद करण्यात यावी अशा नाणे निधीने आपल्यावर अटी लादल्या. हे धोरण नेहरूंच्या कालापासून उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचे जे धोरण शासनाने अवलंबिले होते त्याच्या अगदी विरोधी होते. या धोरणामधून विदेशी भांडवलाचे आपल्या अर्थव्यवस्थेवरील वर्चस्व वाढत गेले. डंकेल कराराचाही तोच परिणाम होत आहे.

## डंकेल कराराचे परिणाम

डंकेल कराराचे विश्लेषण केले तर त्यातील विसंगती सहज लक्षात येतात. जेथे बड्या राष्ट्रांनी स्वीकारण्याच्या बंधनांचा प्रश्न आहे तेथे त्यांच्या बाबतचे नियम अस्पष्ट आहेत. उलट, अविकसित राष्ट्रांबद्दलचे नियम अधिक स्पष्ट आणि त्यांच्यावर भार टाकणारे आहेत. बौद्धिक संपदेचा हक्कच घ्या. हा हक्क मान्य करण्याचा मूळ हेतू जो मनुष्य काही शोध लावतो त्याबद्दल त्याला बक्षिस मिळावे हा होता. आता त्याऐवजी मोठ्या कंपन्यांना जी हाव असते ती संतुष्ट करण्याचा आणि त्यांच्या एकाधिकारामुळे त्याना जे उत्पन्न मिळते त्याला संरक्षण देण्यासाठी तो वापरला जात आहे. बौद्धिक संपदेच्या हक्कामुळे बी-बियाणे व

जंतु यांच्यावर पेटंट मिळविणे सोपे झाले आहे. हा ठराव मंजूर झाल्यावर स्वत:च्या शेतात पिकलेले धान्यही शेतकऱ्याने पुन्हा बी म्हणून वापरू नये आणि बाहेर विकू नये असे विदेशी कंपन्यांचे म्हणणे होते. ते भारताने मान्य केले नाही. शेतकऱ्याने स्वत:च्या शेतात ते बी म्हणून वापरावे आणि जरूर असल्यास फक्त आपल्या गावातच बी म्हणून विकावे असा निर्णय झाला. बासमती तांदूळ, हळद यांच्यावर पेटंट घेण्याचा विदेशी कंपन्यांनी जेव्हा प्रयत्न केला तेव्हा हा नवा शोध नाही हे सिद्ध करण्यासाठी आपणास जागतिक व्यापार संघटनेच्या न्यायालयाकडे धाव घ्यावी लागली. हे प्रत्येक वस्तूच्या बाबतीत करणे फार खर्चाचे असल्याने आपण त्यात नेहमीच यशस्वी होऊ असे नाही.

पेटंटच्या या हक्काचा पर्यावरणावरही परिणाम झाल्याखेरीज राहणार नाही. विदेशी कंपन्या शेकडो एकर जमीन खरेदी करून त्यावर एकच पीक घेतील. त्यामधून शेकडो वर्षांच्या इतिहासातून निर्माण झालेली उष्ण कटिबंधातील देशांमधील वनस्पतींची व जीवजंतूंची विविधता नष्ट होईल आणि पर्यावरणालाही धोका पोहोचेल.

उदारीकरणामुळे बॅंकिंग, विमा, व्यापार, प्रसारमाध्यमे व सेवा क्षेत्रांत काम करणाऱ्या उत्तरेकडील देशांतील बहुराष्ट्रीय कंपन्या या क्षेत्रांमध्ये घुसतील. त्यांच्याकडील भांडवलामुळे या क्षेत्रांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास त्यांना वेळ लागणार नाही.

## संधीची असमानता

जागतिक व्यापार संघटनेचे नियम सर्व राष्ट्रांचे हित डोळ्यासमोर ठेऊन करण्यात आलेले नाहीत. बड्या राष्ट्रांच्या दृष्टीने त्यांच्या वस्तूंना बाजार आणि भांडवल गुंतवणुकीच्या संधी याना अधिक महत्त्व आहे. त्यामुळे याबाबतीतील निर्बंध अविकसित राष्ट्रांनी दूर करावेत असा त्यांचा आग्रह आहे. मात्र तंत्रविज्ञानाच्या बाबतीत त्यांना जो एकाधिकार आहे तो घालविण्याची त्यांची तयारी नाही आणि श्रमिकांची संख्या जेथे जास्त आहे तेथून दुसरीकडे जाण्याची त्यांना परवानगी मिळावी यालाही त्यांची मान्यता नाही. GATT च्या सभासदांपैकी फक्त वीस टक्के देश औद्योगिकदृष्ट्या विकसित आहेत. त्यांना या करारानुसार वाढीव उत्पन्नाच्या 70 टक्के उत्पन्न मिळेल आणि त्यामुळे अविकसित राष्ट्रांचे नुकसान होईल असा काही अर्थशास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

डंकेल करारामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना जगातील बहुतेक देशांत व्यापार व गुंतवणूक करण्याचे अधिक स्वातंत्र्य मिळालेले आहे, मात्र त्यांच्या कार्यावर निर्बंध घालण्याचे शासनाचे अधिकार कमी झाले आहेत. व्यापारावरील निर्बंध दूर झाल्यामुळे शेतीच्या क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्या आता येथे येऊ लागल्या आहेत. त्या जेथे जातात तेथे मोठ्या प्रमाणात जमिनीची खरेदी करतात. मात्र तेथील जनतेच्या हितासाठी आवश्यक असलेले अन्नधान्याचे उत्पादन त्या करीत नाहीत तर जगातील श्रीमंत राष्ट्रांतील लोकांना हवे असणारे चैनीचे खाद्यपदार्थ त्या तयार करतात. येथील जमिनी त्यांच्या ताब्यात गेल्या तर येथे अन्नधान्याच्या किमतीत वाढ होईल आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्याही वाढेल. अमेरिका आपल्या देशातील शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करीत असल्याने धान्याची निर्यात करणारा तोच मोठा देश आहे.

अविकसित राष्ट्रांना या कराराने मिळणाऱ्या संधी अप्रत्यक्ष आहेत आणि त्या उपलब्ध होण्यासाठीही बराच काल जावा लागणार आहे. त्यांच्याकडून निर्यात होणारे पदार्थ मर्यादित असल्याने जागतिक व्यापारात आपले स्थान प्रस्थापित करणे त्यांना कठीण होईल. तसेच कराराची नीट अमलबजावणी होते यावर नजर ठेवण्यासाठी शासन यंत्रणेवरही त्यांना अधिक खर्च करावा लागेल.

## सिंगापूर परिषद

युरुग्वेनंतर तीन वर्षांनी 1995 सालच्या डिसेंबर महिन्यात जागतिक व्यापार संघटनेमार्फत निरनिराळ्या

देशांच्या व्यापार मंत्र्यांची दुसरी परिषद झाली. तिचा उद्देश युरुग्वे येथील चर्चेतून झालेल्या कराराचे परिणाम काय होत आहेत ते पाहणे हा होता. परंतु तसे करण्याऐवजी विकसित राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी नव्या कराराच्या दृष्टीने गुंतवणूक, कामगारांचे हित, स्पर्धेबाबतचे धोरण आणि शासकीय खरेदीतील उघडपणा हे प्रश्न व्यापाराशी जोडून ते चर्चेत पुढे आणण्याचा प्रयत्न केला. अविकसित राष्ट्रांचा हे नवे प्रश्न जागतिक व्यापार संघटनेच्या कक्षेत आणण्यास विरोध होता.

## पारदर्शकतेचा अभाव

ज्या पद्धतीने या परिषदांचे काम चालते ती पारदर्शक नाही याबद्दल अनेक मंत्र्यांनी आपली नापसंती तेथे व्यक्त केली. परिषदेच्या खुल्या अधिवेशनात भाग घेण्याची सर्वांना मुभा होती. पण अविकसित राष्ट्रांतील मंत्र्यांच्या भाषणावर तेथे फारशी चर्चा झाली नाही. प्रत्यक्षात ज्या लहान समित्यांमधून या चर्चा चालत त्यामधून त्याना बाहेर ठेवले जाई. चर्चा संपुष्टात येऊन कराराचा मसुदा तयार झाल्यावर त्याला विरोध करणे चर्चेला हजर नसलेल्या राष्ट्रांना अवघड होते. विकसित राष्ट्रांच्या दडपणाखाली त्याना त्यावर सही करावी लागे. त्यांची ही नाराजी प्रथम मंत्री, नंतर इतर सभासद, त्यानंतर तिथे आलेल्या बिगरशासकीय संस्थांचे प्रतिनिधी व प्रसारमाध्यमे यांमार्फत सर्वांपर्यंत जाऊन पोहोचली.

या परिषदेतून जे निष्पन्न झाले ते सर्व देशांना सारखे हितकारक नव्हते. गरीब राष्ट्रे येथे परिघावरच राहिली. अमेरिकेच्या प्रयत्नाने जो करार झाला त्यामधून नव्या माहिती तंत्रविज्ञानातून उत्पादन झालेल्या वस्तूंच्या व्यापाराला उत्तेजन मिळाले. मात्र कापड, तयार कपडे अशा प्रकारचे जे पदार्थ विकसनशील देश पूर्वीपासून निर्यात करीत होते त्याबद्दलच्या त्यांच्या तक्रारी बाजूस सारण्यात आल्या. उरुग्वे करारातील अटींचे पालन करताना विकसनशील राष्ट्रांना ज्या अडचणी येत होत्या त्यावर चर्चा केली गेली नाही. उलट, व्यापाराशी संबंध नसलेले नवे प्रश्न या संघटनेच्या कक्षेत आणण्याचा बड्या राष्ट्रांनी प्रयत्न केला. अविकसित राष्ट्रांच्या प्रतिनिधींचा त्याला विरोध असल्यामुळे त्यावर निर्णय होऊ शकला नाही.

## जागतिकीकरणविरोधी परिषद

सिंगापूरची ही परिषद झाल्यानंतर काही महिन्यांनी 1998 सालच्या नोव्हेंबर महिन्यात फिलिपाईन्स देशातील बिगर-शासकीय संस्थांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरली. विविध खंडांतील 31 अविकसित देशांच्या प्रतिनिधींनी तिच्यामध्ये भाग घेतला होता. सोव्हिएत युनियनच्या विघटनामुळे जगातील साम्राज्यवादी राष्ट्रांची ताकद वाढली होती आणि स्वतःला फायदेशीर असणारी जागतिकीरणाची धोरणे आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत अविकसित राष्ट्रांवर लादण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता. त्याचे परिणाम जाणवू लागल्यावर अनेक गरीब राष्ट्रांतील समाजवादी शक्ती हळूहळू जागृत होऊ लागल्या आणि त्यानी ही परिषद घेतली. जागतिक स्तरावर संघटित होऊन जागतिकीरणाच्या या नवउदारमतवादी अन्यायी धोरणांना विरोध करणे हाच या परिषदेचा उद्देश होता. त्यादृष्टीने स्थानिक व राष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणून लोकांचे प्रबोधन केले पाहिजे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याना संघटितरित्या विरोध केला पाहिजे असे निर्णय या परिषदेत घेण्यात आले.

## सिॲटलची परिषद

यानंतरची जागतिक व्यापार संघटनेची तिसरी परिषद 1999 साली 31 नोव्हेंबर ते 3 डिसेंबर या काळात अमेरिकेमधील सिॲटल या शहरात घेण्यात आली. तिला विरोध करण्यासाठी अविकसित देशांतील बिगर शासकीय संघटनांचे हजारो प्रतिनिधी तेथे एकत्र आले आणि परिषदेच्या वास्तूबाहेर त्यानी ऊग्र निदर्शने केली. अखेर ही निदर्शने थांबविण्यासाठी अमेरिकेच्या पोलीस दलाला हस्तक्षेप करावा लागला.

सिॲटलची ही सभा अत्यंत महत्त्वाची होती. कारण जागतिक व्यापार संघटनेचे सभासद असलेल्या 135 देशांचे व्यापार मंत्री पुढील 25 ते 50 वर्षांतील व्यापारविषयक धोरणांची चर्चा करण्यासाठी येथे एकत्र आलेले होते. ही सभा सुरू होण्यापूर्वी भारत व इतर विकसनशील राष्ट्रांनी आपला एक समविचारी गट तयार केला आणि त्याने चालू प्रश्नांवर चर्चा केली, परस्परांना माहिती दिली आणि त्यांच्यामध्ये काही राजकीय मतभेद असूनही इतर अविकसित देशांशी बोलणी चालू ठेवली. मागच्यावेळी आपण हरलो आणि पुढील कालातही आपणास अनेक संकटांना तोंड द्यावे लागणार आहे याची जाणीव त्याना एकत्र आणण्यास कारणीभूत ठरली. सिॲटलच्या चर्चेची तयारी म्हणून जागतिक व्यापारी संघटनेकडे जे 250 निबंध सादर करण्यात आले त्यातील निम्मे निबंध या देशांकडून सादर करण्यात आलेले होते. जे करार आधी संमत झालेले आहेत त्यांच्यावरही पुन्हा चर्चा करण्यात यावी यावर त्यांचा भर होता. मात्र तसे करण्यास अमेरिकेने नकार दिला ; कारण, जागतिक व्यापार संघटनेतील अमेरिकेच्या प्रतिनिधी रिटा व्हेयस यांच्या मते '' जे समतोल असे करार आधीच अस्तित्वात आहेत त्यावरील चर्चा परत सुरू करण्याने फारसे काही साधणार नाही.''

सिंगापूर आणि सिॲटल येथील परिषदांमध्ये विकसित राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी नव्या कराराच्या दृष्टीने जे नवे प्रश्न पुढे आणले त्यामध्ये गुंतवणूक, कामगारांचे हित, शेती आणि शासकीय खरेदी यांचा समावेश होता.

## गुंतवणूक

गुंतवणुकीबाबतचा जो ठराव ते करू पाहात आहेत त्यामध्ये प्रत्येक देशाच्या शासनाने स्थानिक व विदेशी कंपन्या याना समान वागणूक द्यावी असे कलम आहे. या ठरावामुळे विदेशी कंपन्या, विदेशी नागरिक यांचा प्रवेश, स्वरूप, वर्तणूक आणि व्यवहार यांच्यावर बंधने घालण्याचे शासन व नागरिक यांचे न्याय्य हक्क व सत्ता नाहीशी होईल.

या विदेशी कंपन्यांपासून स्थानिक उद्योगांना संरक्षण आवश्यक असण्याची कारणे अनेक आहेत.

(1) अनेक वर्षे वसाहती म्हणून राहिल्याने या देशांतील शेतकरी व कंपन्या यांच्याकडे मोठ्या विदेशी कंपन्यांशी स्पर्धा करण्याइतकी ताकद अद्याप आलेली नाही. (2) आपल्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि आर्थिक कृती यांच्यावर आपली सत्ता शाबूत ठेवण्यासाठी विकसनशील राष्ट्रांना परकीयांच्या मालकीवर निर्बंध घालण्याचा हक्क असणे आवश्यक आहे. (3) आयातनिर्यात व्यापारात समतोल राहावा आणि नवे प्रश्न निर्माण होऊ नयेत यासाठीही त्याची आवश्यकता आहे. (4) देशातील उद्योगधंद्यांची वाढही अनेकदा शासकीय मदतीशिवाय होऊ शकत नाही. (5) हा करार झाला तर वित्त आणि विकास यांच्या व्यवस्थापनासाठी लागणारी महत्त्वाची साधने शासनाच्या हातून काढून घेतली जातील आणि जे करारानुसार वागणार नाहीत त्यांच्यावर जागतिक व्यापार संघटना आपले निर्बंध लादील.

## कामगार प्रश्न

कामगारविषयक व पर्यावरणासंबंधीचे कायदे सर्व देशांना समान असावेत असे अमेरिकेतील कामगार संघटनांचे मत होते. म्हणून परिषद भवनाच्या समोर अविकसित देशांतील बिगर-राजकीय संघटनांप्रमाणे त्यानीही निदर्शने केली. परिषद सुरू होण्यापूर्वी अमेरिकेतील येत्या अध्यक्षीय निवडणुकीवर डोळा ठेऊन अमेरिकेचे अध्यक्ष क्लिंटन यानी वृत्तपत्रांशी जो वार्तालाप केला तो अविकसित देशांतील संघटनांना संकटाची कल्पना देण्यास उपयुक्त ठरला. या वार्तालापात त्यानी सांगितले की, जे देश याबाबतीत जागतिक व्यापार संघटनेच्या अटी पाळणार नाहीत त्यांच्यावर निर्बंध लादले जातील. अविकसित देश या वार्तालापामुळे अधिक जागृत झाले. कामगार हा जागतिक व्यापार संघटनेच्या कक्षेत येत नाही, याबाबत बहुतेक अविकसित राष्ट्रांत एकमत होते. कामगार हित

अखेर आर्थिक विकासावर अवलंबून असते, म्हणून विकसित राष्ट्रांनी आपल्या मालाला संरक्षण देण्यासाठी कामगार हिताचा मुद्दा पुढे करू नये असेच त्यांना वाटत होते.

## शेती

या अगोदर झालेल्या सभांमध्ये अमेरिका व युरोपीय युनियन ही राष्ट्रे आपापसात समझोता करून आपली भूमिका ठरवीत आणि विकसनशील राष्ट्रांना वचने व धमक्या देऊन ती मान्य करण्यास भाग पाडीत. शेती प्रश्नाच्या बाबतीत मात्र अमेरिका व युरोपीय युनियन यांचे एकमत होऊ शकले नाही हे सिॲटल येथील परिषदेच्या अपयशाचे एक महत्त्वाचे कारण आहे. शेतीमालाच्या बाबतीत प्रशुल्क कमी करून आणि शेतकऱ्यांना विक्रीच्या बाबतीत देण्यात येणारी अर्थसाहाय्ये बंद करून या व्यापाराचे उदारीकरण करण्यात यावे यासाठी अमेरिकेचा प्रयत्न चालू होता. युरोपीय युनियनचा मात्र त्याला विरोध होता. त्यांचे म्हणणे असे होते की, अमेरिका शेतकऱ्याला मदत करण्यासाठी जो शासकीय खर्च करते तो युरोपीय देशांइतकाच असला तरी तो अर्थसाहाय्य मानला जात नाही, कारण तो विक्रीच्या किमतीशी जोडलेला नसून शेतकऱ्यांचा उत्पादन परिव्यय कमी करण्यासाठी स्वस्त दराने पाणी व कर्जे देण्यासाठी केला जातो. त्यामुळे शेतीच्या अर्थसाहाय्यावर निर्बंध घालणारा करार इतर देशांतील शेतकऱ्यांना घातक ठरेल, मात्र अमेरिकेतील शेतकऱ्यांवर त्याचा परिणाम होणार नाही.

## शासकीय खरेदी

1996 साली अमेरिकेतील शासनाने जागतिक व्यापार संघटनेला जो निबंध सादर केला त्यात ते म्हणते,''निरनिराळ्या देशांतील शासकीय खरेदी लाखो कोटी डॉलरची असते. यामध्ये पोलीस, अग्निशमन आणि स्थानिक प्रकल्प यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची खरेदी, स्वास्थ व सामाजिक सुरक्षितता यासाठी राज्य शासने करीत असलेली खरेदी, इलेक्ट्रिक पॉवर ग्रिडस्, टेलिकम्युनिकेशन्स आणि वाहतुकीची साधने यासाठी मध्यवर्ती शासनाची खरेदी यांचा उल्लेख आहे. अमेरिकेच्या मते, जरी जागतिक बाजारात वस्तू आणि सेवा यांची खरेदी शासन सर्वात जास्त प्रमाणात करीत असले तरी या कृती जागतिक व्यापार संघटनेच्या पायाभूत नियमाप्रमाणे होत नाहीत. म्हणून तसे घडावे यासाठी जागतिक व्यापार संघटनेने प्रयत्न केला पाहिजे.''

अमेरिकेच्या म्हणण्याप्रमाणे याबाबतीत नियम करण्यात ही संघटना यशस्वी झाली तर पुढील कालात शासन वस्तू आणि सेवा यांची खरेदी करताना किंवा विकासाचे प्रकल्प बांधताना स्थानिक कंपन्यांना अग्रक्रम देऊ शकणार नाही.

## सिॲटल येथील अपयश

सिॲटलच्या सभेत हे नवे प्रश्न समोर आणण्यास अनेक अविकसित देशांनी विरोध केला. कामगार प्रश्न हा या व्यापार संघटनेच्या कक्षेत येत नाही, तो आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेकडे (ILO) सोपवावा. गुंतवणुकीच्या प्रश्नाच्या सर्व बाजू तपासणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेची व्यापार व विकास याबद्दलची संघटना (UNCTAD) ही या प्रश्नांचा विचार करू शकेल असे त्यांचे मत होते. आफ्रिकेतील प्रमुख राष्ट्रे केनिया आणि इजिप्त यांचा विरोध पडद्यामागील वाटाघाटींना होता. बहुसंख्य अविकसित देशांना एकत्र येऊन चर्चा करण्याची संधी न देता फक्त काही महत्त्वाच्या देशांनाच चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि आपले मुद्दे मांडण्यासाठी पाचारण करण्यात येत होते. बाकी सर्व राष्ट्रांना त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वाची अशी चर्चा चालली असताना वगळण्यात येत होते. ही संघटना लोकशाही मार्गांनी चालत नाही. तिच्यातील करार उघडपणे सर्वांबरोबर चर्चा करून करण्याऐवजी गुप्तपणे केले जातात. या कारणास्तव जागतिक व्यापार संघटनेचे कार्यालय आणि त्याच्या मुख्य बार्शेफस्की यांनी जे निवेदन तयार केले आहे त्याला आम्ही मान्यता देऊ शकत नाही, असे या

राष्ट्रांनी जाहीर केले. ही अगदी अखेरची थप्पड होती. त्यामुळे आपण तयार केलेले निवेदर अविकसित राष्ट्रे मान्य करणार नाहीत याची बार्शेफस्कींना जाणीव झाली आणि तसे झाल्यास या घटनेबाबत प्रसारमाध्यमे जो आरडाओरडा करतील त्यापेक्षा ही सभा बारगळली तरी चालेल असे त्यानी ठरविले. त्यामुळे कोणताही निर्णय न होता ही सभा समाप्त झाली.

जागतिक व्यापार संघटनेवर अमेरिका व युरोपीय युनियन यांचे वर्चस्व आहे हे खरे. पण नाणे निधी व जागतिक बँक यांच्याशी तुलना केली तर या संघटनांच्या ठरावांना विरोध करण्यासाठी आपला नकाराधिकार (veto) वापरण्याचा अमेरिकेला जसा अधिकार आहे तसा या व्यापार संघटनेच्या घटनेने तिला मिळालेला नाही. या संघटनेचे निर्णय एकमताने घेतले जावेत अशी अपेक्षा आहे. एकमताच्या या आवश्यकतेमुळे अनेक वेळा अमेरिकेने येथील निर्णय प्रक्रियेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यात यश मिळविलेले आहे हे खरे. परंतु सर्व निर्णय एकमताने घेतले गेले पाहिजेत असा नियम असल्यामुळे सभासद राष्ट्रांच्या एखाद्या गटाला अमेरिकेचा निर्णय मान्य नसेल तर अमेरिकेला आपले म्हणणे त्यांच्यावर लादता येणार नाही हेही स्पष्ट आहे. प्रत्यक्षात तेच घडले.

सिॲटल परिषद संपल्यानंतर पंधरा दिवसांनी 17 डिसेंबरला युरोपीय युनियनचे अध्यक्ष रोमॅनो प्रोडी आणि अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांची भेट झाली आणि सिॲटल येथे निष्फळ झालेल्या परिषदेत न सुटलेले काही प्रश्न सर्व देशांच्या व्यापार मंत्र्यांची नवी परिषद न घेता सोडविता येतील असे त्यानी ठरविले. शिवाय नव्या वाटाघाटीसाठी विकसनशील देशांना एकत्र आणण्याच्या दृष्टीनेही त्यानी काही पाऊले टाकली. सिॲटलच्या परिषदेत श्रीमंत देशांनी आपला आयात वाटा (quota) व प्रशुल्क हे निर्बंध कमी करून आपली निर्यात वाढविण्यास मदत करावी अशी विकसनशील देशांची मागणी होती. ती काही देशांच्या बाबतीत मान्य करावी असे त्यानी ठरविले. त्याचबरोबर मागे झालेल्या वाटाघाटीतून जे करार झाले त्यांचे पालन करण्यात ज्याना अडचण येत असेल त्याना मदत करण्याचेही त्यानी मान्य केले.

भविष्यात विकसनशील राष्ट्रे आपले ऐक्य टिकवून धरतील का या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. कारण, या राष्ट्रांचा आपल्याला होत असलेला विरोध दिसून आल्यावर विकसित राष्ट्रे अधिक धीट बनतील आणि आपले म्हणणे मान्य करण्यास त्याना भाग पाडतील अशी शक्यता आहे. 17 डिसेंबरच्या सभेचा वृतान्त वाचला तर हेच स्पष्ट होते. म्हणून त्यांच्या कारवायांना हाणून पाडावयाचे असेल तर अविकसित राष्ट्रांनी आपले ऐक्य टिकवून धरण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि जगात काय चालले आहे याची आपल्या देशातील लोकांना जाणीव करून दिली पाहिजे.

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही वर्षांत जवाहरलाल नेहरूसारखे जे पुढारी भारताचे पंतप्रधान झाले त्याना आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे सखोल ज्ञान होते आणि भारतातील आर्थिक समस्यांचीही जाण होती. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात काही प्रमाणात तरी अविकसित देशांचे नेतृत्व ते करू शकले. आज भारतात निरनिराळ्या पक्षांचे जे पुढारी आहेत त्याना आर्थिक समस्यांची पुरेशी जाणीव नाही आणि जागतिकीकरणामधून निर्माण झालेल्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिकाही ते घेताना दिसत नाही. सिॲटलच्या परिषदेला भारताचे जे शिष्टमंडळ गेले होते त्यामध्ये शासकीय प्रतिनिधींबरोबर फक्त बड्या भांडवलदारांच्या प्रतिनिधींचाच समावेश होता. लहान उद्योगांचे आणि बिगर-राजकीय संघटनांचे जे प्रतिनिधी तेथे हजर होते त्यांच्याशी त्यानी विचारविनिमय केला नाही अशी त्यांच्याबद्दल तक्रार आहे. म्हणून जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांमधून निर्माण होणारा धोका ज्याना समजतो असे विचारवंत आणि पुढारी यांच्यावरच ही जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडण्यात ते अपयशी ठरले तर आपल्या राष्ट्राचे पुन्हा एका वसाहतीत रूपांतर होण्यास वेळ लागणार नाही.

एकविसाव्या शतकातील भांडवलशाहीला तेच हवे आहे.

### संदर्भ सूची


1 Kurien,C.T. 'Global capitalism and the Indian Economy-Tracts for the Time,6.

2 Khor, Martin,' The W. T. O and the South : Implications and Recent Development' in *Globalisation and Alternative II*, Vikas Adhyayan Kendra.

4 'Seattle Confereace -Negative Impressions Make Postive Developments', *Economic & Political Weekly*, Jan. 6-14, 2000.

5 'Seattle and Beyond: Disarming New World Order,' *Economic and Political Weekly*, 15-21 Jan., 2000.



## मराठी अर्थशास्त्र परिषद

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक, 1999

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रुपये एक हजार एकचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक' प्रतिवर्षी देण्यात येते. 1 जानेवारी ते 31 डिसेंबर, 1999 या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथांच्या लेखकांना यंदाच्या स्पर्धेत सहभागी होता येईल. स्पर्धेचे नियम व अटी, इत्यादीसाठी डॉ. आ.गो. पुजारी, कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, किल्ला भाग, मंगळवेढा, जिल्हा - सोलापूर 413305 यांच्याशी संपर्क साधावा. विहित नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या 4 प्रतींसह, कार्यवाहाना 31 ऑगस्ट, 2000 पर्यंत मिळावेत.

**आ. गो. पुजारी**

**कार्यवाह – खजिनदार**

# टिपणे

अंजली कुलकर्णी / विनायक देशपांडे *
शीतल प्रदीप महाडिक **
पुष्पा तायडे ***

*प्रपाठक व अधिव्याख्याता, अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.*

*** कला, वाणिज्य महाविद्यालय, हडपसर (पुणे).*

** * * अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोक महाविद्यालय, वर्धा.*

1

## महाराष्ट्रातील आधारभूत संरचना : जिल्ह्यांचे चित्र

***(अंजली कुलकर्णी/विनायक कुलकर्णी)***

आधारभूत संरचनेच्या सोयीत दोन कालावधीतील बदल जाणून घेण्याकरिता नऊ चलांबाबत माहिती उपलब्ध झाली. 1975-76 ते 1993-94 या कालावधीत राज्य स्तरावर झालेले बदल लक्षात घेऊन आधारभूत संरचनेच्या सोयींची स्थिती तक्ता 1 मध्ये दर्शविण्यात आली आहे. राज्यात प्रतिलाख लोकसंख्येमागील टपाल कार्यालयांची संख्या सोडल्यास इतर सर्व सोयींमध्ये वाढ झाल्याचे दिसते. 1975-76 यावर्षी ही संख्या 19 होती तर 1993-94 साली ती 15.25 झाली. अर्थात वाढती लोकसंख्या याकरिता एक कारणीभूत घटक असू शकेल. प्रति 100 चौ.कि. मी. रस्त्यांची लांबी विचारात घेतल्यास राज्यस्तरावर लांबी 28.8 कि.मी. होती तर 1993-94 साली यात वाढ होऊन ती 67.33 किमी. झाली.

जिल्ह्यांची तसेच प्रादेशिक स्थिती याबाबत विशेष समाधानकारक नाही. प्रति 100 चौ.किमी. रस्त्यांची लांबी या मापदंडाच्या संदर्भात 1975-76 या वर्षासाठी अमरावती विभागातील तसेच मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे राज्य सरासरी पातळीच्या खाली असल्याचे निदर्शनास येते. हीच स्थिती 1993-94 या वर्षातही अमरावती विभागासाठी कायम होती तर मराठवाड्यात नांदेड वगळता इतर सर्व जिल्हे राज्य सरासरीच्या पातळीच्या खालीच होते. 1993-94 साली मुंबई तसेच

तक्ता 1
आधारभूत संरचनेच्या निर्देशकांतील बदल : महाराष्ट्र राज्य

| आधारभूत संरचना सोयी | | 1975-76 | 1993-94 | बदल (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| 1 | रस्त्यांची लांबी (प्रति 100 चौ. किमी.) | 28.8 | 67.33 | 133.78 |
| 2 | लोहमार्ग (प्रति 100 चौ. किमी.) | 1.70 | 1.77 | 4.11 |
| 3 | टपाल कार्यालये (प्रति लाख लोकसंख्येस) | 19 | 15.25 | -19.74 |
| 4 | दूरध्वनींची संख्या (प्रति लाख लोकसंख्येस) | 521 | 1851 | 255.28 |
| 5 | बँकांच्या शाखा (प्रति लाख लोकसंख्येस) | 5.8 | 7.18 | 23.79 |
| 6 | दरडोई बँकेच्या ठेवी (रु.) | 943 | 8,267 | 776.67 |
| 7 | शेती क्षेत्राला दरडोई बँकेचे कर्ज (रु.) | 47 | 204 | 334.04 |
| 8 | औद्योगिक क्षेत्रासाठी दरडोई कर्ज (रु.) | 375 | 1,784 | 375.73 |

नागपूर विभागातील प्रत्येकी तीन जिल्हे राज्य सरासरीपेक्षा रस्त्यांच्या बाबतीत खालच्या स्तरावर होते. तर नाशिक आणि पुणे विभागातील प्रत्येकी दोन जिल्हे राज्य सरासरीपेक्षा याच वर्षासाठी कमी स्तरावर होते. प्रति 100 चौ.किमी. लोहमार्गाबाबत काही अपवादात्मक जिल्हे वगळता सामान्यत: सर्वच प्रदेशांबाबत परिस्थिती समाधानकारक वाटते. मुंबईतील रायगड, नाशिकमधील धुळे, अहमदनगर, पुणे विभागातील सातारा, कोल्हापूर, मराठवाडा विभागातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, अमरावती विभागातील अमरावती, यवतमाळ, बुलढाणा हे जिल्हे राज्य सरासरीच्या खालच्या पातळीवर असल्याचे आढळते. या निर्देशकाच्या संदर्भात मात्र नागपूर विभागातील सर्व जिल्हे राज्य सरासरीच्या वरच्या पातळीवर होते. (गडचिरोली जिल्ह्याबाबतची माहिती या संदर्भात उपलब्ध नाही.)

प्रतिलाख लोकसंख्येमागील टपाल कार्यालयांची संख्या अमरावती तसेच नाशिक विभागांतील सर्वच जिल्ह्यांत राज्य सरासरीपेक्षा जास्त असल्याचे दिसते. इतर विभागांत मात्र काही जिल्ह्यांच्या बाबतीत कार्यालयांची संख्या राज्य सरासरीपेक्षा कमी होती. विभागनिहाय स्थिती लक्षात घेतल्यास नागपूर व मराठवाडा विभागांतील प्रत्येकी तीन जिल्हे राज्य सरासरीपेक्षा खाली असल्याचे दिसले. मुंबई आणि पुणे विभागांतील दोन जिल्ह्यांच्या स्थितीमध्ये 1975-76 आणि 1993-94 या दरम्यान बदल झालेला नाही. यात पुणे, मुंबई, ठाणे या जिल्ह्यांचा समावेश होतो.

प्रतिलाख लोकसंख्येमागे बँकांच्या शाखा नाशिक, औरंगाबाद आणि अमरावती या विभागांतील सर्वच जिल्ह्यांमध्ये राज्य सरासरीपेक्षा कमी होत्या. नागपूर विभागात चंद्रपूर सोडून इतर जिल्ह्यांची स्थिती राज्य सरासरीच्या तुलनेत असमाधानकारक आढळली. या

निर्देशकाच्या संदर्भात प्रत्येक विभागातील किमान एकदोन जिल्हे तरी सरासरीपेक्षा निम्न स्तरावर असल्याचे दिसते.

विकासाच्या संदर्भात प्रतिलाख लोकसंख्येमागील दूरध्वनींची संख्या एक महत्त्वपूर्ण घटक ठरू शकेल. परंतु याबाबतीत नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या विभागांतील सर्वच जिल्हे राज्य सरासरी पातळीच्या खाली असल्याचे दिसते. पुणे विभागातील चार तर मुंबई विभागातील तीन जिल्हे देखील राज्य सरासरीच्या खालच्या स्तरावर होते. मुंबई विभागात 1975-76 या साली एकच जिल्हा राज्य सरासरीच्या तुलनेत कमी होता. परंतु 1993-94 या वर्षात जिल्ह्यांची संख्या तीनवर गेली. पुणे जिल्ह्यातील पाचपैकी चार जिल्हे राज्य सरासरीपेक्षा कमी होते. राज्य स्तरावर या निर्देशकाच्या बाबतीत जाणीवपूर्वक प्रयत्न करून सुधारणा घडविण्यात यावी. येणाऱ्या कालात माहिती तंत्रविज्ञान विकसित करण्यात जागतिक पातळीवर विशेष भर देण्यात येत असल्याने या निर्देशकात सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे. दरडोई बँक बचतीच्या बाबबतीत पुणे विभाग वगळता इतर सर्वच विभाग राज्य सरासरीपेक्षा खालच्या स्तरावर असल्याचे दिसते. भांडवलनिर्मितीला चालना देण्याच्या दृष्टीने या घटकाची महत्त्वपूर्ण भूमिका असते. वाढत्या लोकसंख्येसोबतच बचतीच्या प्रमाणात देखील वाढ व्हावयास हवी. यादृष्टीने राज्य स्तरावर काही योजना अमलात आणाव्या लागतील.

शेती क्षेत्राला दरडोई बँकेचे कर्ज हा एक निर्देशक आधारभूत संरचनेचा विकास बघण्याच्या दृष्टीने घेण्यात आला. 1993-94 या वर्षात मुंबई विभागातील सर्व जिल्हे राज्य सरासरीपेक्षा खालच्या स्तरावर होते. पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांना मात्र राज्य सरासरीपेक्षा अधिक कर्जपुरवठा झाल्याचे आढळते. मराठवाड्यातील चार जिल्हे, नागपूर विभागातील तीन जिल्हे तसेच अमरावती विभागातील दोन जिल्हे राज्य सरासरीपेक्षा कमी स्तरावर होते. नाशिक विभागातील जळगांव वगळता इतर सर्व जिल्ह्यांना देण्यात आलेला कर्जपुरवठा राज्य सरासरीपेक्षा जास्त प्रमाणात होता. अमरावती आणि नागपूर विभागांची स्थिती 1975-76 च्या तुलनेत 1993-94 या वर्षात सुधारल्याचे दिसते. या विभागातील सर्वच जिल्हे 1975-76 साली राज्य सरासरीच्या तुलनेत खालच्या पातळीवर होते. 1993-94 या वर्षात मात्र काही जिल्ह्यांना करण्यात आलेल्या शेती कर्ज पुरवठ्यात वाढ झाली. पुणे विभागातदेखील अशा रीतीनेच सुधारणा झाल्याचे दिसते.

उद्योगांना दरडोई बँकेचे कर्ज या निर्देशकाच्या बाबतीत नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या चारही विभागांतील सर्व जिल्हे राज्य सरासरीपेक्षा खालच्या पातळीवर 1993-94 या वर्षात होते. या बाबतीत 1975-76 ची स्थिती कायम राहिल्याचे आढळते. पुणे विभागातील फक्त पुणे जिल्हा सोडल्यास इतर जिल्ह्यांची स्थिती या निर्देशकाच्या बाबतीत फारशी समाधानकारक नाही. उद्योगांना पुरविण्यात येणाऱ्या बँकेच्या कर्जातील राज्य सरासरी प्रामुख्याने निव्वळ पुणे आणि मुंबई या दोन जिल्ह्यांना देण्यात आलेल्या कर्जामुळे वाढल्याचे दिसते.

अभ्यासाकरिता निवडण्यात आलेल्या आठ निर्देशकांपैकी उद्योगांना पुरविण्यात येणाऱ्या दरडोई बँकेच्या कर्जाकडे अधिक लक्ष पुरविणे आवश्यक आहे. उद्योगांमध्ये वाढ झाल्यास इतर निर्देशकांमध्ये देखील सुधारणा घडून येऊ शकतील. उद्योगांतील उत्पादनप्रक्रियेत आधारभूत संरचनेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या सहभाग असतो. प्रादेशिक विकास आणि आधारभूत संरचना यातील परस्परसंबंध एकतर्फी नसतो. प्रादेशिक विकासासोबतच आधारभूत संरचनेचा विकासदेखील घडून येऊ शकेल.

मुंबई विभागाच्या संदर्भात दरडोई बँक बचती आणि शेती क्षेत्राला देण्यात येणारे दरडोई बँक कर्ज या निर्देशकांकडे विशेष लक्ष पुरविणे आवश्यक वाटते. सर्वच जिल्हे, राज्य सरासरीपेक्षा खालच्या पातळीवर या बाबतीत 1993-94 या वर्षात होते. तसेच विभागातील

बहुतांश जिल्ह्यांची स्थिती, दूरध्वनी, उद्योगांना पुरविण्यात येणारे कर्ज आणि रस्त्यांची लांबी या बाबतीत विशेष समाधानकारक नाही. नाशिक विभागात बँकांच्या शाखा, दूरध्वनी, बँक बचती आणि उद्योगांना देण्यात येणारे बँकेचे कर्ज या चार निर्देशकांच्या संदर्भात परिस्थिती विशेष समाधानकारक नाही.

पुणे विभागात दूरध्वनी आणि उद्योगांना पुरविण्यात येणारे कर्ज या दोहोंमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता वाटते. या विभागात पुणे जिल्हा सोडून इतर सर्वच जिल्हे याबाबतीत राज्य सरासरीपेक्षा कमी पातळीवर आहेत. तसेच या विभागातील सातारा, सोलापूर आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांत बँकेच्या शाखा आणि बँक बचती यात प्रगती घडवून आणणे आवश्यक आहे.

औरंगाबाद विभागाच्या संदर्भात बँकेच्या शाखा, दूरध्वनी, बँक बचती, रस्त्यांची लांबी आणि उद्योगांसाठी कर्ज याबाबतीत विशेष प्रयत्न करून आधारभूत संरचना विकसित करण्याची आवश्यकता वाटते. प्रति 100 चौ.किमी. लोहमार्ग आणि टपाल कार्यालये हे दोन निर्देशक सोडल्यास इतर सर्वच निर्देशकांच्या बाबतीत अमरावती विभागातील सर्वच जिल्ह्यांची परिस्थिती निराशाजनक वाटते.

### *आधारभूत संरचनेच्या विकासाचा स्तर*

महाराष्ट्रातील विविध विभागांसाठी तसेच जिल्ह्यांसाठी आधारभूत संरचनेच्या विकासाचा स्तर बघण्याच्या दृष्टीने जून, 1982 मध्ये राज्य योजना मंडळाचे भूतपूर्व सदस्य नरोत्तम शाह यानी महाराष्ट्रातील जिल्हयांसाठी आर्थिक विकासाचा स्तर दर्शविण्यासाठी सांख्यिकी माहिती संकलित केली. ही माहिती त्यानी 1975-76 या वर्षासाठी दिली होती. प्रस्तुत अभ्यासासाठी नरोत्तम शाह यानी उपयोगात आणलेल्या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यानी निवडलेल्या विविध निर्देशकांपैकी तुलनात्मक विवेचन करण्याच्या उद्देशाने 9 निर्देशके घेण्यात आली. 1993-94 या वर्षासाठी या निर्देशकांची जिल्हावार माहिती Centre for Monitoring Indian Econmy या संस्थेने प्रकाशित केली. यातील सांख्यिकी माहिती आणि नरोत्तम शाह यांच्या अभ्यासातील माहिती या दोहोंचे तुलनात्मक विवेचन करण्यात आले.

राज्यासाठी निवडलेल्या 9 निर्देशकांच्या संदर्भात राज्याच्या प्रत्येक विभागासाठी कमाल आणि किमान मूल्य तपासून बघण्यात आले आणि संपूर्ण राज्यासाठी तसेच विभागानुसार प्रमाण काढण्यात आले. हे प्रमाण 1975-76 तसेच 1993-94 या दोन वर्षासाठी मापन करण्यात येऊन आधारभूत संरचनेच्या सोयींमधील बदल तपासण्यात आले.

आधारभूत संरचनेच्या निर्देशकांचे कमाल व किमान मूल्य आणि त्यांचे प्रमाण मुंबई जिल्हा समाविष्ट करून तसेच वगळून तक्ता 2 आणि 3 मध्ये दर्शविले आहे. प्रति 100 चौ.किमी रस्त्याची लांबी या सोयीच्या बाबतीत 1975-76 तसेच 1993-94 या वर्षासाठी मुंबई जिल्ह्याचे मूल्य सर्वात कमी होते. या दोन कालखंडात मुंबईतील रस्त्यांच्या लांबीत 9.1 प्रति 100 चौ.किमी पासून 8.13 प्रति 100 चौ.किमी. पर्यंत घट झाली. कमाल मूल्य 1975-76 साली सातारा जिल्ह्याचे होते. (59.1) तर 1993-94 या वर्षासाठी कमाल मूल्य सांगली जिल्ह्याचे झाले (100.62). कमाल मूल्यात या कालावधीत वाढ झाली. दोन्ही कालखंडांत महत्तम मूल्य दर्शविणारे जिल्हे पुणे विभागातील होते. प्रत्येक निर्देशकातील असमानता तपासून बघण्यासाठी कमाल आणि किमान मूल्यांचे प्रमाण काढण्यात आले. 1975-76 या वर्षासाठी हे प्रमाण 6.49 होते तर 1993-94 या कालात यात वाढ होऊन हे प्रमाण 12.38 झाले. याचाच अर्थ निवडलेल्या कालखंडात राज्यातील रस्त्यांच्या लांबीतील असमानतेच्या प्रमाणात वाढ झाली.

मुंबई जिल्हा वगळल्यास 1975-76 साली निर्देशकांच्या संदर्भात किमान मूल्य चंद्रपूर

तक्ता 2

आधारभूत संरचनेच्या निर्देशकांचे कमाल–किमान मूल्य आणि त्यांचे प्रमाण

(महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात–मुंबई समाविष्ट करून)

| आधारभूत संरचनेच्या सोयी | 1975-76 | | | 1993-94 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | किमान मूल्य (जिल्हा) | कमाल मूल्य (जिल्हा) | प्रमाण | किमान मूल्य (जिल्हा) | कमाल मूल्य (जिल्हा) | प्रमाण |
| 1 प्रति 100 चौ.किमी. रस्त्यांची लांबी | 9.1 (मुंबई) | 59.1 (सातारा) | 6.49 | 8.13 (मुंबई) | 100.62 (सांगली) | 12.38 |
| 2 प्रति 100 चौ.किमी. मागे लोहमार्ग | 0.50 (कोल्हापूर,बीड) | 15.7 (मुंबई) | 31.4 | 0.40 (उस्मानाबाद) | 16.42 (मुंबई) | 41.05 |
| 3 टपाल कार्यालये (प्रतिलाख लोकसंख्येस) | 4.0 (मुंबई) | 38.0 (रत्नागिरी) | 9.5 | 2.76 (मुंबई) | 41.46 (सिंधुदुर्ग) | 15.02 |
| 4 दूरध्वनींची संख्या (प्रति लाख लोकसंख्येस) | 51.0 (बीड) | 2,534 (मुंबई) | 49.69 | 79 (गडचिरोली) | 9,647 (मुंबई) | 122.11 |
| 5 बँकांच्या शाखा (प्रति लाख लोकसंख्येस) | 2.4 (बीड) | 14.4 (मुंबई) | 6.0 | 5.2 (नाशिक) | 12 (मुंबई) | 2.31 |
| 6 बँक ठेवी (दरडोई रुपये) | 64 (बीड) | 5,961 (मुंबई) | 93.14 | 486 (गडचिरोली) | 52,985 (मुंबई) | 109.02 |
| 7 बँकेचे एकूण कर्ज (दरडोई रुपये) | 31 (परभणी) | 3,616.9 (मुंबई) | 116.67 | 325 (रायगड) | 32,791 (मुंबई) | 100.89 |
| 8 बँकेचे कर्ज (रु.) (दरडोई, शेतीक्षेत्र) | 6 (चंद्रपूर) | 114 (पुणे) | 19 | 89 (मुंबई) | 346 (धुळे) | 3.89 |
| 9 दरडोई बँकेचे कर्ज (उद्योग) | 2 (परभणी) | 2,082 (मुंबई) | 1,041 | 31 (उस्मानाबाद) | 10,578 (मुंबई) | 341.22 |

## तक्ता 3

### आधारभूत संरचनेच्या निर्देशकांचे कमाल-किमान मूल्य आणि त्यांचे प्रमाण
### (महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात-मुंबई वगळून)

| आधारभूत संरचनेच्या सोयी | 1975-76 | | | 1993-94 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | किमान मूल्य (जिल्हा) | कमाल मूल्य (जिल्हा) | प्रमाण | किमान मूल्य (जिल्हा) | कमाल मूल्य (जिल्हा) | प्रमाण |
| 1 रस्त्यांची लांबी<br>(प्रति 100 चौ.किमी.) | 11.9<br>(चंद्रपूर) | 59.1<br>(सातारा) | 4.97 | 26.01<br>(गडचिरोली) | 100.62<br>(सांगली) | 3.87 |
| 2 लोहमार्ग<br>(प्रति 100 चौ.किमी. मागे) | 0.50<br>(कोल्हापूर,बीड) | 3.6<br>(नागपूर) | 7.2 | 0.40<br>(उस्मानाबाद) | 6.1<br>(वर्धा) | 15.25 |
| 3 टपाल कार्यालये<br>(प्रतिलाख लोकसंख्येस) | 12.0<br>(ठाणे) | 38.0<br>(रत्नागिरी) | 3.17 | 7.30<br>(ठाणे) | 41.46<br>(सिंधुदुर्ग) | 5.68 |
| 4 दूरध्वनींची संख्या<br>(प्रति लाख लोकसंख्येस) | 51.0<br>(बीड) | 886<br>(पुणे) | 17.37 | 79<br>(गडचिरोली) | 1,953<br>(पुणे) | 24.72 |
| 5 बँकांच्या शाखा<br>(प्रति लाख लोकसंख्येस) | 2.4<br>(बीड) | 9.1<br>(पुणे) | 3.79 | 5.2<br>(नाशिक) | 9.13<br>(सिंधुदुर्ग) | 1.75 |
| 6 दरडोई बँकेच्या ठेवी<br>(दरडोई रुपये) | 64<br>(बीड) | 1,027<br>(पुणे) | 16.05 | 486<br>(गडचिरोली) | 5,386<br>(पुणे) | 11.08 |
| 7 बँकेचे एकूण कर्ज<br>(दरडोई रुपये) | 31<br>(परभणी) | 810<br>(पुणे) | 26.13 | 325<br>(रायगड) | 3,416<br>(पुणे) | 10.51 |
| 8 बँकेचे कर्ज (रु.)<br>(दरडोई, शेतीक्षेत्र) | 6<br>(चंद्रपूर) | 114<br>(पुणे) | 19.0 | 92<br>(रत्नागिरी) | 346<br>(धुळे) | 3.76 |
| 9 औद्योगिक कर्ज<br>(दरडोई रुपये) | 2<br>(परभणी) | 1,129<br>(ठाणे) | 564.5 | 31<br>(उस्मानाबाद) | 2,106<br>(पुणे) | 67.93 |

जिल्ह्यासाठी होते (11.9) तर 1993-94 साली हेच मूल्य गडचिरोली जिल्ह्यासाठी झाले (26.01) कमाल-किमान मूल्याचे प्रमाण मात्र 4.97 वरून 3.87 पर्यंत घसरले. यावरून असे लक्षात येत की, असमानतेच्या प्रमाणात वाढ होण्यास मुंबई जिल्ह्याचे योगदान अधिक आहे. दोन वर्षांसाठी किमान मूल्य नागपूर विभागातील जिल्ह्यांचे होते.

तुलनात्मक विवेचन अधिक स्पष्ट करण्याच्या दृष्टीने विचलनाचे गुणांक काढण्यात आले. या गुणांकांचे मूल्य दोन्ही कालावधीसाठी, निवडलेल्या निर्देशकांच्या बाबतीत तक्ता 4 मध्ये दर्शविले आहे. रस्त्यांची लांबी या संदर्भात विचलन गुणांकाचे मूल्य मुंबई जिल्हा वगळल्यास 0.66 वरून 0.59 पर्यंत (दोन कालखंडांत) कमी झाले. मुंबई समाविष्ट केल्यास या मूल्यात 0.73 वरून 0.85 पर्यंत वाढ झाली.

**1 लोहमार्ग**

या निर्देशकाच्या बाबतीत मुंबई जिल्हा समाविष्ट केल्यास, 1975-76 या वर्षासाठी किमान मूल्य (0.50) कोल्हापूर आणि बीड या दोन जिल्ह्यांसाठी

**तक्ता 4**
**विचलन गुणांक**

| आधारभूत संरचनेच्या सोयी | मुंबई समाविष्ट करून | | मुंबई वगळुन | |
|---|---|---|---|---|
| | 1975-76 | 1993-94 | 1975-76 | 1993-94 |
| 1 रस्त्यांची लांबी (प्रति 100 चौ.किमी.) | 0.73 | 0.85 | 0.66 | 0.59 |
| 2 लोहमार्ग (प्रति 100 चौ.किमी. मागे) | 0.94 | 0.95 | 0.76 | 0.89 |
| 3 टपाल कार्यालये (प्रतिलाख लोकसंख्येस) | 0.81 | 0.87 | 0.52 | 0.70 |
| 4 दूरध्वनींची संख्या (प्रति लाख लोकसंख्येस) | 0.96 | 0.97 | 0.89 | 0.85 |
| 5 बँकांच्या शाखा | 0.71 | 0.36 | 0.58 | 0.26 |
| 6 दरडोई बँकेच्या ठेवी (रु.) | 0.98 | 0.98 | 0.88 | 0.84 |
| 7 बँकेचे एकूण कर्ज (रु.) | 0.98 | 0.96 | 0.92 | 0.78 |
| 8 दरडोई कृषी कर्ज (रु.) | 0.90 | 0.59 | 0.90 | 0.58 |
| 9 औद्योगिक कर्ज | 0.99 | 0.99 | 0.99 | 0.96 |

होते तर कमाल मूल्य मुंबई जिल्ह्याचे होते. 1993-94 या कालात किमान मूल्य उस्मानाबाद जिल्ह्याचे झाले (0.40) तर कमाल मूल्य मुंबई जिल्ह्याचेच कायम होते. परंतु या दोन कालावधीत कमाल मूल्यात 15.7 वरून 16.42 पर्यंत वाढ झाली. कमाल - किमान मूल्याच्या प्रमाणात 31.4 वरून 41.05 पर्यंत वाढ झाल्याचे दिसते. रेल्वे मार्गांच्या संदर्भात राज्यातील असमानता वाढल्याचे यावरून लक्षात येते.

मुंबई वगळून लोहमार्ग या निर्देशकाचे कमाल मूल्य नागपूर जिल्ह्याचे 3.6 येते. मात्र प्रति 100 चौ.किमी. मागे रेल्वे मार्गांची लांबी मुंबई जिल्ह्यासाठी नागपूर जिल्ह्याच्या तुलनेत जवळपास 4.36 पटीने अधिक होती. 1993-94 या वर्षासाठी कमाल मूल्य नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्याचे झाले (6.1). कमाल-किमान मूल्याचे प्रमाण 1975-76 साली 7.2 होते. यात वाढ होऊन हे 15.25 झाले. मुंबई वगळूनदेखील लोहमार्गांच्या बाबतीत असमानता वाढल्याचे दिसते. विचलन गुणांकात (मुंबई समाविष्ट करून) 1975-76 ते 1993-94 या वर्षांत 0.94 हून 0.95 पर्यंत वाढ झाली तर मुंबई वगळता याच दरम्यान विचलन गुणांकातील वाढ लक्षणीय होती. यात 0.76 वरून 0.89 पर्यंत वाढ झाली.

## 2 टपाल कार्यालये

आधारभूत संरचनेच्या सोयींमधील बदल तपासून बघण्याच्या दृष्टीने टपाल कार्यालये हा एक निर्देशक विचारात घेण्यात आला. विकासाच्या प्रक्रियेत संदेशवहनाच्या सोयीला महत्त्वपूर्ण स्थान आहे. 1975-76 तसेच 1993-94 या दोन्ही वर्षांसाठी किमान मूल्य प्रगत अशा मुंबई जिल्ह्यासाठी होते. टपाल कार्यालयांची संख्या प्रतिलाख लोकसंख्येमागे दर्शविण्यात आली आहे. या निर्देशकाच्या बाबतीत 1975-76 ते 1993-94 च्या दरम्यान मुंबई जिल्ह्यातील कार्यालयांच्या संख्येत 4.0 वरून 2.76 पर्यंत घट झाल्याचे दिसते. कमाल मूल्य 1975-76 साली कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्याचे होते (38.0) तर 1993-94 साली सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी झाले (41.46). कमाल-किमान मूल्याच्या प्रमाणात संदर्भ वर्षांत लक्षणीय वाढ (9.5 वरून 15.02 पर्यंत) झाली.

मुंबई जिल्हा वगळून 1975-76 तसेच 1993-94 या वर्षांसाठी किमान मूल्य संपूर्ण महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्याचे होते. या जिल्ह्याच्या किमान मूल्यात संदर्भ कालात घट झाली. कमाल-किमान मूल्याचे प्रमाण 3.17 होते. कमाल मूल्य 1975-76 साली रत्नागिरी जिल्ह्याचे होते. 1993-94 साली कमाल-किमान मूल्याचे प्रमाण 5.68 झाले. संदर्भ कालात विचलन वाढीस लागल्याचे यावरून स्पष्ट होते. 1993-94 या वर्षासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रमाण कमाल झाले. मुंबई समविष्ट करून विचलन गुणांकाच्या मूल्यात 0.81 वरून 0.87 पर्यंत वाढ झाली तर मुंबई वगळता यात 0.52 वरून 0.70 पर्यंत वाढ झाली. असमानता वाढीचे हे एक द्योतक आहे.

## 3 दूरध्वनींची संख्या

मुंबई जिल्हा समाविष्ट करून दूरध्वनींच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याची स्थिती तपासली असता असे दिसते की, सर्वांत कमी दूरध्वनींची संख्या औरंगाबाद विभागातील बीड जिल्ह्यात 1975-76 या वर्षासाठी होती तर 1993-94 साली नागपूर विभागातील गडचिरोली जिल्हा याबाबतीत मागासलेला होता. या दोन्ही वर्षांसाठी जिल्ह्याचे मूल्य महत्तम होते. कमाल-किमान प्रमाणात संदर्भ कालात 49.69 वरून 122.11 पर्यंत वाढ झाल्याचे दिसते. मुंबई जिल्हा वगळता दोन्हीं वर्षांसाठी दूरध्वनींची महत्तम संख्या राज्यातील पुणे जिल्ह्यात होती. कमाल-किमान प्रमाणात संदर्भ वर्षांत 17.37 वरून 24.72 पर्यंत वाढ झाल्याचे आढळते. विचलन गुणांकात, मुंबई जिल्हा समाविष्ट केला असता, 1975-76 ते 1993-94 या कालावधीत 0.96 वरून 0.97 पर्यंत वाढ झाल्याचे दिसते. मात्र

मुंबई वगळता विचलन गुणांकाच्या मूल्यात 0.89 वरुन 0.85 पर्यंत घट झाल्याचे दिसते. दूरध्वनींच्या संख्येमधील जिल्ह्यांतील असमानता मुख्यत्वेकरून मुंबई जिल्ह्यामुळेच आहे.

## 4 बँकांच्या शाखा

प्रतिलाख लोकसंख्येमागे बँकांच्या शाखा सर्वात कमी औरंगाबाद विभागातील बीड जिल्ह्यात तसेच नाशिक विभागातील नाशिक जिल्ह्यात संदर्भ वर्षांसाठी अनुक्रमे 2.4 आणि 5.2 होत्या. तसेच दोन्ही वर्षांसाठी कमाल मूल्य मुंबई जिल्ह्याचेच होते. या निर्देशकाच्या बाबतीत किमान मूल्यात वाढ झाली तर कमाल मूल्यात घट झाल्याचे दिसते. कमाल-किमान मूल्याच्या प्रमाणात संदर्भ कालात लक्षणीय घट झाली. मुंबई जिल्हा वगळता महत्तम मूल्य 1975-76 ला पुणे जिल्ह्यासाठी होते (9.1) तर 1993-94 ला हे मूल्य कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचे झाले. (9.13). असमानता कमाल-किमान मूल्याच्या प्रमाणावरून पाहिली असता यात लक्षणीय घट झाल्याचे आढळते. 1975-76 साली हे प्रमाण 3.79 होते तर 1993-94 साली ते 1.75 पर्यंत घसरले. विचलन गुणांकाच्या संख्येत या निर्देशकाच्या बाबतीत मुंबई वगळून तसेच मुंबई जिल्हा धरून संदर्भ कालात लक्षणीय घट झाल्याचे निदर्शनास येते.

## 5 दरडोई बँकेच्या ठेवी

मुंबई जिल्हा समाविष्ट करून दरडोई बँकेच्या ठेवी कमीत कमी औरंगाबाद विभागातील बीड जिल्ह्यात तर नागपूर विभागातील गडचिरोली जिल्ह्यात 1975-76 आणि 1993-94 या कालासाठी अनुक्रमे रु. 64 आणि रु. 486 होत्या. सर्वात अधिक मूल्य संदर्भ वर्षांसाठी मुंबई जिल्ह्याचे होते ; मात्र त्यात रु. 5,961 वरून रु. 52,985 पर्यंत वाढ झाली. कमाल -किमान प्रमाणात 93.14 वरून 109.02 पर्यंत वाढ झाली. मुंबई जिल्हा वगळल्यास या निर्देशकाच्या बाबतीत देखील दोन्ही वर्षांसाठी कमाल मूल्य पुणे जिल्ह्याचे होते. 1975-76 साली हे मूल्य रु. 1,027 होते तर 1993-94 या वर्षी ते रु. 5,386 झाले. कमाल-किमान प्रमाणाच्या मूल्यात 16.5 वरून 11.08 पर्यंत घट झाल्याचे दिसते. या निर्देशकाच्या विचलन गुणांकात मुंबई जिल्हा समाविष्ट केल्यास बदल आढळत नाही. 1975-76 चे 0.98 हे मूल्य 1993-94 साली कायम राहिले. म्हणजेच असमानता या दरम्यान त्याच प्रमाणात राहिली. मात्र मुंबई जिल्हा वगळता या निर्देशकाच्या संदर्भात असमानता कमी झाल्याचे दिसते. 1975-76 च्या 0.88 वरून घट होऊन 1993-94 या वर्षात या निर्देशकाचे मूल्य 0.84 झाले.

## 6 बँकेचे दरडोई एकूण कर्ज

संदर्भ वर्षात बँकेचे दरडोई एकूण कर्जाचे मूल्य मुंबई जिल्ह्यासाठी सर्वाधिक होते. त्यात रु. 3,619.9 वरून रु. 32,791 पर्यंत वाढ झाली. ही वाढ खूपच जास्त झाल्याचे दिसते. किमान मूल्य 1975-76 साली औरंगाबाद विभागातील परभणी (31) जिल्ह्याचे होते तर 1993-94 साठी कोकण विभागातील रायगड जिल्ह्याचे होते (325). संदर्भ कालात कमाल-किमान प्रमाणात 116.67 वरून 100.89 पर्यंत घसरण झाल्याचे दिसते. मुंबई जिल्हा वगळून बँकेच्या दरडोई एकूण कर्जाची महत्तम रक्कम पुणे जिल्ह्यात होती. यात 1975-76 च्या रु. 810 वरून 1993-94 च्या रु. 3,416 पर्यंत घट झाली. मुंबई जिल्हा समाविष्ट करून विचलन गुणांक तपासल्यास त्यात 0.98 वरून 0.96 पर्यंत अल्प प्रमाणात घट झाल्याचे दिसते तर मुंबई वगळता संदर्भ वर्षात या गुणांकाच्या मूल्यात लक्षणीय घट झालेली दिसते (0.92 वरून 0.78 पर्यंत).

## 7 बँकेचे शेती क्षेत्रासाठी दरडोई कर्ज

1975-76 या वर्षात सर्वात कमी कर्ज वाटप नागपूर विभागातील चंद्रपूर जिल्ह्यात (रु. 6) झाले तर 1993-94 या वर्षासाठी मुंबई जिल्ह्यात कमीत कमी कर्ज वाटपाची रक्कम आढळून आली (रु. 89). सर्वात

अधिक वाटप 1975-76 या वर्षात पुणे जिल्ह्यात (रु. 114) तर 1993-94 या वर्षात धुळे जिल्ह्यात (रु. 346) झाले. कमाल-किमान प्रमाणाच्या मूल्यात 19 वरून 3.89 पर्यंत घट झाली. मुंबई जिल्हा वगळल्यास कमीत कमी कर्ज वाटपाची रक्कम रत्नागिरी जिल्ह्यासाठी आढळली (रु. 12). कमाल - किमान प्रमाणात 19.09 वरून 3.76 पर्यंत घट झाली. विचलन गुणांकाच्या मूल्यात मुंबई समाविष्ट करून तसेच मुंबई वगळून संदर्भ कालासाठी जवळपास सारख्याच प्रमाणात घट झाल्याचे आढळते (0.90 वरून 0.58).

## 8 बँकेचे औद्योगिक क्षेत्रासाठी दरडोई कर्ज

या निर्देशकाच्या बाबतीत सर्वात कमी मूल्य औरंगाबाद विभागातील परभणी आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांचे होते. तसेच दोन्ही वर्षांसाठी महत्तम मूल्य मुंबई जिल्ह्याचेच राहिले. 1975-76 साली मुंबई जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राचे दरडोई कर्ज रु. 2,082 होते; यात वाढ होऊन 1993-94 साली हे कर्ज रु. 10,578 झाले. कमाल-किमान प्रमाणाच्या मूल्यात 1,041 वरून 341.22 पर्यंत घट झाली. मुंबई जिल्हा वगळून या कर्जाचे महत्तम वाटप 1975-76 साली ठाणे जिल्ह्यात (रु. 1,129) आणि 1993-94 साली पुणे जिल्ह्यात (रु. 2,106) झाले. कमाल-किमान प्रमाणात 564.5 वरून 67.93 पर्यंत लक्षणीय घट झाली. विचलन गुणांकाचे मूल्य मुंबई जिल्हा समाविष्ट करून 1975-76 आणि 1993-94 या वर्षासाठी कायम होते तर मुंबई जिल्हा वगळल्यास त्यात अल्पशी घट झाल्याचे दिसते. (0.99 वरून 0.96)

आधारभूत संरचनेच्या निर्देशकांच्या मुंबई समाविष्ट करून कमाल आणि किमान मूल्यांची तपासणी केली असता असे लक्षात येते की, रस्त्यांची लांबी आणि टपाल कार्यालये सोडून इतर निर्देशकांच्या बाबतीत बीड जिल्हा सर्वात कमी मूल्य दर्शवितो. जवळपास चार निर्देशकांच्या बाबतीत संपूर्ण राज्यात बीड हा जिल्हा 1975-76 च्या दरम्यान मागासलेला होता, परभणी जिल्हा दोन निर्देशकांच्या बाबतीत तर चंद्रपूर एका निर्देशकाच्या बाबतीत मागासलेला होता. अर्थात 1993-94 या वर्षांत जिल्ह्यांच्या आधारभूत संरचनेत बदल झाला आणि किमान मूल्य वरील निर्देशकांच्या संदर्भात बीड जिल्ह्यासाठी न राहता उस्मानाबाद, गडचिरोली या जिल्ह्यांचे झाले. अर्थात काही निर्देशकांच्या बाबतीत (जसे, रस्त्यांची लांबी, टपाल कार्यालये, बँकेचे दरडोई शेती क्षेत्राचे कर्ज) मुंबईसारख्या जिल्ह्यांचे मूल्यदेखील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वात कमी होते. बँकांच्या शाखांच्या बाबतीत किमान मूल्य नाशिक जिल्ह्याचे आढळले. मुंबई वगळून जिल्हानिहाय आधारभूत संरचना सोयी बघितल्यास पुणे जिल्हा बऱ्याच निर्देशकांच्या बाबतीत आघाडीवर आहे. मुंबई जिल्ह्याच्या पाठोपाठ आधारभूत संरचनेचा विकास सर्वात अधिक पुणे जिल्ह्यात झालेला आढळतो. सामान्यपणे असे दिसते की, औरंगाबाद आणि नागपूर विभागातील जिल्हे राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत आधारभूत संरचनेच्या बहुतांश निर्देशकांच्या संदर्भात मागासलेले आहेत. प्रामुख्याने रस्त्यांची लांबी, लोहमार्ग, दूरध्वनींची संख्या, दरडोई बँकेच्या ठेवी, दरडोई औद्योगिक कर्ज याबाबतीत अधिक लक्ष पुरविणे आवश्यक वाटते.

जिल्ह्यांच्या विकासाच्या संदर्भात आधारभूत संरचनेच्या सोयी निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे याबाबत दूमत नाही. परंतु निव्वळ बँकांच्या शाखा स्थापन करून विकास घडून येईल असे नाही. याबरोबरच बँकांचे कर्ज, ठेवी व इतर संलग्नित घटकांमध्ये देखील सुधारणा होणे आवश्यक आहे. काही जिल्हे, काही निर्देशकांच्या बाबतीत आघाडीवर असले तरी त्याचा परिणाम एकंदर विकास साधण्यावर होत नाही. झिरपण्याची प्रक्रिया काही जिल्ह्यांच्या बाबतीत संरचनात्मक अलवचिकतेमुळे (rigidities) जलद गतीने होत नाही. मुंबई जिल्ह्यासारखे जिल्हे काही निर्देशकांच्या बाबतीत आघाडीवर नसले तरी या जिल्ह्यांची विकास संरचनाच मुळात भिन्न स्वरुपाची

असल्याने त्याचा विपरित परिणाम होत नाही.

विचलन गुणांकांचे परीक्षण केले असता असे दिसते की, रस्त्यांची लांबी, बँकांच्या शाखा, टपाल कार्यालये, याबाबतीत जिल्ह्यांमधील असमानता लक्षणीय स्वरुपाची नाही. परंतु बँकांचे औद्योगिक कर्ज, दरडोई बँकांच्या ठेवी, दूरध्वनींची संख्या, लोहमार्ग, या बाबतीतील असमानता प्रकर्षाने जाणवते.

**समारोप**

आधारभूत संरचनेच्या सोयींचा अभाव किंवा अपुरा पुरवठा हा विभागीय मागासलेपणा वाढीला लागण्यास कारणीभूत घटक असावा असे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. विदर्भ व मराठवाडा हे महाराष्ट्रातील दोन विभाग आर्थिकदृष्ट्या अविकसित असून त्यांच्या मागासलेपणाचे स्पष्टीकरण आधारभूत संरचनेच्या सोयींच्या मागासलेपणात सापडते. पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे रहस्यदेखील तेथे विकसित झालेल्या आधारभूत संरचनात्मक सोयींच्या विकासातच गोवलेले आढळते. हिर्शमन यानी असमतोलित आर्थिक विकासाचे सूत्र सांगताना 'आधारभूत संरचनेचा विकास' ही आर्थिक विकासाची पूर्वअट असल्याचे सांगितले. कारण त्यामुळे सरकारी व प्रत्यक्ष खाजगी गुंतवणुकीस चालना मिळते. विदर्भात औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ही गुंतवणूक अत्यावश्यक आहे. आधारभूत संरचनेचा विकास न झाल्याने विदर्भातील औद्योगिक तसेच कृषी क्षेत्रांत गुंतवणूक झाल्याचे आशादायक चित्र प्रत्ययास येत नाही. त्यादृष्टीने खाजगी तसेच सरकारी क्षेत्रांच्या माध्यमातून कृषी-औद्योगिक विकासास पोषक अशा आधारभूत संरचनेत गुंतवणूक आणि त्याआधारे आर्थिक विकास या सूत्राचे परिपालन करणे अत्यावश्यक ठरते.

धोरणात्मक दृष्टिकोनातून बघता वेगवेगळ्या निर्देशकांच्या बाबतीत किमान मूल्य दाखविणाऱ्या जिल्ह्यांचे व विभागांचे त्या त्या निर्देशकाच्या संदर्भात संपूर्ण नियोजन करून, विशिष्ट कालावधीत त्याचा विकासाचा दर्जा राज्यस्तरावर आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. याबाबतीत विचलन गुणांकाचे मूल्य एक पथदर्शक म्हणून उपयोगी ठरू शकेल.

या सर्व विश्लेषणातून निर्माण होणारा मूलभूत स्वरुपाचा प्रश्न म्हणजे आधारभूत संरचनेचे वित्तीय प्रबंधन कसे करावे ? विदर्भात तसेच मराठवाड्याच्या बाबतीत का पीछेहाट झालेली आहे ? नाशिक, पुणे व पश्चिम महाराष्ट्रातील इतर जिल्हे का प्रगतीपथावर आहेत ? आधारभूत संरचनेच्या वित्तीय प्रबंधनाचे कोणते पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत ? खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून हा विकास कितपत होईल ? या सर्व बाबींचा सांगोपांग विचार करणे अपरिहार्य आहे. खाजगी क्षेत्राद्वारे आधारभूत संरचनेचा विकास हे तत्त्व अंगिकारल्यास खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या दृष्टीने शासनाने भरीव स्वरुपाचे प्रयत्न करणे आवश्यक ठरते.

खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीला प्राधान्य दिल्यास त्याच्याशी निगडित इतर प्रश्नांची कारणमीमांसा करणे तितकेच अपरिहार्य ठरते. सामाजिक परिव्यय व खाजगी नफा यातील द्वंद्व सर्वश्रुतच आहे. (एन्रॉनमुळे विजेच्या दरातील अपेक्षित वाढ ग्राहकाच्या दृष्टीने अन्यायकारक आहे.) त्यादृष्टीने आधारभूत संरचना आणि त्यातील खाजगी क्षेत्राचे योगदान यावर विशेष अभ्यास होणे आवश्यक वाटते.

■■

## 2
# भारतीय स्त्रियांचा रोजगारातील सहभाग

*(शीतल प्रदीप महाडिक)*

1962 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेत विकासासंबंधी भूमिका मांडताना आर्थिक आणि सामाजिक ही दोन्ही अंगे विकासासाठी समान महत्त्वाची असल्याने दोहोंत समतोल असावा या

मुद्यावर भर दिला गेला. या अनुषंगाने पुढे जाता, आर्थिक विकासात अर्थव्यवस्थेतील सर्व अंतर्भूत क्षेत्रांत अभिवृद्धी आणि त्यातही समतोल हवा त्याचप्रमाणे सामाजिक घटकांतही सर्व समाजाच्या सर्व घटकांना समान संधी उपलब्ध व्हाव्यात, तरच सामाजिक विकास घडून येईल. हेही नि:संशय सत्य आहे. असे जर असेल तर, वेगवेगळे आर्थिक आणि सामाजिक मापनदंड लावल्यास 'कोठे आहे भारतीय स्त्रीचे स्थान?' हा चिंतनीय मुद्दा ठरतो. आरोग्य, शिक्षण, रोजगार संधी, इत्यादी घटकांचा आपणास यात अंतर्भाव करता येईल.

सारासार विचार करता धर्म, पंथ, जात, वर्ग या सर्वांना वगळून केवळ लिंगभेद हा नैसर्गिक आणि जैविक भेद गृहीत धरल्यास तेवढीच एक विषमता किंवा फरक, की जो टाळताच येणार नाही, यात्यतिरिक्त विचार करता स्त्री-पुरुष समाजरचनेची समान अंगे आहेत. त्याना समान दर्जा, समान संधी यांची अपेक्षा ठेवणे साहजिकच ठरते. पण हे चित्र सहसा आढळत नाही. अगदी इतिहास काळापासून ते आजतागायत. सर्वच देशांत आर्थिक विकासाबाबत चढाओढ चालू असताना सामाजिक अंग मात्र दुर्लक्षिले जाते आणि त्यातही खास करून स्त्रीवर्ग, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अगदी अमेरिका, इंग्लंड, जपान, इत्यादी आर्थिक प्रगतीत अग्रेसर देशसुद्धा याला अपवाद ठरू नयेत. भारतात तर हे चित्र प्रकर्षाने जाणवते.

या संदर्भात मैत्रेयी कृष्णराज यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते. त्या म्हणतात, ''समाजरचनेतील विशिष्ट वर्ग, जात आणि लिंग विकासापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले गेले आहेत. त्यात दलितांबरोबर स्त्रियांचाही समावेश होतो. अविकसिततेची संकल्पना आणि विकास प्रक्रियेचा आंतरराष्ट्रीय भांडवलशाही व्यवस्थेशी असणारा घनिष्ट संबंध स्त्री संबंधात विशेष महत्त्वाचा ठरतो.''

एस्टर बोझेरप या विदुषींचे मतही यापेक्षा वेगळे नाही. ''गेल्या काही शतकांपासून घडणाऱ्या संक्रमणामुळे स्त्रियांवर निश्चितच विशिष्ट परिणाम झाले आहेत, पण ते त्या त्या सामाजिक संरचनेवर अवलंबून होत.'' पाश्चिमात्य स्त्रियांना मतदानाच्या हक्कासाठी झगडावे लागले. भारतात मात्र हा हक्क राजकीय स्वार्थासाठी का होईना सहज बहाल केला गेला. असे असले तरी, शोषणव्यवस्थासुद्धा विकासप्रक्रियेचाच एक भाग आहे की काय, असा प्रश्न विचारवंतांना पडण्याइतपत स्त्रीशोषण, दडपण, दुय्यम दर्जा, इत्यादी बाबी सर्रास रूढ झाल्या.

याच पार्श्वभूमीवर मारिया मास या स्त्रीवादी विचारवंत म्हणतात, ''वाढ आणि नफा या दोन सूत्रांभोवती गुंफलेली वर्तमान जागतिक बाजारव्यवस्था ही निसर्ग, स्त्रिया आणि इतर जनसमूहाच्या शोषणाखेरीज आपले अस्तित्व टिकवूच शकत नाही,'' या विपर्यस्त व्यवस्थेचा परिणाम म्हणजे सामाजिक समतोल बिघडविणे.

'विकास' ही पाश्चात्य विश्वाभोवती केन्द्रित झालेली पुरुषप्रधान संकल्पना आहे. याची सत्यासत्यता आपणास भारतीय विकास आणि भारतीय स्त्रियांच्या संदर्भात पडताळून पाहता येईल.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत वास्तविक पाहता श्रमाच्या पातळीवर स्त्रीवर्गाचा जवळजवळ निम्मा किंवा त्यापेक्षा अधिक हिस्सा असतो. पण असे असूनही त्यांचे स्थान मात्र दुय्यमच मानले जाते. एवढेच नव्हे तर, राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनातही त्यांच्या बहुसंख्य श्रमाचा वाटा दुर्लक्षिला जातो. श्रमविभागणी करताना कष्टाची, अकुशलतेची, दुय्यम स्वरुपाची आणि पूरक कामे स्त्रियांना आणि तांत्रिक, कौशल्याची, दर्जेदार कामे पुरुषवर्गाला असाही भेदभाव आढळतो. जेणेकरून स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वाचा ठसा आपल्या कामाच्या, कर्तृत्वाच्या, श्रमाच्या जोरावर उठविता येऊ नये. किंबहुना, उत्पादक कामांपासून त्या वंचितच राहाव्यात. कारण, उत्पादक कामातील त्यांचा सहभाग वाढला. तर दीर्घकालीन बेकारी निर्माण होण्याची भीती असते. त्यामुळे स्त्रियांची अर्थव्यवस्थेतील भूमिका सीमान्तिक

राहते. आजही भारतीय स्त्रीचे श्रम कृषीक्षेत्रात, शेतमजूर, पारंपरिक उद्योग (टोपल्या विणणे, विडी कामगार, साफसफाई, गृहोद्योग, शिवणकाम, विणकर, खाद्यपदार्थ), इत्यादी कामांतच अडकविलेले दिसतात. त्यामुळे तंत्रविज्ञान, कौशल्य, उत्पादनप्रक्रिया, इत्यादी पासून त्या साहजिकच अलिप्त आहेत आणि त्यामुळेच त्यांचा सामाजिक दर्जाही कनिष्ठ/दुय्यम ठरतो.

अलीकडे तर लिंगभावावर आधारित श्रमविभागणीला नवे आर्थिक-सामाजिक आयाम लाभले आहे. श्रमविभागणी होताना अर्थातच पुरुषसत्ताक व्यवस्थेचा पगडा आढळतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या उगमापासूनच स्त्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी श्रमविभागणी हे एक साधन म्हणून वापरले गेले. कारण, स्त्रियांचे बहुतांश काम दुर्लक्षित व अदृश्य स्वरुपाचे असते. भांडवलशाहीत तर आर्थिक काम म्हणजे ज्याचा मोबदला मिळतो आणि जे बाजारयंत्रणेला पूरक काम असते. स्त्रियांच्या कामाला हे दोन्ही निकष लागत नाहीत. राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनातही स्त्रियांद्वारे केल्या जाणाऱ्या गृहकृत्याची मोजदाद होत नाही. या अनुषंगाने काही सैद्धान्तिक दृष्टिकोनही पुढे येतात.

नवअभिमत विचारसरणीनुसार स्त्रियांच्या कमी उत्पन्नास सामाजिक विषमतेऐवजी त्यांची कमी उत्पादकताच कारणीभूत असते. त्यासाठी त्यांनी बाजारातील घडामोडींना अनुसरून आपली भूमिका बदलावी. संस्थात्मक दृष्टिकोन मानतो की, लैंगिक विषमतेतून श्रमविभागणी होते. श्रमाच्या विषम वाटपामूळेच अर्थव्यवस्थेतील काहीच क्षेत्रांत स्त्रिया काम करतात, तर काही क्षेत्रांत केवळ स्त्रियाच काम करतात. त्यामुळे अशा रोजगारात घट झाली की त्या बेकार होतात. मार्क्सवादाच्या दृष्टिकोनातून उत्क्रान्तीच्या टप्प्यांवरून पूढे सरकताना आणि रानटी अवस्थेतून सांस्कृतिक अवस्थेपर्यंत येताना उत्पादन साधने विकसित होत गेली. नंतर खाजगी मान्यता ही संकल्पना रूढ झाली. त्या जोडीलाच पितृसत्ताक एंजेल्स म्हणतात, '' जसजशी संपत्ती वाढली तसतसा पुरुषांच्या कौटुंबिक आणि कुटुंबाबाहेरचा दर्जा स्त्रीच्या तुलनेत उंचावला.'' जहालमतवादी (radicals) मानतात. की, कुटुंबसंस्था भांडवलदाराचेच हित जपते. बाजारातील विषमता कुटुंबातील लिंगभेदावर आधारित असते. स्त्रिया जरी रोजगाराद्वारे पैसे मिळवीत असल्या तरी पर्यायाने पुरुषसत्ताक भांडवलशाही व्यवस्थेच्याच गरजा भागवितात.

वरील सर्व सैद्धान्तिक दृष्टिकोन नजरेखालून घातल्यास लैंगिक विषमता, संपत्तीवरील हक्क आणि बाजाराची नियंत्रणे यामुळेही स्त्रियांना श्रम विभागणीतही दुय्यम स्थान मिळते. भारतातील स्त्री-पुरुष श्रमविभागणीतील विषमता संघटित क्षेत्र आणि असंघटित क्षेत्र याद्वारे अजमावली जाते.

### *संघटित क्षेत्र*

या क्षेत्राचे वैशिष्ट्य म्हणजे यात आपल्याला आधुनिक उत्पादनविषयक संबंध आढळतात. कामगारांची सुरक्षा, कायद्याने सामूहिक सौदयाचा हक्क असणारे श्रमिक संघ, इत्यादींचे अस्तित्व असते. यात खाजगी क्षेत्रातील विनियमित व्यवसाय आणि सरकारी क्षेत्रातील उद्योग व्यवसायांचा समावेश होतो.

एकूण महिला कामगारांपैकी 94 टक्के असंघटित क्षेत्रात तर 6 टक्के संघटित क्षेत्रात मोडतात, यावरून त्यांचा दर्जा ध्यानात येईल. 1962 ते 1973 या दशकात या क्षेत्रातील स्त्री कामगारांची संख्या 13.7 लाखांवरून 21.4 लाखांवर गेली; वाढीचे प्रमाण 56 टक्के आहे. आजतागायत या टक्केवारीत वाढ होत गेली आहे. 1971 मध्ये एकूण स्त्री कामगारांचे प्रमाण 6 टक्के होते ; पैकी उद्योगात 3.7 टक्के आणि सेवा क्षेत्रात 3.3 टक्के होते. तसेच सरकारी क्षेत्रातील त्यांच्या रोजगाराचे प्रमाण 35 टक्क्यांवरून 47 टक्क्यांवर गेले, तर खाजगी क्षेत्रातील 65 टक्क्यांवरून 52 टक्क्यांपर्यंत घसरले. एवढेच काय पण केन्द्र सरकारच्या नोकऱ्यांतही स्त्री कामगारांची संख्या नगण्यच आहे. संघटित क्षेत्राची विभागणी उद्योग आणि

सेवा क्षेत्र अशी केल्याने उद्योग क्षेत्रातील एकूण रोजगार संख्या जरी वाढत असली तरी त्यातील स्त्री रोजगार घटत आहे. 1951 मध्ये ते 11.43 टक्के, 1971 मध्ये 9 टक्के आणि 1989 मध्ये 13 टक्के होते. महिला कामगारासंबंधीच्या संरक्षण कायद्याचे विपरित परिणाम, स्त्री-पुरुषांना समान वेतन धोरण, अर्थव्यवस्थेतील अचानक परिवर्तन, उत्पादन पद्धतीचे आधुनिकीकरण व नूतनीकरण, इत्यादी घटक स्त्री रोजगारात घट घडविण्यास जबाबदार ठरतात.

तक्ता 1
खाजगी व सरकारी क्षेत्रातील रोजगारातील स्त्रियांचा वाटा

*(लाख)*

| क्षेत्र | 1989 | 1996 |
|---|---|---|
| सरकारी | 21.89 | 35.77 |
| खाजगी | 13.56 | 28.56 |
| एकूण | 35.45 | 64.33 |

तक्ता 1 वरून 1989 मध्ये संघटित क्षेत्रातील 35.45 लाख स्त्रियांपैकी 21.89 लाख स्त्रिया सरकारी क्षेत्रात आणि 13.56 लाख स्त्रिया खाजगी क्षेत्रात काम करीत होत्या. त्याजागी 1996 मध्ये अनुक्रमे 35.77 लाख आणि 28.56 लाख स्त्रिया होत्या. हा वाढीचा दर लक्षणीय नाही. आजही शेती, मासेमारी आणि इतर संबंधित व्यवसायात तसेच खाजगी उद्योगांत रोजगाराचे प्रमाण अधिक आढळते. सरकारी क्षेत्रात मात्र उलट चित्र आढळते. चहा, कॉफी, रबर मळ्यांत स्त्री कामगारांचे प्रमाण बरेच जास्त आहे.

सेवा क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढला असला तरी उच्च दर्जाच्या नोकऱ्यांत प्राधान्याने पुरुष वर्गाचाच सहभाग अधिक आढळतो. 1987 च्या गणनेनुसार IFS सेवेतील अधिकारपदावर 9.58 टक्के, आयकर विभागात 5.30 टक्के, वनविभागात 0.57 टक्के, केन्द्रीय सचिवालये 3.36 टक्के, संख्याशास्त्र, विभागात 4.72 टक्के इतकेच स्त्रियांचे प्रमाण आहे. यावरुन उच्च शिक्षण आणि कौशल्याची आवश्यकता असणाऱ्या क्षेत्रांत स्त्रियांचा अत्यल्प शिरकाव आढळतो. याउलट, शिक्षक, कारकून, आणि वैद्यकीय व निम्नवैद्यकीय क्षेत्रांत मात्र स्त्रियांचे प्रमाण अधिक आढळते. व्यवस्थापकीय आणि प्रशासकीय सेवांतही अत्यल्प स्त्री सहभाग (0.8 टक्के) हे प्रमाणही लिंगभेदाचाच परिणाम दर्शविते. घरात आणि घराबाहेर ही. त्यांना आजही निर्णयस्वातंत्र्य नाकारलेच गेले आहे हेच यावरून स्पष्ट होते. वैद्यकीय क्षेत्रात वैद्यकतज्ज्ञ, शल्यविशारद, आणि परिचारिका या क्षेत्रांत स्त्रियांचा सहभाग आढळतो. त्यात 4.9 टक्के शल्यविशारद, 31.9 टक्के परिचारिका, 32.6 टक्के भौतिक चिकित्सा, आरोग्यतंत्रज्ञ आणि औषध निर्मीतीतज्ज्ञ आढळतात तर 30.6 टक्के आया आहेत. यावरूनही विषमता दिसते. शिवाय स्त्रियांचे आर्थिक आणि सामाजिक दुय्यम स्थानही स्पष्ट होते.

### *असंघटित क्षेत्र*

सहज प्रवेश, स्थानिक साधनांचा वापर, कामगारांच्या श्रमाचा पुरेपूर वापर, कामचलाऊ तंत्रविज्ञान, अनियंत्रित स्पर्धात्मक बाजार, विविधता आणि अनिश्चितता शिवाय कोणत्याही संरक्षण यंत्रणांचा अभाव असणारे, संघटना, कायद्याची बांधिलकी, कामाच्या ठिकाणची परिस्थिती, वेतन, कामाची सुरक्षितता, इत्यादी गोष्टींचा अभाव असणारी सर्व क्षेत्रे असंघटित म्हणून ओळखली जातात. यात कृषीक्षेत्र आणि बिगर-कृषी क्षेत्राचा अंतर्भाव होतो.

### *कृषी क्षेत्र*

ग्रामीण भागात असंघटित क्षेत्रात 95 टक्के तर शहरी भागात 75 टक्के महिला रोजंदारी कामात गुंतलेल्या आढळतात. वसाहतवादानंतर भारतातील गृहोद्योग नष्ट झाले. दुसऱ्या बाजूने, जमीनदारीमुळे अल्प भूधारकांचा वर्ग संपुष्टात आला आणि 1951 मधील महिला शेतकऱ्यांची 183 लाख असलेली संख्या

1971 मध्ये 92 लाखांपर्यंत घटली. आजतागायत ती घटतच आहे. उलट, 1951 मधील महिला शेतमजुरांची संख्या 120 लाखांवरून 1971 मध्ये 157 लाखांवर पोहोचली म्हणजे एकूण महिला कामगारांच्या 50 टक्के झाली. हा बदल वाढत्या रोजगार संधींचा निर्देशक नसून वाढत्या दारिद्र्यावस्थेचा आणि परावलंबित्वाचा द्योतक आहे. कृषी क्षेत्रात शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि अन्य तत्सम क्षेत्रांतील रोजगाराचा अंतर्भाव होतो.

*बिगर-कृषी क्षेत्र*

खाणकाम, तंबाखू, विडी उद्योगातील कामगार सर्व गृहोद्योग (हातमाग, तयार कपडे, हस्तकला), फेरीवाले, भाजीवाले, बांधकाम, घरकाम, इत्यादींचा समावेश यात होतो. यांत्रिकीकरण, उद्योगीकरण यामुळे हस्तोद्योगांना तर विपरित कायद्यांमुळे खाणकाम, इत्यादींना उतरती कळा लागली. त्यामुळे रोजगाराचे प्रमाण घटले. कायद्याने खाणकामात स्त्रियांना बंदी, रात्रपाळी स्त्रियांनी करू नये, जड, अवजड मालाची ने आण यासारख्या बाबतीत कायद्याने बंदी, बाळंतपणाच्या रजा, इत्यादी संरक्षक कायद्यांमुळे बहुतांश क्षेत्रांतून स्त्रियांची पीछेहाट झाली. बांधकाम उद्योगात अकुशल श्रमाला ठराविक कालापुरता कराराने रोजगार दिला जातो. येथेही स्त्री-पुरुष वेतनात फरक केला जातो. विडी उद्योगातही त्यापेक्षा वेगळे चित्र नाही. त्यातही अत्यल्प वेतन, घरी बसून काम आणि कनिष्ट दर्जा आहे. चिकन उद्योगात (कापडावर भरतकाम करणारा उद्योग) एकूण कामगारांपैकी 97 टक्के स्त्रिया असून त्यापैकी 95.8 टक्के करारबद्ध कामगार, 3.6 टक्के स्वयंरोजगार करणाऱ्या आणि 0.5 टक्के दलालांच्या मध्यस्थीने आलेल्या. यातील बहुसंख्य निरक्षर, निर्वाहपातळीखाली जीवन जगणाऱ्या मुस्लिम स्त्रिया आहेत. त्यामुळे पारंपरिक दलालांच्या हातीच हा व्यवसाय केन्द्रित झाला आहे. व्यवसायातील 60 ते 70 टक्के नफा घाऊक व्यापारीच घेतो. त्यामूळे कामगारांची भयंकर पिळवणूक असते.

*स्वयंरोजगार*

कमी रोजगार संधी, बेकारीत वाढ, वाढती महागाई आणि वाढते दारिद्र्य या परिस्थितीला तोंड देण्यासाठी स्त्रिया स्वयंरोजगार हाही मार्ग स्वीकारतात. त्यातही निरक्षरता, साधनसंपत्तीचा अभाव, आधुनिक बाजाराच्या कार्यपद्धतीबाबत आणि विक्रय तंत्राबाबतचे अज्ञान यामुळेही स्वयंरोजगाराला मर्यादा येतात. अशा सर्व मर्यादित परिघाअंतर्गत असणाऱ्या असमान रोजगार संधी, सांस्कृतिक चौकट, धर्म, जात, वर्ण, इत्यादी अडथळे या सर्वातून पुढे येणे स्त्रीला किती दुरापास्त झाले आहे. याची सहज कल्पना येते.

1970 साली व्यावसायिक, तांत्रिक आणि अन्य संबंधित व्यवसाय करणाऱ्यांपैकी केवळ 17 टक्के स्त्रिया होत्या. त्यातही 75 टक्के शिक्षिका, वैद्यक क्षेत्रात 7.10 टक्के, वकील 2 टक्के होत्या. प्रचलित सामाजिक वातावरणात स्थापत्य, वैद्यक, अभियांत्रिकी, इत्यादी उच्च व्यवसायांत शिरण्यासाठी आवश्यक असलेले दीर्घकालीन शिक्षण थोड्याच उच्च आणि मध्यमवर्गीय स्त्रियांनाच शक्य होते.

सामाजिक कार्यकर्ते या क्षेत्रात मात्र स्त्रियांचा सहभाग जवळजवळ 30 टक्के आहे. पण येथेही निर्णयप्रक्रियेत पुरुषवर्गाचाच पुढाकार दिसतो. तृतीय श्रेणी कर्मचारी वर्गात मात्र स्त्रियांचा भरणा तुलनेने अधिक आहे. स्वागतिका, लेखनिक, टंकलेखक, इत्यादीवरून त्यांचा कनिष्ठ दर्जा ध्यानात येतो.

एक स्वागतार्ह बाब म्हणजे मध्यवर्ती सेवांमध्ये महिला उमेदवारांना स्पर्धेच्या समान संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे IAS, IPS, IFS अशा क्षेत्रांत 1:81 असणारे प्रमाण 1960 मधील आकडेवारीनुसार 1:70 इतके झाले आहे. येथे मात्र स्त्रियांनी आपली क्षमता, कुवत, पात्रता दर्शविली आहे.

भारतीय शासकीय सेवेच्या भरतीविषयक नियमांपैकी 5 (3) नुसार कार्यदक्षतेची सबब पुढे करून केन्द्रीय सेवेतील विवाहित स्त्री कर्मचाऱ्यांकडून राजीनामा मागण्याचा अधिकार सरकारला होता. त्या नियमाविरुद्ध प्रातिनिधिक विरोध करून महिला

अधिकाऱ्यांनी हा नियम भारतीय शासकीय सेवेबाबत गैरलागू असल्याच्या न्यायालयाच्या निकालानंतर 1972 मध्ये रद्द करवून घेतला. उच्च पातळीवरील जबाबदारीच्या पदावर स्त्रियांच्या प्रमाणात आढळणाऱ्या तफावतीस स्त्रियांबद्दलचे पूर्वग्रह, त्यांची धरसोडवृत्ती ही कारणेही जबाबदार असतात.

स्त्री-शिक्षण आणि स्त्री रोजगार यात विरोधाभास आढळतो. निरक्षरतेमुळे अनेक गरजू स्त्रियांना रोजगार नाही, तर अनेकींना शिक्षण घेऊनही रोजगाराची शाश्वती नाही. 1971 मधील वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेने (CSIR) केलेल्या नमुना पाहणीत 4 लाख स्त्री पदवीधरांपैकी केवळ 1,50,000, म्हणजे एकूण स्त्री कामगारांपैकी 4 टक्के, स्त्रियांनाच रोजगार होता. हे प्रमाण आता नक्कीच वाढले आहे. पण ही वाढ नगण्यच असणार. मात्र वाढती महागाई, वाढते आर्थिक दडपण यामुळे गृहिणी आणि माता या दोनच अंगांनी वाढणारे स्त्रीचे व्यक्तिमत्व शिक्षणाद्वारे सर्व अंगांनी फुलेल अशी अपेक्षा आहे.

उपरोक्त विश्लेषणावरून आपण आर्थिक पातळीवर जरी बालाढ्य महासत्ता बनण्याच्या प्रयत्नात असलो तरी दुसऱ्या बाजूने सामाजिक विषमता रुंदावते आहे. त्यास खास करून वर्ग, जात, आणि लिंगभाव हे निकष लावता येतील. समाज पुरुषाची दोन समान अंगे म्हणून स्त्री-पुरुषांचा उल्लेख केला जात असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात हे चित्र क्वचितच दिसते. उलट पितृसत्ताक कुटुंबे आणि पुरुषप्रधानता यामुळे एकच अंग पूर्णत: सशक्त, प्रभावी आणि आत्मकेंद्री बनले आहे. तर दुसरे अंग मात्र दुय्यम दर्जा, मागासलेपणा, आर्थिक परावलंबित्व, दडपणूक आणि धार्मिक, सांस्कृतिक बंधनात बंदिस्त आहे. मग त्याचा पूर्ण विकास होणार कसा ? आणि अशा एकांगी वाढलेल्या समाजाला, पर्यायाने राष्ट्राला, विकसित राष्ट्र म्हणावे का ?

स्वातंत्र्य मिळाले पण परकीयांचीच नीती आताही स्त्रियांना सोसावी लागत आहे. इंग्रजांनी जाणीवपूर्वक द्वैत राबविले. आता स्वकीयही तोच किल्ता गिरवीत आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये. केवळ माता, गृहिणी याच अधोरेखित भूमिकांच्या कोषात ती अडकविली जाते. त्यातूनही आर्थिक कोंडीमुळे रोजगार मिळविणे अत्यावश्यक ठरल्यावर तिला तो मिळविण्यास भाग पाडले जाते. पण निर्णयप्रक्रियेत ती दुर्लक्षिली जाते.

केवळ 'रोजगार' हा एक घटक विचारात घेतला तरी असणाऱ्या विषमतेचे आणि दुय्यम दर्जाचे चित्र स्पष्ट होते. इतर निकषांबाबतीतही यापेक्षा वेगळे चित्र नाही. उपलब्ध साधनांची दुर्मिळता आणि त्यावर पडणारा ताण लक्षात घेता भविष्यात सेवा क्षेत्र आणि अनुत्पादक क्षेत्रांना आळा बसणार आहे. त्यांची वाढ खुंटल्यावर महिलांच्या रोजगार क्षेत्रातही घट होण्याचीच शक्यता नाकारता येणार नाही. अशावेळी उत्पादक क्षेत्रांत त्याना सामावून न घेतल्यास पुन्हा निर्माण होणाऱ्या असमतोलाला आळा घालणे अवघड होईल.

आर्थिक विकासाबरोबर नवनवी दालने रोजगारासाठी खुली होत असली तरी नवीन तंत्र आत्मसात करण्याच्या संधी, कौशल्य, त्यासाठीची प्रशिक्षणे, इत्यादींच्या अभावामुळे आणि खाजगीकरण, संगणित्रीकरण यामुळे रोजगार संधी कमी होण्याचीच शक्यता अधिक आहे. खुल्या अर्थव्यवस्थेतील तंत्रविज्ञानातील परिवर्तनामुळे, रोजगार क्षेत्रातील असुरक्षिततेमुळे स्त्रियांचा 'राखीव फळी' म्हणूनही वापर होण्याची शक्यता आहे. 1991 च्या नव्या आर्थिक धोरणानुसार जागतिकीकरण, खुले आर्थिक धोरण, खाजगीकरण या पार्श्वभूमीवर 1995 च्या जागतिक विकास अहवालानुसार संरचनात्मक तडजोड कार्यक्रम आणि त्यातील नव्या विकास दृष्टिकोनासाठी जुने उद्योग बंद करून नवे निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. श्रमाची गतीशीलता आणि रोजगारातील लवचिकता वाढविण्याकरिता बंदिस्त अर्थव्यवस्थेऐवजी ती खुली करण्याकडे कल आहे. या प्रयत्नात सरकारी क्षेत्र मोडीत निघून पुन्हा रोजगारातील असुरक्षितता वाढेल. याचा अधिक फटका स्त्री कामगारांना बसेल यात शंका नाही.

■■

# 3
# वर्धा जिल्ह्यातील पीक विमा योजना

*(पुष्पा तायडे)*

भारतीय शेतीत सर्वात जास्त नुकसान पावसामुळे होते. कधी अतीवृष्टी होते तर कधी अनावृष्टी होते. याशिवाय वादळ, टोळधाड, पिकांवर पडणारी कीड अशा अनेक आपत्तींमुळे शेतीमालाच्या उत्पादनाची पातळी घसरते आणि शेतकऱ्यांचे नुकसान होते. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावत जाते. नैसर्गिक आपत्तीतून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांच्या आर्थिक जीवनमानात स्थैर्य आणण्यासाठी, शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची भीषणता कमी करण्यासाठी कर्ज परतफेडीची क्षमता वाढविण्यासाठी पीक विमा योजना महत्त्वाची आहे.

1939 साली राष्ट्रीय नियोजन समितीने जमीनविषयक धोरण, शेतमजूर आणि विमा यावर विचार करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने दिलेल्या अहवालानुसार भारतात पीक विमा योजना सुरू करण्यात आली. सन 1943 साली मध्य प्रदेश येथील देवास संस्थानमध्ये पीक विम्याचा पहिला प्रयोग करण्यात आला. 1946 मध्ये मद्रास येथे तांदूळ व अन्नधान्यासाठी पीक विमा योजना कार्यान्वित केली. 1947 साली केन्द्र सरकार पीक विमा योजनेच्या अमलबजावणीसाठी योग्य पाऊल उचलेल असे घोषीत केले आणि त्यानुसार 1948 साली केन्द्र सरकारच्या कृषी व अन्न मंत्रालयाने बी.पी. प्रियोळकर यांची नेमणूक करून पीक विम्याची एक प्रायोगिक योजना राबविली. राज्य सरकारांनी या योजनेला अनुकूल प्रतिसाद न दिल्यामुळे ही योजना बारगळली. 1960-61 मध्ये पंजाब सरकारने ही योजना सुरू केली. वरील सर्व योजना केन्द्र सरकारच्या घटनात्मक तरतुदीच्या अडचणींमुळे किंवा अन्य काही कारणांमुळे बारगळल्या. भारतात 1972 मध्ये पीक विमा योजना प्रायोगिक तत्वावर व मर्यादित क्षेत्रात सुरू करण्यात आली. 1979 साली भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाने राज्य सरकारांचे सहकार्य घेऊन योजनेचे कार्यक्षेत्र व व्याप्ती वाढविली. 1983-84 ला ही योजना अकरा राज्यांमध्ये कार्यान्वित झाली होती. आज सर्वच राज्यांत ही योजना कार्यान्वित झालेली आहे.

1980-81 साली महाराष्ट्रात प्रायोगिक तत्त्वावर पीक विमा योजना कार्यान्वित करण्यात आली. तेव्हा विदर्भातील नागपूर, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यातदेखील ही योजना प्रायोगिक स्वरुपात सुरू करण्यात आली होती. शेतकऱ्यांनी मात्र यावेळेस या योजनेला अजिबात प्रतिसाद दिला नाही. 1981-82 साली वर्धा जिल्ह्याला या पीक विमा योजनेतून वगळण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा या जिल्ह्यात लवकरच पीक विमा योजना सुरू करण्यात आली. हळूहळू विदर्भातील सर्वच जिल्ह्यांत पीक विमा योजना कार्यान्वित करण्यात आली. विदर्भात भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाच्या साहाय्याने ही योजना कार्यान्वित झालेली आहे.

वर्धा जिल्ह्यात केन्द्र शासनाची पीक विमा योजना लागू करण्यात आलेली आहे. वर्धा जिल्ह्यातील शेतकरी स्वतःहून पीक विमा योजनेचा लाभ घेत नाही. शासनाच्या पीक कर्ज वाटप योजनेच्या अंतर्गत ही योजना राबविली जात आहे. पीक कर्ज वाटप योजनेच्या अंतर्गत शेतकऱ्यांना रु. 10,000 पर्यंत अल्पमुदती कर्ज मिळते. दिलेल्या कर्जाची वसुली हमखास व्हावी, पीक बुडाले तरी शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये तसेच कर्जपुरवठा करणाऱ्या अधिकोषांचे देखील नुकसान होऊ नये यासाठी पीक विमा योजना राबविली जात आहे. जे अधिकोष पीक कर्जवाटप करतात ते सर्वच अधिकोष पीक विमा योजना राबवितात. यात राष्ट्रीयीकृत व सहकारी अधिकोषांचा समावेश आहे. मात्र वर्धा जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोष हा योजना राबविणारा अग्रणी व प्रमुख अधिकोष आहे. पीक कर्ज घेणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला पीक विमा योजनेत सहभागी होणे बंधनकारक आहे. वर्धा जिल्ह्यात कृषीसाठी पीक कर्ज पुरवठा करणाऱ्या अधिकोषांची

संख्या जास्त आहे. तसेच या योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्याही खूप जास्त आहे. या सगळ्यांचा अल्पावधीत अभ्यास करणे अशक्य असल्यामुळे ही योजना राबविण्यात अग्रेसर असणाऱ्या वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषाद्वारे राबविल्या जाणाऱ्या सर्वकष पीक विमा योजनेचा अभ्यास केला आहे.

महाराष्ट्रातील थोड्या तालुक्यांत ही योजना भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाच्या साहाय्याने 1985 पासून सुरू झाली होती. त्यात वर्ध्याचाही समावेश होता. पुढे भारत सरकारने महाराष्ट्र शासनाला ही योजना आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यकालात 1 जून, 1990 च्या खरीप हंगामासाठी आणि 1989-90 च्या रब्बी हंगामासाठी पुढे चालू ठेवण्याचे आदेश दिले. त्यानुसार वर्धा जिल्ह्यात देखील तेव्हापासूनच ही योजना पुढे चालू ठेवण्यात आली. पूर्वी कर्ज घेतलेल्या रकमेच्या दीडपट रकमेला विमा संरक्षण होते तसेच एकूण विमा हप्त्याच्या 1 टक्का रक्कम अल्प भूधारकांना भरावी लागत असे आणि 1 टक्का रक्कम शासन देत होते. 1995 पासुन त्यात बदल करण्यात आला तो पुढीलप्रमाणे. वर्धा जिल्ह्यात कापूस हे महत्त्वाचे व्यापारी पीक आहे. परंतु या जिल्ह्यात कापसासाठी पीक विमा योजना नाही. या जिल्ह्यात शासनाच्या आदेशानुसार सोयाबीन, संकरित ज्वारी, गहू, चणा व भूईमूग या पिकांसाठी ही योजना आहे. हा अधिकोष शेतकऱ्यांना वरील पाच पिकांसाठी कर्ज मंजूर करतो आणि त्याच पिकांचा विमा काढला जातो. विम्याचा हप्ता मंजूर केलेल्या कर्जाच्या रकमेवर अवलंबून असतो. जास्तीत जास्त रु. 10,000 पर्यंत कर्ज मिळू शकते. वेगवेगळ्या पिकांसाठी विम्याच्या हप्त्याचे दर वेगवेगळे आहेत. ते तक्ता 1 मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता 1 वरून हे स्पष्ट होते की, जास्तीत जास्त रु. 10,000 कर्ज घेतल्यास रु. 100 किंवा रु. 200 विमा हप्ता भरून विमा संरक्षण प्राप्त करता येते. रु. 10,000 पेक्षा जास्त कर्ज घेतले तरी विमा संरक्षण रु. 10,000 कर्ज मर्यादेइतकेच मिळते आणि तितक्याच रकमेवर विमा हप्ता भरावा लागतो. कर्ज यापेक्षा कमी असल्यास विमा हप्त्याची रक्कम देखील कमी राहते. पाच एकर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असलेल्या अल्प भूधारक शेतकऱ्यांनी कर्ज घेतले असेल तर अशा शेतकऱ्यांच्या पीक विमा हप्त्याची रक्कम 25 टक्के भारत सरकार आणि 75 टक्के राज्य शासन देते. इतर शेतकऱ्यांना जे कर्ज दिले जाते त्यांच्याकडून हप्त्याची रक्कम वसूल केली जाते किंवा कर्जाच्या रकमेमधून विमा हप्त्याची रक्कम कापून घेतली जाते आणि ती भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ व केन्द्रीय पीक विमा निधी यांच्याकडे पाठविली जाते. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषाने 1995-96 ते 1997-98 या तीन वर्षांच्या कालात किती सभासदांचा विमा काढला यासंबंधीची माहिती तक्ता 2 मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 1**
**वर्धा जिल्ह्यातील विविध पिकांच्या विमा हप्त्याचे दर**

| पिकांचे प्रकार | प्रति रु. 100 ला विमा हप्त्याचा दर (रु.) | रु. 10,000 कर्ज मर्यादेसाठी विमा हप्त्याची रक्कम (रु.) |
|---|---|---|
| सोयाबीन, भुईमूग, चणा | 1 | 100 |
| संकरित ज्वारी, गहू | 2 | 200 |

तक्ता 2 वरून हे स्पष्ट होते की, 1995-96 च्या तुलनेत 1996-97 या वर्षी कर्ज घेणाऱ्या सभासदांची संख्या, पीक संरक्षित रक्कम व विमा हप्त्याच्या रक्कमेत वाढ झाली. 1997-98 या वर्षी मात्र 1996-97 च्या तुलनेत सभासद शेतकऱ्यांची संख्या, पीक संरक्षित रक्कम व विमा हप्त्याच्या रक्कमेत घट झालेली आढळली.

तक्ता 2

वर्धा जिल्ह्यातील विविध पिकांच्या विमा हप्त्याचे दर

| वर्ष | पीक | सभासद संख्या | पीक संरक्षित रक्कम (रु.) | विमा हप्त्याची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1995-96 | ज्वारी | 19,979 | 559.80 | 7,07,397 |
| | सोयाबीन | 5,522 | 98.99 | 1,55,774 |
| | गहू (ओलीत) | 592 | 11.58 | 23,152 |
| | **एकूण** | **26,093** | **670.37** | **8,86,323** |
| 1996-97 | ज्वारी | 23,130 | 633.12 | 8,01,410 |
| | सोयाबीन | 6,526 | 138.88 | 1,10,865 |
| | भुईमूग | 1,249 | 28.58 | 18,976 |
| | गहू (ओलीत) | 501 | 9.25 | 6,761 |
| | **एकूण** | **31,406** | **809.83** | **9,38,012** |
| 1997-98 | ज्वारी | 21,970 | 585.43 | 7,01,675 |
| | सोयाबीन | 6,710 | 161.82 | 1,23,572 |
| | भुईमूग | 883 | 18.46 | 11,337 |
| | गहू (ओलीत) | 272 | 5.74 | 11,471 |
| | **एकूण** | **29,835** | **771.45** | **8,48,055** |

स्रोत : वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोष

शेतकऱ्यांनी ज्या पिकांचा विमा काढला आहे अशा पिकांचे अतिपर्जन्य, अवर्षण, चक्री वादळ, गारपीट तसेच उंदीर, घुशी व कीटकांमुळे नुकसान झाल्यास नूकसान भरपाई दिली जाते. या योजनेच्या अंतर्गत वर्धा जिल्ह्याचे 34 महसूल एककांत (रेव्हेन्यू सर्कल) विभाजन केले आहे. शासनाने प्रत्येक प्रकारच्या पिकासाठी विमा काढण्यासाठी महसूल एकक ठरवून दिले आहे. त्या महसूल एककात ठरवून दिलेल्या पिकाचाच विमा काढता येतो, इतर पिकांचा नाही. ही योजना सुरू करताना शासन हमी पत्र मर्यादा घोषीत करते. ज्या पिकासाठी जास्त जोखीम स्वीकारावी लागते त्याना हमी पत्र मर्यादा कमी असते तर ज्या पिकासाठी जास्त जोखीम स्वीकारावी लागत नाही त्याना हमी पत्र मर्यादा जास्त होती, ती खालीलप्रमाणे होती.

| पीक | हमी पत्र मर्यादा (टक्के) |
|---|---|
| भात, बाजरी, गहू, हरभरा | 80 |
| ज्वारी, भुईमूग, तूर, सुर्यफूल, सोयाबीन | 61 |

हमी पत्र मर्यादेवर नुकसान भरपाई देण्याचे प्रमाण अवलंबून असते. असे असले तरी प्रत्यक्ष नुकसान भरपाई किती द्यावी यासाठी खालील सूत्राचा अवलंब केला जातो.

$$\left[\text{नुकसान भरपाई रक्कम}\right] = \left[\frac{\text{उत्पादनातील घट}}{\text{सर्वसाधारण उत्पादन}}\right] \times \left[\text{पीक संरक्षित रक्कम}\right]$$

सर्वसाधारण उत्पादन काढण्यासाठी त्या भागातील पाच वर्षांच्या उत्पादनाची सरासरी काढली जाते. नुकसान भरपाईची रक्कम काढण्यासाठी प्रत्येक तालुक्यात 16 पीक कापणी प्रयोग केले जातात. त्याआधारे सरासरी काढून उत्पादन काढले जाते आणि वरील सूत्रानुसार नुकसानभरपाई काढली जाते. वर्धा जिल्हयात जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषाच्या अंतर्गत पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या सभासद शेतकऱ्यांपैकी ज्याना नुकसान भरपाई प्राप्त झाली त्याचा आढावा तक्ता 3 मध्ये घेण्यात आला आहे.

### तक्ता 3
### पीक विमा योजनेद्वारे शेतकऱ्यांना प्राप्त नुकसान भरपाई

| वर्ष | पीक | सभासद संख्या | जमिनीचे क्षेत्र (हेक्टर) | उत्पादनातील घट (किलो) | नुकसान भरपाई (रु.) | प्रतिव्यक्ती नुकसान भरपाई (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1995-96 | ज्वारी | 2,307 | 2,829.21 | 289.50 | 31,85,878.23 | 130.10 |
| | गहू | 296 | 233.82 | 312.70 | 1,52,083.70 | 513.80 |
| | चणा | 6 | 4.00 | 15.20 | 265.16 | 44.19 |
| | **एकूण** | **2,609** | **3,067.03** | -- | **33,38,227.09** | **1,279.50** |
| 1996-97 | ज्वारी | नुकसान भरपाई हक्क मिळाला नाही | | | | |
| | सोयाबीन, भुईमूग, चणा | 15,882 | 17,413.17 | -- | 1,58,35,416.70 | 997.06 |
| 1997-98 | ज्वारी | पीक कमी असूनही नुकसान भरपाई मिळाली नाही | | | | |
| | भुईमूग | 427 | 231.80 | 127.80 | 2,43,278.46 | 569.74 |
| | सोयाबीन | 18,210 | 18,767.17 | 469.50 | 5,81,087.20 | 31.91 |
| | **एकूण** | **18,637** | **18,998.97** | -- | **8,24,365.66** | **42.23** |

स्रोत : वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोष

तक्ता 3 वरून हे स्पष्ट होते की, ज्वारीचे पीक कमी झाले होते तरी ज्वारीला नुकसान भरपाई मिळाली नाही. 1995-96 ला 6 शेतकऱ्यांना मिळून रु. 265.16 नुकसान भरपाई मिळाली. म्हणजे प्रतिशेतकरी रु. 44.19 मिळाले. 1997-98 ला सोयाबीन पिकासाठी प्रतिशेतकरी रु. 31.91 नुकसान भरपाई मिळाली. ही रक्कम फारच कमी होती. नुकसान भरपाईसाठी विमा महामंडळाचा स्वतंत्र विभाग आहे. त्यात शासन, सहकार किंवा अधिकोषाचा कोणताही संबंध नाही.

पाच एकर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले तर त्याना विमा हप्ता भरावा लागत नाही. त्यांच्या विमा हप्त्याची रक्कम शासन भरते आणि त्याना विमा संरक्षणाचा लाभदेखील मिळतो. विमा योजनेत सहभागी झालेल्या एकूण सभासदांपैकी अल्प भूधारक सभासद किती होते, त्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ किती होते आणि किती रकमेचे पीक संरक्षण मिळाले ते तक्ता 4 मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 4

**सर्वंकष विमा योजनेत अल्प भूधारकांचा सहभाग**

| तपशील | 1995-96 | 1996-97 | 1997-98 |
|---|---|---|---|
| *(अ) सभासद संख्या* | | | |
| अल्प भूधारक | 13,918 (53.33) | 18,142 (57.77) | 16,295 (54.61) |
| इतर | 12,175 (46.67) | 13,264 (42.23) | 13,540 (45.39) |
| **एकूण** | **26,093 (100.00)** | **31,406 (100.00)** | **29,835 (100.00)** |
| *(आ) जमिनीचे क्षेत्र* | | | |
| अल्प भूधारक | 8,729.74 (30.36) | 8,360.56 (26.41) | 10,366.60 (35.57) |
| इतर | 20,020.87 (69.64) | 23,297.91 (73.59) | 18,777.18 (64.43) |
| **एकूण** | **28,750.61 (100.00)** | **31,658.47 (100.00)** | **29,143.78 (100.00)** |
| *(इ) पीक संरक्षण रक्कम (रु. लाखात)* | | | |
| अल्प भूधारक | 230.45 (34.38) | 273.92 (33.82) | 291.98 (37.85) |
| इतर | 439.92 (65.62) | 535.91 (66.18) | 479.47 (62.15) |
| **एकूण** | **670.37 (100.00)** | **809.83 (100.00)** | **771.45 (100.00)** |

टीप : कंसातील आकडे टक्केवारी दाखवितात.
स्रोत : वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोष.

तक्ता 4 वरून हे स्पष्ट होते की, विमा योजनेत सहभागी झालेल्या एकूण सभासदांमध्ये तिन्ही वर्षी अल्प भूधारक सभासदांची संख्या जास्त होती आणि इतर सभासद शेतकऱ्यांची संख्या त्या तुलनेत कमी होती. मात्र विमा योजनेअंतर्गत इतर शेतकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ जास्त असून अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ कमी होते. विमा संरक्षित रकमेचा विचार करता अल्प भूधारकांचे प्रमाण इतर शेतकऱ्यांच्या तुलनेत कमी आढळते.

अल्प भूधारक शेतकऱ्यांना जरी त्यानी विमा हप्त्याची रक्कम भरलेली नसली तरी पीक विमा संरक्षण मिळते. वर्धा जिल्हयात वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषामार्फत राबविलेल्या योजनेद्वारे किती शेतकऱ्यांना लाभ मिळाला ते तक्ता 5 मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 5 वरून हे स्पष्ट होते की, सर्वंकष विमा योजनेच्या नुकसान भरपाईचा लाभ मिळालेल्या एकूण सभासदांत अल्प भूधारक सभासदांचे प्रमाण जास्त होते. मात्र एकूण जी नुकसान भरपाईची रक्कम प्राप्त झाली त्यामध्ये अल्प भूधारकांना मिळालेली रक्कम कमी होती.

पीक विमा योजनेद्वारे शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती व इतर आपत्तीत संरक्षण मिळावे हा उद्देश होता, परंतु हा उद्देश फारसा सफल होतो असे म्हणता येत नाही. कारण या योजनेत काही मूलभूत दोष आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत :

1 पीक विमा नुकसान भरपाई लवकर प्राप्त होत नाही.

2 पीक संरक्षित रक्कम ही कर्ज रकमेएवढीच असते.

तक्ता 5

**सभासद शेतकऱ्यांत अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या लाभाचे प्रमाण**

| तपशील | 1995-96 | 1996-97 | 1997-98 |
|---|---|---|---|
| *(अ) सभासद संख्या* | | | |
| अल्प भूधारक | 1,596 (61.17) | 9,211 (58.00) | 12,024 (64.52) |
| इतर | 1,013 (38.83) | 6,671 (42.00) | 6,613 (35.48) |
| **एकूण** | **2,609 (100.00)** | **15,882 (100.00)** | **18,637 (100.00)** |
| *(आ) नुकसान भरपाई (रुपये)* | | | |
| अल्प भूधारक | 11,57,697.12 (34.68) | 52,78,472.23 (33.33) | 58,44,924.28 (33.33) |
| इतर | 21,80,529.97 (65.32) | 1,05,56,944.47 (66.67) | 1,16,89,848.55 (66.67) |
| **एकूण** | **33,38,227.09 (100.00)** | **1,58,35,416.70 (100.00)** | **1,75,34,772.83 (100.00)** |

टीप : कंसातील आकडे टक्केवारी दाखवितात.
स्रोत : वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोष.

3 पिकाच्या उत्पादनात जी घट होते त्याच्या तुलनेत नुकसान भरपाई मिळते. त्यामुळे रक्कम फारच कमी मिळते.

4 महसूल एककानुसार (रेव्हेन्यू सर्कल) विमा प्रकरणे सादर केली जातात. म्हणून पीक नुकसानीचे मोजमाप करण्यासाठी देखील पीक कापणी त्या महसूल एककातच केलेली असावी. ती तालुका पातळीवर केली जाते.

5 नुकसान भरपाई मिळेपर्यंत सर्वसाधारण उत्पादन माहिती होत नाही.

6 शासनाने जी पैसेवारी जाहीर केली आणि 50 पैशाच्या आत जी गावे टंचाईग्रस्त घोषित करून महसूल माफ केला अशा गावातील सभासदांना नुकसान भरपाई मिळत नाही. कारण नुकसान भरपाईचा संबंध त्या भागातील 16 आणे पीक कापणीच्या प्रयोगाशी जोडतात.

7 योजना सुरू करताना फक्त हमी पत्र मर्यादा जाहीर केली जाते.

8 कापूस व इतर पिकांसाठी विमा योजना नाही.

9 सर्वसाधारण उत्पादन काढण्याची पद्धत अयोग्य आहे. पाच वर्षांपैकी तीन वर्षे पीक कमी झाले असेल तर सरासरी देखील कमी येते.

10 मिळालेल्या नुकसान भरपाईमधून घेतलेल्या कर्जाच्या रकमेची देखील परतफेड होऊ शकत नाही.

या योजनेत असलेले वरील दोष दूर करण्यासाठी पुढील उपायांचा अवलंब करावयाला पाहिजे :

1 पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना लवकर प्राप्त होईल या दृष्टीने कार्यवाही करावी.

2 पीक संरक्षित रक्कम ही कर्ज रकमेएवढी न ठेवता पीक मूल्याच्या अंदाजित रकमेएवढी असावी.

3 पिकाच्या उत्पादनात जी घट झाली त्याच्या प्रमाणात नुकसान भरपाई देण्याऐवजी एकूण झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात भरपाई द्यावयाला पाहिजे.

4 महसुल एककानुसार पीक कापणीचे प्रयोग करावे. नुकसानीचे योग्य मापन होते.

5 सर्वसाधारण उत्पादन अगोदरच जाहीर करावे. सर्वसाधारण उत्पादन काढण्यासाठी दहा वर्षे पिकाची सरासरी काढावी किंवा ज्या वर्षांत पीक चांगले आले आहे त्या पाच वर्षांची सरासरी काढावी.

6 शासनाने जिथे महसूल माफ केला आहे अशा गावाला नुकसान भरपाईचा लाभ मिळावयाला पाहिजे.

7 प्रत्येक जिल्ह्यातील महत्त्वाची व्यापारी पिके व फळे या सर्वांसाठी पीक विमा योजना लागू करावी.

8 अल्प भूधारकांना अधिक लाभ मिळेल यादृष्टीने नुकसान भरपाई योजना राबवावी.

## संदर्भ सूची


1 Press Note - Government of Maharashtra, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, dated 30 th Oct, - 1995.

2 वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी अधिकोषाद्वारे प्राप्त आकडेवारी.

3 भारतीय सर्वसाधारण विमा निगमाचे परिपत्रक.

4 महाराष्ट्र शासनाचे व केन्द्र शासनाचे पीक विमा योजनेसंबंधीचे परिपत्रक.


■■■■

# महाराष्ट्रातील औद्योगिक विकास : आधारभूत संरचना *

चंद्रहास स. देशपांडे **

** मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने जमनालाल बजाज स्मृती उपक्रमांतर्गत अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर (जि. पुणे) येथील चर्चासत्रात दि. 5 फेब्रुवारी, 2000 रोजी केलेले बीजभाषण.*

** * कार्यकारी संचालक , महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल, मुंबई.*

## 1 प्रास्ताविक

आधारभूत संरचना (infrastructure) व आर्थिक विकास यांच्यामध्ये एक अनन्यसाधारण संबंध आहे. आधारभूत संरचनाद्वारा अधिकाधिक वेगाने आर्थिक विकास साधण्यास मदत होते तसेच विकासाच्या सतत वाढत्या वेगामुळे अधिकाधिक आधारभूत संरचना उपलब्ध होऊ शकतात. परस्परपूरक व परस्परावलंबी अशा दोन्ही दृष्टींनी या संबंधाकडे पाहता येते.

तीन ठळक बाबींचा अंतर्भाव आधारभूत संरचनामध्ये करणे आवश्यक आहे : (1) *भौतिक :* प्रामुख्याने ऊर्जा, दूरसंचार, परिवहन / दळणवळण; (2) *सामाजिक :* शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, इत्यादी आणि (3) *वित्तीय :* बँका व इतर वित्तीय संस्थांचे जाळे या तीनही घटकांची उपलब्धता आणि त्यांचे सुयोग्य व्यवस्थापन हा शेती-उद्योग-सेवा क्षेत्रे या सर्वांच्या अभिवृद्धीसाठी सर्वात महत्त्वाचा दुवा होय.

आजच्या आधुनिक, स्पर्धात्मक जगात सर्व देशांत, विशेषत: भारतासारख्या विकसनशील देशांत, आधारभूत संरचना हा विकासाच्या प्रक्रियेतील एक केन्द्रबिंदूच बनला आहे. त्याची कारणेही तशीच आहेत. जगभरचा अनुभव सांगतो की, योग्य आधारभूत संरचनांची अनेक तऱ्हेने उपयुक्तता असते : उत्पादकता वाढणे, उत्पादन परिव्ययात घट होणे, बाजारात उद्योगांमध्ये स्पर्धात्मकता निर्माण होणे, विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात आकर्षित करता येणे, इत्यादी.

विविध संशोधनाअंती असे आढळून आले आहे की,

सर्वसाधारणतः आधारभूत संरचनामध्ये गुंतवणूक जर 1 टक्क्याने वाढली तर राष्ट्रीय उत्पन्नही 1 टक्क्याने वाढते. थोडक्यात, राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर जर सतत वाढता ठेवावयाचा असेल तर आधारभूत संरचनामध्ये दीर्घ मुदतीची गुंतवणूक आकर्षित करण्यास पर्याय नाही.

## 2 आधारभूत संरचना आणि भारतीय अर्थनीती

आपण सर्व जाणतोच की, वर्षानुवर्षे आधारभूत संरचनातील गुंतवणूक सरकार वा सरकारी उपक्रमांद्वारेच केली जावयाची वीजनिर्मिती असो वा रस्तेउभारणी, दूरसंचार असो वा बंदरे, केन्द्रीय वा राज्य सरकारच्या तिजोरीतूनच या प्रकल्पांसाठी पैसा उभा केला जावयाचा. 1991 च्या नव्या आर्थिक धोरणानुसार मात्र हे चित्र बदललेले आपण पाहतो आहोत. औद्योगिक गुंतवणुकीच्या क्षेत्रात तर कायापालट झाला आहेच, पण आधारभूत संरचनांच्या निर्मिती आणि व्यवस्थापनामध्ये खाजगी क्षेत्राला अधिकाधिक वाव देण्यात आला आहे. (असेही म्हणता येईल की, अलीकडच्या कालात, अनुत्पादक/योजनाबाह्य खर्चामध्ये प्रचंड वाढ झाल्यामुळे केन्द्र व राज्य सरकारे यांच्याजवळ दुसरा पर्यायही नव्हता !) इतकेच नव्हे तर, विदेशी गुंतवणूकदाराना व बहुराष्ट्रीय कंपन्यांनाही प्रामुख्याने आधारभूत संरचनामध्ये गुंतवणूक करण्यास उद्युक्त करण्यासाठी राज्याराज्यांमध्ये आज तीव्र स्पर्धा सुरू आहे.

आधारभूत संरचनांचे किंवा प्रामुख्याने खाजगी गुंतवणुकीवर आधारित आर्थिक विकास साधणे हा आजच्या युगाचा एक मंत्रच बनला आहे. मात्र हा एक अत्यंत गुंतगुंतीचा विषय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. एखाद्या वस्तुनिर्माण (manufacturing) उद्योगातून / उत्पादनातून सरकारने अंग काढून घेणे आणि आधारभूत संरचनांच्या पुरवठ्यामध्ये खाजगी क्षेत्रावर अधिकाधिक भार टाकणे यात लक्षणीय फरक आहे. आधारभूत संरचनांमधील केलेल्या गुंतवणुकी या प्रामुख्याने दीर्घ मुदतींच्याच असाव्या लागतात ; त्यावर लवकर प्रत्याय (returns) मिळत नाही. विक्रेता-ग्राहक-नियंत्रणकर्ता यापैकी कोणत्या ना कोणत्या स्वरुपात सरकारचा सहभाग आधारभूत संरचनामध्ये राहतोच. शिवाय, कायद्याशी संलग्न असेही बरेच मुद्दे अमलबजावणी करताना उपस्थित होतात आणि झालेले आहेत. आणखी एक यक्षप्रश्न म्हणजे वित्त. दीर्घ मुदतीच्या भांडवल उभारणी योजना, प्रकल्पांचे हस्तांतर ( BOOT किंवा BOT वगैरे) होईपर्यंत खाजगी गुंतवणूकदारांची वसुली, सरकारद्वारे हमीची सुविधा (guarantees) हे सगळे घटक आधारभूत संरचनांच्या खाजगीकरणाच्या आड येत असतात. अत्यंत पारदर्शक दीर्घकालीन धोरण व कठोर अमलबजावणी याशिवाय आधारभूत संरचना क्षेत्रात यशस्वी खाजगीकरण साधले जात नाही. उदारीकरणानंतर जवळजवळ एक दशक लोटूनही आज आधारभूत संरचनामध्ये (काही सन्माननीय अपवाद वगळता) भलेमोठे प्रकल्प वेगाने कार्यान्वित होऊ शकले नाहीत, हे एक कटु सत्य आहे !

मात्र एक गोष्ट निश्चित आहे. पुढील कालात, केवळ सरकारी उपक्रमांद्वारे व निधीद्वारे सुविधांचा विकास अशक्य आहे. 'सरकारी-खाजगी भागीदारी' हा प्रथमचा उपाय आणि तद्नंतर अधिकाधिक खाजगी गुतवणुकीद्वाराच आधारभूत संचनांचा विकास हे टप्पे ओळखून संक्रमण करणे अधिक सयुक्तिक. (इथे नमूद केले पाहिजे की, राकेश मोहन समितीचा अहवाल या संदर्भात अत्यंत उपयुक्त व वाचनीय आहे.)

## 3 महाराष्ट्राची स्थिती

महाराष्ट्राची आर्थिक स्थिती व राज्यवार क्रमवारीतील महाराष्ट्राचे बदलते (!) स्थान हा काही वर्षे एक बहुचर्चित विषय बनला आहे. बेलगाम कर्जउभारणी, कर्जाचा अयोग्य वापर, कर-महसुलाच्या वाढीचा घटता दर, पाचव्या वेतन आयोगाचा भार, अशा अनेक बाबींमुळे महाराष्ट्राची वित्तीय अवस्था अत्यंत

नाजुक झाली आहे हे निःसंशय. व्याज व वेतन देण्यातच बहुतांश महसूल कामी येत असल्यामुळे विकासासारख्या (क्षुल्लक ?) कामांना आज सरकारकडे पुरेसा पैसा नाही, अशी अत्यंत विदारक परिस्थिती आपल्या डोळ्यादेखत घडत आहे.

औद्योगिक गुंतवणुकीच्या क्षेत्रातही, महाराष्ट्राच्या वर्षानुवर्षे असलेल्या वर्चस्वाला अलीकडच्या काळात मोठेच आव्हान उभे राहिले आहे. दक्षिणी राज्ये (आंध्र प्रदेश, तमिळ नाडू व कर्नाटक) यांच्याशी महाराष्ट्राची तीव्र स्पर्धा आहे, तीही विशेषतः सेवा क्षेत्रातील 'नव्या' (माहिती तंत्रविज्ञान, इत्यादी) गुंतवणुकीस आकर्षित करण्यात.

प्रश्न महाराष्ट्र राज्याच्या वित्तीय स्थितीचा असो वा गुंतवणूक आकर्षित करण्याचा, दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या दृष्टीने पाहता, आधारभूत संरचना हाच निकष केन्द्रस्थानी असणे अत्यावश्यक आहे. राज्यवार करसवलतींचा काळ आता अधिकृतरीत्या समाप्त करण्यात आला असल्यामुळे, राज्यांतर्गत 'स्पर्धात्मक लढाई' ही आता फक्त आधारभूत संरचनांच्या उपलब्धी व व्यवस्थापनाशी निगडित राहणार आहे. ज्या राज्यात आधारभूत संरचनांची स्थिति उत्तम, तेथे गुंतवणूक अधिक आणि त्यामुळेच भावी औद्योगिक विकासास चालना, हे सूत्र अबाधित राहील असे समजावयास हरकत नाही. महाराष्ट्राच्या औद्योगिक धोरणातही त्यादृष्टीने त्वरित बदल आवश्यक आहेत.

## 4 महाराष्ट्राचा औद्योगिक विकास : धोरणे व प्रगती

उदारीकरण/जागतिकीकरण ही धोरणे औद्योगिक क्षेत्रात 1991 पासून राबविण्यास सुरुवात केली. त्यावेळेसही महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रात सर्वात प्रगत व अग्रेसर राज्य म्हणून गणले जात असे. उदारीकरणाचे वारे देशात वहावयाला लागल्यानंतर, सर्वप्रथम महाराष्ट्राने 1993 साली औद्योगिक धोरण जाहीर केले आणि त्यात थोडे फेरफार करून (मुख्यतः व्यापार - वाणिज्य यांचा अंतर्भाव करून) 1995 साली तत्कालीन सरकारने 'नवे औद्योगिक, व्यापार आणि वाणिज्य धोरण' अमलात आणले. या धोरणात प्रामुख्याने केन्द्रीय धोरणांचेच प्रतिबिंब पडलेले आढळते. महाराष्ट्राच्या औद्योगिक धोरणाची काही ठळक वैशिष्ट्ये अशी : उद्योगासाठी उदारीकरण व शिथिलीकरण; सरकारी कार्यपद्धतींत सुसूत्रता, सुलभता व पारदर्शकता आणण्याचा उद्देश ; लघुउद्योगांसाठी सवलती ; शेतीमाल आधारित व संगणित्र क्षेत्रांस विशेष प्राधान्य; एक-खिडकी धोरण. 1998 साली 'माहिती-तंत्रविज्ञान धोरण' जाहीर केले गेले आणि ''कुठेही, केव्हाही आणि कसाही संपर्क '' हे ब्रीद वाक्य अंगीकारले गेले. विकसनशील प्रदेशांतील आधारभूत संरचनांच्या विकासावर विशेष भरही या धोरणात दिसतो ; उदाहरणार्थ, राज्यातील 9 ठिकाणी अद्ययावत आधारभूत संरचनांनी युक्त अशा औद्योगिक संकुलाची उभारणी, इत्यादी.

अलीकडच्या कालातील औद्योगिक प्रगतीचा धावता आढावा घेतला तर, वस्तुनिर्माण क्षेत्रात राज्याचे वर्चस्व आजही दिसून येते ; उदाहरणार्थ, देशातील एकूण वस्तुनिर्माण प्रक्रियेत राज्याचा 21 टक्के वाटा स्थूल उत्पादनात व मूल्यवृद्धीत कायम आहे. (1997-98 च्या आकडेवारीनुसार); तसेच 19 उद्योग क्षेत्रांत महाराष्ट्र देशातील पहिल्या तीन क्रमांकांच्या राज्यांत आहे. रसायने, धातू उत्पादने, यंत्रसामग्री व परिवहन या प्रमुख उद्योगांत राज्याचे आजही वर्चस्व असल्याचे दिसते. औद्योगिक अभिवृद्धीचा दरही भारताच्या औद्योगिक अभिवृद्धीच्या दरापेक्षा अधिकच राहिला आहे. (राज्य पातळीवरच्या औद्योगिक उत्पादनाच्या आकडेवारीची त्रुटी इथे प्रकर्षाने जाणवते !)

## 5 आधारभूत संरचना : एक आढावा

आधारभूत संरचना व आर्थिक विकास यातील परस्परसंबंध आपण पाहिले. देशातील बदलत्या आर्थिक धोरणांचाही थोडा ऊहापोह केला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची सद्यःस्थिती काय आहे ? पुढील विवेचनात

याचा प्रामुख्याने विचार केला आहे. (मात्र, आधारभूत संरचनामधील प्रत्येक क्षेत्राचा वेगळा, सखोल विचार न करता एकत्रितपणे काही ठळक मुद्दे चर्चिले आहेत.) यामागील प्रमुख उद्देश, गेल्या 9-10 वर्षांनंतरची परिणती कशात झाली, कोणत्या समस्या आल्या आणि काय उपाययोजना केल्या जाऊ शकतात, या बाबी जाणून घेणे हा आहे.

1990-99 मध्ये आधारभूत संरचनांमध्ये झालेली प्रगती (वा बदल) तक्ता 1 वरून ध्यानात येईल.

ढोबळमानाने असा निष्कर्ष काढता येईल की, भौतिक आधारभूत संरचनांमध्ये (विशेषत: वीज उत्पादन व रस्त्यांची लांबी) गेल्या 9-10 वर्षांत लक्षणीय वाढ झाली असली तरी सिंचित क्षेत्र, लोहमार्गांची लांबी, आणि प्रामुख्याने शिक्षण व आरोग्य यामधील आधारभूत संरचनांमध्ये त्याच कालात अत्यंत नगण्य वृद्धी झाली आहे. विरोधाभास असा आहे की, आधारभूत संरचनांच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांत राज्यामधील गुंतवणुकीचा ओघ सतत वाढतच राहिला

**तक्ता 1**

**महाराष्ट्रातील आधारभूत संरचनांचा विकास**

| आधारभूत संरचना | परिमाण | 1990-91 | 1998-99 |
|---|---|---|---|
| ***(1) वीज*** | | | |
| (अ) एकूण उत्पादन | दशलक्ष कि. वॉ. तास | 37,311 | 57,973 |
| (आ) एकूण वापर | दशलक्ष कि.वॉ. तास | 30,775 | 51,695 |
| ***(2) वाहतूक*** | | | |
| (अ) लोहमार्गांची लांबी | किलोमीटर | 5,434 | 5,447 |
| (आ) पृष्ठांकित रस्त्यांची लांबी | किलोमिटर | 1,32,048 | 1,74,616 |
| ***(3) शिक्षण*** | | | |
| (अ) प्राथमिक शाळा | -- | 57,744 | 64,918 |
| (आ) विद्यार्थी | हजारात | 10,424 | 12,291 |
| ***(4) आरोग्य*** | | | |
| (अ) रुग्णालये | -- | 768 | 843 |
| (आ) दवाखाने | -- | 1,896 | 1,396 |
| (इ) बालमृत्यू दर | प्रतिहजार जीवित जन्मामागे | 60 | 49 |
| ***(5) सिंचित क्षेत्र*** | हजार हेक्टर | 3,319 | 3,362 |

**स्रोत :** *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, 1999-2000,* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन पृष्ठे (xi-xii)

आहे ! इतर कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रातील आधारभूत संरचानांमध्ये असलेली गुंतवणूक अधिक आहे आणि प्रकल्पांची संख्याही जास्त आहे. Centre for Monitoring Indian Economy अहवालावर आधारित तक्ता 2 वरून ही गोष्ट स्पष्ट होते.

**तक्ता 2**

**महाराष्ट्रातील आधारभूत संरचनांमधील गुंतवणूक (मार्च, 2000)**

| आधारभूत संरचना | गुंतवणूक (कोटी रुपये) | प्रकल्पांची संख्या |
|---|---|---|
| (1) वीजनिर्मिती | 44,570 | 58 |
| (2) विविध सेवा (एकूण) | 52,169 | 171 |
| (अ) परिवहन | 25,615 | 85 |
| (आ) आरोग्य सेवा | 1,114 | 8 |
| (इ) दळणवळण | 5,820 | 9 |
| (3) सिंचन | 28,814 | 64 |
| एकूण | **1,25,553** | **293** |

स्रोत : Centre for Monitoring Indian Economy, *Monthly Review of Investment Projects*, May, 2000, p. 108.

राज्यातील एकूण 1,57,000 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतील जवळजवळ 80 टक्के वाटा हा आधारभूत संरचनांमधील गुंतवणुकीचा आहे, हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे.

असे असतानाही या आकडेवारीचा प्रत्यक्ष लाभ राज्यातील उद्योजकांना, गुंतवणूकदारांना आणि विशेषत: सामान्य लोकाना मिळत आहे अशी परिस्थिती नाही. याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(1) बरेचसे अतिभव्य प्रकल्प (mega projects) आजही कागदोपत्रीच आहेत. त्यांच्या अमलबजावणीत अक्षम्य दिरंगाई आढळून येते. एप्रिल, 1999 ते मार्च, 2000 या एकाच वर्षात सुमारे 6,000 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रकल्प हे विविध कारणांमुळे महाराष्ट्रात रखडले / बंद पडले आहेत !!

(2) मालकीच्या दृष्टीने पाहता आजही बहुतांशी गुंतवणूक व प्रकल्प हे सरकारी मालकीचे आहेत. अनेक आमिषे दाखवूनही अद्याप खाजगी उद्योजक आधारभूत संरचनांमध्ये गुंतवणूक करण्यास राजी झालेले नाहीत. काही ठिकाणी योग्य मार्गदर्शक तत्त्वे नाहीत, सरकारी कार्यप्रणाली व धोरणात पारदर्शकता नाही, पर्यावरणवाद्यांनी काही प्रकल्पांचे (बंदरे, विमान तळ, इत्यादी) उच्चाटन केले, यामुळे खाजगी उद्योजकांत दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीसाठी विश्वासार्हतेचे, गुंतवणूकानुकूल वातावरण तयार झालेले दिसत नाही.

मात्र जमेची बाजू अजिबातच नाही असे नाही. वीजनिर्मितीच्या येत्रात राज्याची स्थिती इतर राज्यांपेक्षा उत्तम आहे. वीजनिर्मितीची क्षमता व उत्पादनही अलीकडच्या कालात वाढते राहिले आहे. (एन्रॉन-विरोधकांनी हे लक्षात घ्यावयास हवे !) तसेच, पूल व रस्ते या क्षेत्रांत गेल्या पाचसहा वर्षात लक्षणीय गुंतवणूक हेतुपुरस्सर करण्यात आली. खाजगी व सरकारी भागीदारीचे, भांडवल उभारणीचे नवे मार्ग चोखाळण्यात आले. राज्याच्या दूरगामी विकास प्रक्रियेच्या दृष्टीने या घटना निश्चितच स्वागतार्ह आहेत. छोटी बंदरे, हवाई मार्ग यामध्ये मात्र अपेक्षित यश मिळू शकले नाही. (गुजराथने इथे बाजी मारली आहे !)

### 6 प्रमुख समस्या व उपापयोजना

राज्याच्या एकूण आर्थिक विकासाच्या दृष्टीने, आणि विशेषत: आधारभूत संरचनांच्या बाबतीत खरा यक्षप्रश्न असा आहे की, जर खाजगी गुंतवणूक अपेक्षित वेगाने वाढली नाही तर यापुढेही गुंतवणुकीचा अधिकाधिक भार सरकारी क्षेत्रालाच उचलावा लागेल. त्यातून अनेक उपप्रश्न भेडसावतील. सरकारच्या वित्तीय गणिताचे काय होईल ? महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, राज्य परिवहन इत्यादी आधारभूत संरचनांशी निगडित असलेल्या आणि (त्यामुळेच ?) सातत्याने तोट्यात

चालत असलेल्या महामंडळांचे भवितव्य काय ? सिंचन क्षेत्रातील गुंतवणुकी आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होतील काय ? इत्यादी. (विद्यमान सरकारच्या श्वेतपत्रिकेत यावर सुयोग्य प्रकाश टाकण्यात आला आहे.)

आधारभूत संरचनांमधील वरील उल्लेखिलेल्या प्रमुख समस्यांवर त्वरित पाउले उचलून मात केली नाही तर राज्याच्या औद्योगिक परिस्थितीवर अधिकच विपरित परिणाम तर होईलच, पण भावी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेलाच मोठ्या प्रमाणात खीळ बसेल. त्यादृष्टीने पुढील काही उपाययोजनांचा विचार करता येईल.

(1) अधिकाधिक खाजगी गुंतवणूक वेगाने आकर्षित करण्यासाठी कार्यपद्धतीत गतिमानता आणणे, जुन्या कायद्यांत आमूलाग्र बदल करणे, नियमांच्या अमलबजावणीत पारदर्शकता आणणे आणि गंतवणुकीसाठी वातावरण पोषक बनविणे.

(2) तोट्यातील महामंडळे त्वरित मोडीत काढणे अथवा त्यांचे खाजगीकरण करणे. अडकलेला सरकारी निधी त्यातून मुक्त करणे. श्वेतपत्रिकेत व राज्याच्या 2000-01 च्या अर्थसंकल्पात यावर पुरेसे भाष्य आहे. मात्र निकड आहे ती अमलबजावणीची !

(3) राज्य सरकारने माहिती तंत्रविज्ञानाचा पुरेपूर लाभ उठविला पाहिजे, आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा केली पाहिजे आणि विशेषत: खेडोपाडी शिक्षण व आरोग्याशी निगडित असलेल्या सेवांच्या पुरवठ्यावर अधिकाधिक भर दिला पाहिजे.

(4) आधारभूत संरचनांच्या बाबतीत एका सतत दुर्लक्षिलेल्या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. एक सार्वत्रिक समज असा आहे की, सरकारने या बाबींचा पुरवठा सतत व अत्यंत कमी दरात (खरे तर विनामूल्यच !) करावा. समाजवादी अर्थकारणात हा समज अधिकाधिक सुदृढ होत गेला. रस्ते, बंदरे, वीज वा दळणवळण या गोष्टींच्या वास्तविक किमती ग्राहकांनी द्याव्या यासाठी लोकशिक्षणाची गरज आहे. अत्यंत चुकीच्या अर्थकारणामुळे अर्थसाहाय्यांमुळे महामंडळे तोट्यात निघाली, सरकारी तिजोरीही सातत्याने रिकामी होत गेली. इतके होऊनही मुबलक पुरवठा झाला नाही हे वेगळेच.

(5) सधन शेतकरी, उच्चभ्रू मध्यमवर्ग (म्हणजेच आपण सर्व) धोरणांचे लाभार्थी बनले आणि कोणत्याही दरवाढीचा विवेकशून्य व आधारशून्य विरोध करण्याची संस्कृती बळावली. विजेचे दर, रस्त्यांचे टोल, रेल्वेचा प्रवास हे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर असल्याशिवाय गुंतवणूक आकर्षित होणार नाही आणि त्यामुळे योग्य प्रमाणात आधारभूत संरचनांची उपलब्धताही वाढणार नाही, हे सत्य डोळ्याआड करणे योग्य नाही. याचा अर्थ असा नव्हे की, खाजगी वा सरकारी गुंतवणूकदारांनी ग्राहकांना लुटण्यास मुभा असावी ! महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचा अलीकडचा अनुभव हा येथे उद्बोधक ठरावा. त्यावरून हेच सिद्ध होते की, जर विनियमनात पारदर्शकता असेल, प्रक्रिया लोकशाहीच्या तत्त्वांना धरून असेल आणि राजकीय हस्तक्षेप नसेल, तर सर्वमान्य तोडगा निघू शकतो. (एन्रॉनला आज विजेच्या दरवाढीबाबत 'अपेक्षित मनमानी' करण्यास आपोआपच खीळ बसली आहे आणि एन्रॉन विरोधकही या तोडग्याबाबत समाधानी असल्याचे दिसते.)

राज्य सरकार व धोरणकर्त्यांवर ही सर्व आव्हाने पेलण्याची मोठी जबाबदारी आहे. केवळ राजकीय स्वार्थ व हितसंबंधांची जपणूक न करता आधारभूत संरचनांकडे अर्थशास्त्रीय दृष्टीने बघणे हे अत्यंत गरजेचे आहे. राज्याची गेलेली पत जर परत मिळवावयाची असेल तर अनेक धडाडीचे व तितकेच अप्रिय निर्णय घ्यावे लागतील. येथे पुनरुच्चार करावासा वाटतो की, उद्योजकता विकास, उद्योगधंद्यांची भरभराट अथवा विदेशी गुंतवणूक यांचा राज्यासाठी उपयोग करावयाचा असेल तर कर सवलतींवर वा अन्य वित्तीय धोरणांवर अवलंबून न राहता आधारभूत संरचनांमध्ये सुधारणा, त्यांचे योग्य व्यवस्थापन आणि किंमत वसुली यावरच भावी आर्थिक विकासाची दिशा ठरविणे याला पर्याय नाही.

■■■■

# अर्थ शब्दांची वाट पाहे

शि. ना. माने *

## 1 Trickle- down theory

पारंपरिक अभिवृद्धी सिद्धान्तात वापर. वितरणापूर्वी / ऐवजी उत्पादनावर लक्ष केन्द्रित. प्रथम वस्तू उत्पादनात वाढ. काही कालावधीनंतर ती पायरीपायरीने तळातील व्यक्तीपर्यंत झिरपते. कुझनेटस् यानी या सिद्धान्ताचे पुढीलप्रमाणे समर्थन केले. विकासाच्या आरंभीच्या टप्प्यांत उत्पादनातील वाढीबरोबर उत्पन्नातील विषमतेत वाढ झाली तरी अखेरीस ती घटते किंवा नष्ट होते. परंतु ते एक मिथक आहे. आजकाल विकासाच्या सिद्धान्तात अभिवृद्धी सिद्धान्तांवर एक प्रमुख आक्षेप घेतला जातो. उत्पादनातील किंवा उत्पन्नातील वाढ शिखरावरील श्रीमंत व्यक्तींपुरतीच सीमित राहते. ती तळातील व्यक्तींपर्यंत झिरपत नाही. परिणाम ? श्रीमंत संपन्न होतात, तर गरीब विपन्नावस्थेत राहतात. विशेषत: धनंजयराव गाडगीळानी त्यांच्या वितरणाच्या मीमांसेच्या स्वरुपात या सिद्धान्ताला आव्हान दिले. परंतु आजमितीस (सन 2000) जागतिक बँकेवरील डेविड डॉलर व आर्ट क्रे (David Dollar and Aart Kraay) या अर्थशास्त्रज्ञांनी अभिवृद्धी सिद्धान्ताला ('Growth is good for the poor') परत उचलून धरण्याचा प्रयत्न केला आहे. (पाहा : 'Growth is good,' The Economics focus, *The Economist,* May 27-June 2, 2000, p. 96.) त्यांच्या निबंधाचा गोषवारा पुढीलप्रमाणे. अभिवृद्धी झिरपत नाही. एकाच वेळी देशातील गरीब व श्रीमंत यांच्या उत्पन्नात जवळजवळ एक समान प्रमाणात (one - for -one) वाढ होते. ते काही असो. झिरप/ पाझर सिद्धान्त हा मराठी पर्याय सुचविला आहे.

* *भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, सातारा.*

### 2 Prosumer

सदरचा जोड-शब्द (producer व consumer या शब्दांपासून तयार केलेला) टॉफलर यानी प्रथम चलनात आणला. उत्पादक व ग्राहक यांच्यात थेट संबंध किंवा दुवा निर्माण करणे. मध्यस्थ व्यापाऱ्यांचे उच्चाटन करणे हे उद्दिष्ट. विशेषत: शेतीमालाच्या खरेदीविक्री व्यवहारात अटळपणे दिसून येणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील किंमत विचरणाचे (price-spread) उच्चाटन करणे. उदाहरणार्थ, हैद्राबादचा 'रयतु बाजार.' परिणामी उत्पादकाला मिळालेली किंमत व ग्राहकाने दिलेली किंमत यांच्यातील तफावत नष्ट होऊन उत्पादक व ग्राहक यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होते. 'prosumer' चा मराठी पर्याय म्हणून 'उत्ग्राहक' हा जोडशब्द सुचविला आहे.

### 3 Growthmanship

अभिवृद्धी संकल्पनेच्या संदर्भात वापर. Growth म्हणजे अभिवृद्धी परंतु 'manship' चा अर्थ 1998 पर्यंतच्या उपलब्ध कोशांमध्ये नोंदल्याचे दिसत नाही. अपवाद 1998 मधील *The New Oxford Dictionary of English* चा आहे. 'manship' चा त्यात दिलेला अर्थ असा : denoting a skill in a subject or an activity. उदाहरणार्थ, marketship, vice-chancellorship, chairmanship, (विशिष्ट विषयातील किंवा व्यवहारातील कौशल्य किंवा नैपुण्य यांचे दर्शन घडविणे.) आजकाल statesmanship व growthmanship यांच्यात समन्वय असल्याशिवाय प्रगती गतिमान होत नाही. मराठी पर्याय-वृद्धीकौशल्य, वृद्धीकार्यकौशल्य.

### 4 Corporatisation

जागतिक बँकेच्या 1994 मधील अहवालात (infrastructure for development, p. ix) या शब्दाची पुढील व्याख्या आयती तयार आहे. ती पुढे उद्धृत केली आहे. ''The transformation of government-owned enterprise into legal entity subject to company law, including separation of ownership and management through a board of directors or other body." (संचालक मंडळ किंवा दुसरे मंडळ याच्या साहाय्याने मालकी व व्यवस्थापन यांच्या विभक्तीकरणाचा समावेश करणाऱ्या कायद्याच्या अधीन (किंवा मर्यादेत) सरकारी मालकीच्या उपक्रमाचे कायदेशीर वस्तूसत्यात रूपांतरण.) म्हणजे सरकारी मालकीची जागा भागधारकांकडून घेतली जाणे, कायद्याने संचालक मंडळाकडे व्यवस्थापन नियंत्रण असणे, निर्णयांच्या बाबतीत ते मंडळ स्वायत्त असले तरी अंतिमत: ते भागधारकांना जबाबदार असणे, इत्यादी वैशिष्ट्यांनी ते युक्त असते.

Corporation चा मराठी पर्याय निगम किंवा कंपनी असा आहे. म्हणूनच निगमीकरण, कंपनीकरण हे मराठी पर्याय सुचविले आहेत.

### 5 Entity

वरील निगमीकरणाच्या व्याख्येत या शब्दाचा उल्लेख आहे. *विश्वकोश,* परिभाषा संग्रहात वस्तु, भाव असे त्याचे पर्याय दिले आहेत. ते अपुरे वाटतात. Entity-being, something in existence असे अर्थ दिले आहेत. म्हणजे असु, अस्तित्वात असलेली वस्तू. उदाहरणार्थ, the TELCO is an entity. म्हणून वस्तूसत्य हा पर्याय जास्त समुचित व समर्पक आहे.

### 6 अवसायन

येथे मराठी पर्याय सुचविण्याचा हेतु नसून दुर्लक्षित शब्दाचा केवळ पुनरुच्चार करण्याचा हेतू आहे. मुळात काही मराठी पर्याय आयते उपलब्ध आहेत परंतु ज्यांचा पाहिजे त्यावेळी किंवा ठिकाणी वापर होत नाही अशा शब्दांपैकी हा एक शब्द आहे. निदान मला तो नवीन आहे म्हणून ही चर्चा.

विशेषत: महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँका व सहकारी संस्था यांच्यासाठीच्या कायद्यातील प्रस्तावित सुधारणेच्या संदर्भात सदरचा शब्द वाचनात आला. सुरुवातीला प्रस्तावित सुधारणा व अवसायन यांच्या परस्पर संबंधाचा उलगडा झाला नाही. मराठी शब्दकोश चाळले. अखेर द.ह. अग्निहोत्री यांच्या *अभिनव मराठी-मराठी शब्दकोशात* (खंड 1, 1983) 'अवसायन' चे पुढील अर्थ उपलब्ध झाले. : दिवाळे, नादारी जाहीर करणे, समापन. सहकारातील कार्यकर्ते व जाणकार याना हा शब्द पूर्वीपासून माहीत आहे. संस्था अवसायनात जाऊ नये या हेतूने संस्थेची तूट किंवा तोटा त्यासाठी जबाबदार ठरणाऱ्या सभासदांकडून वसूल करण्याची प्रस्तावित तरतूद असलेल्या नवीन सहकारी कायद्याला एकतीसाव्या महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेने एकमुखी मान्यता दिल्याचे वृत्त आहे. समापनाबरोबर अवसायन शब्दाचा वापर व्हावा एवढ्याच मर्यादित भूमिकेतून सदरचे टिपण लिहिले आहे.

■■■■


# मराठी अर्थशास्त्र परिषद

**(अ) परिषदेची प्रकाशने**

| | |
|---|---|
| (1) नी.वि. सोवनी | *अर्थसिद्धान्त :* आणखी चिकित्सक निबंध, 1997,पृष्ठे 226, किंमत रु. 20 |
| (2) मो. वि. भाटवडेकर : | *शिक्षणाचे अर्थशास्त्र,* 1978, पृष्ठे 157 (वितरण : व्हीनस प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे), किंमत रु. 20. |
| (3) भ.ग. बापट | *आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धान्त आणि धोरण,* पृष्ठे 333 दुसरी आवृत्ती, 1998 किंमत रु. 160/- (वितरण : कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद). |
| (4) नी. वि. सोवनी | *अर्थमीमांसा,* 1995, पृष्ठे 345 (वितरण : डॉ. व्यं. सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे. क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे 411 029). किंमत रु. 250. |

***(आ) परिषदेला देणगी रूपाने मिळालेली आणि परिषदेकडून विक्रीस उपलब्ध प्रकाशने***

| | |
|---|---|
| (1) नी. वि. सोवनी | *साफा विचारसरणी : चार व्याख्याने,* पृष्ठे 64 (प्रकाशक : नी. वि. सोवनी) किंमत, रु. 10. |
| (2) नी. वि. सोवनी | *अर्थसिद्धान्त : काही चिकित्सक निबंध,* 1972 (प्रकाशक : देशमुख आणि कंपनी, पुणे). |

*ग्रंथ परीक्षण*

# केन्स : व्यक्ती व विचारांची ओळख

**खेर, सी. पं. (1997), *क्रान्तिकारी अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स*, प्रकाशक कुमुद खेर, पुणे, पाने 95, किंमत रु. 100.**

**दि. व्यं. जहागिरदार** ✲

अर्थशास्त्रावरील विविध विषयांवर सातत्याने चिंतन करून मराठीत लिखाण करणारे आणि पुस्तक लिहिणारे जे तुरळक प्राध्यापकेतर लेखक आहेत त्यामध्ये सी. पं. खेर हे एक विशेष लेखक मानले पाहिजेत. मार्च, 1997 मध्ये त्यानी 'क्रांतिकारी अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स' हे छोटेखानी (पृष्ठसंख्या 97) पुस्तक प्रसिद्ध केले. पुस्तकाच्या प्रस्तावनेत ''मी प्राध्यापक नाही, माझे कुठे लागेबांधे नाहीत व मजजवळ छाप पडावीशी पदवी नाही'' अशी खंत त्यानी व्यक्त केली आहे.

सी. पं. खेर हे गेल्या 40-45 वर्षापासून मराठीतून तसेच इंग्रजीतूनही लेखन करीत आहेत. पैसा व पैसाविषयक धोरण हा त्यांच्या अध्ययनाचा मुख्य विषय आहे. त्याच दृष्टीने त्यानी केन्सचे अध्ययन केले. केन्स हा त्यांचा आवडता विषय आहे. त्यांच्या स्वतःच्या ग्रंथालयात मला केन्स व पैसा या विषयांवर अनेक पुस्तके आढळलीत. 1958 मध्ये त्यानी *केन्स आणि शुम्पीटर यांचे अर्थशास्त्र* हे पुस्तक लिहिले होते. 1960 च्या सुमारास नागपूरचे प्रसिद्ध प्राध्यापक भा. ह. मुंजे यानी *केन्सची रोजगारीची मीमांसा* हे पुस्तक 2 भागांमध्ये प्रसिद्ध केले होते. सध्या समष्टीय अर्थशास्त्रावर पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी जी अनेक पुस्तके इंग्रजी, हिंदी व मराठी माध्यमातून उपलब्ध आहेत आणि जी अर्थशास्त्राच्या अभ्यासकांच्या वाचनात येतात त्यात केन्सच्या अर्थशास्त्राचा तसेच केन्सप्रणीत अर्थशास्त्राचा अन्तर्भाव होतो. पण केन्स या व्यक्तीवर आणि तिच्या ग्रंथसंपदेवर स्वतंत्र पुस्तक मराठीत उपलब्ध नव्हते. ही एक उणीव भरून काढण्याचे काम या पुस्तकाने निश्चितच केले आहे. विसाव्या शतकातील श्रेष्ठ व प्रभावी अर्थशास्त्रज्ञ

✲ *सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर.*

म्हणून निःसंशय केन्स यांचेच नाव घ्यावे लागेल. केन्सच्या अर्थशास्त्राचा पुढील पिढ्यांवर झालेला वैचारिक प्रभाव, गेल्या 50 वर्षांमध्ये अर्थशास्त्राच्या विविध विषयांवर त्याचा झालेला परिणाम आणि विशेषत: आर्थिक धोरणावर झालेला परिणाम लक्षात घेतला तर केन्सचे मोठेपण मान्य होण्यासारखे आहे. केन्सच्या जन्मशताब्दी वर्षात तसेच *जनरल थिअरी* ला पन्नास वर्षे पूर्ण झाली त्या वर्षात प्रसिद्ध झालेले लेख, पुस्तके आणि जगभर त्या अनुषंगाने आयोजित केलेली चर्चासत्रे, परिसंवाद केन्सच्या लोकप्रियतेचे व प्रभावाचे निदर्शक आहेत. केन्सच्या विचारांच्या संदर्भात प्रसिद्ध झालेले संशोधनपर लेख आणि असंख्य पुस्तके पाहता इतक्या साधनसामग्रीशी परिचित असणे हे या विषयातील तज्ज्ञ व्यक्तीसच शक्य आहे.

खेर यांचे पुस्तक सहा प्रकरणांमध्ये विभागले आहे. पहिले प्रकरण 'जॉन मेनार्ड केन्स - व्यक्ती आणि कार्य' 40 पृष्ठांचे असून या पुस्तकातील आकाराने सर्वात मोठे प्रकरण आहे. केन्सचा जीवनवृत्तांत सांगताना त्यांच्या जीवनातील ठळक भाग त्यात येईल याची काळजी लेखकानी घेतली आहे. केन्सची तत्त्वज्ञानाची आवड, त्यांचे कला प्रेम, किंबहुना त्यांचे कलासक्त जीवन याचे मनोज्ञ वर्णन यात आहे. केन्स हे 34 वर्षे *Economic Journal* चे संपादक होते. संपादक पदावर असताना नाकारलेल्या लेखांवरही अभिप्राय देण्याचे त्यांचे वैशिष्ट्य तसेच लेकांविषयीची त्यांची आत्मीयता आणि त्याना प्रोत्साहन देण्याची त्यांची वृत्ती महत्त्वाची होती. केन्सचा हिंदुस्थान व हिंदुस्थानच्या ज्या ज्या प्रश्नांशी संबंध आला त्यांचाही लेखकाने आवर्जून उल्लेख केला आहे.

केन्सनी लिहिलेल्या एकूण 17 पुस्तकांपैकी प्रमुख पुस्तकांचा परिचय करण्यात आला आहे. केन्सविषयी जुजबी माहिती असणाऱ्यांना हा परिचय अतिशय उपयोगी पडेल. 1921 मध्ये प्रसिद्ध झालेल्या *A Treatise on Probability* या तत्त्वज्ञानावर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाचा परिचय खेर यानी कुशलतेने करून दिला आहे. विशेषत: त्याचा केन्सच्या विचारप्रणालीवर व विश्लेषणपद्धतीवर झालेला नेमका परिणाम लेखकाने स्पष्ट केला आहे. तत्त्वज्ञानाच्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रात या ग्रंथामुळे भर पडली आहे. संभाव्यता ही संख्याशास्त्रात वारंवारितेशी तर तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात वादविवादाने लाभलेल्या ज्ञानाशी निगडित आहे. केन्सना संभाव्यता जीवनाची मार्गदर्शक म्हणून महत्त्वाची वाटते. मॅगरीज या केन्सच्या चरित्र लेखकाने असे म्हटले आहे की, सगळ्या प्रश्नांचे मूळ शोधण्याची केन्सची जी प्रवृत्ती होती ती प्रवृत्ती अशा अध्ययनातून निर्माण झाली होती. गृहितांच्या वास्तवदर्शिता व निष्कर्षांच्या तर्कशुद्धतेचा केन्सचा आग्रह हा त्यांच्या संभाव्यतेच्या अध्ययनामुळेच शक्य झाला आहे.

सन 1919 मध्ये केन्सनी लिहलेले *Economic Consequences of Peace* हे तत्कालीन लोकप्रिय पुस्तक. त्याची अनेक भाषांतरेही झाली. 1918 च्या सुमारास इंग्लंडचा विजय दृष्टीपथात दिसू लागला त्यावेळी युरोपची पुनर्रचना कशी करायाची, जर्मनीकडून किती खंडणी वसूल करावयाची या प्रश्नांकडे वित्त मंत्रालय व केन्स यांचे लक्ष गेले. ब्रिटिश वित्त मंत्रालयाचा सदस्य म्हणून केन्सनी काम केले पण दोस्त राष्ट्रांनी जर्मनीच्या पात्रतेचा विचार न करता जर्मनीवर फार खंडणी लादली हे न पटल्यामुळे केन्सनी शिष्टमंडळाचा राजीनामा दिला. या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकामुळे केन्सची वाहवा झाली. अर्थात केन्सच्या या पुस्तकावर टीकाही झाली. विशेषत: अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या प्रवृत्तीवर केन्सनी केलेली टीका काहींना आवडली नाही.

*A Treatise on Money* हा दोन खंडांत प्रसिद्ध झालेला केन्सचा एक महत्त्वाचा ग्रंथ होय. पहिल्या खंडात पैशाचा सिद्धान्त तर दुसऱ्या खंडात सिद्धान्ताच्या उपयोजित व्यवहाराचे विवेचन आहे. हॅरॉड आणि जॉन हिक्सच्या मते केन्सच्या *General Theory* मध्ये हाच विचार सुप्तपणे वावरत आहे. काहींना केन्सच्या *General Theory* मधील

प्रतिपादन या ग्रंथातील विचारांशी विसंगत वाटते. केन्सनी वास्तविक पाहता *General Theory* च्या प्रस्तावनेत *Treatise* व *General Theory* यांच्यातील संबंध स्पष्ट केला आहे. अभ्यासकांनी ही प्रस्तावना काळजीपूर्वक वाचावयास हवी. या दोनही ग्रंथांतील विवेचनात फरक आढळतो हे जरी खरे असले तरी तो फरक महत्त्वपूर्ण संज्ञांच्या व्याख्येतील फरकामुळे आलेला आहे. केन्सच्या पाठीराख्यांना केन्सने मारलेल्या या कोलांटउड्या नव्हेत असे वाटते तसेच ते खेरांनाही वाटते. 1936 साली प्रसिद्ध झालेला *General Theory of Employment, Interest and Money* हा केन्सचा सर्वाधिक गाजलेला, अर्थशास्त्राचा मैलाचा दगड ठरलेला आणि अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना परिचित असणारा ग्रंथ आहे. या ग्रंथावर मात्र बरेच त्रोटक विवेचन, जेमतेम पाचसहा पृष्ठांचे, प्रस्तुत पुस्तकात केले आहे. एवढ्या पानांमध्ये या ग्रंथावरील मोजक्या व बोलक्या प्रतिक्रियाही आहेत तसेच सर्वसाधारण सिद्धान्त आणि अविकसित राष्ट्रांच्या प्रश्नांचाही ओझरता उल्लेख आहे. या ग्रंथातील महत्त्वाच्या उणीवा अत्यंत थोडक्यात सांगून या ग्रंथावरील प्रतिक्रिया स्पष्ट करताना पाच महत्त्वाच्या प्रतिक्रिया लेखकाने बारकाईने नमूद केल्या आहेत.

या प्रतिक्रियांमध्ये "वाईट तऱ्हेने लिहिलेले पुस्तक" ही सॅम्युअल्सन यांची तीव्र प्रतिक्रियादेखील आहे. ग्रंथातील संदिग्धता देखील स्पष्ट केली आहे. केन्सच्या अर्थशास्त्राशी खेर पूर्णपणे परिचित आहेतच पण काही महत्त्वाच्या बाबी अधिक सुस्पष्टपणे व सविस्तर लिहावयास हव्या होत्या असे या महत्त्वाच्या भागाकडे पाहून अभ्यासकांना वाटेल. केन्स व मार्क्स यांची तुलना, केन्सचे तत्त्वज्ञान आणि केन्सप्रणीत अर्थशास्त्र या महत्त्वाच्या विषयांवरदेखील या प्रकरणात चर्चा झालेली आहे. केन्सवादापेक्षा नवपैसावाद श्रेष्ठ ठरतो का या प्रश्नाचा परामर्श घेतला आहे. बेकारीवर उपाय म्हणून मागणीचे व्यवस्थापन केले जावे, स्वायत्त गुंतवणुकीवर भर, व्याज दर कमी करावेत असे केन्सवाद सुचवितो. पैशाचा पुरवठा आणि त्याचा परिचलन वेग यातील बदलाने अर्थव्यवस्थेत चढउतार होत असल्याचे दिसून आल्याने व्याज दरापेक्षा पैशाचा पुरवठा महत्त्वाचा असे नवपैसावाद्यांना वाटते. तथापि, पैशाचा पुरवठा वाढूनही अर्थव्यवहार कुंठित झाल्याची उदाहरणे असल्याने नवपैसावादाने केन्सवादावर मात केली असे म्हणणे अर्थातच अवघड आहे.

'केन्स आणि आंबेडकर' या दुसऱ्या प्रकरणात चलन मानकाच्या (monetary standard) संदर्भात केन्स आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिपादनाचा परामर्श घेतला आहे. केन्सनी भारताच्या संदर्भात सुवर्ण विनिमय मानकाची (gold exchange standard) शिफारस केली होती तर बाबासाहेब आंबेडकरानी सुवर्ण चलन मानकाचा (gold currency standard) पुरस्कार केला होता. सन 1925 पूर्वीच्या हिंदुस्थानच्या चलन व वित्तविषयक प्रश्नांसंबंधी केन्स व आंबेडकर यानी स्वतंत्रपणे लिखाण केले आहे. केन्सनी हिंदुस्थानात प्रस्थापित झालेल्या सुवर्ण विनिमय मानकाला उचलून धरले तर बाबासाहेब आंबेडकानी आपल्या *The Problem of the Rupee* या ग्रंथात केन्सच्या मताचा विरोध करताना रुपया स्थिर ठेवण्यासाठी रुपयाची क्रयशक्ती स्थिर ठेवावी लागेल असे प्रतिपादले. त्यादृष्टीने त्यानी सुवर्ण चलन मानकाचा पुरस्कार केला. ऐतिहासिक दृष्टीने या प्रकरणाला महत्त्व असून चलन व वित्ताचा अभ्यास करणाऱ्यांना हे प्रकरण देखील महत्त्वाचे वाटेल. या प्रकरणातून बाबासाहेब आंबेडकर यांची शास्त्रीय दृष्टी व अत्यंत रोखठोक स्पष्टीकरण यांचे अत्यंत योग्य दर्शन घडते. जिज्ञासूंनी यादृष्टीने बाबासाहेब आंबेडकरांचा मूळ ग्रंथच वाचला पाहिजे. (महाराष्ट्र शासनाने बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र वाङ्मयाच्या प्रसिद्ध केलेल्या सहाव्या खंडात तो मुद्रित केला आहे.) या वादातून असे दिसून येते की, साम्राज्याचा प्रतिनिधी म्हणून केन्सनी केलेली शिफारस योग्य आहे पण अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांची शिफारस उचित नाही. हिंदस्थानच्या हिताच्या दृष्टीने आणि

शास्त्रीयदृष्ट्यादेखील आंबेडकरांचे प्रतिपादन योग्य होते. हिंदुस्थानात सुवर्णचलन मानकाच्या आवश्यक अटी जर पूर्ण केल्या तर सुवर्ण चलन मानक यशस्वी होण्यास कोणतीच अडचण नव्हती. वसाहतींतील चलनावर साम्राज्याची पकड राहण्याच्या दृष्टीने हिंदुस्थानात चलनव्यवस्था होती.

'केन्स आणि हिंदुस्थानचा पौंड स्टर्लिंग संग्रह' हे तिसरे प्रकरण फारच छोटेखानी, जेमतेम पाच पृष्ठांचे, आहे. दुसऱ्या युद्धकालात भारताचा आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद अनुकूल झाल्याने भारत धनको झाला. युद्धामुळे भारताची आयात घटली, उलट दोस्त राष्ट्रांनी युद्धसामग्रीची भारताकडून आयात केली. युद्धकालात स्वतः झीज सोसून युद्धासाठी साधनसामग्री पाठविणाऱ्या भारताबद्दल केन्स यानी कृतज्ञता व्यक्त करून ही देणी सन्मानपूर्वक परत करण्याची भूमिका घेतली होती, याचा उल्लेख या प्रकरणात आहे.

चौथ्या प्रकरणात केन्सच्या रोजगारविषयक सर्वसाधारण सिद्धान्ताचा आढावा घेतला आहे. उत्पादन वाढीचे मानवी प्रयत्न हे रोजगार पातळीतून दृग्गोचर होत असतात. समग्र प्राप्ती ही रोजगारावर निर्भर असते. अपेक्षित मागणीला प्राप्तीचे पाठबळ मिळून रोजगार पातळीची निर्धारक प्रभावी मागणी अस्तित्वात येते. प्रभावी मागणीचा एक घटक उपभोग प्रवृत्ती अल्पकालात स्थिर तसेच सीमान्तिक उपभोग प्रवृत्ती एकापेक्षा कमी म्हणून दुसऱ्या घटकावर-गुंतवणूकीवर-केन्सचा विशेष भर आहे. भांडवलाची सीमान्तिक कार्यक्षमता घटत जाते म्हणून व्याज दर अल्प असणे योग्य ठरते. व्याज दरावर नियंत्रण राखणारा म्हणून पैशाचे धोरण महत्त्वाचे ठरते. मंदीच्या कालात गुंतवणूक थांबते, अशावेळी सरकारने त्यात सहभागी व्हावे. किमतीतील घटीमुळे उपक्रमी निराश होतील म्हणून मजुरी वाढविण्यास मुभा असावी असे केन्सना वाटते. या प्रकरणातील विवेचन देखील नऊ पानीच आहे. पृष्ठ क्रमांक 66 वर नजरचुकीने उपभोगातील वाढ भागिले प्राप्तीतील वाढ (△ उ/△ प्रा) म्हणजे 'उपभोग प्रवृत्ती' होय असे म्हटले आहे. तेथे 'सीमान्तिक उपभोग प्रवृत्ती' असे हवे. लेखकाने या प्रकरणाच्या प्रारंभीच असे म्हटले आहे की, ही रूपरेषा अतिशय स्थूल आहे; सर्वसाधारण सिद्धान्त काय आहे याबद्दलची वाचकांची जिज्ञासा चाळविण्यापुरती आहे. समष्टीय अर्थशास्त्राशी परिचय असणाऱ्या वाचकांना त्यामुळे फारसे काही हाताशी लागत नाही. विवेचनातील सफाई थोडी कमी झाल्याचेही जाणवते.

पाचवे प्रकरण 'नवअभिजात, नवसमन्वयी अर्थशास्त्रज्ञ आणि केन्स' या शीर्षकाचे आहे. आपण पाठ्यपुस्तकातून जे समष्टीय अर्थशास्त्र अभ्यासतो ते केन्सच्या सिद्धान्ताहून भिन्न आहे. त्यामध्ये केन्सच्या संकल्पना आहेत. आपण अभ्यासत असलेल्या समष्टीय अर्थशास्त्रात जो समन्वय आहे तो दोन प्रकारचा आहे. एका प्रकारात केन्सप्रमाणे पुरवठ्याची बाजू गृहीत धरून मागणीच्या बाजूने समन्वय साधला आहे. या प्रकारचा प्रयत्न जे. आर. हिक्स आणि पुढे हॅन्सन यानी केला. त्याला नवअभिमत अर्थशास्त्र म्हणून संबोधले जाते. दुसऱ्या प्रकारात मागणी व पुरवठ्याचे विवेचन एकत्रितपणे मांडले आहे. वस्तू, पैसा व श्रम या तीनही बाजारांचा एकत्रित विचार करून सर्वसाधारण समतोल कसा प्रस्थापित केला आहे. या समन्वय करणाऱ्या प्रक्रियेत केन्सच्या मूळ विचारांचा विपर्यास झाला असे काही अर्थशास्त्रज्ञांप्रमाणे खेर यांचेही मत आहे. सदर पुस्तकातील हे एक चांगले प्रकरण असून लेखकानी एका क्लिष्ट विषयाची मुद्देसूद मांडणी केली आहे. लेखकाची विषयावरची पकड या प्रकरणातून जाणवत राहते.

'नवकेन्शियनांच्या संशोधनाची दिशा' हे सहावे व शेवटचे प्रकरण होय. केन्सच्या सिद्धान्ताने सूचित केलेल्या विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी सद्य:स्थितीत नव-केन्सप्रणीत संशोधन तीन दिशेने चालू आहे : (1) किमतींची ताठरता, (2) मजुरीमधील अलवचिकता आणि (3) वास्तविक व्यापार चक्रांची कारणमीमांसा. या प्रकारच्या संशोधनाबाबत इथे

सांगोपांग चर्चा नसून ढोबळ रूपरेषा मांडली आहे. जोखीम टाळण्याच्या प्रयत्नांमधून किमती लवचिक राहात नाहीत. मजुरी लवचिक नसण्याची कारणे कामगारांच्या गुणवत्तेमधील फरक, कामगार काम सोडून जाण्याची शक्यता आणि गुणी कामगार न मिळण्याची शक्यता यामध्ये शोधली जात आहेत. आर्थिक चढउतार हे विशेषेकरून तंत्रविज्ञानातील बदलांच्या प्रमाणात होणाऱ्या स्वैर चढउतारांमुळे घडून येत आहेत.

खेर यानी सोप्या भाषेत पण विषयाची गुणवत्ता कायम ठेऊन प्रस्तुत पुस्तक लिहिलेले आहे. पुस्तकातील प्रकरणांची संख्या व मांडणी अधिक काटेकोरपणे करता आली असती असे म्हणावेसे वाटते. अनेक ठिकाणी स्पष्टीकरण अधिक सविस्तरपणे लेखक सहज करू शकले असते, परंतु बहुधा पृष्ठसंख्येवर मर्यादा असल्यामुळे पहिली दोन प्रकरणे वगळता अन्य प्रकरणे लेखकाला आटोपती घ्यावी लागली. केन्ससारख्या क्रान्तीकारी अर्थशास्त्रज्ञावर लिखाण करताना असा भाग असू शकतो जो विवेचनात आलेला नाही हे अभ्यासकांना जाणवते. मात्र हेही खरे की केन्सच्या या सर्व प्रकारच्या पैलूंवर विवेचन करणे हा कधी कधी लेखकाचा उद्देशही नसतो. क्रान्तीकारी अर्थशास्त्रज्ञ केन्स असे शीर्षक देताना मात्र त्याचे क्रान्तिकारित्व प्रकर्षाने लक्षात येईल हे जाणून लिखाण करणे आवश्यक असते. केन्ससंबंधात केवळ माहिती देणे आणि विश्लेषण करणे हे जेवढे महत्त्वाचे तेवढेच त्यांचे क्रान्तिकारित्व स्पष्ट करणे गरजेचे असते. यादृष्टीने विचार केल्यास हे पुस्तक वाचल्यानंतर केन्सचे क्रान्तिकारित्व पुरेसे ठसत नाही असे वाटते. केन्सच्या संदर्भात त्यांचा सर्वसाधारण सिद्धान्त हा सर्वसाधारण कसा, केन्सचे अर्थशास्त्र मंदीचे अर्थशास्त्र आहे का, आणि ते स्थैतिक अर्थशास्त्र आहे का, अशा प्रश्नांची सविस्तर उकल होणे गरजेचे होते. केन्सच्या समकालिनांमध्ये केन्सचे विचार अधिक लोकप्रिय, प्रभावी का ठरले, तसेच केन्स आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारातील भिन्नता, न्यूनविकसित अर्थव्यवस्थेमध्ये केन्सच्या अर्थशास्त्राची प्रयोज्यता, अशा विषयांवर खेर यानी आधिक सविस्तरपणे लिहावे असे हे पुस्तक वाचल्यानंतर वाटत राहते. पैसाविषयक अर्थशास्त्र हा खेर यांचा आवडता आणि चिंतनाचा विषय आहे याचे प्रत्यंतर हे पुस्तक वाचताना निश्चितच येत राहते. एका महत्त्वाच्या विषयावर मराठीतून पुस्तक प्रकाशित करून खेर यानी मराठीतील अर्थशास्त्रीय वाङ्मय समृद्ध करण्यास हातभार लावला आहे.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यवाहांच्या पत्त्यातील बदल

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह – खजिनदार डॉ. आ. गो. पुजारी हे पुण्यातून मंगळवेढा (जि. सोलापूर) येथे राहण्यास गेले आहेत. तरी सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, परिषदेचे सदस्य आणि पदाधिकारी यानी इत:पर पुढे गरजेनुसार त्यांच्याशी खालील पत्त्यावर संपर्क साधावा. तसेच परिषदेचे सदस्य शुल्क, 'अर्थसंवाद' ची वार्षिक वर्गणी, जाहिरातीचे पैसे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने खालील पत्त्यावरच पाठवावेत; पुण्याला पाठवू नयेत.

डॉ. आ. गो. पुजारी, कार्यवाह – खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
किल्ला भाग, मंगळवेढा (जि. सोलापूर) 413 305
(दूरध्वनी : 02188 - 20556)

# संवाद

*(प्रताप रघुनाथ चिपळूणकर, प्रगतीशील शेतकरी, कोल्हापूर.)*

*अर्थसंवाद*, खंड 23, जुलै-सप्टेंबर, 1999 च्या अंकात प्रमुख संपादक रवीन्द्र दोशी यानी 'आर्थिक वार्ता' या सदरात पान क्र. 169 वर 'बासमती तांदळाची व्यथा' या आपल्या लेखातून जागतिक बाजारात निर्माण केलेल्या या जगप्रसिद्ध तांदळाच्या जातीच्या समस्येबाबत उद्‌बोधक माहिती दिली आहे. रूढ अर्थाने सर्वच माहिती बरोबर आहे. मी गेली 30 वर्षे बासमती भात पिकविणारा कोल्हापूर जिल्ह्यातील एक शेतकरी आहे. माझे काही अनुभव रूढ विज्ञानापेक्षा वेगळे आहेत, ते वाचकांसमोर आणावेत म्हणून ही प्रतिक्रिया व्यक्त करीत आहे.

त्यानी बासमती भाताच्या वैशिष्ठ्या विषयी काही मुद्दे उपस्थित केले आहेत.

(1) जो कोणता तांदूळ अनुवंशिक गुणधर्मांनी युक्त असेल त्याला बासमती तांदूळ म्हणावयाचे का ?

(2) बासमती तांदळाला असणारा वास, चव, स्वाद ही त्याची वैशिष्ट्ये त्याच्या अनुवंशिकतेशी निगडित आहेत की भौगोलिकतेशी ?

(3) बासमती तांदूळ जगात कोठेही विकसित करून उपज करून पिकविता येणे शक्य आहे का हे पीक प्रदेशविशिष्ट आहे ?

मी एक शेतकरी असल्याने आणि माझ्या अभ्यासाच्या मर्यादा पाहता राईसटेकचा टेक्समती, अमेरिकेचा पेटंट कायदा, अगर ब्रिटनची डी.एन.ए. चाचण्याद्वारे अनुवंशिकतेची तपासणी याविषयी मी लिहीत नाही. मी गेली 30 वर्षे सातत्याने वर्षभर आमच्या शेतावर पिकविलेला बासमती तांदूळ खात असल्याने माझी अवस्था अतिपरियात् अवज्ञा अशी झाली आहे. 1996-97 च्या हंगामात नेहमीपेक्षा 40 आर ज्यादा क्षेत्र बासमती भात लावला. उत्पादन अतिरिक्त झाल्याने प्रथमच विक्रीसाठी भात गिरणी मधून भात कांडून तांदूळ तयार केला. असा नमुना जेव्हा घाऊक बाजारातील व्यापाऱ्यांना दाखविला तेव्हा त्यानी कोल्हापुरात बासमती पिकविणे ही कल्पनाच चुकीची ठरविली. इकडे बासमती पिकविल्यास त्याला पंजाबप्रमाणे चव, वास, स्वाद येत नाही. 10 ते 12 रुपये किलो प्रमाणे कोणी घेत असल्यास देऊन टाका आणि या फंदात पडू नका असा सल्लाही दिला गेला. (रत्नागिरी 24 ही स्थानिक जातही त्यावेळी 13 ते 14 रुपये किलो दराने विकली जात होती.) 10 क्विंटल तांदळाचे आता काय करावयाचे ? इतक्या कमी दरात विकणे परवडणारे नव्हते.

भातविषयक संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करीत असता कोल्हापुरात भाताची पेरणी मे-जून मध्ये तर पंजाबात जुलै-ऑगस्टमध्ये होते. त्याचप्रमाणे कापणी इथे सप्टेंबर-ऑक्टोबर या उष्ण हवामानात होते तर पंजाबात नोव्हेंबर-डिसेंबर या थंड हवामानात होते. त्यामुळे तांदळाला वास देणारी तेले पंजाबात टिकून राहू शकतात. त्यामानाने गरम हवेमुळे येथील भात तयार होत असता तेले उडून जाऊ शकतात आणि म्हणावा तसा वास येत नाही. वैशिष्ट्यासाठीच्या भौगोलिक मर्यादा विज्ञानाने अशा स्पष्ट केल्या आहेत. केवळ या कारणासाठी बासमती उशिरा पेरणे आणि कापणी उशिरा करणे अशक्य आहे.

माझ्याकडील तांदूळ खपविण्यासाठी मी त्याच्या लहान लहान पुड्या केल्या आणि अनेक ओळखीच्या लोकाना व मित्रमंडळींना नमुना तपासण्याची विनंती केली. प्रत्येक वेळी पुडी उघडून ज्यावेळी लोकानी वास अजमाविला तेव्हा

तांदळाला फारच उत्तम वास असल्याचे मत दिले. घरात शिजवून खाल्ल्यानंतर अनेकांनी स्वाद व चव उत्तम असल्याचा दाखला दिला. अनेकांनी पंजाबी बासमतीपेक्षा तीनही गुण उत्तम असल्याचे सांगितले. परिचयात अवज्ञा झाल्यामुळे आपल्या मालाच्या प्रतीची ओळख अशा प्रकारे झाली.

भौगोलिक बंधने असूनही असे कसे झाले याची वैज्ञानिक उत्तरे शोधणे गरजेचे आहे. याच अंकात पान 156 वर 'कृषी पर्यावरणाची हानी' आणि त्यापुढील अंक खंड 23, आक्टोबर-डिसेंबर, 1999, पान 250 वर 'शेतीतील सेंद्रिय पदार्थांचे व्यवस्थापन : वास्तव व अनुभव' असे माझे दोन लेख प्रकाशित झाले आहेत. आज सेंद्रिय पदार्थांच्या चुकीच्या व्यवस्थापनामुळे पंजाबच्या बासमतीची गुणवत्ता खालावली आहे. भौगोलिक व अनुवंशिकता या बरोबर जमिनीच्या सुपिकतेशी निगडित असणारी सेंद्रिय पदार्थांचे व्यवस्थापन हीही बाब शेती उत्पादनाच्या गुणवत्तेशी निगडित आहे. तीनही बाबींचा समतोल झाल्यास पंजाबी तांदळाची गुणवत्ता कदाचित उच्चतम असेल. परंतु योग्य व्यवस्थापनाने पंजाबपेक्षा चांगल्या गुणवत्तेचा तांदूळ जगात कोठेही निर्माण करणे शक्य असल्याचे माझे मत मला वाचकांसमोर आणावयाचे आहे.

आज सर्वच धान्ये, फळे, भाज्या याना पूर्वीसारखी चव, स्वाद नसल्याची तक्रार जुन्या जाणकार लोकांची आहे. सेंद्रिय पदार्थांचे चुकीचे व्यवस्थापन हेच यामागील प्रमुख कारण आहे. तांदळाप्रमाणेच गूळ, नारळ, चिक्कू या माझ्या शेतीतील उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत माझा अनुभव वरील संदर्भास दुजोरा देणाराच आहे.

वरीलप्रमाणे कोणत्याही शेती उत्पादनाची प्रत सुधारता येते. आज प्रतीपेक्षा उत्पादन वाढीकडेच शेतकऱ्यांचे व शास्त्रज्ञांचे जास्त लक्ष आहे. योग्य अभ्यासाने भारतातील कोणताही भात पिकविणारा प्रांत बासमतीच्या बाजारात उतरू शकेल. त्यानंतर मग पंजाबी शेतकऱ्यांना गुणवत्तेबाबत जास्त विचार करावा लागेल. जागतिकीकरण व खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये अनेक औद्योगिक उत्पादनांबरोबर कृषी उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत शेतकऱ्यांनाही झगडावे लागणार आहे. अशी वेळ आल्याशिवाय 'कृषी पर्यावरणाची हानी' व 'सेंद्रिय पदार्थांचे व्यवस्थापन' या विषयांचा आणखी सखोल अभ्यास करण्याची गरज निर्माण होणार नाही.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### वार्षिक वर्गणीत वाढ

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि 'अर्थसंवाद' चे वार्षिक वर्गणीदार याना आम्ही कळवू इच्छितो की दिनांक 1 एप्रिल, 2000 पासून वार्षिक वर्गणीमध्ये पुढीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

**(अ) परिषदेचे सदस्य**

(1) **साधारण सदस्य :** रु. 150 (वार्षिक)

(2) **संस्था सदस्य :** शैक्षणिक संस्था : रु. 150 (वार्षिक)

व्यावसायिक संस्था : रु. 200 (वार्षिक)

**(आ) ग्रंथालये :** रु. 150 (वार्षिक). सर्व वर्गणीदारांनी या वाढीची नोंद घेऊन 1 एप्रिल, 2000 ते 31 मार्च, 2001 या वर्षासाठीची वर्गणी वाढीव दराने कार्यवाहांकडे पाठवावी ही विनंती.

**आ.गो. पुजारी**
**कार्यवाह–खजिनदार**

# सांख्यिकी पुरवणी - 33

# भारताचा विदेशी व्यापार

संकलन : रवीन्द्र दोशी
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

तक्ता 1
वस्तू व्यापार शेष (balance of trade)

*(दशलक्ष डॉलर)*

| वर्ष | निर्यात | आयात | वस्तू व्यापार शेष |
|---|---|---|---|
| 1970-71 | 2,031 | 2,162 | -131 |
| 1975-76 | 4,649 | 6,064 | -1,415 |
| 1980-81 | 8,485 | 15,867 | -7,382 |
| 1985-86 | 8,905 | 16,067 | -7,162 |
| 1990-91 | 18,145 | 24,073 | -5,927 |
| 1991-92 | 17,866 | 19,411 | -1,545 |
| 1992-93 | 18,537 | 21,882 | -3,344 |
| 1993-94 | 22,238 | 23,306 | -1,070 |
| 1994-95 | 26,331 | 28,654 | -2,324 |
| 1995-96 | 31,795 | 36,675 | -4,880 |
| 1996-97 | 33,470 | 39,132 | -5,663 |
| 1997-98 | 33,980 | 40,779 | -6,799 |

तक्ता 2

प्रमुख वस्तूंची निर्यात (दशलक्ष डॉलर)

| वस्तू | 1987-88 | 1990-91 | 1997-98 |
|---|---|---|---|
| **(अ) प्राथमिक वस्तू (Primary Products)** | **3,161** | **4,324** | **7,470** |
| ***(1) कृषी व संलग्न वस्तू*** | **2,561** | **3,354** | **6,404** |
| 1 चहा | 464 | 596 | 405 |
| 2 कॉफी | 202 | 141 | 436 |
| 3 तांदूळ | 261 | 257 | 881 |
| 4 कच्चा कापूस | 85 | 471 | 226 |
| 5 तंबाखू | 104 | 147 | 285 |
| 6 काजू बी | 243 | 249 | 374 |
| 7 मसाल्याच्या वस्तू | 260 | 130 | 379 |
| 8 खाद्यतेल | 165 | 339 | 916 |
| 9 फळे व भाजीपाला | 99 | 119 | 152 |
| 10 प्रक्रियायुक्त फळे, रस, इतर वस्तू | 134 | 119 | 173 |
| 11 सागरी वस्तू | 411 | 535 | 1,160 |
| 12 साखर व मळी | 9 | 21 | 67 |
| 13 मांस व मांस वस्तू | 68 | 78 | 216 |
| 14 इतर | 57 | 152 | 733 |
| ***(2) खनिजे*** | **600** | **970** | **1,066** |
| 1 लोहकण | 428 | 585 | 474 |
| 2 इतर | 172 | 385 | 592 |
| **(आ) निर्माणी वस्तू (Manufactured goods)** | **8,195** | **12,996** | **25,430** |
| 1 चामडे व तयार वस्तू | 964 | 1,449 | 1,443 |
| 2 रसायने व संलग्न वस्तू | 567 | 1,307 | 3,120 |
| 3 प्लास्टिक व लिनोलियम वस्तू | 50 | 111 | 512 |
| 4 रबर, काच, रंग, एनॅमेल व वस्तू | 174 | 297 | 689 |
| 5 अभियांत्रिकी वस्तू | 1,152 | 2,250 | 4,982 |
| 6 तयार कपडे | 1,403 | 2,236 | 3,776 |
| 7 सूत, कापड, इत्यादी | 1,084 | 1,540 | 4,271 |
| 8 तागाच्या वस्तू | 186 | 166 | 98 |
| 9 काथ्याच्या वस्तू | 23 | 27 | 68 |
| 10 हस्तोत्पादने (रत्ने, दागदागिने, गालिचे, इ.) | 2,442 | 3,437 | 6,040 |
| 11 क्रीडावस्तू | 44 | 48 | 78 |
| 12 इतर | 104 | 127 | 354 |
| **(इ) पेट्रोलजन्य वस्तू** | **500** | **523** | **353** |
| **(ई) इतर** | **233** | **302** | **727** |
| **एकूण** | **12,089** | **18,145** | **33,980** |

तक्ता 3

प्रमुख वस्तूंची आयात

*(दशलक्ष डॉलर)*

| वस्तू | 1987-88 | 1990-91 | 1997-98 |
|---|---|---|---|
| **(अ) भर आयात (bulk imports)** | **7,019** | **10,848** | **14,655** |
| ***(1) खनिज तेल व पेट्रोलजन्य वस्तू*** | **3,116** | **6,028** | **8,217** |
| ***(2) भर उपभोग वस्तू*** | **1,141** | **557** | **1,365** |
| 1 तृणधान्ये व तयार वस्तू | 50 | 102 | 286 |
| 2 खाद्यतेले | 747 | 182 | 735 |
| 3 कडधान्ये | 194 | 268 | 224 |
| 4 साखर | 149 | 5 | 119 |
| ***(3) इतर भर वस्तू*** | **2,760** | **4,263** | **5,074** |
| 1 रासायनिक खते | 392 | 984 | 1,104 |
| 2 अशोधित धातू | 493 | 614 | 909 |
| 3 कागद व तयार वस्तू | 208 | 254 | 496 |
| 4 कच्चे रबर | 93 | 126 | 160 |
| 5 कागदाचा लगदा व रद्दी | 184 | 255 | 282 |
| 6 धातूंचे तुकडे (scraps) | 373 | 852 | 618 |
| 7 लोखंड व पोलाद | 1,018 | 1,178 | 1,506 |
| **(आ) बिगर-भर आयात (non-bulk imports)** | **10,137** | **13,225** | **26,124** |
| ***(1) भांडवली वस्तू*** | **5,064** | **5,836** | **9,187** |
| ***(2) निर्यातसंबंधित वस्तू*** | **2,585** | **3,680** | **6,737** |
| ***(3) इतर*** | **2,488** | **3,709** | **10,200** |
| **एकूण** | **17,156** | **24,073** | **40,779** |

तक्ता 4

विदेशी व्यापाराची दिशा

*(दशलक्ष डॉलर)*

| देश | 1987-88 | | 1990-91 | | 1997-98 | |
|---|---|---|---|---|---|---|
| | निर्यात | आयात | निर्यात | आयात | निर्यात | आयात |
| **(अ) OECD देश** | **7,122** | **10,266** | **10,249** | **13,773** | **18,925** | **20,732** |
| ***पैकी*** | | | | | | |
| 1 युरोपीय संघ (EU) | 3,034 | 5,708 | 4,989 | 7,067 | 8,555 | 9,754 |
| 2 उत्तर अमेरिका | 2,380 | 1,774 | 2,830 | 3,235 | 7,047 | 4,062 |
| 3 आशिया व ओशनिया | 1,403 | 2,067 | 1,895 | 2,690 | 2,352 | 3,707 |
| 4 इतर | 305 | 717 | 536 | 782 | 971 | 3,209 |
| **(आ) OPEC** | **742** | **2,277** | **1,020** | **3,924** | **3,401** | **9,420** |
| **(इ) पूर्व युरोप** | **2,001** | **1,640** | **3,243** | **1,882** | **1,202** | **1,100** |
| **(ई) विकसनशील देश** | **1,719** | **2,967** | **3,099** | **4,490** | **10,074** | **9,461** |
| ***पैकी*** | | | | | | |
| 1 आशिया | 1,443 | 2,077 | 2,610 | 3,372 | 7,746 | 7,082 |
| पैकी - 1 सार्क | 313 | 76 | 533 | 131 | 1,567 | 250 |
| 2 इतर विकसनशील राष्ट्रे | 1,130 | 2,001 | 2,077 | 3,241 | 6,179 | 6,832 |
| 2 आफ्रिका | 243 | 503 | 394 | 573 | 1,607 | 1,794 |
| 3 लॅटिन अमेरिका | 33 | 387 | 95 | 546 | 722 | 585 |
| **(उ) इतर** | **5** | **6** | **11** | **3** | **26** | **67** |
| **एकूण** | **12,089** | **17,156** | **18,145** | **24,073** | **33,980** | **40,779** |

तक्ता 5

भारताचा सर्वसाधारण आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद (BoP)

*(दशलक्ष डॉलर)*

| तपशील | 1970-71 | 1980-81 | 1990-91 | 1997-98 |
|---|---|---|---|---|
| (1) व्यापारी माल (merchandise) | | | | |
| (अ) निर्यात (जहाज खर्च मुक्त किंमत) | 1,890 | 8,445 | 18,477 | 34,849 |
| (आ) आयात (परिव्यय विमा वाहणावळीसह किंमत) | 2,435 | 16,314 | 27,914 | 51,126 |
| **वस्तू व्यापार शेष (अ – आ)** | **-545** | **-7,869** | **-9,437** | **-16,277** |
| (2) सेवारूप (निव्वळ) निर्यात (invisibles) | -49 | 5,065 | -243 | 9,804 |
| (3) चालू खाते (current account) (1+2) | -594 | -2,804 | -9,680 | -6,473 |
| (4) भांडवली लेखा (capital account) | 580 | 1,665 | 7,188 | 10,984 |
| पैकी (अ) विदेशी गुंतवणूक | 48 | उ.ना. | 103 | 4,993 |
| (आ) विदेशी मदत | 672 | 1,409 | 2,210 | 899 |
| (इ) वाणिज्य कर्जे | 22 | 252 | 2,248 | 3,999 |
| **(5) सर्वसाधारण ताळेबंद (3+4)** | **-14** | **-1,140** | **-2,492** | **4,511** |

तक्ता 6

रुपयाचा विनिमय दर

*(विदेशी चलनाच्या एककास रुपये)*

| वर्ष | अमेरिकी डॉलर | पौंड स्टर्लिंग | ड्यूश मार्क | जपानी येन (दर 100 येनला रुपये) |
|---|---|---|---|---|
| 1970-71 | 7.5578 | 18.0000 | 2.0490 | 2.0800 |
| 1975-76 | 8.6825 | 18.3933 | 3.4458 | 3.0000 |
| 1980-81 | 7.9092 | 18.5042 | 4.1875 | 3.7500 |
| 1985-86 | 12.2349 | 16.8467 | 4.5553 | 5.6200 |
| 1990-91 | 17.9428 | 33.1930 | 11.4351 | 12.7900 |
| 1995-96 | 33.4498 | 52.3526 | 23.3993 | 34.8425 |
| 1997-98 | 37.1648 | 61.0240 | 20.9613 | 30.2990 |

तक्ता 7

भारतात आलेली विदेशी गुंतवणूक

| वर्ष | (अ) प्रत्यक्ष गुंतवणूक | | (आ) रोखारूपी गुंतवणूक | | (अ) + (आ) एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी रुपये | दशलक्ष डॉलर | कोटी रुपये | दशलक्ष डॉलर | कोटी रुपये | दशलक्ष डॉलर |
| 1990-91 | 174 | 97 | 11 | 6 | 185 | 103 |
| 1991-92 | 316 | 129 | 10 | 4 | 326 | 133 |
| 1992-93 | 965 | 315 | 748 | 244 | 1,713 | 559 |
| 1993-94 | 1,838 | 586 | 11,188 | 3,567 | 13,026 | 4,153 |
| 1994-95 | 4,126 | 1,314 | 12,007 | 3,824 | 16,133 | 5,138 |
| 1995-96 | 7,135 | 2,133 | 9,192 | 2,748 | 16,327 | 4,881 |
| 1996-97 | 9,571 | 2,696 | 11,758 | 3,312 | 21,328 | 6,008 |
| 1997-98 | 11,824 | 3,197 | 6,696 | 1,828 | 18,520 | 5,025 |

तक्ता 8

विदेशी विनिमयाचा राखीव निधी

*(दशलक्ष डॉलर)*

| आर्थिक वर्षाची अखेर | एस. डी. आर. | सोने | विदेशी चलन मत्ता | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1970-71 | 148 | 243 | 584 | 975 |
| 1975-76 | 234 | 281 | 1,657 | 2,172 |
| 1980-81 | 603 | 370 | 5,850 | 6,823 |
| 1985-86 | 131 | 417 | 5,972 | 6,520 |
| 1990-91 | 102 | 3,496 | 2,236 | 5,834 |
| 1995-96 | 82 | 4,561 | 17,044 | 21,687 |
| 1997-98 | 1 | 3,391 | 25,975 | 29,367 |

# MARATHI ARTHASHASTRA PARISHAD
## (Established 1977)

# Dr. R.S. Sabnis Memorial Prize

## General Information

An endowment fund has been created by the Parishad with the assistance of a donation from family members of Dr. R. S. Sabnis after his death in June 1999 for the purpose of the award of a prize in his memory on an annual basis. It was decided that the award be given for outstanding contribution in the form of an article on themes from the field of Central Banking. Industrial Finance and General Industrial Economics. These were precisely the areas of special and abinding interest for Dr. Sabnis as a teacher as well as a researcher.

As a founder member and the first Secretary and Treasurer of Marathi Arthashastra Parishad, Dr. Sabnis was closely associated with its activities since its inception in 1977. The Parishad principally aimed at promoting excellence in the field of study, teaching and research in Economics, both theoretical and applied, in Marathi. With this end in veiw, the institution in the initial years, concentrated on two activities-holding the Annual Convention and publication of a quarterly journal *ARTHASAMVAD* in Marathi. Since then, there has been a steady expansion of activities planned and organised by the Parishad for the benefit of its members as well as the general public. These included seminars, symposia, work-shops, public lecture series, publication of books, award of prizes, and so on.

Dr. Sabnis has significantly contributed to the all round development of the Parishad for well over two decades through his enormous organising ability, untiring efforts as also rare sense of dedication and commitment. He ws a distinguished academician and held important positions which included the coveted IFCI Professorship in Industrial Finance at Mumbai University.

**RULES FOR THE AWARD**

1 The essay contest is open to all Indian Nationals above the age of 25.

2 Published articles in standard accredited journals (two xerox copies) on themes belong ing to specified areas in the 'Announcement' will be accepted as entries for the contest.

3 The articles may be in English or Marathi.

4 Only one published article from each participant will be considered for the award.

5 Articles received by us would be forwarded for perusal and comment to a panel of

experts with due care for non-disclosure of the identity of participants for the contest.

6 The President or Executive President of the Parishad will nominate the panel of experts every year and fix its terms and conditions.

7 If in the opinion of the nominated experts, none of the entries received in a particular year could be adjudged as deserving or the award, the prize money for that year would be transferred to the corpus of the Fund.

8 The decision of Marathi Arthashastra Parishad on all matters pertaining to the contest would be final and binding on all participants.

9 The award will be formally given to the winner of the contest at the annual convention of the Parishad sometime in November each year details about which will be communicated in advance to all concerned.

10 The Parishad will arrange for the translation of the award-winning article in Marathi and publish the same in its quarterly journal *ARTHASAMVAD.*

11 Award winning candidate would be held ineligible for sending his entry for the contest for a second time.


**MARATHI ARTHASHASTRA PARISHAD**

**(Established 1977)**

**ANNOUNCEMENT**

The Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis, of Dr. R. S. Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in the form of an article published during calendar years 1998 and 1999 in standard accredited journals on themes belonging to the areas of Central Banking, Industrial Finance and General Industrial Economics. Last date for the submission of entries for the inaugural year's contest is **10th August, 2000.** For further details contact the undersigned at his address :1,Kapil Apartments,NearTejas Society,Kothrud, Pune-411 029.

Dr. V. S. Patankar
Executive President
M. A. Parishad

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सदस्यांची यादी

(एप्रिल–जून, 1999 अंकापासून पुढे चालू)

898 प्रा. एस. बी. मंडले, मालवण

899 श्री भरतकुमार सुबराव सोलापुरे, हेब्बाळ,

900 श्री चंद्रकांत सातप्पा भानुमते, सोलापूर

901 श्री गोरखनाथ शिखरे, कल्याण

902 प्रा. जे. व्ही. हळबे, रत्नागिरी

903 प्रा. सौ. यास्मीन खालीद आवटे, रत्नागिरी

904 प्रा. सौ. संहिता सुहास आठवले, पुणे

905 प्रा. आप्पासाहेब माणिकराव पवार, राजगुरुनगर

906 प्रा. राजेश रामासा चव्हाण, अचलपूर

907 प्रा. राजेंद्र अच्युतराव रसाळ, चाकण,

908 प्रा. रामराव नागोबा गंगासागरे, परभणी

909 श्री अनिल कृष्णराव वावरे, भिलवडी,

910 प्रा. सुनिता शंकर माळी, कळंबी

911 प्रा. वसंत चिंतामण जोशी, पुणे

912 डॉ. अशोक चमणलाल नाणावटी, येवला

913 प्रा. मधुकर रामचंद्र वेदपाठक, म्हसळा

914 प्रा. राजू पंढरीनाथ झाडबुके, मिरज


## मराठी अर्थशास्त्र परिषद

प्रकाशन पाचवे व सहावे

मूल्य व वितरण (भाग 1 आणि 2)

लेखक : ग. प्र. पिंपरकर

या ग्रंथाचे भाग 1 आणि 2 स्वतंत्रपणे आता विद्यार्थी व अध्यापकांना पुनर्मुद्रित स्वरुपात उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रु. 200 आहे. पाच वा अधिक प्रती घेणाऱ्यांना विशेष सूट मिळेल.

वितरक : अनमोल प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे 411 002

पुस्तकाच्या प्रतींसाठी वितरकांकडे मागणी करावी. कार्यवाहांकडेही मिळेल.

*बी. ए. आणि एम. ए. च्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ग्रंथ*

आ. गो. पुजारी

कार्यवाह - खजिनदार

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## 'अर्थसंवाद' स्थायी निधीस देणगी

**रु. 501**

1 डॉ. सु. दा. तुपे, पुणे

**रु. 500**

1 डॉ. दिलीप भोइटे, पुणे

2 प्रा. बाळासाहेब पाटील, पंढरपूर

**रु. 251**

1 डॉ. सौ. कुंदा दामले, पुणे

2 प्रा. एस.एल. पाटील, सांगोला

3 प्रा. बी.एच. कुलकर्णी, सांगोला

**रु. 250**

1 श्री. उपळेकर

2 डॉ. बी. डी. कुलकर्णी, पुणे

**रु. 201**

1 प्रा. एम.एल. अंत्रे, संगमनेर

**रु. 200**

1 प्रा. सर्जेराव ठोंबरे, औरंगाबाद

2 प्रा. सुधाकर अंभोरे

**रु. 150**

1 सौ. मेधा कुलकर्णी, मालाड

**रु. 101**

1 डॉ. सुहास सहस्त्रबुद्धे, सांगली

2 डॉ. दि.व्यं. जहागिरदार, अमरावती

**रु. 100**

1 प्रा. डी.के. पाटील, कवठे महांकाळ

2 प्रा. के. एच. ठक्कर, कोल्हापूर

3 डॉ. बाळासाहेब कांबळे, पुणे

4 प्रा. आण्णासाहेब देसाई, बारामती

5 सौ. नलिनी पंडित, मुंबई

6 प्रा. दत्ता लिमये, पुणे

7 प्रा. आर. जी. रसाळ

8 प्रा. रमेश कटके, गडहिंग्लज

9 डॉ. प्रभाकर भावके

10 प्रा. सौ. शीला सहस्त्रबुद्धे, सांगली

11 प्रा. सौ. वरदा देशपांडे

12 प्रा. सौ. सुनंदा अत्रे

13 प्रा. सौ. विद्या कचरे

14 प्रा. शशिकांत गाडगीळ, कराड

15 प्रा. चितलवार

16 कु. अमिटकर, सांगळे

17 डॉ. अ.रा. पडोशी, गोवा

18 डॉ. सुधा मोकाशी, मुंबई

19 प्रा. चंद्रकांत केळकर, मुंबई

20 डॉ. सुनिल ढेकणे, पुणे

21 प्रा. रमेश आ. देव, देवरुख

22 डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार

23 प्रा. सौ. अपेक्षा मराठे, पुणे

**रु. 75**

1 डॉ. श्रीराम पेडगांवकर, नांदेड

2 डॉ. व्ही.बी. ककडे व श्री. ए.के. वावरे, कोल्हापूर

3 डॉ. ज.फा. पाटील, व प्रा. पां. ना. गावडे, कोल्हापूर

## मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या स्थायी निधीस देणगी

1 प्रा. शरद शंकर जोशी, पुणे 1,001

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## चोविसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे चोविसावे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर/नोव्हेंबर, 2000 मध्ये कन्या महाविद्यालय, मिरज येथे होईल. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर अध्यक्षस्थान भूषवितील. या अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी पुढील विषय निश्चित करण्यात आले आहेत :

1 केन्सनंतरचे अर्थशास्त्रीय सिद्धान्त

2 जागतिकीकरणाचे धोरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील बदल

3 महाराष्ट्रातील ग्रामीण विकेन्द्रीकरण

चौथा विषय आयत्या वेळेचा असेल. परिषदेचे अध्यक्ष तो यथावकाश जाहीर करतील. त्या विषयावर निबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त 2,000 शब्दांत विषय मांडावयाचा असून निबंधासोबत 300 शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. *निबंधाच्या दोन प्रती आणि सोबत गोषवारा पाठविल्याखेरीज त्याविषयीचा निर्णय अध्यक्षांकडून पाठविला जाणार नाही.*

निबंध मराठीतच असावेत. ते पूर्वी कोठेही सादर केलेले वा प्रसिद्ध केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे / शैक्षणिक वा अन्य संस्थेचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीतच देणे आवश्यक आहे.

*प्रत्येक निबंध लेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.*

*31 ऑगस्ट, 2000* ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख असून त्यानंतर पाठविलेले निबंध स्वीकारले जाणार नाहीत. निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत :

**डॉ. भालचंद्र मुणगेकर,**
**कुलगुरू, मुंबई विद्यापीठ,**
**कुलगुरू निवासस्थान,**
**पाटण जैन मंडळ मार्ग,**
**मरीन लाईन्स, (पश्चिम),**
**मुबई 400 020**

**आ. गो. पुजारी**
**कार्यवाह - खजिनदार**

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची विज्ञानावरील प्रकाशने

| अनु. | पुस्तकाचे नांव | लेखक / अनुवादक | किंमत |
|---|---|---|---|
| (1) | रेडिओ दुरुस्ती | श्री. श्री. वि. सोहोनी | 52-00 |
| (2) | रेकॉर्ड प्लेअर | -----''----- | 11-50 |
| (3) | डिझेल इंजिन | प्रा. सुभाष सावरकर | 15-00 |
| (4) | अणुयुग | श्री. वि. त्र्यं. आठवले | 12-00 |
| (5) | पुस्तक बांधणी | श्री. वि. ना. लिमये | 18-00 |
| (6) | खनिज तेल व तज्जन्य रसायने | श्री. प. म. बर्वे | 16-00 |
| (7) | ध्वनिवर्धन आणि वितरण व्यवस्था | श्री. श्री. वि. सोहनी | 22-00 |
| (8) | तेल व मेदे भाग - 1 व 2 | डॉ. न. गं. मगर | 19-00 |
| (9) | वनश्री सृष्टी भाग - 1 व 2 | डॉ. म. वि. आपटे | 20-00 |
| (10) | भौतिक मानवशास्त्र | श्री. वि. श्री. कुलकर्णी | 33-00 |
| (11) | कापडावरील रासायनिक प्रक्रिया | डॉ. रा. श. भागवत | 18-00 |
| (12) | बहुरुपी बहुगुणी कार्बन | डॉ. रा. चं. जोशी | 14-00 |
| (13) | सैद्धान्तिक मृतिका बलविज्ञान (श्री. तेगाझी लिखित पुस्तकाचा अनुवाद) | श्री. श. म. भालेराव | 42-00 |

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रांवर मिळतील.**

व्यवस्थापक,
शासन लेखनसामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद – 431 001.

व्यवस्थापक,
शासकीय ग्रंथागार,
बडवे बिल्डिंग, पी. वाय. सी. जिमखाना
पुणे – 411 004.

प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग,
चर्नी रोड, मुंबई – 400 004.

व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार,
सिव्हिल लाइन्स,
नागपूर – 440 001.